Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

AYURME MANSA
1952 G. K. U.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Samaj Foundation Chenn

AYURME MANSA

main. Gurukul Kangri Co

079433
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

COMPILED

D

Stock Verification-20

Diamond Book Binding House
Moh. Karachi...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें परस्कृत मासिक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

COMPILED

१-१५५२

आयुर्मीमांसा

...ED

निवारी

१९५२

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

079433

★

079433

...क वर्गणी

रुपये

...ोळ अंक

आणे

या अंकांत

संधानविधि

वैद्य पु. वि. धामणकर

पुष्टिकर औषधी कल्प

वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर

निवडक रुग्णचिकित्सा

वैद्य दां. द. जोशी

डॉ. आगाशे रुग्णालय–निधि–निवेदन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉ. मो. ना. आगाशे–रुग्णालय



डॉ. मो. ना. आगाशे यांच्या शष्ठ्यब्दि पूर्तिनिमित्त झालेल्या सत्कार समारंभाचे वेळीं दे. भ. दादासाहेब मावळणकर यांच्या हस्ते या संकल्पित रुग्णालयाची कोनशिला बसविण्यांत आलेली होती. हा संकल्प आता प्रत्यक्षांत येत आहे. इमारतीचें बांधकाम चालू असताना घेतलेले हें छायाचित्र आहे. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यांत बांधकाम पूर्ण होईल. ज्यांनीं या रुग्णालयासाठीं डॉ. आगाशे सत्कार निधीस देणग्या देऊन सहाय्य केलें त्याच्या दातृत्वाचेंच हें मूर्त चिन्ह होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

चालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

१५ वें] जानेवारी १९५२ [अंक १ ला

क वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ही त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचें सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

अनुभवसिद्ध

अर्कशाला–औषधें

यूटोन : गर्भरक्षक
गर्भपोषक
शक्तिवर्धक

लोहीन : रक्तवर्धक
मेंदूला बलदायक
शक्तिदायक

वसंतमिश्रण: जीर्णज्वर, रक्तक्षीणता
व क्षयाची पूर्व
आणि प्रारंभिक लक्षणें
यांवर गुणकारी

शिशुजीवन: लहान मुलांचा
दमा, खोकला, अपचन
यावर उत्तम व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन: मातेचें दूध निर्दोष
करणारे व वाढविणारे
औषध

ही औषधें विक्रेत्यांच्या दुकानीं
अवश्य असली पाहिजेत.

त्यांची मागणी सतत वाढत आहे.

आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छोट्या जाहिराती

वैद्य, डॉक्टर व औषध विक्रेते यांच्या माहितीकरित

आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांची सूची

(हें सदर प्रत्येक अंकांत नियमितपणें प्रसिद्ध होते भारतांतील विशेषतः मुम्बई राज्यांतील सर्व आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांचा या सदराद्वारे वैद्य, डॉक्टर व विक्रेते आणि ग्राहक यांना सातत्यानें परिचय होत असतो. एक प्रकारे "Buyer's Guide" हें या सूचीचें स्वरूप असल्यानें या सदराचें महत्त्व जाहिरातदारांना वेगळें सांगावयास नको.

ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती इतरत्र या अंकांत वर्षाच्या करारानें घेण्यांत आलेल्या आहेत त्यांची माहिती या सूचींत *विनामूल्य* छापली जाते. केवळ सूचीसाठीं मजकूर पाठविणाऱ्या जाहिरातदारानीं वर्षाचे करारानें जाहिरात दिली पाहिजे. वर्षाचा दर फक्त तीस रुपये आहे. ही रक्कम आगाऊ द्यावी लागेल. मजकूर जास्तीत जास्त चार ओळी असावा.)

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकारांच्या औषधी वनस्पतींचें विक्रेते. महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत येतो. वैद्य व गाहकांनीं माहिती मागवावी. वाकेरीभाते खात्रीनें मिळते.

शा जादवजी लल्लूभाई आणि कं०

सर्व प्रकारची काष्ठौषधि व औषधी निर्मितीसाठीं लागणारी कच्ची द्रव्यें यांचे विक्रेते. २४५ काळबादेवी रोड मुंबई २.

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी. (यू. पी.)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. इंजेक्शनविषयक "सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन विज्ञान" या पुस्तकाचे प्रकाशक.

अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (मध्य प्रदेश)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शनचिकित्सा (मूल्य ३ रु.) या पुस्तकाचे प्रकाशक.

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर.

पुरोहित श्वासहारी, शोधना इ. विख्यात औ... निर्माते.

आयुर्वेदिक धन्वतरी फार्मसी अहमदनगर

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धती... वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा (उ. गुजराथ)

छप्पन्न वर्षांपासून चालू असलेली संस्था. शास्... व पेटंट औषधे तयार केली जातात.

अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.,

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. वैद्यांना ...क्शनचे शिक्षण दिले जाते. पत्रव्यवहार— प्रतापगंज ब...

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें तयार केली ज... आयुर्वेद प्रसारक मंडळी या संस्थेच्या रुग्णालयांत तीं प... जातात. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, हैद्राबाद या ... सर्वत्र विक्रेते आहेत.



हें सदर अवश्य वाचा.
तें उपयुक्त आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मो. ना. आगाशे–रुग्णालय–निधी

देणगीदारांना निवेदन

डॉ. मो. ना आगाशे यांच्या षष्ठयब्दिपूर्ति समा-चे वेळीं घोषित केल्याप्रमाणें 'डॉ. आगाशे–रुणा–, उभारण्याचा संकल्प सिद्धीस जात आहे, याचें प्र. मंडळीच्या कार्यकर्त्यांना समाधान वाटते. मात्र सिद्धीच्या आड आर्थिक टंचाईची अडचण डोंगरा-च्या स्वरूपांत उभी होती. ती ओलांडतांना संस्थेला ंचा आधार घ्यावा लागला. ज्या देणगीदारांनी व आगाशे यांच्या चहात्यांनीं रुग्णालय–निधीस य्य केले त्यांचे आभार मानताना आज पुन्हां द्दा त्याना सहाय्यार्चा विनंति करावयाची आहे.

या अंकाच्या दुसऱ्या कव्हरवर बांधल्या जात असलेल्या गाशे–रुग्णालयाचे छायाचित्र दिलें आहे. दि. २ जाने– १९४९ ला डॉ. आगाशे यांच्या सत्कार प्रसंगी दे. भ. साहेब मावळणकर यांनीं या इमारतीची कोनशिला बलेलीं होती. डॉ आगाशे यांच्या चाहत्यानीं व आ. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनीं डॉ. आगाशे यांना ६१००० रुपयांचा सत्कार–निधि या दिवशीं अर्पण तो याच इमारतीच्या उभारणीसाठीं सत्कार–समि-आयुर्वेद प्रसारक मंडळीच्या स्वाधीन केला. आ. प्र. ीनें या इमारतीची जी योजना आखलेली होती तीं होण्यासाठीं आणखीहि खूपच मोठ्या निधीची आव-ता होती. म्हणून डॉ. आगाशे–रुग्णालय निधि या नांवानें ग्रा मिळविण्याचे काम अद्याप चालू आहे.

रुग्णालयाचें दुहेरी महत्त्व

सातारा शहरांत गेली ३५–३६ वर्षें आयुर्वेद प्रसारक ी ही संस्था कार्य करीत आहे. आयुर्वेद शिक्षण आणि ेवा ही तिच्या कार्याची द्विविध रूपें असून ती परस्पराव-आहेत. आयुर्वेद–शिक्षण हें आतां कार्यकर्त्यांनीं स्वतःच्या ेनें चालविलेलें व लोकश्रयावर आधारलेलें कार्य राहि-नसून सरकारचें नियंत्रणाबरोबरच सरकार कांहीं आर्थिक यहि शिक्षणसंस्थांना देते. पण या आर्थिक सहाय्यासाठीं शिक्षण संस्थेस असलेली मंजुरी कायम राहावी म्हणून रच्या सर्व अटी व नियम पाळावे लागतात.

या अटींत संस्थेचें सुसज्ज रुग्णालय असलें पाहिजे ही महत्त्वाची अट आहे. ती पुरी करणें अवश्य होते. १९५२ पासून नवा शिक्षणक्रम अंमलांत येत असल्यानें त्यापूर्वी गालय उभारणें संस्थेच्या मान्यतेच्या दृष्टीनें अपरिहार्य . मात्र सध्याच्या काळांत पुरेशा रुग्णालयाची उभारणी ासाठीं कांहीं लाख रुपयांची गरज लागते. एवढा खर्च करणें संस्थेच्या सामर्थ्या बाहेरचे होते. पण डॉ. आगाशे यांची पुण्याई, संस्थेची सेवा, संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचें संस्थेवरील प्रेम व धनिकांचे दातृत्व यामुळें ६१००० रुप-यांचा निधि जमू शकला व या कार्यास हात घालता आला. शिक्षणसंस्थेसाठीं एक आवश्यक साधन म्हणून जसे रुग्णाल-याचें महत्त्व आहे तसेच ती एक लोकोपयोगी संस्था आहे. हे हि वैशिष्ठच लक्षांत ठेवले पाहिजे. संस्थेच्या रुग्णालयाचा लाभ गेली वीस वर्षे होत आलेला आहे. या नव्या रुग्णाल-यामुळें हा फायदा वाढेल व रुग्णांची मोठ्या प्रमाणावर व परिणामकारक सेवा करता येईल.

आणखी आर्थिक सहाय्याची आवश्यकता

रुग्णालयाच्या खर्चाचा गृहीत अंदाज कमीत कमी दोन लाख रुपयांचा होता. ही इमारत पुरी होण्यासाठीं आणखी एक लाख रुपये संस्थेनें उभारणें आवश्यक होते. इमारतीचे कामकाज चालू असतानाच ही तूट जाणवू लागली. या पेच प्रसंगांतून सुटण्याकरितां शेवटीं गेल्या मे महिन्यांत संस्थेला कर्ज काढावे लागलें. येथील युनायटेड वेस्टर्न बँकेनें ३०००० रुपये व वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें ४५००० रुपये मिळून ७५००० रुपयांचें कर्ज दिले आहे शिवाय पंचवीस हजार रुपये पाहिजेतच. युनायटेड वेस्टर्न बँकेंचे कर्ज अल्प मुदतीनें असल्यामुळें ते येत्या मार्चपूर्वी फेडावे लागणार आहे. वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे कर्ज १० वर्षांच्या मुदतीनें प्रतिवर्ष हप्तेवंदीनें फेडावयाचे आहे.

या आर्थिक जवाबदारींतून संस्थेची मुक्तता व्हावी यासाठीं संस्थेच्या हितचिंतकांपुढें कांहीं योजना मांडाव्याशा वाटतात. त्या पुढे देत आहोत.

१ संस्थेच्या ज्या माजी विद्यार्थ्यांनीं आश्वासनें दिली आहेत पण अद्याप देणगीची प्रत्यक्ष रक्कम पाठविलेली नाहीं त्यांनीं ती त्वरित धाडून द्यावी.

२ ज्यानीं वैयक्तिक देणगी दिली आहे अशा माजी विद्यार्थ्यांनीं आपल्या कार्यक्षेत्रांतून रुग्णालय निधीसाठीं देणग्या मिळविण्याचा प्रयत्न करावा. प्रतिवर्षी अशा देणग्या १००।२०० रुपयांच्या जरी मिळाल्या तरी पांच वर्षांत कर्ज-मुक्तीच्या कामीं त्यांचा चांगला हातभार लागेल.

३ ज्यांना संस्थेस कर्ज देणें शक्य असेल त्यांनीं अवश्य कर्ज द्यावे. संस्था अशा कर्जावर दरसाल चार टक्के व्याज देते.

४ कर्ज देऊ शकणारे असे कोणी परिचित गृहस्थ असतील तर माजी विद्यार्थ्यांनी त्यांना संस्थेस कर्ज देण्याची विनंती करावी.

माजी विद्यार्थ्यांनीं या योजना उचलून धरल्या तर कर्ज फेडीच्या दिव्यांतून संस्था पार पडू शकेल असा मला मला विश्वास आहे. मी या प्रिय माजी विद्यार्थ्यांच्या व संस्थेच्या हितचिंतकांच्या आश्वासनपर पत्रांची वाट पहात आहे.

वि. ल. आगाशे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुष्टीकर औषधी कल्प

ले:—वैद्य दत्तात्रेय शास्त्री जळूकर नशिराबाद.

वैद्यकीय चिकित्सा कार्यात निरोगी व रोगी ह्या दोघां-नाहि पौष्टिक औषधें देण्याची पाळी वैद्यांना येत असते. रोग्यांचे दीर्घ कालीन रोग संपल्यानंतर शरीरघटकांची झालेली झीज भरून येण्यासाठीं आणि निरोग्यांना असलेली शक्ति कायम राहून जमल्यास अधिक वाढण्यासही अशा प्रकारची औषधें द्यावीं लागतात. परंतु तीं देतांना अथवा सुचवितांना ज्यांस ते द्यावयाचे अथवा सुचवावयाचें त्यांच्या दूष्य, देश, बल, काल इत्यादींचा विचार अवश्य करावयास हवा. अलीकडे जाहि-रातींचा सुळसुळाट असलेल्या युगांत शक्तिवर्धक (Tonic) ह्या नांवाखालीं औषधी निर्माते आपापलें घोडे पुढें दामटीत असतात; व त्यातील भपकेदारपणास भुलून तीं औषधें घेणारें कांहीं थोडे थोडके आढळत नाहींत. फार काय भरपूर कमिशन व कांहीं नमुन्याच्या बाटल्या (samples) मिळाल्यावर त्या औषधांचा प्रचार आणि प्रसार करण्यांत डॉक्टर व वैद्यांतहि जणूं स्पर्धा चाललेली आढळून येते. परंतु गरजवंताची गरज आणि पुरविला जाणारा माल ह्या दोहोंच्या कुंडलीतील परस्पर ग्रहमान न जुळल्यास अशीं औषधें देणारे व घेणारे या दोघांवरही पश्चातापाची पाळी आल्याखेरीज राहात नाहीं. यासाठीं अशा जरूरीच्या वेळा व त्यावेळीं द्यावयाचें औषधीकल्प या संबंधी प्रस्तुत लेखांत विचार कर्तव्य आहे.

पौष्टिक औषधांचे प्रकार

१ बृहण २ वृष्य ३ वाजीकर ४ रसायन

सामान्यत: ह्या पौष्टीक औषधांचे ह्या प्रमाणें चार वर्ग करता येतोल. यांतील पहिले दोन प्रकार आजारीपणांतून उठल्यानंतर व शेवटचें दोन प्रकार स्वास्थ्यरक्षण आणि संव-र्धन यासाठीं वापरावे लागतात. ह्या संबंधी शास्त्रकारांनीं खालील प्रमाणें विवेचन केले आहे.

बृंहण— बृंहयेत् व्याधि भैषज्य मद्य स्त्री शोक कर्षितान् ।
भाराध्वोरः क्षतक्षीण रूक्ष दुर्बल वातलान् ।
गर्भिणी सूतिका बाल वृद्धान ग्रीष्मे ऽ परानपि ।
(वा. सू. अ. १४)

रोगांनीं, अतिरिक्त औषध सेवनानें (वमन वि सारख्या क्षीण करणाऱ्या) मद्य पानानें, अत्यंत स्त्री से तसेंच शोक, ओझे वाहणें, दूर अंतराचा पायीं प्रवास इत्यादी कारणांनी, शिवाय शरिरांत कोठेही व्रण होऊन रक्त गेल्यामुळें जे क्षीण झालेले असतील, ज्यांची प्रकृती आहे, अशक्त, वात प्रकृतीचे, गर्भिणी व बाळंतीण लहान अर्भकें व वृद्ध ह्यांना बृंहण द्यावें. तसेंच सामान्यत: ऋतूमध्यें या व्यतिरिक्त कोणासही बृंहण देतां येतें, असा सूत्राचा अर्थ आहे. अर्थातच् ह्या सर्व लोकांना कृशत्व होऊन बल वाढावें आणि शरीर पुष्ट व्हावें या गोष्टी आवश्यकता असते. भगवान् चरक मुनींनीं

" बलं पुष्टयुपलंभश्च काश्व दोष विवर्जनम्
लक्षणं बृहिते " (च. सू. स्था. अ. २३)

ह्या शब्दांनीं हेंच सांगितले आहे. व त्या साठीं—

" गुरू शीत मृदु स्निग्धं बहलं स्थूल पिच्छिलम्
प्रायोमंदं स्थिरं श्लक्ष्णं द्रव्यं बृंहणमुच्यते "
(च. सू. स्था. अ.

म्हणजे पचनास जड वीर्यानें शीत व गुणांनी मृदू, बहल (घन) स्थूल (संहतावयव) पिच्छिल (बुळबुळीत) (सावकाश काम करणारे) स्थिर व श्लक्ष्ण अशा द्र उपयोग करण्यांस सुचविलें आहे. शिवाय केवळ औष भागणार नाहीं हें ओळखून—

" अचिंतया हर्षणेन ध्रुवं संतर्पणेनच
स्वप्न प्रसंगाच्च कृशो वराह अिव पुष्यति ॥
(वा. सू. स्था. अ.

हें ही सुचवून ठेविलें आहे. अर्थातच् निष्काळजीपणा, आ वृत्ती व भरपूर झोप ह्या गोष्टी मिळाल्या तरच बृंहण केलेलें हे उपचार यथायोग्य लागू होऊन पुष्टि प्राप्त हो लक्षांत ठेवणें जरुर आहे. आता ह्या दृष्टीनें बृंहण कोणते होतात ते पाहूं.

धान्याहारांत मुख्यत: यव (सातू) व गोधूम ह्यांचा प्रामुख्यानें समावेश असावा. हीं दोन्हीं वर सांगित बृंहणासाठीं आवश्यक अशा गुरुशीतस्निग्ध आदिगुणांनीं असतात. यांतच पुन्हा दूध तूप व साखर यांसारख्या स आणि सर्व प्रकारच्या जीवनीय अंशांनीं संपन्न द्रव्यांची देऊन निर्माण होणारे योग म्हणजेच आहार द्रव्यांतील होत असें म्हटल्यास हरकत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधीय द्रव्यांत भुईकोहळा, शतावरी, माषपर्णी, पर्णी आणि वंशलोचन, गुळवेल, वरधारा, कमळ यां- खीं द्रव्यें तृप्तीकारक, जीवन, शक्तिवर्धक व क्षीणांना दायक म्हणून बृंहण वर्गांत घालतां येतात.

सिध्दौषधीमध्यें अश्वगंध पाक, बदाम पाक, ब्राह्य यन तशींच शतावरी कल्प, द्राक्षासव, चंद्रप्रभा लक्ष्मी- ास व चतुर्मूख रस ह्यांचाहि समावेश बृंहण योगांत केला ल.

वृष्यकल्प

पौष्टिक औषधांत फारच थोड्या फरकानें उपयोगांत रा बृंहणासारखा वृष्य हा योग आहे.

वृष्य हा शब्द वृष ह्या शब्दावरून साधलेला आहे. , पान आणि संचार स्वातंत्र्य देऊन अनिर्बंध सोडलेल्य स वृष किंवा पोळ अशी संज्ञा आहे. ग्रामीण भाषेंत सांड ही म्हणतात. बृंहणास आवश्यक अशा अचिंता इत्यादि गोष्टी त्यांचा पुरेपूर उपयोग ह्या पशूचें बाबतीत केला ो व त्यामुळें तो पशू धष्टपुष्ट, बेडर, सुस्त व मस्त असा असतो हें आपण व्यवहारांत पहातोंच. अर्थातच् च प्रकारें कोणत्याहि प्रकारची जबाबदारी अथवा काळजी ं, यथेष्ट संचार करणें, व रिकामपणीं स्वस्थ झोप घेणें, सवलती देऊन वर वर्णन केलेलेच सर्वही बृंहण योग हे ि व वृष्यही होऊं शकतात. अर्थातच् या दोहोंतील फरक ल तर तो तात्विक दृष्टीनें. बृंहणापेक्षां वृष्य योगांत मान- स्वास्थ्य अधिक आवश्यक असते एवढाच म्हणतां येईल.

सूक्ष्म दृष्टीनें एक निराळी गोष्ट येथें सांगून इष्ट अनिर्बन्ध खान, पान, आसन, व शयन असलेला पोळ कामांध बनलेला आढळतो. अर्थात् शरीर पुष्टी होऊन कता वाढविण्याचें दृष्टीनें जेव्हां उपचार करावयाचें ील तेव्हां वृष्य योगांचीच अधिक उपयुक्तता असतें. ह्या नें बृंहण कल्पाशिवाय आणखी ही कंदर्प पाक, गोक्षुर , जातीफलादि मोदक, आकारकरभादि चूर्ण, पुष्प धन्वा- कवचबीज पाक, पूर्ण चंद्रोदय किंवा मकर ध्वज, सुवर्ण ंगेश्वर, इ. औषधीयोग उपयोगांत आणतां येतील.

वाजीकर योग

सर्व बाजूंनीं प्रकृती निर्दोष असून केवळ कामशक्ति किंवा नष्ट झालेल्या लोकांसाठीं वाजी म्हणजे अश्व, घोड्याप्रमाणें फुप्फुसांची शक्ति असणें व कामशक्ति असणें ह्या दोन गोष्टी साधण्याच्या दृष्टीनें वाजी- योग चिकित्सा कार्यांत वापरावे लागतात.

अपत्य सन्तान करं यत् सद्यः संप्रहर्षणम् ।
वाजीवाति बलोयेन यात्य प्रतिहतोंगनाः ॥१॥
भवत्यतिप्रियःस्त्रीणां येन येनोपचीयते ।
तद्वाजीकरणं तद्धि देहस्योर्जस्करं परम् ॥२॥

अल्पसत्वस्यतु क्लेशैर्बाध्य मानस्य रोगिणः ।
शरीर क्षय रक्षार्थं वाजीकरण मुच्यते ॥३॥

(अ. हृ. उत्तर ४०)

श्रीमद्वाग्भटाचार्यांनीं वाजीकरण शद्बाच्या ह्या व्याख्येत हें स्पष्ट सांगितलेंच आहे कीं शुक्र धातूचें ठिकाणीं सन्तानोत्पादन क्षमता निर्माण करून तद्द्वारां स्वतःच्या चित्ताची प्रसन्नता व स्त्रियांच्या कामशांतीचें सामर्थ्य अखंडित ठेवणारे सर्वही योग वाजीकरण नांवानें ओळखिले जातात.

नानाविध कष्टांचीं कामें करून शरीर व मनानें दुबळ्या झालेल्या लोकांसाठींच वाजीकरणाची आवश्यकता असते.

अर्थातच् शुक्र ओज वृद्धी करण्याचें सामर्थ्य असणारीं सर्वही द्रव्यें ह्या योगांत वापरणें इष्ट आहे.

संतान निर्मिति हा वाजीकरणाचा मुख्य उद्देश असून स्त्री व पुरुष ह्या दोनही निरोगी देहांतील परस्परानुरूप गुणांचा संयोग होणें आवश्यक असल्यानें कामशास्त्रोक्त, गुणसंपन्न पुरुष आणि स्त्री हीं परस्परांची प्रधानतम वाजीकर द्रव्यें होत. कामशास्त्राच्या दृष्टीनें अपत्य लाभार्थ स्त्री पुरुषांच्या गुणांचें विवेचन हा एक स्वतंत्र विषय असल्यानें तो टाळून आपणांस येथें फक्त त्या गुणांचा परिपोष करणाऱ्या द्रव्यांचाच विचार करणें कर्तव्य आहे, तो पुढील अंकीं करूं.

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकूण २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुप्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३।।, ६ व १० किमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विकत मिळतें अगर

कारखानदार
डॉ. पुरोहित फार्मसी,
कोल्हापूर (एस. एम. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभूत–चिकित्सा

वात संग्रहणी

लेखकः– वैद्य– दामोदर दत्तात्रय जोशी.

आयुर्विद्याविशारद व भिषक्‌शिरोमणि, सांगली

सांगली नगरपालिकेच्या आयुर्वेदिक दवा खान्यांत खालील रुग्णबाई वातसंग्रहणीच्या रोगांपासून कशा बऱ्या झाल्या यासंबंधीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

रूग्णबाई वयानें २२ वर्षाच्या, धंदा शेतकीचा. मराठा जातीच्या.

इतिहासः— रूग्णबाईना सुमारें २ महिन्यापासून दिवसांतून ८।१० वेळां सद्रव व सशूल मलप्रवृत्ती होत असल्याचें कळलें.

निदानः— २ महिन्यांची दीर्घकालीन अतिसृतीचीं सशूल लक्षणें, मुखपाक, शोक, रुक्षता वगैरे लक्षणावरून वात-संग्रहणी रोगाची निश्चिती होण्यास वेळ लागला नाहीं.

लक्षणें:—रोगी प्रथम आमचेकडे आली त्यावेळीं तिला ८।१० वेळां गडगडून व सशूल अशी मलप्रवृत्ति रोजी होत असल्याचें बाईनें सांगितलें जिभेवर लाली असून तोंडास तिखट मुळीच लागूं देत नाही असें बाई म्हणाल्या. मुखपाक हें संग्रहणींतील प्रमुख लक्षण येथें आढळलें. आटोप हें वात संग्रहणीचें लक्षणही रुग्णांत आढळलें. वरचेवर हात व गृधी सर्वसानाम " खा खा करण्याची व सर्व पदार्थ खाण्याची हविषा हें संग्रहणी-तील एक मुख्य लक्षण या रुग्णांत आढळलें.

चिकित्सा:—तारीख ३।११।५१ ला औषधाला सुरवात झाली. पहिल्या दिवशीं सकाळ, दुपार, संध्याकाळ व रात्रीं ४ वेळां ग्रहणी वज्रकपाट २ गुंजा डाळिंबाचा रस. प्रत्येक खेपेस ४ चमचे यांतून घेणेस दिलें. दुसरेच दिवशीं वरील औषधानें ६ च वेळां शौचास झालें व शूल थोडा कमी झाला. पण कासाचीं लक्षणें थोडी सुरू आहेत असें रूग्ण-बाईनें सांगितल्यामुळें दाडिमाष्टक २ मासे मधांतून वरचेवर चाटण्यास दिलें व वरील औषधहीं पूर्ववत चालूच ठेवले. वरील योजनेने चौथें दिवशीं अतिसृति निम्मी कमी झाली. कासही थोडा कमी झाला. शूलजवळ जवळ नाहिसाच झाला.

तारीख ८–११–५१ ला म्हणजे ६ वें दिवशीं मल प्रवृतीस १ च वेळां व घन होऊं लागली. कास व शूल यांचा संपूर्ण निरास झाला. रोग्यास भूक लागलीं. मुखपाक कमी होऊं लागला.

वरील औषधी योजना १३।११।५१ अखेर ठेवली. या अवधीत संग्रहणीची पूर्ण लक्षणें नाहीशी रोग्यास भूक लागू लागली. शूल व कास पूर्वीच होती. मुखपाकहि नाहिसा झाला. व खा खा कर प्रवृत्ति नाहिशी झाली. रोग्याच्या तोंडावर तेज दिसू मलप्रवृत्ती १ च वेळ व घन होई.

तारीख १४।११।५१ पासून औषधांत बदल सकाळ संध्याकाळ फक्त २ वेळां अग्निकुमार २ गुंजा व ताजें ताक १ वाटी व पादेलोण ।' भार यांतून घेणेस वरील योजना सुमारें १६ दिवस पुढें चालूं ठेवली. पुढें ३।१२।५१ पासून अग्निमांद्य चिकित्सा म्हणून सकाळ सा काळीं भास्कर लवण १ मासा ताजें व गोड ताक १ व पादेलोण ।' भार यांतून चालूं ठेवलें. ही औषधी सुमारें १० दिवस चालू ठेऊन पुढें येथील औषध बंद केले शक्तिवर्धक म्हणून 'लोहासव' हें औषध दोन्ही जेवल्यावर ४ चमचे औषध व दुप्पट थंड पाणी यांतून दिलें. हें शक्तिवर्धक सुमारें २ महिनें चालू ठेवण्याचा दिला.

वरीलप्रमाणें औषधीयोजनेनें या बाईचा सं संपूर्ण नाहिशी होऊन ती आपल्या घरीं गेली

पथ्य—या बाईस सुरवातीस केवळ गोड व ताजें भाताच्या लाह्याचें पीठ शर्करा मिश्र करून ताकांतून व हेंच पीठ ताजें ताक व पादेलोण यांतून घेणेचा सल्ला प्यावयास उकळून थंड झालेलें पाणी व दुपारी व गोड पिकलेले डाळिंब, या प्रमाणें, आठवडा पथ्य ठेवले

आठवड्यानंतर भाताची पेज दुपारीं व रात्रीं तू पादेलोण घालून घेणेस सांगितले दुपारी व रात्री पूर्ववत् पीठ व मधून मधून लाहयास तूप मीठ लावून घेणेचा दिला. पुढें ८ दिवसानंतर कण्हेरी, आटवल या रितीनें दिवसानंतर भात मुगाचें, वरण, ताजें ताक, पादेलो डाळिंब व भाताच्या लाह्या या अन्नावर रोग्यास राह सल्ला दिला. पिण्यास उकळलेलें पाणी घेणेचा सल्ला होता.

भाताच्या लाहया व ताजें गोड ताक संग्रह रोग्यास जीवन आहे. भाताच्या लाह्या पचनास हलक्या त्या तृषा शामक व संग्रहणीच्या मलांतील द्रवांश करणाऱ्या म्हणजें ग्राही आहेत. अंतड्यांना शा आमल्या व कमी करणाऱ्या आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताजें गोड ताक हें दीपन व पाचक असून संग्रहणी
अग्निमांद्य नाशक, ग्राही, तृषा शामक व आंतड्यातील
न खळबळ नाहिसे करण्यांत श्रेष्ठ आहे.

या रोगांत वापरणेंत आलेलें ' ग्रहणी वज्रकपाट '
औषधांतील सुवर्ण मौक्तिक व रौप्य यांचीं भस्में संग्रहणी
ांत आंतड्यास हृदयास व फुप्फुसास बल्य म्हणून उपयोगी
ात. यांतील पारा व गंधक हीं रसायनें आहेत. अतिवीष,
रमोथे धायटीचीं फुलें, इंद्रजव व गुळवेल यांच्या भावना
ामुळें औषध ग्राही बनलें आहे. यामुळें संग्रहणी रोगांत
औषध मलांतील द्रवांश कमी करून अग्निमांद्याचा निरास
ं व आंतडी व हृदयांचें बलवर्धन करून रोग्यास चैतन्य
हें औषध अग्निदीपक म्हणून या रोगांत श्रेष्ठतम ठरलें

' अग्निकुमार ' या औषधांत पारा, बचनाग, गंधक,
णखारलाही, मिरी, शंखभस्म व कपर्दिकभस्म अशीं
न, अग्निमांद्यनाशक, ग्राही व हृदयोत्तेजक अशीं औषधें
यामुळें या औषधानें रोग्यास चांगली भूक लागावयास
होऊन पोटांतील कळ व मलांतील द्रवांश कमी होऊन
णी रोग्याचा निरास झाला.

या नंतर वापरलेलें भास्कर लवण या औषधांत पंच-
, पिंपळी, सुंठ, पहाडमूळ चित्रकमूळ, कुडासाल, व
ार, व डाळिंब रसभावना दिल्यामुळें हें चूर्ण अग्निदीपक
ठ्यांतील वात नाशक व ग्राही गुणांमुळें संग्रहणीचा बी
करणारें उत्कृष्ट चूर्ण आहे. या नंतर शक्तिवर्धक म्हणून
यास सांगितलेलें लोहासव हें औषध प्रत्यक्ष रक्तांतील
ालिक वाढविणारें व त्याचबरोबर अग्निदीपक
द्धकोष्टता न वाढविणारे आयुर्वेदीय दिव्य औषध
यांत त्रिफळा या चूर्णामुळें लोहाचा बद्धकोष्ठ होण्याचा
नाहिसा केलेला आहे. तसेच त्रिकटू, चित्रक वगैरे
ुळें दीपन पाचनाचा हेतु साधलेला आहे. इतर औषधें
व रक्तवाढीस बल्य व उपकारक अशीं वापरलेलीं
. एकंदरीत हें आसव रक्तवर्धक अग्निदीपक व बद्ध-
नाशक म्हणून सर्वोत्कृष्ट ठरलेलें आहे.

वरीलप्रमाणें चिकित्साक्रमानें सदर वात संग्रहणीच्या
या मोठ्या आजारांतून संपूर्णपणें बऱ्या झाल्या.

आयुर्वेदीय अर्कशाला

हैद्राबाद राज्य सोल एजन्सी

हैद्राबाद राज्यांतील वैद्य व विक्रेते यांनीं आयुर्वेदीय अर्कशाळेच्या मालाविषयीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ज. बा. बापट
अर्कशाला सोल एजन्सी ऑफीस
आनंदस्वामी रोड
जालना

हैद्राबाद शहरांतील
अर्कशाला औषधांचे
प्रमुख विक्रेते

आयुर्धाम मेडिकल हॉल

सुलतान बझार हैद्राबाद

यांचेकडे आयुर्वेदीय अर्कशाला लि.,
सातारा यांची सर्व औषधें मिळतात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधीकरण-शास्त्र

संधान-विधि

(लेखांक सहावा)

लेखक—वैद्य, पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर पनवेल

टिकाऊ काढे

हा प्रकार अलिकडेच आणि तोही नव्यानेंच रूढ झाला आहे. पण ताजा काढा आणि हा कल्प ह्यांत महदंतर आहे. काढ्यांत वनस्पतींचें कांहीं कण अंतराळीं तरंगत असतात. ते काढ्याबरोबर पोटांत जातात, कार्यकारी ठरतात. टि. काढ्यांत हा भाग उरत नाहीं. काढ्यांत कोहळ अगर अम्ल ह्यापैकीं कांहींही असत नाहीं. त्यामुळे तो सौम्य व मृदु राहतो. टि. काढ्यांत कोहल अम्ल असल्याने तो तीव्र व तीक्ष्ण होतो. अशा प्रकारचा फरक काढा व टि. काढा ह्यांत असल्यानें ते एकमेकाचे प्रतिनिधि होत नाहींत. अशोकसाल काढा व अशोकारिष्ट किंवा बाळंत काढा ताजा व टिकाऊ ह्यात्ते गुणधर्मात फार फरक आढळतो. वनस्पतींचें शास्त्रोक्त गुणधर्म हुकुमी लाभण्यास त्यांचा ताजा काढाच घ्यावा लागतो. टि. काढा विधींत रासायनिक परिवर्तन होत असल्याने द्रव्य व गुण हीं दोन्हीहीं बदलतात. टि. काढा आणि आसव ह्यांच्या प्रक्रिया गुण सारख्याच असल्यानें टि. काढा म्हणजे एक प्रकारचीं आसवारिष्टेंच होत.

मद्य कल्प

संधान विधीचे पोटभेद तीन. हे विभाग विधीवरून पडलेले नाहींत तर त्या त्या पदार्थाचें रसावरून (१) आसवारिष्टें हा वर्ग मधुराम्ल रसात्मक होय. (२) मद्य पंचरसात्मक खरें पण त्यांतही अम्ल रसाचे उत्कटत्व, अम्लरसास प्राधान्य. अर्थात् हा कल्प अम्लरसात्मक गणला गेला. उदा० मद्यमम्लेषु श्रेष्ठम्। (च.) सर्वेषां मद्यमम्लानामु पर्युंपरितिष्ठते। च. चि. (३) तिसरा प्रकार राहिला तो लोणच्या रायत्यांचा. यांस तीन रस असतात. तिखट, आंबट खारट. हे तिन्ही रस उत्कट असल्यानें ह्याचा रस कट्वम्ललवण असा धरला गेला.

हे तिन्ही प्रकार एकाच विधीनुसार तयार होतात पण ते तयार करण्याचे हेतु व त्याचे पदार्थ भिन्न भिन्न असल्यानें ते निरनिराळ्या गुणांचे व कार्याचे तयार होतात. आसव आणि मद्य आणि लोणचें ह्यांत अम्लरस सामान्य आहे, आणि आसवांत तर हा आम्लरस अत्यंत वर्ज्य मानला असें वैविध्य ह्यांत असलें तरी हीं तिन्ही अपत्यें संधान विधीचींच होत.

हेतु:—प्रत्येक कल्प रचतांना उद्दिष्ट फल नजरे ठेवून, तद्नुसार द्रव्यें व विधींचीं निवड करतात. हे कांहीं वेळां सुरवातीसच स्पष्ट दिलेले असतात. तर वेळेस ते परिणामरूपांतच अंतर्भूत असतात. त्यामुळें कल्पाचे सामान्य गुण तेच त्या निर्मितीचे हेतु; असें धरावें लागत आहे. चरकाचार्यांनी मद्याचें सामान्य गुण.

मद्याचे गुण

" हर्षणं प्रीणनं बल्यं भयशोक श्रमापहम्।
प्रागल्भ्य वीर्यप्रतिभा तुष्टि पुष्टि बलप्रदम्॥ "

असें वर्णिलें आहेत.

तर वाग्भटानें

" अनलोत्तेजनं रुच्यं शोकश्रम विनोदकम्।
नचातः परममन्यदारोग्य बलपुष्टि कृत्॥

असे सांगितले आहेत.

चरकमतें मद्य हें हर्षण म्हणजे आल्हाद देणारें, वाग्भटमतें तें उत्तेजित करणारें आहे. त्यांत चढत्या श्रे फार मोठा फरक आहे तो कालमानानें पडला असावा. मितीस तर मद्य हें पेय नुसतें उत्तेजकच नव्हे तर मा आहे, असें दिसतें. तेव्हां मूळ कल्पनेंत व्यवहार अनुरो कालांतरानें फरक होत जातो, असें दिसतें. सारांश असा उत्तेजक, मादक असें एखादे पेय निर्माण करणें हा आज सुरानिर्मितीचा हेतु स्पष्ट व दृढ झाला आहे खरा.

विधि:— वरीलप्रमाणें इष्ट गुणोपेत द्रव्य तयार यचें तर एकांच प्रकारचें विधीनें साधत नाहीं. त्या अनेक विधींचें सहाय्य घ्यावें लागतें. मद्य निर्मितींत निष्क संधान, उद्धरण ह्या तीन विधींचा अंतर्भाव झाला निष्कासनानें आधार तयार होतो. संधानांत अम्ल व यांचा जन्म होतो आणि उद्धरणानें अम्ल व कोहल यांची वाढून मद्याची शक्ति वाढतें. ह्या विधीत आधार अगर द्रव्यांच्या गुणांची अपेक्षा, फार नसते. तर अम्ल व कोहलयु पाहिजे असतो. हें कार्य उद्धरणानें चांगलें साधतें, म्हणून पहिल्या दोन्हीं पेक्षां तिसऱ्या विधीस अधिक प्राधान्य आ

आधार:—मधाचे आधार उभ्दिजच पण अ मानानें त्यांचे प्रकार थोडे. आसवांत धान्यांचा समावेश नाहीं. तो तेथें प्राधान्यानें होतो. तसेंच काकवी हा आसवविधींत त्याज्य गणला गेला आहे. तो येथें श्रेष्ठ पावला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मद्याचे आधाराचे पांच वर्ग होतात.

१ धान्य, २ पुष्प, ३ फल, ४ कांड, ५ सार

(१) *धान्य*—यव, शालि इ.

(२) *पुष्प*—मोहाची फुलें इ.

(३) *फल*—१ द्राक्ष, २ कोहळा, ३ मनुका, ४ …चंद, ५ काजू, ६ जांभूळ, ७ खजूर, ८ मोसंबी, ९ बोर …बेहेडा, ११ होपस, १२ संत्रा इ.

(४) *कांड*—ऊंस, शिंदी, सागू, ताड, माड

(५) *सार*—मध साखर, काकवी, गूळ

तयार दारूंची कांहीं नांवे आधारावरुनहि दिलेली …ठतात. उदा.– सीधु, खार्जुर, गौडी, माध्वी, पैष्टी, …क, बैभीतकी, संत्रा, मोसंबी माधूकी, ताडी, माडी इ.

आधेय:– मद्यांत आधेयांना विशेष महत्त्व म्हणजे …गंधापुरते असतें. उत्तेजन व उन्मादन हीच प्रमुख …उद्दिष्ट असल्यानें, त्याकडे ह्या विधींत विशेष लक्ष … आणि ते अम्ल व कोहलप्रभूत निर्मितीनें साधतें. …ना ह्यांचे प्रमाणावरच मद्याचें तीव्रत्व अवलंबून

साधक:— मद्यांत सौमनस्य जननांचा भाग नसतो. …ाला अधिक मान असतो. त्या दृष्टीनें काकवी …ेला गूळ, जळलेली साखर, खजुराचे रिते कोथळे असले … साधनांकरितां उपयुक्त ठरतात. १९४४ सालीं … भयंकर स्फोट झाला. तेव्हां तेथील जळके गोड पदार्थ …चे डिस्टिलरी मध्यें पर्वतप्राय पडले होते. असें ऐकि– आहे. याशिवाय …, गूळ यांचा रेंदा, मोहाचीं फुलें यांचाहि उपयोग …त. ह्यापासून अम्ल व कोहल यांची उत्पत्ति झपाट्यानें …ळ होते.

उद्धरण—एका द्रवांतील विशिष्ट भाग नाडीयंत्रानें काढून घेण्याचे विधीस उद्धरण म्हणतात. हें कार्य … देणाऱ्या यंत्रास अर्कयंत्र, नाडीयंत्र, वारुणीयंत्र, भपका, (…istillating Apparatus) म्हणतात.

… सामान्य परिवर्तनांत कोहलाचें शतमान १० ते १४ …धिक संभवत नाहीं. आसवांत हें मान पुरेसें पडतें. पण …्यास हें मान २५ चे पुढें न्यावें लागतें. त्याकरितां … वारुणी यंत्रातून अनेक वेळ उडवून घेत असत. उदा–

पुनस्तं वारुणीयंत्रे समारोप्य तमाहरेत् ।
एवंतु दशधा सारं पौनःपुन्येन संहरेत् ॥

(भा. भैं. र. ४१४८ पंचसायक.)

ह्यानंतर जायफळ, जायपत्री, लवंगा, कंकोळ, केशर, कस्तूरी, कापूर, इ. सुवासिक द्रव्यें किंवा अर्क काढतांना गुलाब, जाई, जुई, मोगरा, शेवंतीच्या पाकळ्या घालतात. म्हणजे मद्यास गंध येतो.

उपयोग–

निगूढ शल्याहरणे शस्त्र क्षाराग्नि कर्मणि ।
पीतमद्यो विषहते सुखं वैद्यविकत्थनाम् ॥

(अ. हृ. चि. भ. ७।७२)

प्राचीनकालीं खोलवर गेलेलें शल्य काढणें, शस्त्रावचारण करणें, क्षारानें सूज फोडणें, मस जाळणें, किंवा अग्नीनें डाग देणें, ह्याकामीं मद्य प्यायला देत असत. त्यामुळें रुग्ण गुंगत असे. त्या गुंगीत हीं असह्य कर्में उरकून घेत. त्यामुळें रोग्याला क्लेश सुसह्य होत. कार्यांत अडथळा येत नसे, व वैद्याचे काम सोपें होई.

मद्यगुण–

प्रत्येक प्रकारच्या मद्याचे गुण निरनिराळे असतात. पण गुणसामान्य म्हणून त्यांत कांहीं असतें. ते गुण–

लघूष्ण सूक्ष्मतीक्ष्णाम्ल व्यवाय्याशुगमेवच ।
रुक्षं विकाशि विशदं मद्यं दशगुणं स्मृतम् ॥

(च. चि. अ. १४)

" प्रकृत्यामद्यमम्लोष्णम् " (अ. हृ.)



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मद्य पचायला हलकें, शरीरांत अगदीं शेवटचे व सूक्ष्म बिंदूपर्यंत जाऊन भिडतें. हें प्रथम सर्व शरीर झपाट्यानें व्यापतें. मग अंतरिंद्रियावर काम करतें. हें रूक्ष आहे. उष्ण आहे. प्रथम उत्तेजन कार्य करतें. त्याचा अम्मल संपला कीं, तो प्राणी विकल होतो. ह्या गुणांमुळें मद्य तनमन, अग्नि, बुद्धीला प्रथम उत्तेजन देऊन त्यांकडून उत्तम काम भरपूर प्रमाणांत झटकन करवून घेतें. व पर्यायानें तुष्टि, पुष्टि, वल, प्राप्त करून देतें. एकेकाळीं वैद्यलोकही रोगचिकित्सेंत मद्यमांसाचा उपयोग भरपूर करीत असत. पण अध्यात्माकडे लोकांची प्रवृत्ती अधिक होत गेली, तसतसा त्यांचा हा प्रघात मागें पडत गेला.

मद्यदोष

मद्यांत गुण आहेत ते त्याचें अल्पमात्रेनें लाभतात. पण सामान्यतः माणसाची तृप्ति तेवढ्यानें होत नाहीं आणि मद्याचे दोष त्याला त्रास देऊं लागतात. शरीरांतील शुक्रांत असें जे अंतिम तेज ओज, त्याचे गुणधर्म व मद्यगुण अगदीं परस्पर विरुद्ध आणि त्यांतले त्यांत मद्य जोरदार, त्याचे गुण बलवान्, त्यामुळें मद्यसेवनानें प्रथम ओजाचा नाश होतो. मग हृदय विघडतें. त्याचा आकार वाढतो. तें फुगतें. त्यामधील पडदे झिजतात व हृद्रोग होतो. हा रोग वरा होत नाहीं. यकृतावर असाच अनिष्ट परिणाम होऊन तेंहि निकामी होतें. ह्या अवयवांचे वैकल्यामुळे मनुष्य मरतोसुद्धां. शिवाय झंझांवातानें झाडे उन्मळून पडतात. तशी स्थिति मद्यानें मनाची होतें. ह्यामुळें

सत्वं तदाश्रयं चाशु संक्षोभ्य जनयेन्मदम् ।
रसधात्वादि मार्गाणां सत्वबुद्धींद्रियात्मनाम् ।।
प्रधानमोजसश्चैव हृदयं स्थान मुच्यते ।
अतिपीतेन मद्येन विहतेनौजसा च यत् ।।
हृदयं यति वैकृत्यं तत्रस्था ये च धातवः ।।
प्रेत्य चेह च यच्छ्रेयः श्रेयो मोक्षश्च यत्परम् ।
मनः समाधौः तत्सर्व मायत्तं सर्वदेहिनाम् ।।
मद्यन मनसाश्चास्य संक्षोभः क्रियते महान् ।
महा मारुत वेगेन तटस्थस्येव शाखिनः ।। (च. चि

इतकी मोठी हानि मानवांना सोसावी लागते.

मद्य मोहक असतें. भयानक असतें. मद्य प्यालेले मनुष्य शोकग्रस्त होतो. रागावतो. उन्मत्त होतो, मरतोहि. अपस्मार अपतंत्रकासारखे आजार त्याला त्याची स्मृति नष्ट होते आणि म्हणून चरकाचार्य म्हणतात

मद्येमोहो भयं शोकः क्रोधो मृत्युश्च संश्रितः ।
सोन्मोदमदमूर्च्छाद्याः सापस्मारापतानकाः ।।
यत्रैकः स्मृतिविभ्रंशस्तच्च सर्वमसाधुवत् ।
इत्येवं मद्यदोषज्ञा मद्यं गर्हन्ति यत्नतः ।। (च. चि

तसेंचः--

येंविषस्य गुणाः प्रोक्ता ते ऽ पि मद्ये प्रतिष्ठिता
तेन मिथ्योपयुक्तेन भवत्युग्रो मदात्ययः ।।
किंतु मद्यं स्वभावेन यथैवान्नं तथा स्मृतम् ।
अयुक्तियुक्तं रोगाय युक्तियुक्तं यथामृतम् ।। "

असें माधवानें म्हटलें आहे. वाग्भटानें सुद्धां " ... पीतममृतम् । अन्यथा विषवत् " असेंच म्हटलें आहे.

रामतीर्थ ब्राह्मी तेल

(स्पेशल नं. १) (मेडिकेटेड) डोक्याचे ज्ञान व क्रियातंतु बलवान करते, काळे आणि मजबूत होतात. टक्कल पडलेल्या जागीं पुन्हां केस येतात. खवड़े उवा, यांचा नाश होतो. स्मरणशक्ति वाढते. डोळ्यांत घातल्यानें दृष्टीं सुधारते. कानांत टाकल्यानें कानाचे रोग नाहींसे होतात. गाढ झोंप लागते.

सर्वऋतूंत सर्वांना उपयोगी. सर्वत्र मिळतें. मोठी बाटली किं. ३-८-०, लहान बाटली किं. रु.

श्री रामतीर्थ योगाश्रम, ८ उमेश धाम, २ रा विन्सेंट स्क्वेअर, दादर जी. आय्. पी. रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषध म्हणून मद्य देतांना, निरनिराळ्या मद्यांचे व या जुन्या नव्या प्रकारांचे गुणधर्म लक्षांत घेत असत. मद्याचे दहा गुणांनीं ओजाच्या दहाहि गुणांचा नाश सत्वगुणांचा नाश होतो. रजोगुण व तमोगुण ह्यांचे य मदाच्या पुढच्या अवस्थेंत होतें. त्यांचाहि प्राग्वैद्य र करीत. त्यामुळें मद्याचा दुरुपयोग सहसा होत नसे. फायदाच होई.

– मद्यस्वभाव –

आयुर्वेदांत प्रत्येक पदार्थाचे व कल्पाचे स्वाभाविक धर्म पालेलें आहेत. "सुरा जर्जरी करोति।" च. असें मद्यां- नें म्हटलें आहे. मद्य या शब्दाचा अर्थ सुध्दा मस्ति जें अथवा गुंगवते तें मद्य. हचा त्याच्या बलवत्तर स्वभा- फार भ्यायचें असते. कारण मद्य एकदां चाखले कीं, मनाचे लोक केव्हांच त्याचे आहारी जातात. व आपलें गमावून बसतात. पण आजचे समाजांतहि कांहीं लोक आढळतात. पैकीं कोणी झोपतांना १ चषक नियमानें तर कोणी बुद्धिमंत अत्यंत महत्वाचे असें बौद्धिक वाचनाचे कामकाज करावयाचें असतां घेतात. पण हें नियमित आणि परिमित असतें. त्यामुळें त्यांना मद्या- फायदा होतो. तसें इतरांचे नसतें. त्यांची मद्यातिसक्ति राहते व ते दरिद्री होतात, बुडतात. म्हणून दारुचा होत असतो. प्राचीन कालीं सुद्धां असे प्रकार होत. जक दंडकहि कांहीं असत. वाङमयांतसुद्धां दारुचा व करीत असत. उदाहरण म्हणून खालील सुभाषित ईल.

" मद्यपस्य कुतः सत्यं दया मांसाशिनः कुतः।
कामिनश्च कुतो विद्यानिर्धनस्य कुतः सुखम् ॥
एकतः चतुरो वेदा ब्रह्मचर्यं तथैकतः ॥
एकतः सर्वपापानि मद्यपानं तथैकथः ॥

सारांश मद्य हा पदार्थ अत्यंत तीक्ष्ण विष व शस्त्रा पुन्हां अत्यंक मोहकहि आहे. दिव्याच्या तेजाला तंग जसा दिव्यावर झडप घालून आत्मनाश करुन घेतो स्थिती मद्याची होते.

टिंक्चर्स— (औषधी मद्य)

टिंक्चर्स हा एक ॲलोपॅथिक औषधी कल्प आहे. सहाय्यानें हा तयार करतात. हा द्रव असतो. म्हणून औषधी द्रव्यांचा कोहलिक द्राव म्हणतात. (An alcoholic solution of medicinal tances).

टिंक्चर्सचे तीन प्रकार आहेत. १ एकाकी द्रव्याचे तें 'सावे' अधिक द्रव्य युक्त तें 'संमिश्र' एकाहून अनेक द्रव व द्रव्यें असलेलें तें संयुक्त.

टिंक्चर विधींत द्रावक, प्रक्रिया आणि द्रव्य ह्यांना प्राधान्य असतें. द्रावणा करितां प्राधान्यानें कोहलाचा क्वचित प्रसंगी ईथर, अमोनिया, ग्लिसरीन ह्यांचाही उपयोग करतात. क्रियेचेही तीन भेद आहेत. १ हिम (Maceration) २ प्रस्रवण (Percolation) ३ मेलन (Solution)

हिमविधी:— वनस्पतींचे जाडें भरडें चूर्ण व द्रिद्रा- वण एकत्र करून बंद ठेवावें. मधून मधून भांडे घुसळीत जावें. असें सात दिवस करावें. आठवें दिवशीं प्रथम वरील प्रमाणें वरील निवळ हळूंच बाजूस काढावी. खालचा गाळ पीडण- यंत्रांत घालून घट्ट दाबावा. त्यामधून निघालेला द्रव व निवळी एकत्र करावींत. प्रथम फडक्यानें नंतर प्रस्रावक पदार्थानें हा द्रव गाळून घ्यावा. आणि प्रामाण्य जमवावें.

प्रस्रवणविधी— वनस्पतीचे पृथुचूर्ण द्रावणांत भिजवून बंद भांड्यात चार तास भिजत ठेवावें. तें चांगलें फुगलें कीं प्रस्त्रावकांत बसवावे. त्यावर थोडेंसें द्रावण घालावें. प्रस्त्रा- वकांतून द्रावण थेंब थेंब गळूं लागलें कीं तोटी बंद करून चूर्ण

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय
अशा शक्तिशाली
अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स
चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता यावद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—
सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—
मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.
व्यवस्थापकः— अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा (सी. पी.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुडेपर्यंत पुन्हां त्यावर द्रावण घालावें व पुन्हां ठिवकणें सुरुं करून द्यावें. तीन चतुर्थांश द्रव खाली उतरला कीं प्रस्त्रवण बंद करावें. प्रस्त्रावकांतील कल्प व द्रव एकत्र करून वस्त्रानें गाळून घ्यावें. गाळ पीडण यंत्रानें दाबून त्यांतील सर्व द्रावण अलग करावें. तिन्ही द्रव एकत्र करुन प्रस्त्रावक पदार्थातून गाळून घेणें व मग प्रामाण्य जमविणें.

मेलन—कापूर व अफूसारखे अच्छसार व निस्यंद कोहलिक द्रावणांत विरवावयाचे ह्यालाच कोणी Dilution म्हणतात. हें मिश्रण प्रस्तुत (Filtered) करून घेतलें कीं घेतलें कीं झालें.

विद्रावण— वनस्पतीमधील सार भाग अलग करण्याकरितां योजावयाचे द्रवास विद्रावण म्हणतात. द्रव, द्राव ,द्रावण हे त्याचे पर्याय शद्बंटिंक्चर विधींत हें विद्रावण कोहलिक असतें. १०० टक्के कोहलास अच्छ कोहल म्हणतात. ९० टक्के अच्छ कोहल अधिक १० टक्के वाष्पोदक ह्या मिश्रणास रेक्टिफाईड स्पिरिट म्हणतात. ह्या प्रमाणें पाणी अधिक अधिक मिळवून निरनिराळ्या शक्तीचा कोहलिक द्रव तयार करतात. पदार्थांचे स्वभावानुसार कोणत्या श्रेणीचा कोहलिक द्रव वापरावा हें ठरवितात. हा कोहलिक द्रव सार निष्कासना करिता, वीर्य रक्षणाकरितां, वीर्य वर्धनाकरितां उपयोजतात. सामान्यत: ४५ पासून ६० श्रेणीचा कोहल नि:सारणाकरितां योजतात. तयार झालेल्या टिंक्चरमधील कोहलाचे शतमान सामान्यत: वरील श्रेणींचें आसपास असतें. सगळ्यांत कमी कोहल काताचे टिंक्चरमध्यें ३७।० तर अधिकमान सुंठीचे टिंक्चरमध्यें ९०।० असतें.

बाजारांत मिळणाऱ्या टिंक्चर्सची संख्या पुष्कळ आहे. पण ब्रिटीश फार्माकोपियानें अवघी ३४ च टिंक्चर्स शिक्का मोर्तब केली आहेत. ह्यांत अफू, कुचला इ. चीं तर कांहीं संत्रा लिंबूसाल, वेलची, जायफळ इ. चीं सुगंधी, मनोरमहि आहेत.

टिंक्चरविधी आयुर्वेदांत होता काय?

चरकानें कल्पस्थानांत देवदाली इ. चें कल्प करण्यांकरितां दारूचे निवळीचा उपयोग केला आहे. सु डांत तो पदार्थ रात्रभर ठेवून दुसरें दिवशीं सकाळीं तो त्यांतील द्रव प्रस्तुत करून घ्यावा ; असा तो विधी ह्या बाबतचे सूत्र "आसुत्यच सुरामंडे मृदित्वा पिबेत् ॥ " असें आहे. चरकानंतरच्या आयुर्वेद विद्वा मृतसंजीवनी सुरामंड काहीं आसवांकरितां उपयोजला उ. कापूर, अफू; कस्तूरी इ. सुरामंडांत हे पदार्थ वरील मिसळावयाचे व छानून घ्यायचे. टिंक्चरच्या तिसऱ्या रांत हें विधीं बसूं शकतील. पण सुरामंड अम्ल असतो. टिंक्चरमधील कोहलिक द्रव अम्लरसयुक्त नसतो. ह्या वरून कर्परासव, अहिफेनासव, मृगमदासव, इ. आसवें टि होत असें म्हणतां येत नाहीं. म्हणून आयुर्वेद वाङ्मयांत सुरासव अशी संज्ञा आहे.

—आसव नि टिंक्चर—

आसव नि टिंक्चर मध्यें कोहलाचे अस्तित्व साम्य आहे बाकी सर्व भेदच.

परिवर्तन— आसवांत परिवर्तन विधि असतो विधींत कोहल निर्माण होतो. त्याला स्वयंभु, नैसर्गिक, परिवर्तित कोहल म्हणतात.ह्या इंग्रजीं भाषेंत Fermented, self gene Natural म्हणतात. आसवांतलें परिवर्तन असतें. आसवांत १२ ते १४ टक्केपर्यंत कोहल झाला कीं, हें परिवर्तन आपोआप थांबतें. व तदनंतर क

भृंगराजासव—

आंतड्यांतील अनेक दोषांमुळें बद्धकोष्ठ होणाऱ्या व तज्जन्य सर्व विकारांवर अत्यंत उपयोगी.

दि आयुर्वेदिक धन्वन्तरी फार्मसी लिमिटेड;

अहमदनगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगर श्रेणी वाढत नाहीं. टिंक्चर विधींमध्यें परिवर्तन नसतो.

कोहल—आसवांतला कोहल नैसर्गिक व तो अधिकांत अधिक १२ ते १४ शतमानापर्यंत असतो. टिंक्चरमधला कोहल उद्धरित (Distilled) असतो. त्याची श्रेणी ४५ ते शतमानापर्यंत असते.

रस—आसवांत मूळ वनस्पतींचा एक रस असतो. बरोबरच मधूर रस भरपूर व अम्लरस किंचित प्रमाणांत असतो. म्हणजे आसवांत तीन रस असतात. टिंक्चर मध्यें वनस्पतीचा तेवढा एकच रस असतो.

सुगंधी द्रव्य—हीं द्रव्यें सामान्यतः दीपक, पाचक हर, मलमूत्र, वातानुलोम, जंतुनाशक, दुर्गंधी नाशक शरीरास जोम व मनास आल्हाद देणारी असतात. आसवांत द्रव्यें असतात. त्यामुळे वरील धर्म हे आसवाचे सामान्य ठरतात. टिंक्चरमध्यें हे पदार्थ नसतात. अर्थात् त्यांचे हे नसतात. हें उघड आहे. पण तीं सुगंधित करतात.

परिणाम—आसवांत अधिकांत अधिक मधुर रस असतो. हा रस कोहलचा जनक तसा प्रतिबंधक व प्रतिकारकही आधींच आसवांत कोहलाचें मान अवघें १२ ते १४ असतें. अनपायीं असतें. असें जरी आहे तरी सामर्थ्यवान् कोहलाचे जे दुष्परिणाम शरीर व मनावर घडूं लागल्यात मधुररस ते निवारण करतो. अशी योजना टिंक्चरमध्यें नसल्यानें व कोहल प्रभूत प्रमाणांत असल्यानें त्याचें मादकत्व जाणवणें शक्य होतें. म्हणूनच टिंक्चर कार्डमम् को, टिंक्चर टी, टिंक्चर लेमोनिस् टिं. झिंझिबेरी इ हीं टिंक्चर्स ऐवजीं सेवन केलीं जातात. तसें आसवांबाबत केव्हांही नाहीं नि दाखलाही नाहीं तसा कोठेंच.

आसवांत सुगंधी द्रव्य घालणें, मधुररसाचे प्रमाण मोठें ठेवणें, कोहलाचें मान कमी राखणें अशा उपकारक व निश्चित योजना समाविष्ट केल्या आहेत. तसा प्रकार टिंक्चरमध्यें नाहीं. त्यामुळें टिंक्चरनें मनुष्यशरीरास व मनास पीडा होतें. ... पोहोंचतें. कोहलचे तीक्ष्णत्व, तीव्रत्व तनमनाला ... कारक ठरतें. त्यामुळें आसवें ही केव्हांही अनपायी ... त. तशी टिंक्चर बाबत हमी देतां येत नाहीं.

टिंक्चर्संपासून तनमनास तडाखा बसतो. तो परिणाम अल्पकालीन असतो, तरी ती ऱ्हासक ठरतो. आसवांचे ह्याच्या उलट स्वरु- असते. त्यानें केवळ नैमित्तिक कार्य न होतां नित्य कार्यही अवयवाचें वैकल्य दूर करण्याचें काम आसव करतें. न त्याचे कार्यप्रचीतीस विलंब लागतो.

एकाच वनस्पतीचे पृथक कल्प

१ अशोकाचा काढा केला. त्यांत साखर घालून पक्का पाक किंवा शुष्क शर्करा तयार केली, तर अशोकाचे गुण टिकाऊ होतील पण अपेक्षित प्रमाणांत गुण येण्यास औषधि मात्रा व कालहि अधिक लागतील. पण कार्य मात्र टिकाऊ.

(२) अशोकाचे टिंक्चर केलें, तर मात्रा थोडी, गुण लौंकर पण तितक्याच लौकर प्रतिक्रिया, त्यामुळें कार्य टिकाऊ नाहीं. पुनः कोहलाचे तीव्रत्व नाजुक स्त्रियांस सोसत नसल्यानें अशोकाचें टिंक्चर तितकेसें उपयुक्त ठरत नाहीं तें निराळेंच,

(३) अशोकाचें आसव केलें तर मात्रा थोडी, गुण सावकाश पण टिकाऊ. तनमनास आल्हाद आणि प्रतिक्रिया, विनाश, मद मोह इ. भय कांहीं नाहीं.

टिंक्चर नि मद्य

परिवर्तन—टिंक्चरमध्यें हें नसतें पण मद्यांत असतें. ह्याच बरोबर मद्यांमध्यें उद्धरण (Distillation) असतें. तें हि टिंक्चरमध्यें नसतें.

कोहल—अन्यत्र तयार झालेला कोहल अपेक्षेप्रमाणें टिंक्चरमध्यें घालतात. मद्यांतला कोहल त्यांतच परिवर्तनानें

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुल्कंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्टय !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegrams- AYURVED.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व उद्धरणानें वाढलेला असतो. अन्य कोहलाची जरुरी येथें भासत नाहीं.

टिंक्चरमधला कोहल एकाकी असतो. त्यामुळें त्याच्या स्वाभाविक गुणांचा तेवढाच लाभ होतो. पण मद्यांमधील कोहलास अम्लांची जोड लाभलेली असल्यानें तेथें कोहलाच्या गुणदोषांचा उत्कर्ष झालेला असतो.

टिंक्चर नि मद्यांतलें कोहल शतमान जवळ जवळ सारखेंच असतें. फक्त बलांत फरक. मद्यांतला कोहल अम्ल संयोगानें अधिक बलशाली, तीक्ष्ण व तीव्र झालेला असतो.

मद— टिंक्चर पेक्षां मद्यानें मद लौकर येतो. येतो तोहि जोरदार असतो. मद्यमदाचे परिणाम फार खोलवर नि दूरगामी होतात. तसें टिंक्चरचें नाहीं.

रस:— टिंक्चर मधील वनस्पतीचा जो रस तोच टिंक्चरचा रस. मद्याचें तसें नाहीं. मद्याचा उत्कट रस अम्ल. कोणत्याही प्रकारचें मद्य असो त्याचा रस बहुधा अम्लच.

स्पर्श— त्यामुळें टिंक्चरपेक्षां मद्याचा बाह्यस्पर्श अधिक थंड आणि आंतरिक स्पर्श अधिक जळजळीत व चरचरीत असतो.

गंध— मद्याची मोहकता वाढविणेंसाठीं त्याला निरनिराळचा गंध द्रव्याचा वास लावतात. तसा रंगहि देतात सुन्दर. हे दोन्ही प्रकार टिंक्चरमध्यें नसतात. वनस्पतीचा जो गंध व रंग तो त्या टिंक्चरचा. हा मात्र ठरलेला असतो. आणि तो जमविण्याचा प्रयत्नही होतो.

टिंक्चर नि मद्य ह्यांत सामान्य काय, तर कोहल. आणि भेद काय तो वर दिलाच आहे. आसव टिंक्चर हे जसे औषधी कल्प समजले जातात तसें मद्यांचे नाहीं. मद्य हा पदार्थ कांहीं वेळेंस औषधीं म्हणून वापरतां येत असला तरी तरीं तो खरा निर्माण होतो तो मादक पेय म्हणून. तेव्हां मद्य हे औषधी वर्गांत फारसें बसू शकत नाहीं.

आसव नि मद्य

उद्धरण—प्राचीनकाळीं आसवें सुद्धां उद्धरित करीत असत. पण त्यांत कोहलाचें मान वाढविण्याचा हेतु नसून औषधी गुणाढ्य करण्याचा मानस असे. ब्रिटिश राजवटींत उद्धरण कायद्यानें बंद झालें. तें आजहि तसेंच आहे.

मद्यामधील कोहल मानानें व बलानें वाढवावयाचा असतो. त्यामुळें उद्धरण हा विधि मद्यसंधानांतील एक आवश्यक विधि होऊन बसला. ह्यालाहि सरकारी परवाना लागतो. पण दारूच्या भट्ट्या सरकारच चालवीत असल्यानें व परदेशी दारूची आवक भरपूर असल्यानें देशी दारू गाळण्याचे परवानें कोणी घेत नाहीं.

कोहल—आसवांतील नैसर्गिक परिवर्तनांत १२ … पेक्षां अधिक कोहल कधींच निर्माण होत नाहीं. आणि … मानानें तनमनाचा क्षोभसुद्धां होत नाहीं. कोहलाचा … येण्यास कमीत कमी ३० ते ३५ टक्के कोहलमान ल… तें आसवांत कधींच नसतें. आसवातला कोहल वि… (Diluted) व मधुर द्रव्याचे संयोगानें निर्बंधित अ… त्यामुळें आसव कितीहि प्याले तरी कोहलाचे तीक्ष्णत्व, … अपायी ठरत नाहीं व मदहि येत नाहीं.

मद्यांतल्या कोहलाचे सामर्थ्य अम्लसंयोगानें वाढ… असतें. त्यामुळें मद्य फार जपून वापरावें लागतें. आसव… एकांतहित म्हटलें तर मद्यास एकांताहित वर्गात घालावें ल…

रस—आसवांत कोहल प्रतिबंधक म्हणून मधुर … प्रभूत घालतात. हें मधुर द्रव्य कोहल संजनन, कोहल नि… पोषण, बलवर्धन, शरीर रक्षण, नि मनोल्हादन करतें. … संरक्षक योजना मद्यांत नाहीं. त्यामुळें आसव निर्मद व … पायी ठरतें; तर मद्य ह्या उलट. त्यामुळें मद्यांत भय प्रति… असतें. तें आसवांत नसतें.

मद्यांत कोहल प्रभूत प्रमाणांत असतो. तो अम्ल… संयुक्त असतो. त्यामुळें तो अधिक बलवान, तीव्र व तीक्ष… झालेला असतो. मद्य मोहक असतें. चुकूनहि त्याचे … गेले तरी 'न कळतां पद अग्निवरी पडे। न करि दाह… न कधीं घडे।' अशी स्थिती होते. त्यामुळें मद्या… उपायापेक्षां अपायाचा संभव अधिक. त्याचे व्यसन जडण… शक्यता फार. अशा कारणानें मद्याचा उपयोग कर… तज्ज्ञसुद्धां सहसा धजावत नाहींत. तर इतरांची काय क… ह्यामुळें हा कोहल कल्प कनिष्ठ प्रतिचा ठरतो.

टिंक्चर्समधला कोहल एकाकी खरा. मद्य अगर अ… प्रमाणें विरोधक अगर सहाय्यक त्याचे जोडीला न… यामुळें त्याचे एकटयाचेच गुणदोष घडतात. पण … मद्याप्रमाणेंच तीक्ष्ण, उष्ण, तीव्र असल्यानें टिंक्चर्ससुद्धां घ… कच ठरतात. त्यामुळें तज्ज्ञा शिवाय टिंक्चर्स वापरतां … नाहीत. कोहल अनिर्बंधित असल्यानें हा कोहलकल्प … श्रेणीत बसतो.

आसवांत कोहल अत्यल्प असतो. तोहि वि… (Diluted) असतो. इतके असूनहि त्यापासून तन… यत्किंचितहि इजा पोहोचूं नये म्हणून आसवांत जवळ … २५ ते ३० शतमानापर्यंत मधुर द्रव्य नियुक्त असते. त्… आसवें बिनधोक व अनपायी ठरतात. तेव्हां हा कोह… श्रेष्ठ श्रेणीचा हें म्हणणें ओघानेंच पुढें येते. ह्याच का… मुळें सामान्य जनतासुद्धां आसवारिष्टांचा उपयोग नि… करूं शकते.

मागील अंकीं—परिवर्तन
पुढील अंकीं—उपसंहार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांचा पत्रव्यवहार

वैद्यकीय अभ्यासक्रम

ले. *विष्णु चिंतामण काळे*. तासगांव

१५ ऑगस्ट १९४७ ला आपला भारतवर्ष पारतंत्र्यातून त्र झाला. त्यामुळें भारतवर्षातील वाढत्या अज्ञानाचा कार हळू हळू नष्ट होईल व सर्व तऱ्हेचे ज्ञान लोकांना व सुलभ होईल अशी इच्छा आहे, त्या दृष्टीनें आमच्या वास येणारा एक विचार मांडीत आहे.

सध्याच्या सरकारचा शिक्षणासंबंधीचा विचार पाहिला केवळ शिक्षणाच्या दर्जाचा विचार करून चालणार तर त्याचा विस्तार होईल कसा याचा विचार होणे श्यक आहे, त्यासाठीं ज्या समाजास आपण शिक्षण देणार समाजाच्या आर्थिक स्थितीला अनुसरुन शिक्षणक्रम ण्यांत आला म्हणजे लोकांत जास्तीत जास्त फायदा ची प्रवृत्ती वाढेल. पण जर न परवडणारा शिक्षणक्रम तर समाजातील सर्व लोकांना समानसंधी आहे या ण्यास एक प्रकारे हरताळ फासल्याप्रमाणेंच आहे. तरी णक्रमाची योजना आखतांना समाजाच्या आर्थिक ीचा विचार होणें जरूर आहे.

आता उच्च शिक्षणावरच विशेषतः ज्याच्या आयुष्याचा साय अवलंबून आहे, असा समाजातील महत्त्वाचा वर्ग जे मध्यमवर्ग होय. या वर्गात साधारणतः वकील, डॉक्टर्स, नियर्स, क्लार्कस् आदी बुद्धिजीवी वर्ग येतो या ठिकाणी ास सध्याची मध्यम वर्गाची आर्थिक स्थिती विचारांत आवश्यक आहे. गेल्या महायुद्धानें मध्यमवर्ग जवळील क खलास झाली. कारण मिळणाऱ्या उत्पन्नावर भागेना. न शिल्लक खलास झाली, दागदागिने विकावे लागले, ळे समाज कफल्लक बनला. युद्ध थांबले पण मध्यम- ी स्थिती मात्र काडी इतकीही बदलली नाहीं. बदलली तर ती आगीतून फोफाट्यांत पडल्या प्रमाणें झाली. ळें युद्धकाळच बरा होता असे म्हणणे भाग पडले. थोड- म्हणजे मरता येत नाहीं म्हणूनच मध्यमवर्ग जगतो हया परिस्थितीचा विचार येवढ्याच साठीं घेतला कीं, शिक्षणाचा फायदा नेहमी घेत असलेल्या मध्यमवर्गाची खरोखर काय झाली आहे ! उच्च शिक्षणक्रम आख- णारे लोक त्याचा दर्जा वाढण्याच्या नांवाखाली कशा तऱ्हेचा शिक्षणक्रम आखीत आहेत याचा विचार होणें जरुर आहे. त्यांच्या एकंदर हालचालीवरून समाजाचा विचार आर्थिक-दृष्टया केला जात नाहीं, असें मोठया कष्टानें पण नम्रपणें म्हणावेसे वाटते.

आजकाल मध्यमवर्गाची स्थिती पाहिल्यास दिवसेंदिवस खालावत चालली आहे. एखाद्या मोठयाशा कुटुम्बांत एकटाच मिळवणारा, म्हणजे एकखांबी तंबू सारखी कुटुम्बाची स्थिती होते. त्यामुळें कुटुम्बांतील मुलामागें साधारणपणें २० रुपये मासिक शिक्षणखर्च येतो. एखाद्यास चार मुलें असल्यास खर्च फारच होतो. त्यामुळें शिक्षणाच्या खर्चाचा बराचसा ताण पालकवर्गावर पडत आहे. याचा परिणाम एकच दिसून येतो तो म्हणजे शिक्षणखर्च न झेंपल्यामुळे पुष्कळशा बुद्धिमान स्त्रीपुरुषांना उच्च शिक्षणाचा कोर्स सोडून देण्याखेरीज गत्यंतर रहात नाहीं. हे चालू असलेल्या सर्वच उच्च शिक्षण-क्रमाबद्दल म्हणतां येईल. येवढा मोठा प्रश्न विचारांत न घेतां आपल्याकडे दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय शिक्षणापुरते बोलावयाचे झाल्यास एका सुलभ अर्थात स्वस्त व थोडया काळांत आवरणारा आणि शक्य तो अधिक नैपुण्य प्राप्त करून देणारा एखादा वैद्यकीय शिक्षणक्रम आखून लोकोपयोगी कार्य करावे.

आजच्या काळांत आपापल्या आत्यंतिक मत प्रवाहामुळें मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांची फार मोठी कुचंबणा होत आहे. संपूर्ण आयुर्वेद का आलोपाथी या रस्सी खेचीत या दोन्हीही मतांचे समन्वय करण्याच्या प्रयत्नांत वैद्यकीय शिक्षणक्रम विद्यार्थ्यांच्या शरीर व बुद्धी यावर अधिकाधिक ताण पडणारा होत आहे. ही वस्तुस्थिती दिसून येते.

यासंबंधी कांहीं विचार मांडणें अगत्याचे व उचित होय. त्याचा समाजांत विचार होणे जरूर आहे. आयुर्वेद का अलोपाथी असा खरा म्हणजे कोणताच आग्रह न धरता वैद्यक व्यवसाय सामान्यतः चांगला करतां येईल अशा तऱ्हेचा एखादा वैद्यकीय शिक्षणक्रम असावा.

आजच्या विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या दृष्टीनें विचार केल्यास शिक्षणांत दीड तप घालवावे लागते. उदा.—मॅट्रिक अगर तत्सम परिक्षेसाठीं वयांतील ११ वर्षे, इंटर सायन्सची २ वर्षे व ४॥ ते ५ वर्षे नवीन कोर्सची व एखादे तरी वाढणारे असें आपण विचारांत घेतल्यास १८ वर्षे म्हणजे दीड तप येवढा काळ शिक्षणांत घालवूनही चांगला निपुण असा वैद्यक व्यवसायी उत्पन्न होऊ शकत नाहीं. अशी वस्तुस्थिति निर्णय देत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

०७१४३२

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रचलित शिक्षण क्रमांत उच्च शिक्षणक्रम ठेऊ नये असा याचा अर्थ नसून त्याच्या जोडीस दुसराहि शिक्षणक्रम ठेवण्यांत यावा. जसें डिग्री व डिप्लोमा कोर्स असतात त्याप्रमाणें सामान्य वर्गासाठीं सुलभ असा एखादा स्वतंत्र वैद्यक शिक्षण क्रम असावा. मध्यें केवळ आयुर्वेदच ठेवण्याचा आग्रह नसावा. कारण हिंदुस्थानांतील हजारो खेडयापाडयातून अद्याप वैद्यकीय मदत मिळत नाहीं. अशा खेडयापाडयांना आर्थिक दृष्ट्या उच्च शिक्षणक्रम घेतलेला डॉक्टर असू नये असें वाटत नाहीं. पण अशा तऱ्हेचा डॉक्टर वर्ग आर्थिक दृष्टया परवडत नाहीं. त्यांना जरूर मात्र खूप आहे म्हणून गरीब जनतेला परवडणारा उपयुक्त असा एखादा डॉक्टर त्या शिक्षणक्रमातून बाहेर पडणे ही समाजाची आजेची गरज आहे.

गेली ५० ते ६० वर्षे राष्ट्रीय पुढारी व निरनिराळे पक्षोपपक्ष जनतेच्या खऱ्या गरजांचा विचार करावा असें म्हणत आहेत. पार तंत्र्यामुळे लोकांच्या खऱ्या गरजांची अवहेलना होते. असेहि म्हटले जात होते. तरी आता त्याना जनतेच्या खऱ्या आरोग्यविषयक गरजेचा सहानभूतीपूर्वक विचार करून एक सुलभ वैद्यकीय शिक्षणक्रम निर्माण करण्याची आणि खेडया–पाडयांपर्यंत जाणारे डॉक्टरांची बहुसंख्या शक्यतो लवकर निर्माण करण्याची व्यवस्था करावी. अभ्यासक्रमासंबंधीची सूचनाही करावीशी वाटते. त्यात खालील गोष्टी प्रामुख्यानें विचारांत घेतल्या जाव्या.

१) मॅट्रिक वा तत्सम परिक्षा पास झालेले तसेच नापास झालेल्यानांही अभ्यासक्रमांत प्रवेश मिळावा. यासाठीं त्याची वैयक्तिक लायकी पाहून प्रवेश मिळावा.

२) ४ वर्षापेक्षां अधिक शिक्षणक्रम नसावा.

३) एकच विषय आयुर्वेदीय व तोच अलोपाथिक म्हणून दोनदा शिकण्याचा प्रसंग या शिक्षणक्रमांत नसावा.

४) शिवाय संस्कृत, तत्त्वज्ञान, जुने शल्ययंत्र, जुने रस-शास्त्रातील किचकट प्रयोग, प्राचीन शरीररचना अशा सारखे विषय वैद्यकीय शिक्षणक्रमांतून काढून टाकण्यांत यावेत.

अशा धर्तीचा अभ्यासक्रम आखण्यांत आल्यास सर्व थरांतील समाज घटकांना त्याचा योग्य तो फायदा घेता येईल व भारताचा अभ्युदय साधता येईल. देश काल व स्थिती यांचा विचार करून कोर्स आखल्यास त्याचे सर्वत्र स्वागतच होईल. याचा योग्य तो विचार व्हावा. यापेक्षां जास्त अपेक्षा ती काय असणार !

नवा अविष्कार

स्त्री, पुरुष, बालक या सर्वांच्याकरिता

अत्युत्तम महौषधी

नवरत्नरस

★

हा हिरा, माणिक, मौक्तिक इ. नवरत्नें आ
सुवर्ण यांच्या संयोजनानें तयार करण्यांत आलेला क
आहे. शरीरस्थ रस, रक्त आदि सप्त धातूंची शु
वृद्धि व पोषण, शुक्र, वीर्य यांची शुद्धी आणि पु
करणें हे या औषधाचें विशिष्ट कार्य आहे. तसेच य
नपुंसकत्व, वीर्यस्राव, स्वप्नदोष इ. चे निर्मूलन हो
नवयौवन प्राप्त होते. स्त्रियांच्या गर्भाशयशोथ, प्र
वारंवार होणारा गर्भपात, गर्भवतीच्या हातापायांव
सूज व फिक्कटपणा यांवरहि गुणकारी आहे. वंध्यत्व
दोष दूर करणारी ही अपूर्व औषधी आहे. मुल
अस्थिदौर्बल्य दूर करून अस्थि बलवान करण
कॅलशियम व व्हिटॅमिनची उणीव, दुधाचे अपचन
करून बालकांना घष्टपुष्ट करणारे असे हे औषध
क्षय, जीर्णज्वर, कास, श्वास, मधुमेह, मानसिक दुर्ब
इत्यादि मध्येंहि अतिशय उपयुक्त आहे.

नवरत्नरस—निरोगी लोकांकरिता रसायन
रोगी लोकांना आरोग्य प्राप्त करून देणारे हे म
औषध आहे.

एका बाटलीची किंमत पांच रुपये

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा

(गुजराथ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

संक्रांतीपर्यंत शेअर अर्ज स्वीकारले जातील

अर्कशालेचा रौप्य महोत्सव जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत साजरा व्हावयाचा आहे. वर त्याच सुमारास डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालयाचें उद्घाटन होईल. रौप्य महोत्सवाच्या वेळेपर्यंत शेअर विक्रीचा कार्यक्रम चालू राहाणार आहे.

★ अर्कशालेच्या बहुसंख्य विक्रेत्यांनीं शेअर्स घेतलेले आहेत. अद्यापहि ज्यानीं आपलें अर्ज धाडलेले नसतील त्यानीं ते त्वरित धाडावे.

★ आ. वै. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व अर्कशालेचे ग्राहक वैद्य यांनाहि अर्कशालेचे भागीदार होण्याविषयीं पुनः एकवार अत्यंत आग्रहाची विनंति करीत आहोत.

★ शेअर्स संबंधीची माहिती ज्याना हवी असेल त्यांनीं त्वरित पत्र लिहावे. सर्व माहिती व अर्जाचा फार्म पाठविला जाईल.

★

आपला अर्ज आजच पाठवा

: सेक्रेटरी :

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

R. No. B. 5225

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्कशालेची वैशिष्ट्यें

अर्कशालेचे शेअर्स घेणें लाभकारक आहे

कारण—

★ गेली पंचवीस वर्षे अनेक आपत्तींना तोंड देऊन कंपनीनें स्थैर्य प्राप्त करून घेतलें .आहे, आ ती आतां भक्कम पायावर उभी असून तिची उत्तरोत्तर प्रगति होत आहे.

★ कंपनीची व्यवस्था कोणत्याहि मॅनेजिंग एजन्सीकडे नसून संचालक मंडळच प्रारंभापासून वि वेतन काम करीत आहे.

★ अर्थात् कंपनीच्या नफ्यावर सर्वतोपरी भागीदारांचाच अग्रहक्क आहे.

★ डिफर्ड व ऑर्डिनरी या दोन्ही प्रकारच्या शेअर्सच्या बाबतींत नफा वाटणीच्या दृष्टीनें समानता आहे.

★ अर्कशालेच्या नफ्याचा कांहीं अंश आयुर्वेदशिक्षण व रुग्णसेवा या कार्याकरितां दिला जा त्यामुळें गुंतविलेल्या रकमेवर योग्य व्याज मिळून शिवाय सार्वजनिक उपयुक्त कार्यास सह केल्याचें श्रेय भागीदाराना लाभते.

आयुर्वेदाला व आयुर्वेदीय औषधी व्यवसायाला स्वतंत्र भारतांत उज्वल भवितव्य असल्यानें व भारतांतील कोट्यावधि जनतेची गरज आयुर्वेदीय,औषधें हजारो वर्षापासून पुरवीत असल्यानें हा व्यवसाय चिरंतन स्वरूपाचा आहे.

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे यांनीं आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि., येथें छापलें व आर्यांग्ल महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : ब. ल. वझे, आयुर्वेद विशारद.

★

या अंकांत

संधानविधि–उपसंहार
वैद्य पु. वि. धामणकर
स्नेहसंमेलन
आ. प्र. मंडळीचा वार्षिक समारंभ
संपादकीय

आयुर्मीमांसेचा 'अर्कशाला–विशेषांक' एप्रील १९५२ ला प्रसिद्ध होईल. या अंकाकरिता अर्कशालेच्या ज्या वैद्य व विक्रेत्यांनीं आपले परिचय–लेख पाठविले नसतील त्यांनीं ते त्वरित पाठविण्याची कृपा करावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वसंत मिश्रण

सुवर्ण, मौक्तिक, प्रवाळ, शृंग, गुळवेल,
कलखापरी व मिरे यांचा संयुक्त कल्प

क्षयाची पूर्व लक्षणें, प्रथमावस्था, द्वितीयावस्था, जीर्ण-ज्वर आणि मोठ्या आजारानंतरचें दौर्बल्य यांवर हा कल्प यशस्वी ठरलेला आहे.

वैद्यवर्गानें या औषधाचा चिकित्सेंत अवश्य उपयोग करावा व आपले अनुभव अर्कशाळेकडे कळवावे अशी विनंती आहे.

या औषधाच्या चिकित्सेतील उपयुक्ततेबद्दल साधार आकडेवारीचें संकलन करावयाचें आहे. या आगामी पुस्ति-केंत वैद्यांचे अनुभव नमूद केले जाणार असल्यानें वसंत मिश्रणाचा वापर करणाऱ्या वैद्यांनीं त्या संबंधीच्या इष्ट त्या नोंदी ठेवाव्या अशी विनंति आहे.

'शास्त्र–विभाग'

आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

०७९५३३

युर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

ालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

५ वें] फेब्रुवारी १९५२ [अंक २ रा

क वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

ोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ही त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचें सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंका-नंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

संपादकीय

येत्या प्रांतीय संमेलनाच्या अध्यक्षपदीं
वै. जळूकर शास्त्री यांची
निवड करा

येत्या उन्हाळ्यांत महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचें अधिवेशन पनवेल येथें भरावयाचें आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी वैद्यराज दत्तात्रय शास्त्री जळूकर यांचीं निवड करण्यांत यावी अशी आमची महाराष्ट्रांतील वैद्यवर्गास आग्रहाची सूचना आहे.

वैद्य जळूकर शास्त्री हे महाराष्ट्रीय वैद्यांच्या चांगले परिचयाचे आहेत. प्राचीन वैद्यपरंपरेचे ते नामवंत वारस असून आधुनिक कालांत अवश्य अशी वैद्यवर्गाची संघटना करण्यांत ते कुशल आहेत. महाराष्ट्रांत वैद्यांची नांव घेण्या-जोगी संघटना संयुक्त खानदेशनें केलेली आहे आणि या संघटनेचे प्रेरक प्राण वैद्य जळूकर हे आहेत. हें सर्वांना माहीत आहे. या संघटनेच्या वतीनें आज पावेतो अनेक विधायक कार्यें पार पाडण्यांत आली आहेत. या संघटने-मार्फत 'चिकित्सक' हें वैद्यकीय नियतकालिक चालवि-येत असते. या नियतकालिकाचें संपादकत्व श्री. जळूकर यांचेकडेच आहे. आयुर्वेद हिताच्या दृष्टीनें खानदेशीय वैद्यबंधु जागरुक व कार्यतत्पर आहेत. वैद्य जळूकर यांची संमेल-नाच्या अध्यक्षपदीं निवड झाली तर संमेलनाची संघटना ही दृढ आणि कर्तृत्व संपन्न करण्यांत त्यांना यश झाल्यावाचून राहाणार नाहीं.

श्री. जळूकर हे शास्त्राचे जाणते उपासक आणि लोकसेवक आहेत. संमेलनाच्या द्वारा होणाऱ्या वैद्यसंघटनेस अधिक शास्त्राभिमुख आणि लोकाभिमुख करणे ही अधिक इष्ट अशी गरज या योजनेमुळें पुरी होणार आहे. विशिष्ट व्यक्तींची आलटून पालटून या अध्यक्षस्थानीं योजना करण्यानें आणि ठराविक मत प्रणालीच्या गटानें संमेलनाची सूत्रें आपल्या हातीं ठेवण्यानें संमेलनाला व्यापक स्वरूप येणार नाहीं. नवे नवे कार्यकर्ते या क्षेत्रांत आले पाहिजेत, अशी आजची गरज आहे. ज्यांनीं एकेकदा हे अध्यक्षपद उपभोगलें त्याना ते पुन्हा देण्यांत औचित्य नाहीं, हे वैद्यांनीं ध्यानीं ध्यावे व संमेलनावरील संकुचित नेतृत्वाचा आरोप दूर करण्या-साठीं नवे नेतृत्व निवडावे अशी आमची सूचना आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छोट्या जाहिराती

वैद्य, डॉक्टर व औषध विक्रेते यांच्या माहितीकरितां

आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांची सूची

(हें सदर प्रत्येक अंकांत नियमितपणें प्रसिद्ध होते भारतांतील विशेषतः मुम्बई राज्यांतील सर्व आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांचा या सदराद्वारे वैद्य, डॉक्टर व विक्रेते आणि ग्राहक यांना सातत्यानें परिचय होत असतो. एक प्रकारे "Buyer's Guide" हें या सूचीचें स्वरूप असल्यानें या सदराचें महत्त्व जाहिरातदारांना वेगळें सांगावयास नको.

ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती इतरत्र या अंकांत वर्षाच्या करारानें घेण्यांत आलेल्या आहेत त्यांची माहिती या सूचींत *विनामूल्य* छापली जाते. केवळ सूचीसाठीं मजकूर पाठविणाऱ्या जाहिरातदारानीं वर्षाचे करारानें जाहिरात दिली पाहिजे. वर्षाचा दर फक्त तीस रुपये आहे. ही रक्कम आगाऊ द्यावी लागेल. मजकूर जास्तीत जास्त चार ओळी असावा.)

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकाराच्या औषधी वनस्पतीचें विक्रेते. महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत येतो. वैद्य व गाहकांनीं माहिती मागवावी. व्हाकेरीभाते खात्रीनें मिळते.

शा जादवजी लल्लूभाई आणि कं०

सर्व प्रकारची काष्ठौषधि व औषधी निर्मितीसाठीं लागणारी कच्ची द्रव्यें यांचे विक्रेते. २४५ काळबादेवी रोड मुंबई २.

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी. (यू. पी.)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. इंजेक्शनविषयक "सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन विज्ञान" या पुस्तकाचे प्रकाशक.

अरविंद केमिकल वर्क्स, छिंद्वाडा (मध्य प्रदेश)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शनचिकित्सा (मूल्य ३ रु.) या पुस्तकाचे प्रकाशक.

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर.

पुरोहित श्वासहारी, शोधना इ. विख्यात निर्माते.

आयुर्वेदिक धन्वतरी फार्मसी अहमदनगर

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीनें वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा (उ. गुजराथ)

छप्पन्न वर्षांपासून चालू असलेली संस्था. शास्त्रीय व पेटंट औषधें तयार केली जातात.

अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.,

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. वैद्यांना इंजेक्शनचे शिक्षण दिले जाते. पत्रव्यवहार— प्रतापगंज

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें तयार केली जातात. आयुर्वेद प्रसारक मंडळी या संस्थेच्या रुग्णालयांत तीं जातात. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, हैद्राबाद या सर्वत्र विक्रेते आहेत.



हें सदर अवश्य वाचा.

तें उपयुक्त आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यालय वार्ता

स्नेह-संमेलन

(लेखक–विद्यार्थी मित्र)

गेल्या तारीख १९, २० नि २१ दिवशीं आमचें स्नेह मोठ्या उत्साहानें पार पडले! डॉ. शरदराव आठल्ये कार्याध्यक्षतेखाली संमेलन समितीची नोव्हेंबरातच झाली. प्रमुख कार्यवाह म्हणून बारटक्के यांचीं निवड नाटयमंत्री म्हणून श्री. वाघ यांची योजना झाली होती. यांच्या मदतीला विद्यार्थि शासितमंडळाचें सर्व सभासद घटनेप्रमाणें पदसिद्ध नियुक्त होते!!

स्नेह संमेलनाचें विशेष आकर्षण म्हणजे नाटयप्रयोग. ल वैद्यक महाविद्यालयाचा नाटयप्रयोग म्हणजे शहरवासीयाना वार्षिक कुतूहल निर्माण करणारी "विद्यार्थ्यांची हौस" नि रुग्णालयास मदत असा नि परमार्थ यांचा संयोग होय!!

यंदाचा आणखी एक विशेष म्हणजे, शहरांतील कांहीं नाटयप्रेमीं मंडळीनींहीं आमच्या संस्थेवरील आपुल– भावनेनें "ओघळलेले मोती" या नव्या नाटकाचा याचवेळीं करण्यास संमति दिली. वेस्टर्न इंडियाचें खात्याचें प्रमुख नि एक यशस्वी साहित्यिक रा. रा. शं. डोपंत दातार यांनीं हें नाटक प्रथमच लिहिलेलें!! यामुळें नाटकाबद्दलही साहित्यभक्तांत मोठें कुतूहल होते. १९ हा जरी संमेलनाचा प्रमुख दिवस, तरी विद्यार्थ्यांचें खेळाचें सामने जवळ जवळ १५ दिवस चालूं होते! ल यशस्वीं विद्यार्थ्यांना प्रमुख समारंभाच्यावेळीं शेठ द हिराचंद बी. ए. यांचे हस्ते पारितोषिकें देण्यांत आली. ाच्या चढाओढीही घेण्यांत आल्या! आपले एक माजी- डॉ. भा. र. पटवर्धन यानी वैद्यवर रघुनाथ शास्त्री न यांच्या स्मरणार्थ दहा रुपयांचे एक पारितोषिक वक्तृत्व स्पर्धेत उच्चांक मिळविणाऱ्या करतां पाठविले

ता. १९ रोजीं स्नेह संमेलनाचा मुख्य कार्यक्रम नि नाटय न्यू. इं. स्कूलच्या सुशोभित रंगभूमीवरच घेण्यांत न्यू. इंग्लिश स्कूलची नवी रंगभूमि व त्याकरतां मुद्दाम पडदे आणि सजावटीचे सामान यामुळे कोणत्याहि ाचे वेळी हें एक भव्य नाटयमंदीरच आहे की काय ास झाल्याशिवाय राहात नाहीं.

रात्रीं १० वाजतां भावबंधनाचा प्रयोग सुरुं झाला. 'माया चळली कां ? तिळभर ममता नाहीं कां ? आली पोटी पोर एकटी तीहि विकतां कां ?' किती बहारीचा नाटय प्रसंग या वाक्याने गडकऱ्यांनी निर्माण केलेला आहे आणि तो वठविण्यास तितक्याच तोलाचा अल्लड अभिनय झाला तर अवघा प्रेक्षक वर्ग मंत्र मुग्ध होऊन जातो!! रा. माधव दातार याने प्रति दितानाथाची आठवण करून दिली हा अभिनय करताना! आवाजाचें नैसर्गिक नादमाधुर्य नि अनेक प्रेक्षकांच्या माना डोलायला लावील असा सहजसुंदर अभिनय म्हणजे त्या दिवशीचें लतिकेच्या नेपांतील माधव दातार!! आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचें असे मोठे भाग्य किं प्रतिवर्षी कोणीतरी अभिनय पटु चमकून जातो. नि सातारकरांची नाटय जिज्ञासा जागृत ठेवतो. 'भावबंधन' तसं वठविण्यास सोपं नव्हे! नवशिक्या हौशी नटाना तर ते अधिकच कठीण! या नाटकाचीं निवड झाली त्यावेळीं अनेकांचा मनांत यशाबद्दल संदेह निर्माण झाला. पण हें धारिष्ट आमच्या उत्साही विद्यार्थ्यांनीं केले. आणि सर्वत्र वाहवा मिळवली. नाटकाचे यश, हें एका दोघां नटाच्या कौशल्यानें गाठतां येत नाहीं, सर्व नटांनीं आपआपल्या भूमिका–मग त्या कितीही सामान्य असोत–समरस होऊन वठविल्या तरच यशाच्या शिखरावर डोलता येते या तत्वाचें पुरेपूर पालन आमच्या इतर नटांनीही केलें! श्रीधर आगाशे यांनीं घनःशामची भूमिका तितक्याच कौशल्यानें वठवली. शारीरिक आंगलोटाची जोड मिळती तर चिंतामणराव कोल्हटकरांनींही मान डोलावली असती. आणि आमचें बाळ माजगांवकर! त्यांचा अभिनय विचारा– यलाच नको! लतिकेला ही खाशी जोडी होती! निस– र्गतः विनोदी वृत्ति नी अंतःकरणांतील भावनांचे चेहऱ्यावरील सुस्पष्ट चित्रण! नि जोडीला अभिनयाची स्वयंभू आवड म्हणजे बाळ माजगावकर!!! अभिनयाची क्वचित मर्यादा सुटली तरी उणीव मात्र कधीही भासायची नाहीं!!! आणि गडकऱ्यांचे कामाण्णा म्हणजे आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचें रा. साने!! साने कधी काळीं गंभीर होतील याची शंकाच वाटते! कित्येकाना हें काम पाहताना दिनकर कामाण्णाची आठवण झाली! साने म्हणजें अभिजात विनोद! बी. ए. च्या परिक्षेच्या वेळीं "भावबंधन" या नाटकाच्या रसग्रहणात्मक सखोल अभ्यासाचा त्यांनीं यावेळीं पुरेपूर उपयोग करून घेतलेला दिसला! त्यांच्या कामाचा जर उठाव व्हायचाचा तर इंदू बिंदूची कृष्णवर्णी जोडी तशीच तोलाची हवी! भावबंधन नाटकात खरी अडचण निर्माण होत असेल तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंदू बिदूंच्या भूमिका वठविणारांची. स्त्रीभूमिका स्त्रिया—नीच करायच्या या नव्या युगात मला वाटते “ भावबंधन ” रंगभूमीवरून कायमचें अंतर्धान पावेल ! कारण तोंडाला काळं फासून प्रेक्षकासमोर यायला कोणतीही स्त्री तयार व्हायची नाहीं ! ! जन्मजात दोषावर गडकऱ्यांनीं येवढा गहजब करून आपल्या कल्पना विलासाला विनाकारण कां राबवले कळत नाहीं. आणि म्हणूनच रा. गोरे नि बर्वे यांचे सर्वांपेक्षां अधिक कौतुक व्हावयास राहिजे. कोणा निष्ठावंत कार्यकर्त्यांनीं पक्षप्रमुखांनीं आज्ञा केल्यास डांबर फासून घेण्याचीही तयारीं दाखवल्याचें प्रसिद्ध झाले आहे. पण या विद्यालयांत आपल्या नाटचसंचाचीं पूर्तता करण्याकरतां रा. गोरे नि बर्वे यांनीं तोंडाला काय फांसून घेतलें हें निराळें कशाला लिहूं ! शाबास बर्वे-गोरे ! तुमचं जास्त कौतुक वाटतं ते यामुळेंच, नि तुमची कामंही चांगली वठली ! नाहींतर कामाण्णाची काय विशाद होती विनोदाचा उच्चांक गांठण्याचीं ! ! मनोहर म्हणजे सौजन्याचें, शांततेचें नि गांभीर्याचें अवतार रानडे यांनी खरोखरच भूगर्भशास्त्राचा अभ्यास केल वाटत होतें नि हिराचंद मेथा तरी काय ? मालतीच्या भ यापेक्षां अधिक अभिनयाची आवश्यकताच कुठे होती जोडी मला वाटते प्रभाकर—लतिकेच्या फटकळ नि पणाला विरोध निर्माण करण्याकरतां निर्माण केली रा. बारटक्क्यांनीं धनेश्वराची भूमिकाही तशीच वठवली. आपली नक्कल चांगली मुखोद्गत असण्यानें मोकळेपणानें अभिनय करतां येतो ही गोष्ट पुष्कळ वेळ नट विसरतात ! ! आणि राहिले आमचे धुंडिराज ! चालून गबाळा पण सात्त्विक, पाल्हाळिक पण प्रेमळ हा विमा एजंट ! ! ! महाजनाच्या चेहेऱ्यावर नि निर्माण केलेला ! मग भूमिकेशी अधिक समरस व्हावयाचे ? प्रेक्षकांची चिक्कार गर्दी म्हणजे अ

— वैद्य, डॉक्टर व औषधालयें यांना बक्षिसें —

१–१–५२ पासून २९–२–५२ पर्यंत ऊंझा फार्मसी लि. चीं औषधें खरेदी करणाऱ्या ग्राह २० टक्के कमिशन व पुढें दिलेलीं बक्षिसें देण्याची योजना आंखली आहे. सर्वांनीं त्यांचा लाभ घ्यावा विनंती आहे.

रु. ३० हून अधिक किंमतीची औषधें खरेदी केल्यास सुन्दर ‘ स्टेथॉस्कोप बॅग ’

रु. ७५ ,, ,, ,, ,, ,, चारुचिकित्सा (उत्तरार्ध) (हकीम अजमलखां साहेब सिद्धप्रयोग किंमत २॥ रुपये) व सिद्धयोगसंग्रह हिंदी (वैद्यराज यादवजी त्रिकमजी किंमत २॥ रुपये.)

रु. १२५ हून अधिक किंमतीची औषधें खरेदी केल्यास रसतंत्रसार (पू. स्वामी कृष्णानंदजी ९–८–०) अथवा भारतभैषज्यरत्नाकराचा १ भाग किंमत १० रु.

रु. ५०० हून अधिक किंमतीची खरेदी केल्यास भारतभैषज्यरत्नाकर ५ भाग किंमत ४५ रु. एका व्यक्त एकावेळींच बक्षिस मिळेल.

ऊंझा फार्मसीमध्यें सर्व प्रकारचीं आयुर्वेदीय औषधें मोठ्या प्रमाणांत तयार केलीं जातात. या आयुर्वेदमहारथी वैद्यराज श्री यादवजी त्रिकमजी आचार्य यांच्या सिद्धयोगसंग्रह व आयुर्वेदोपकारक स्वामीं श्रीकृष्णान यांचें रसतंत्रसार यांतील अनुभूत योग आणि भारतभैषज्यरत्नाकरांतील कित्येक नवे प्रयोग तयार करण्यांत आहेत. वैद्यसमाज त्यांचा लाभ घेऊन आम्हांस प्रोत्साहन देईल अशी आशा आहे.

— अधिक माहितीसाठीं ठोक भावांचें सूचिपत्र मागवा —

ऊंझा फार्मसी लि. (उत्तर गुजराथ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्फूर्ति स्थान ! पहिलीच वेळ असल्यामुळें महाजनांना भ्यायल्यासारखें वाटले कि काय देण जाणे ! ! शेट्टी ़ार नि मोरू वाघ त्यांच्याबद्दल आणखी काय ़यचे ?

बरेच दिवसांनीं असा नटसंच एकत्र आला नि प्रेक्षकांना डोलायला लावले. ता. २० ला शनिवारी ं पार्लमेंटच्या कार्यपद्धतीची चुणूक दाखविण्यांत आली. ़त्ताक राज्यात पार्लमेंटचें काम कसे चालते हे कळा– ़ हवे. विद्यार्थ्यांनीं हाहीं कार्यक्रम चांगला वठवला ! ़री पक्षांतील निरनिराळे मंत्री व मुख्य प्रधानांचा तो ़, नि सभापतीच्या चेहेऱ्यावरील ती कर्तव्य कठोरता दिसत होती ! वादविवाद मंत्री बर्वे यांना याबद्दल ़ाद ! ! करमणुकीच्या कार्यक्रमांत शरद रानडे यांचे फ्ल्यूट ़, रा. अष्टेकरांनीं षडवयावर केलेले तबलावादन, नि ़्या विद्यार्थिनीनीं केलेला "फॅन्सी ड्रेसचा' अभिनव ़्रम भारी उठावदार झाले ! ! लंगडचा भिकाऱ्याचें रा. ़यांचे सोंग लक्षांत भरण्यासारखे होते ! निरनि– ़या व्यवसायांतील विविध नमुनें मूक प्रवेशानें चित्रित ़ारा प्रवेशही या वर्षाच्या नाविन्यांत भर घालीत ! !

इतकी संमेलनें झाली पण या वर्षीचें करमणुकीचें कर्यक्रम ़नेंच वैशिष्ठय पूर्ण होते ! योजकांना याबद्दल धन्यवाद ़ास पाहिजेत. शेवटच्या "फिशपांड" या कार्यक्रमानें मात्र ़र विरजण टाकले ! हा कार्यक्रम म्हणजे "नाहीं सूक्ष्म ़क्षण किंवा बुद्धीची तल्लखता ! ! ! उछुंखलतेचा नमूना ़तो. स्नेहसंमेलनाचा मूळ हेतूच या कार्यक्रमानें नष्ट करून ़ा! कांही वेळां होलीकोत्सवाची ही आठवण होत होती! ़पांडचें कार्यक्रम रद्द व्हावयास पाहिजेत! करमणूकीच्या ़ सूड बुद्धीचें नि कुत्सित वृत्तीचें प्रदर्शन करण्या ़ंच हा कार्यक्रम ठेवला कीं काय कोण जाणे!

रात्रीं ९॥ वाजतां "ओघळलेले मोती" या नाटकाचा ़ सुरु झाला. रंगभूमीची सजावट नाटकाला शोभेशीच होती! नटवर्ग अभिनय कलेंत रुळलेला होता! नाट– ़ नाविन्यामुळें प्रेक्षकांचे कुतूहलही जागत होते! कारखानदार नि मजूर यामधील चालू धकाधकीच्या विषयावर आधारलेलें हें एक प्रेमभंगाचें कथानक आहे. विशेष म्हणजे खटकेबाज संवाद. व ते वठवणारा कसलेला नटवर्ग, डॉ. बाळासाहेब टिळक यांनीं भाऊमामाची भूमिका चांगली केली! लिमयांच्या मुलीच्या तिसऱ्या अंकातील गाण्यानं शोकरसाची पार्श्वभूमी निर्माण करण्यात चांगलेच यशमिळवलं! !

या दोन्ही नाटचप्रयोगांचा समारोप ओगलेवाडीचें नाटच- प्रेमी रा. व्यंकटराव ओगले यांच्या हस्ते झाला! संस्थेतर्फे रा. रा. शं. दातार यांचा सन्मान करण्यांत आला. डॉ. टिळक यांनीं नाटकाच्या जन्माचा इतिहास कथन केला. नि संमेलनाचें कार्याध्यक्ष डॉ. शरदराव आठल्ये यांनीं सर्व सहाय्यकांचे आभार मानले.

तारीख २१ सोमवारी सायंकाळीं अल्पोपहाराचा कार्यक्रम मोठ्या आनंदी वातावरणात झाला. या कार्यक्रमाचे वेळी आमच्या विद्यार्थीभगिनीनीं बराच पुढाकार घेतलेला दिसला !

अशा रीतीनें हें वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वी पार पडले ! यंदा माजी विद्यार्थीही बरेच आले होते ! आमच्या माजी विद्यार्थ्यांना दैनंदिन कार्यांतून थोडें बाहेर पडायला हीच संधी. वैद्यकीय व्यवसायच असा की त्यातून मुक्तता नाहीं. पण वर्षांतून थोडे बंधना पलीकडे होण्याची हीच संधी. दुसऱ्या नाटकाच्यावेळीं सर्व माजी विद्यार्थ्यांनीं शिक्षक, नटसंच नि आलेले सन्मान्य पाहुणे यांना कॉफीपान दिले.

स्नेह संमेलनाचा मूळ हेतू, स्नेह वृद्धिंगत करणे, आपल्या अंगी असलेल्या अनेक कलांचा आविष्कार करणें, एकमेकांना सहाय्य करण्याची वृत्ती वाढवणें, समाजातील उच्चनीचत्व विसरून एकापातळीवरून खेळीमेळीनें आनंदोत्सव करणें! पण शैक्षणिक संस्थामधून प्रतिवर्षी होणारी ही संमेलनें हे हेतू साध्य करतात कां ? असा प्रश्न मनांत उत्पन्न झाल्या– शिवाय राहात नाहीं ! उलट असें वाटूं लागते कीं स्नेह– संमेलनांतून आपुलकी निर्माण व्हावयाच्या ऐवजी गटबाजी व हेवेदावेच अधीक उफाळून येतात ! यापुढे ही स्नेह– संमेलनें भरवितांना सुशिक्षित तरुणांनीं तरी ही परिस्थिती ध्यानीं व मगच हा खटाटोप मांडावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आ. प्र. मंडळीचा वार्षिक समारंभ

आयुर्वेद प्रसारक मंडळी व तदंगभूत संस्था यांचा वार्षिक समारंभ श्रीमान् शेठ लालचंद हिराचंद यांचे अध्यक्षतेखाली ता. १९ जानेवारी १९५२ रोजी झाला. ता. १९ व ता. २० रोजी आ. वै. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचें स्नेह संमेलनहि अत्यंत उत्साहानें पार पडलें.

ता. १९ रोजी संध्याकाळी ५॥ वाजता न्यू इंग्लिश स्कूलच्या सभागृहांत वार्षिक समारंभाचे कार्यक्रमास प्रारंभ झाला. डॉ. आठल्ये यांनीं समारंभानिमित्त आलेले सुभसंदेश वाचून दाखविले. या संदेशांत दे. भ. दादासाहेब माळवणकर, ना. गणपतराव तपासे, डॉ. म्हसकर, राजकुमारी अमृत कौर व मुंबईप्रांतांतील प्रमुख वैद्य आणि आयुर्वेद संस्थांचे चालक यांचे संदेश प्रमुख होते.

संस्थेचे कार्यवाह डॉ. वि. ल. आगाशे यांनीं संस्थेचा वार्षिक अहवाल सभेपुढे सादर केला. या अहवालांत संस्थेनें नुकत्याच बांधलेल्या ' डॉ. आगाशे रुग्णालयाच्या खर्चाची माहिती सांगून त्यांनी जनतेस आर्थिक मदतीची विनंति केली.

महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलना निमित्त विद्यार्थ्यांच्या ज्या विविध स्पर्धा झाल्या त्यांत यशस्वी झालेल्याना अध्यक्षांचे हस्ते बक्षिसे देण्यांत आली संस्थेच्या वतीनें जनतेपुढे एकूण वस्तुस्थितीचें निवेदन करणारे भाषण डॉ जोग यांनी केल्या नंतर सातारा येथील एक प्रमुख नागरिक श्री. द. रा. कुलकर्णी मास्तर यांनीं सातारा शहर वासियांच्या वतीनें संस्थेच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या जनसेवेबद्दल धन्यवाद दिल्यानंतर समारंभाचे अध्यक्ष श्रीमान शेठ लालचंद याना भाषण करण्याबद्दल विनंति करण्यांत आली.

शेठ लालचंदजी आपल्या भाषणांत म्हणाले, " या संस्थेने आपल्या वार्षिक समारंभाचे अध्यक्षस्थान दिल्याबद्दल मी कार्यकर्त्यांचा आभारी आहे. या संस्थेचा आणि माझा जुना ऋणानुबंध आहे. सोलापुरास माझ्या चुलत्यांनीं सखाराम नेमचंद धर्मार्थ दवाखाना जेव्हां सुरु केला तेव्हांपासून त्या दवाखान्यावर या संस्थेचे माजी विद्यार्थी प्रमुख चिकित्सक म्हणून कार्य करीत आहेत. आयुर्वेद हे केवळ भारतीय वैद्यक म्हणूनच नव्हे तर शास्त्र म्हणूनहि मान्य केलें जावे असे माझे मत त्यादृष्टीनें संशोधनाची आवश्यकता आहे. संस्थेचे कार्यकर्ते डॉ आगाशे यांच्याशी चर्चा केल्यानंतर आयु शास्त्रशुद्ध मूलतत्वाबद्दल मला समाधान वाटले. सरका संशोधनाचा प्रश्न हातीं घ्यावा.

साताऱ्यासारख्या बाजूच्या शहरामध्ये ही संस्था ३५।४० वर्षे जनतेची सेवा करीत आहे ही कार्य अभिमानाची गोष्ट आहे. रुग्णसेवा हें एक मोठे राष्ट्री आहे पण जनतेंत आरोग्य नांदावे ही खरी गरज समाजाची राहणीं जशी सुधारेल तसे जनतेचे आरोग्य ही समाजाची स्थिती सुधारण्या करिता देशाची आर्थिक सुधारली पाहिजे. म्हणजे देशाचे शक्य तितक्या औद्योगिकरण झालें पाहिजे. औद्योगिकरण व उत्पा हाच यावर मुख्य उपाय आहे.-"

डॉ. कोल्हटकर यांनीं आभार मानल्यानंतर स संपला. शेठ लालचंद यांनीं आपल्या मुक्कामांत आ महाविद्यालय, रुग्णालय व आयुर्वेदीय अर्कशाला याना देऊन समाधान व्यक्त केले.

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफ्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३।, ६ व १० किंमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विकत मिळतें अगर

कारखानदार
डॉ. पुरोहित फार्मसी,
कोल्हापूर (एस्. एस्. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

र्कशाळेचे यशस्वी रौप्यमहोत्सव वर्ष

१९४९ साली अर्कशाळेच्या व्यवस्थेची पुन-
करण्यांत आल्यापासून अर्कशाळेच्या प्रगतीला
ानकारक वेग लाभलेला आहे. १९४९ साली कंप-
सुमारे चौदा टक्के नफा झाला. आणि मागील तोटा
जवळ भरून निघाला. १९५० साली मागील
पूर्ण भरून निघून भागीदारांना डिव्हिडंड देता
१९५१ सालहि व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी
असून याहि वर्षी डिव्हिडंड देणें शक्य होणार

अर्कशाळेच्या स्थापनेस पंचवीस वर्षें पुरी झाली
पण अर्कशाळेचें व्यावसायिक जीवन तीं १९४१
लिमिटेड झाल्यानंतरच सुरू झालें असें म्हटलें
. या गेल्या अकरा वर्षांपैकी प्रारंभीची दोन तीन वर्षें
ची जुळवा जुळव करण्यांत गेली त्यानंतर. युद्धोत्तर
महर्गतेचा जमाना सुरु झाला. अर्कशाळेला वाढत्या
अनुसरून भरपूर भांडवल मिळू शकले नाहीं. खर्चांत
अपेक्षेबाहेर वाढ झाली आणि १९४७ व १९४८ सालीं
स चिंता वाटण्या इतका तोटा आला.

पण गेल्या तीन वर्षांत ही परिस्थिति पूर्णपणे पालट-
असून कंपनीच्या उज्वल भवितव्याविषयीं निश्चित
स वाटू लागलेला आहे. १९५१ सालची विक्री ही
सालच्या विक्रीच्या मानानें जवळ जवळ दुप्पट
याच प्रमाणांत कंपनीचा सर्वच व्याप वाढलेला
सध्या चार विक्री प्रतिनिधि प्रादेशिक विक्री संघट-
काम करीत असून या संघटनेला अधिक स्थैर्य
त्रता आणण्याकरितां विक्री संघटकाची योजना कर-
आलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्र, कर्नाटक, व मराठ-
अर्कशाळेच्या विक्रीक्षेत्रांत समाविष्ट झालेले असून
देशांत अर्कशाळेनें पाऊल टाकलेलें आहे. १९५२ सालांत
आणि मध्यभारत हीं दोन क्षेत्रें विक्रीच्या कक्षेंत
ाच्या दृष्टीनें विचार चालू आहे.

विक्री व्यवस्थेच्या साधनांत मोटार ट्रकची भर
ी अशीहि योजना कार्यकर्त्यांच्या समोर आहे. हें शक्य
तर १९५२ सालीहि विक्रींत मोठ्या प्रमाणांत वाढ
वाचून राहाणार नाहीं.

अभिनंदन

वैद्यराज गो. शं. देव यांची हैद्राबाद विधिमंडळावर निवड

अर्कशाळेचे हैद्राबाद-राज्यांतील एक ग्राहक व हित-
चिंतक ऋणानुबंधी वैद्यराज गो. शं. देव हे हैद्राबाद राज्य

निवडणुकीत यशस्वी झाले आहेत. त्यांचे
आम्ही अंतःकरणपूर्वक अभिनंदन
करतो. अर्कशाळेनें १९५० सालच्या
गणेश चतुर्थीच्या सुमुहूर्तावर हैद्राबाद
राज्यांत पाऊल टाकलें त्यावेळी
अर्कशाळेस पहिला शुभाशीर्वाद
वैद्यराज गो, शं. देव यांनीं दिला
होता. त्यांच्या पाठबळामुळें व मार्ग-
दर्शनामुळें अर्कशाळेनें त्या प्रदेशांत यशाची मुहुर्तमेढ रोवलेली
आहे.

वैद्यराज गोपाळशास्त्र्यांना अर्कशाळेच्या अध्यक्षांनीं
कंपनीच्या सल्लागार मंडळांत येण्याविषयीं विनंति केली व
ती त्यांनीं मोकळ्या अंतःकरणानें मान्य केली याबद्दल कंपनी
त्यांची अतिशय ऋणी आहे. त्यांचे यापुढेहि अर्कशाळेस
सक्रीय सहकार्य लाभेल अशी खात्री आहे. वैद्यराज देव यांना
जनसेवेच्या कामीं यश लाभो व त्यांचा उत्कर्ष होवो असें
आम्ही चिंतितो.

शास्त्रोक्त व गुणाकारित्वाच्या दृष्टीनें श्रेष्ठ अशा औष-
धांची निर्मिती हें कंपनीचें प्रधान उद्दिष्ट आहे. त्या-
बरोबरच मालाचा उठाव होणें सोपे जावे म्हणून आणि
या देशी औषधांच्या व्यापाराला आधुनिक नीट नेटके-
पणाची व सौंदर्याची जोड दिली जावी या हेतूनें आकर्षक
लेबल्स, व कार्टन्सचा कार्यक्रम १७५१ सालापासून हातीं
घेण्यांत आलेला आहे. १९५२ च्या प्रारंभी वसंत मिश्रण
या अत्यंत यशस्वी ठरलेल्या अर्कशाला औषधास कार्टनची
योजना केलेली आहे. १९५१ सालीं यशस्वी ठरलेल्या बूटोन
व स्तन्यशोधन या औषधांच्या बरोबरीनें यंदा वसंत मिश्र-
णाच्या प्रसिद्धीचा कार्यक्रम हातीं घेतला जाणार आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पारितोषिकें मिळविणारे यशस्वी विद्यार्थी

सन १९५१ एप्रीलमधील स्टेट फॅकल्टी मुंबई यांचेकडून घेतल्या गेलेल्या वर्ष १-२-३ व पदवी परीक्षेंतील पारितोषिके धारण करणारे उत्तीर्ण विद्यार्थी.

(१)श्री. श्री. बा. शेरकर पदवी परीक्षेंत प्रथमांक मिळविल्याबद्दल शेठ बालमुकुंद मुथा पारितोषिक रु. १५ व संस्थेचे १० रु. एकूण २५ रु.

(२) श्री. बा. धों. वैद्य. तिसरे वर्षात १ लें आल्या बद्दल कै. आत्मारामपंत जोग पारितोषिक रु. १० व संस्थेचे रु. ९ एकूण रुपये १९

(३) श्री भा. रा. कुलकर्णी तिसरे वर्षांत दुसरें आल्याबद्दल संस्थेचे पारितोषिक रु. ८

(४) श्री. कृ. वि. गोरे. दुसरे वर्षांत पहिलें आल्या-बद्दल कै. गोपाळभट गोडबोले पारितोषिक रु. ४ व संस्थेचे पारितोषिक रु. ७ एकूण रु. ११

(५) श्री. य. म. बर्वे. दुसरे वर्षात शारीरक्रिया या विषयांत पहिले आल्याबद्दल कै. केशव चिंतामण करमरकर पारितोषिक रु. ४ दुसरे वर्षांत दुसरे आल्याबद्दल संस्थेचे पारितोषिक रु. ६ एकूण रु. १०

(६) श्री. ज. द. थत्ते पहिले वर्षांत पहिले बद्दल कै. यमुनाबाई गोडबोलें पारितोषिक रु. ३ व रु. ५ एकूण रु. ८

(७) कु. गोदावरी जीवराज मारवाडी. वर्षांत दुसरे आल्याबद्दल संस्थेचे पारितोषिक रु ४

भागीदार-विक्रेते व वैद्य

१९५१ सालीं रौप्य महोत्सवाच्या निमित्तानें कंपनीच्या विक्रेत्यांना व वैद्यांना अर्कशाळेचे भागीदार होण्याविषयीं विनंति करण्यास आली आणि या विनंतीचे अभूतपूर्व स्वागत झाले. बहुसंख्य विक्रेत्यांनीं अर्कशाळेचे शेअर्स घेतले. वैद्यानींहि क्रमाक्रमानें शेअर्स घेण्याची मनीषा व्यक्त केली. अर्कशाळेच्या व्यापक कुटुंबांत अधिक दृढ आणि जवळच्या नात्यानें समाविष्ट झालेल्या या भागीदार वैद्य व विक्रेत्यांचे कंपनीच्या प्रगतीसाठीं उत्साहानें सहकार्य लाभेल अशी खात्री वाटते.

ही शेअर विक्रीची योजना अनेक वैद्य व विक्रेत्यांच्या सूचनेवरून याहि वर्षी चालू ठेवण्यांत येणार आहे.

शेवटी, १९५२ सालहि गेल्या तीन वर्षांप्रमाणें यशस्वी होईल अशी पूर्ण आशा व्यक्त करावीशी वाटते.

विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा

वक्तृत्व—पहिले बक्षीस कै. रघुनाथशास्त्री यांच्या स्मृतिनिमित्त डॉ. भा. र. पटवर्धन यांचेकडून आलेलें. श्री, माजगांवकर

उत्स्फूर्त वक्तृत्व—पहिले बक्षीस. श्री. माजगांवकर

उताऱ्याचें पठण—पहिले बक्षीस श्री. माजगांवकर

या तीन्ही स्पर्धातील प्राविण्याबद्दल श्री. माजगांवकर यांना खास असें स्वतंत्र बक्षीसहि देण्यांत आलें. क्रमांकाच्या विद्यार्थ्यांनाहि बक्षिसे देण्यांत आली.

क्रीडा विभाग

धावणे—(८८० मीटर्स) श्री. भोमाज

धावणे—(४०० मीटर्स) श्री. परळे

पोहणे—श्री. फडके

बुद्धिबळे—श्री. खोत

ब्रीज—श्री. वाघ

कॅरम—(डबल्स) श्री. खोत व जोगळेकर

कॅरम—(सिंगल्स) श्री. खोत व चव्हाण

टेबल टेनिस—(मिक्स डबल्स) श्री. [illegible]

रिंग टेनिस—(सिंगल्स) श्रीं. शिंदे ([illegible] श्री. चव्हाण

रिंग टेनिस—(मिक्स डबल्स) श्री. च[illegible] कु. [illegible]

टेबल टेनिस—(सिंगल्स) श्री. चव्हाण.

शरीर सौष्ठव—श्री. पाध्ये

विद्यार्थिनींच्या विविध स्पर्धा

धावणे—कु. गोळवलकर

टेबल टेनिस—(सिंगल्स) कु. लुवरी

रिंग टेनिस—(डबल) कु. पुरोहित (सिंग[illegible] पुरोहित

बॅडमिंटन—(डबल्स) कु. लुवरी

व्हॉली बॉल—तृतीय वर्ष

खालील क्रमांकाच्या कांहीं विद्यार्थ्यांनाहि बक्षिसे आली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धीकरण-शास्त्र

संधान विधि

ले-पु. वि. धामणकर, धूतपापेश्वर पनवेल.

उपसंहार

सुरा आणि धन्वंतरी, समुद्रमंथनकाळीं, एकदमच आले. तेव्हांपासून संधानविधीस सुरवात झाली. तद— आसव कल्पनेचा उदय होऊन तीवर अनेक वर्षे पूर्वक प्रयोग झाले. पैकीं १२५ सिद्धयोग आज आपले लागले आहेत.

हे प्रयोग निरनिराळ्या कालांत निर्माण झालेल्या राळ्या ग्रंथकारांचे आहेत. पण कोणीही ग्रंथकार पाणी, षधी, मधुरद्रव्य, प्रक्षेप इ. चीं प्रमाणें निश्चित करूं ला दिसला नाहीं. नाहीं म्हणावयास द्रव व मधुर द्रव्य परस्पर मान मात्र बरेंचसें प्रमाणित झालेलें दिसतें. तीही प्रमाण मानलें आहे.

काष्ठौषधी योजनेंत दोन प्रकार आहेत. कांहीं आसवांत एक पदार्थ प्रभूत प्रमाणांत योजलेला आढळतो. उ. साल, कुडासाल, कुमारीरस, कूष्मांडरस, इ. तर कांहीं र्गी प्रारंभिक द्रव्याचें नांव त्या आसवांस दिलेलें असतें. मात्र इतर द्रव्यासमान. उ. चंदनासव, पुनर्नवासव, सव, उशीरासव इ.

पहिल्या प्रकारांत औषधाचें नांवावरून त्यांतील प्रधान कळतो. त्याचे कार्यही प्रधान पदार्थास अनुलक्षून र असे अनुमान करतां येतें. गुणलाभही तसाच येतो. सऱ्यांत मात्र प्रारंभिक पदार्थावरून नांव आणि तो नाममात्र, त्यामुळें नांवावरून विविक्षित गुणकर्मांची केल्यास ती अस्थानीं ठरते. तो एकं संयुक्त कल्प यला पाहिजे.

मधुर द्रव्यें गूळ, साखर, मध हीं अनुक्रमें वात, पित्त, नाशक औषधांत उपयोजलेलीं आहेत असेंही दिसत नाहीं.

अशा ह्या प्रयोगावस्थेमधील आसव कल्प विधीसंबंधानें तुटक वचनें आर्षग्रंथांमधून विखुरलेलीं आहेत. त्यांचें न व निरनिराळ्या भाषांमधून लिहिलेल्या अर्वाचीन व पाश्चिमात्य ग्रंथांचें अवलोकन व आलोडन करून कल्पनेची मूळ बैठक कायम ठेवून तिचा शक्य तितका विस्तार करून विषय सुबोध व सुकर करण्याचा प्रयत्न केला आहे.

ह्या प्रयत्नांत विविध संस्था, व्यक्ती आणि प्रयोग, प्रकृति व काल हे अनुकूल लाभले म्हणूनच एवढा आशय मी लिहूं शकलों. त्या अर्थी वरील सर्व मार्गदर्शक, सहाय्यक व प्रेरक यांना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो. आणि त्यांचा ऋणी असल्याचेंही मान्य करतों.

माझा हा प्रयत्न विषयाचें मानानें अत्यल्प आहे. मजपेक्षां अधिक बुद्धिमान , प्रयत्नवान् विद्वान तज्ञांनीं हा विषय हातीं घेऊन अनिश्चित गोष्टी निश्चित करण्याचा प्रयत्न करावा ही विनंती.

परिशिष्ट (१)

आसव कल्प विधीबाबत सामान्य सूचना.

१ आसव अगर अरिष्ट पावसाळीं हवेंत करूं नयेत. त्यावेळचे हवा व पाणी अभिषवनाकरितां युक्त नसतात.

२ आसवारिष्टे कोंदट, कुंवट, गार हवेंत करूं नयेत.

३ पाणी स्वच्छ व अच्छ असावें. पाण्यास विशिष्ट गंध असल्यास तें पाणी उकळून घ्यावें. १२ तास संथ ठेवावें. भेसळ बुडाशी जाते अगर वर येते. ती दूर करून निव्वळ पाणी आसवाकरितां घ्यावें.

रसः—फळ, फूल व पान प्रथम धुवून पुसून कोरडे करावें व मग शक्य तों लोहसंसर्ग न होऊं देतां रस काढावा. अडुळशाचे पानांस किंचित् वाफ दिल्यानें रस निघतो. कुमारी रस शरदांत, आवळ्यांचा रस हेमंतांत निघतो तो उत्तम. लोहस्पर्शानें आंवळारस काळा पडतो, तो फरक इष्ट नव्हे. रस काढण्याकरितां पाण्याचें सहाय्य कधींहीं घेऊं नये.

४ क्वथन नसेल तेथें सुद्धां पाणी श्रृतशीत घ्यावें. हें पाणी लघु होतें. त्यांत अर्क छान उतरतात.

५ क्वाथ्य द्रव्यांची भरड करावी, तीं १२ तास भिजूं द्यावीत. नंतर त्यांत अपेक्षित जल घालावें—काष्ठौषधीमधील सार, ती उमलल्यानें, पाण्यांत उतरतें. ह्याकरितां काल व अग्नि ह्यांचीं अपेक्षा असते, सार निष्कृति करितां आवश्यक तें जल, काल व उष्णतामान सातत्यानें कायम राखावें.

६ क्वाथ्य द्रव्यें निःसार होईपर्यंत पाण्यांत बुडलेल्या स्थितींत उकळू द्यावीत. निःसार झाल्यावर काढा गरम असतांनाच ... लागलीच दाबून त्यामधील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव काढून तो पहिल्या द्रवात मेळवावा. हा काढा पुन: उकळून अपेक्षित शेषमान साधावें. नंतर मात्र तो थंड होऊं द्यावा. व वरील निवळ हळूच हलक्या हातानें वा नळीनें अलग करावी.

७ क्वथित रस, जल, हिम, फांट अगर क्वाथ, ३५°९ उष्ण असतां त्यांत मधुर द्रव्यांचे मेलन करावें. (मधुर पदार्थांपैकीं गूळ जुना, रवाळ. मधुर, पिंवळसर असा असावा. तो आंबूस, कडवट, अगर चिकीचा नसावा. साखर–पिठी–साखर आसवांत घालूं नये. स्वच्छ शुभ्र पैलूदार कोरडा नवा साखऱ्या घ्यावा. मध जना, गोड पिंवळसर घ्यावा. तो निर्मळ–अच्छ असावा. जरूर तर शुद्धच करून घ्यावा.] हें मिश्रण १२ तास ठेवावें

८ मधुरे द्रव्य पूर्णतया विरघळलेलें पाहून तो द्रव गाळून घेऊंन त्यामधील माती केरकचरा दूर करावा.

९ मग त्यांत जुन्या धायटी फुलांच्या चूर्णाची पोटली सोडावी. धायटी फूल भिजवून १२ तास ठेवून फुगल्यावर पिशवींत भरावें. पिशवीचे कापड नवें पांढरें स्वच्छ व पातळ असावें. कापडास खळ नसावी. खळीमुळें आसव आंबट होण्याचा संभव निर्माण होतो. किंवा धातकी जल घालावें.

१० पाणी, मधुर पदार्थ व धायटी फूल ह्यांचे मिश्रण ४८ तास बंद करून ठेवावें. ठेवतांना पाण्याचे उष्णतामान ३५°९ राखावें.

११ मिश्रणांत आवाज व बुडबुडे येऊं लागल्यानंतर आवाप्य द्रव्यांच्या सूक्ष्म चूर्णांची पोट्टली त्यांत सोडावी पोट्टलीमधील चूर्णें १२ तास पाण्यांत भिजून फुगलेली असावींत. त्यांनीं पोट्टलीचा $\frac{2}{3}$ भाग व्यापून $\frac{1}{3}$ भाग मोकळा रहावा.

१२ सर्व मिश्रण पोट्टल्यासह काष्टदंडानें खूप ढवळावें.

१३ पात्र चूर्णोदकानें धुवून निरम्ल करून घ्यावें, मिऱ्यांच्या तीक्ष्ण धुरीनें ते निर्जंतुक करावें व जटामांसी अगरुं, चंदन इ. सुगंधी द्रव्यांचे धुरानें सुगंधित करावेत. अशा तऱ्हेनें भांडें सुयोग्य करून घ्यावें.

१४ पात्र धुरानें भरलेलें असतानांच त्यांत वरील मिश्रण घालावें. त्याचें उष्णतामान ३५°९ साधावें. सुगंध धूप देऊन पात्र मुद्राबंद करावें.

१५ संधीस गोपिचंदन लावलेलें कापड पट्टी तो हवाबंद करावा. म्हणजे हवेंतील जंतु आंत शकत नाहींत.

१६ संधिलेप सुकल्यावर तो घट १ महिनाभर राशींत, भूगर्भांत वा कोष्टसारे (ढोलींत) झांकून पुरावा. म्हणजे हवेंतील उष्णतामानाचे फरकांचा त्यावर होत नाहीं. घटांतील उष्णतामान अपेक्षित स्थिर राहतें. त्यामुळें परिवर्तन अखंड व सुन्दर होत

१७ मुदतीनंतर संधिलेप ओलावून, उमळून तो भाग धुवून पुसून स्वच्छ करावा. झांकण काढून आवाप द्रव्यें तळाशीं जाऊन बसलीं असतील, त्यांत आ जळूं शकेल व आसवास मनोज्ञ गंध येऊं लागला आसव झालें असें समजावें.

मलेरिया शत्रु, पांढरें कोड

ही दोन पेटंट औषधें मागवून धन, यश व कीर्ति मिळवा.

माहिती मागवा–

वैद्य–बी. आर. बोरकर ' आयुर्वेद भवन '

मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (वहाड).



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८ धातकीपुष्प व सुगंधी व इतर द्रव्यें ह्यांच्या …या काढून घेऊन त्यामधील अवशिष्ट सारभाग दावून, …न अलग करावा तो तयार आसवांत घालावा.

१९ साधारण मानतः १३ शेर पाण्यांत गूळ, साखर …घ ही मधुर द्रव्यें १०, १०, १५ ह्या क्रमानें घातलीं …त. हे प्रमाण अनुसरलें असल्यास १३ शेर पाण्याचे …आसव अनुक्रमें २० शेर, २३ शेर आणि २०॥ शेर …होते.

मधुर पदार्थ	तयार मिश्रण (मापी)
गूळ १० शेर	२० शेर
साखर १० शेर	२३ शेर
मध १५ शेर	२०॥

२० आसवांत अम्ल हवा अगर पदार्थ पीठ अम्ल …यांचा संसर्ग न होण्याची दक्षता घ्यावी. कोंदट, कुबट …हवाही वर्ज्य मानावी.

परिशिष्ट २ रें

…रस, हिम, फांट, कषाय द्रव असलेल्या व पिंड, द्रव …व स्वरुप असलेल्या आसवांच्या नमुना कृति.

पिंडस्वरुपाकृति

अष्टशतारिष्ट

१ नांव—द्रव्यसंख्या बोधक

२ रोगाधिकार--शोथ

३ कार्य--दीपन, पाचन, मलबंधनाशक, कफवातहर

४ रोग--सर्वांग शोफ

५ स्थान--सर्व शरीर

६ मात्रा

७ द्रव्यसंग्रह—१ शिवण ३ आंवळा, ५ पिंपळी, …, २ हिरडा, ४ बेहेडे, ६ मनुका, ८ मिरें (प्रत्येकी …चें तोळे)

८ द्रव्यनिर्णय

९ प्रक्रिया—द्रव्यें कुटुन पाण्यांत भिजवून गोळा करून …स्थितींत ठेवणें.

१०--सिद्धि

११--परिगणन

१२ काल--संधान-शरद-हेमंत

…-उष्ण ऋतूंत ७ दि. थंडऋतूंत १४ दि.

„ देशांत ७ दि. „ देशांत १४ दि.

टीप- जरुर पडेल तेव्हां अपेक्षित मात्रा पाण्यांत कोळून तें पाणी उकळून पिणें.

द्रवासव द्राक्षासव, श्रृतशील, जल, अरविंदासव

१ नांव— आरंभीचे पदार्थावरून २ रोगाधिकार बालरोग

३ कार्य— बल्य, बृंहण, दीपन, पाचन, आयुष्यकर, ग्रहघ्न.

४ रोग— लहान मुलांच्या सर्व तक्रारींवर चालतें.

५ द्रव्यसंग्रह— ४ नीलकमळ, ४ वाळा, ४ मंजिष्ठा ४ जटामांसी, ४ शिवणफळ, ४ मोथा, ४ बेहेडा, ४ मोहपुष्प, ४ श्वेतकमळ, ४ मुरा, ४ वेखंड, ४ जेष्ठमध, ८ उपळसरी, ४ वेलची, ४ आंवळा, ४ नीळ, ४ पित्तपापडा, ४ चिकणा, ४ कचोरा, ४ पशेल, ४ अर्जुनसाल, ४ हिरडा, ४ त्रिवृत ८० द्राक्षें, साखर १५ शेर मध ५ शेर पाणी २६ शेर धायटीफूल ६४ तो.

६ मात्रा—

७ स्थान— सर्वतनु

८ द्रव्यनिर्णय—

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्टय!!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegrame- AYURVED.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुरा— कापुरी, मधुरीं, किंवा जटामांसी.
शिवणफळाचे प्रतिनिधि— वडाचें फळ–मनुका

प्रक्रिया—१ पाणी १/४ आटवून ३/४ उरवून गाळून घेणें,

२. प्रथम मध, साखर, पाणी एकत्र करून १२ तास ठेवणें.

३ त्याचबरोबर आवाप्य द्रव्यांची सूक्ष्म चूर्णें १२ तास भिजत ठेवणें.

४ मनुका कुटून अगर वाटून घेणें.

५ धायटी फूल कल्प द्रव्य मिश्रणांत घालून ते ४८ तास झांकून ठेवणें.

६ नंतर आवाप्य द्रव्य पोथकी आत सोडणें

७ मुद्रा–संधिलेप देणें.

८ धान्यराशींत पुरून ठेवणें अगर निवांत प्रदेशीं ठेवणें.

९ मुदतीनंतर काढून वरची निवळ अलग करावी. मग चोथा दाबून निघेल तो व निवळी एकत्र करावींत.

१० सिद्धिप्रमाण—४३॥ तोळे

११ परिगणन—कोहल शतमान विशिष्ट गुरुत्व

अम्ल शतमान	रस
वट्टसार शतमान	रंग
मधुजन शतमान	खनिज शतमान

१२ काल—स्थापन–१ महिना सेवन-भोजनोत्तर साधन–शरद्

द्रवासव–काढा

कुटजारिष्ट

१ नांव—प्रारंभक द्रव्यावरून

२ रोगाधिकार—अतिसार

३ कार्य—आमपाचक, अग्निप्रदीपन, स्तंभन, प्रसादन.

४ स्थान—आंत्र

५ मात्रा—१ते ४ तो. ३।३ तासांनी

६ रोग—रक्तातिसार, संग्रहणी, सर्वज्वर

७ द्रव्यसंग्रह––कुडासाल ५ शेर, मोहपुष्प २॥ शेर मनुका २॥ शेर, शिवणफळ २॥ शेर गूळ १० शेर धायटी फूल ४० तो.

८ द्रव्यनिर्णय––कुडासाल ओली घेणें श्रेष्ठ तें न जमल्यास सुकी कुडासाल भरड करून १२ तास पाण्यांत भिजत घालावी. फुगलेल्या सालीचें वजन ५ शेर घ्यावें.

९ प्रक्रिया––५ शे. कुडासाल मोहपुष्प ८० शे. पाणी, मनुका २॥ शेर २० शेर, शेष शिवणफळ ॥ शेर, १० शेर अवशेष (पुनः क्वथन) २६ शेर (१०शे + ३॥ शे. = १३॥ शेर) शेष अवशेष ३॥ शेर द्रव १३॥ शेर गूळ १० शेर, धा. तो. इतर प्रक्रिया सामान्य

१० सिद्धि––

११ परिगणन––

१२ काल––सामान्य

द्रवासव–फांट

जीरकाद्यरिष्ट

१ नांव— आद्यद्रव्य

२ रोगाधिकार— स्त्रीरोग

३ कार्य— बल्य, दीपन, पाचन, मलवातानु स्तन्यवर्धन, स्तन्यशोधन,

४ स्थान— उरः गर्भाशय व पक्वाशय.

५ मात्रा— १ तें २ तोळें

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी व यश मिळवा. शक्ति व शुद्धता यावद्दल गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—

सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १०

व्यवस्थापकः— अरविंद केमिकल व

छिंदवाडा (सी. पी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६ रोग— अग्निविकृति, अतिसार, संग्रहणी, सूतिका-स्तन्यरोग.

७ द्रव्यसंग्रह— १० शे. जिरें १५ शे. गूळ. ५२ पाणी तो. धायटीफूल १३ शे. शेष ८ तो. सुंठ ४ तो. चिनी, ४ तो. नागकेशर, ४ तो. कंकोळ ४ तो. वेलची तमालपत्र ३ तो. नागरमोथा, ४ तो. लवंग, ४ तो.

८ द्रव्यनिर्णय— सामान्य, जिरें, पांढरे, गोडे.

९ प्रक्रिया— मूळ पाठांत जिऱ्याचा काढा करावयास तला आहे. त्यानें अपेक्षित कार्य होते. पण त्याचे प्रमाण असते. व स्तन्यपानानंतर मातेला थकवा येतो. म्हणजे हे काद्यरिष्ट उत्तेजक होतें. त्यापेक्षां जिऱ्याचा फांट तयार तो द्रव म्हणून योजला तर ह्यापेक्षां अधिक मानाचे चे कार्य होतें. माता बाळकाचे मल व वात ह्यांचे मन व निःसरण चांगलें होतें. उत्तम पोटें भरतें. आईस थकवा येत नाहीं. उलट च वाटतें. तेव्हां जिऱ्याचा फांट तर योजावाच व जोडीला शतावरी हिमाचीही जोड द्यावी. हें फार ठरतें.

(१) जीरक भरड पूड १० शे.-१० शेर थंड पाण्यांत तास भिजत ठेवावी. नंतर तो कल्क १० शेर उक-पाण्यांत सोडावा. १२ तासानंतर तें जिरें त्याच पाण्यांत वाटून त्याचा चव काढावा.

(२) शतावरी भरड ३ शेर-३ शेर पाण्यांत १२ भिजत ठेवावी. नंतर ३ शेर उकळत्या पाण्यांत टाकून झाल्यावर वाटून तिचे दूध काढावें (३ शेर) वर १३ शेर काढा सांगितला आहे. तेथें हा द्रव घ्यावा.

१० सिद्धि—१३ शेर द्रव असल्यास २३ शेर आसव तयार होतें.

११ परिगणन—सामान्य १२ काल-साधन, शरद् इतर सामांन्य

द्रवासव द्राक्षासव रस

नांव—प्रधान पदार्थ

रोगाधिकार—क्षय

कार्य—बल्य, कफघ्न, रक्तप्रसादन, संधानकर.

स्थान—कफस्थान

मात्रा—१ ते २ तो.

रोग—कास, श्वास, गलरोग, क्षय, उरः क्षत,

द्रव्यसंग्रह—द्राक्षारस १३ शेर ४ तो. वावडींग, ४ तो. पिंपळी, ४ तो. नागकेशर, गूळ १० शेर ४ तो. गहूंला ४ तो. मिरें ४ तो. सुंट ४ तो. दालचिनी ४ तो. वेलची ४ तो. तमालपत्र ६४ तो. धायटीफूल

द्रव्यनिर्णय-सामान्य सिद्धि-२० शेर

प्रक्रिया—सामान्य परिगणन-सामान्य

काल—साधन-वसंत इ. सामान्य

सारासव—कोहल—नमुना नं. १

असृहरारिष्ट

नांव—आद्यद्रव्य

रोगाधिकार—राजयक्ष्मा

कार्य—व्रणसंधान, रक्तस्कंदन-स्तंभन

स्थान—कफस्थान, विशेषतः उरःस्थान, आंत्र रक्त

रोग—रक्तनिष्ठीवन, रक्तीआंव, रक्तातिसार, रक्त-प्रदर, क्षय.

भृंगराजासव—

जुनाट बद्धकोष्ठ व तज्जन्य सर्व विकारांवर
अत्यंत उपयोगी.

दि आयुर्वेदिक धन्वन्तरी फार्मसी लिमिटेड;
अहमदनगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मात्रा १ ते ५ बिंदु

द्रव्यसंग्रह--अडुळसा १ भाग कोहल १ भाग

प्रक्रिया--अडुळशाचे पानांस वाफ दिली म्हणजे त्यांचा रस छान निघतो तो घेऊन कोहलाशी मु. सं. सुरेशी-मिश्र करून मुद्रित व संधित स्थितींत धान्यराशींत ७ दि. ठेवावें. नंतर गाळून उपयोजावें.

सिद्धि--सामान्य परिगमन-सामान्य-काल-सामान्य

सारासव-नमुना नं. २

अहिफेनासव

१ नांव— प्रधानद्रव्य

२ रोगाधिकार— अतिसार

३ कार्य— आमपाचन, स्तंभन, शूलघ्न, संमोहन

४ स्थान— महास्त्रोत, वातवाहिनी

५ रोग— शूल, संग्रहणी, अतिसार, विषूचि.

६ मात्रा— १ ते ५ थेंब

७ द्रव्यसंग्रह— ५ शे.– मधुकमल ४ तो. मुस्ता १६ तो.– शुद्धअफू ४ तो. इंद्रजळ ४ तो.– वेलची ४ तो. जायफळ

८ द्रव्यनिर्णय— मुस्ता– क्षेत्र– (बंद) मुस्ता जायफळ –नवें अफू– शुद्ध इंद्रजव– नवें

प्रक्रिया—सामान्य सिद्धि–वटवजन ५।' शेर

परिगणन--अफू ४%

काल—संधान–१ महिना.

टिंक्चर ओपाय

द्रव्यसंग्रह--अफू ३ (औंस) १५० ग्रॅमस्

अल्कोहोल ९०'।' १० औंस (द्रव)

पाणी १० औंस गरम ९३–३·९

प्रथम अफू मॉर्टरमध्यें ठेवावी. तीवर गरम पाणी ओतता ओततां ती ढवळून विरवावी. सहा तास तसेंच ठेवावें तें मिश्रण. नंतर १० औंस अल्कोहोल त्यांत मिसळाव २४ तास संधित ठेवावें. नंतर खूप ढवळून गाळून घ्यावें चोथा दाबून त्यांतील द्रव काढावा. दोन्ही द्रव एकत्र करावेत. २४ पुनः संथ ठेवावें. व मग तें पाणी प्रस्तुत करून घेणें

हैद्राबाद शहरांतील
अर्कशाला औषधांचे
प्रमुख विक्रेते
आयुर्धाम मेडिकल हॉ
★
रेसिडेन्सी बस स्टँड समोर
सुलतान बझार हैद्राबाद
यांचेकडे आयुर्वेदीय अर्कशाला लि.,
सातारा यांची सर्व औषधें मिळतात

आयुर्वेदीय अर्कशाला
हैद्राबाद राज्य सोल एजन्सी
हैद्राबाद राज्यांतील वैद्य व विक्रेते
आयुर्वेदीय अर्कशाळेच्या मालाविषयीं खा
पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.
ज. बा. बापट
अर्कशाला सोल एजन्सी ऑ
आनंदस्वामी रोड
जालना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट ३ रें

मान परिभाषा

९६ गुंजा— १ तोळा
४ तोळे— १ पल
८ तोळे— (२ पल) – १ प्रसृति. पसा
१६ तोळे— (४ पल) १ कुडव १ ओंजळ
३२ तोळे (२ कुडव) – १ शराव
६४ तोळे— (२ शराव) –,प्रस्थ
२५६ तोळे —(४ प्रस्थ) – १ आढक
१०२४ तोळे (४ आढक) – १ द्रोण (३२ शे. ६४तो.
८० तोळे— १ शेर
५ शेर— १ तुला

संधानविधींतील विषयानुक्रम

विषय	आ. मी. अंक	पान न.
म्ल	नोव्हेंबर (५१)	१३
हिफेनासव (प्र.)	फेब्रुवारी (५२)	
स्त्रहरारिष्ट (प्र.)	फेब्रुवारी (५२)	
ल्कोहोलिक र्मेंटेशन	डिसेंबर (५२)	१३
ष्टशतारिष्ट (प्र.)	फेब्रुवारी (५२)	
रविंदासव (प्र.)	फेब्रुवारी (५२)	
ासवारिष्ट कल्पनेचा गगम	ऑगष्ट (५१)	९
ासव विधीबाबत ामान्य सूचना–	फेब्रु. (५२)	
ासवारिष्ट संज्ञा	ऑगष्ट (५१)	१०
ासवारिष्ट प्रकार	ऑगष्ट (५१)	११
ासव लक्षण	ऑगष्ट (५१)	१५
ासव आणि मद्य	ऑगष्ट (५१)	१५
ासव आणि मद्य	जानेवारी (५२)	१४
ासव आणि टिंक्चर	जानेवारी (५२)	१३
ासव बिघडण्याची रणें व विकृति	नोव्हेंबर (५१)	११
ासवारिष्टांतील र्दिष्ट लोहादि धात्वंश	अक्टोबर(५१)	११
स्थापन काल	नोव्हेंबर (५१)	१४
रण	नोव्हेंबर (५१)	१५
१९ उद्धरण	नोव्हेंबर (५१)	१४
२० उपसंहार	फेब्रुवारी (५२)	
२१ कोहल	नोव्हेंबर (५१)	१०
२२ कुटजारिष्ट (प्र).	फेब्रुवारी (५२)	
२३ गालन	नोव्हेंबर (५१)	
२४ जीरकाद्यरिष्ट	फेब्रुवारी (५२)	
२५ टिकाऊ काढे	जानेवारी (५२)	८
२६ टिंक्चरर्स	जानेवारी (५२)	११
२७ टिंक्चर्स आणि मद्य	जानेवारी (५२)	१३
२८ टिंक्चर आमाय (प्र)	फेब्रुवारी (५२)	
२९ तापनम्	नोव्हेंबर (५१)	१५
३० द्राक्षासव (प्र.)	फेब्रुवारी (५२)	
३१ निधापन	नोव्हेंबर (५१)	१३
३२ निर्मलीकरण	नोव्हेंबर (५१)	१५
३३ प्रक्षेप, प्रलोप, प्रधूपन	नोव्हेंबर (५१)	१०
३४ प्रपीडन	नोव्हेंबर (५१)	१५
३५ परिवर्तक	नोव्हेंबर (५१)	९
३६ परिवर्तन	डिसेंबर (५१)	८
३७ परिवर्तनारंभ	,,	९
३८ पक्वापक्व निर्णय	नोव्हेंबर (५१)	१५
३९ पाणी	सप्टेंबर (५१)	१२
४० भरण व मुद्रण	नोव्हेंबर (५१)	१२
४१ भांडी	सप्टेंबर (५१)	१०
४२ मधुर द्रव्यें	आक्टोंबर (५१)	१२
४३ मिश्रण	नोव्हेंबर (५१)	१२
४४ मद्य लक्षण	ऑगस्ट (५१)	१२
४५ मद्यकल्प	जानेवारी (५१)	८
४६ मानपरिभाषा	फेब्रुवारी (५२)	
४७ संधानविधी इतिहास	ऑगस्ट (५१)	१५
४८ संधानविधान	सप्टेंबर (५१)	९
४९ सुगंध धारणम्	नोव्हेंबर (५१)	१५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

WILICO
STRONGHOLD OF PROTECTION

१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन !

१९५१ मध्येंही रु. २ कोटी ६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम

वेस्टर्न इंडिया

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा
यासंबंधीची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस.

हयातींतील विमा	हयातीनंतरचा विमा
रु. २७.	रु. ३३.

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठीं
वेस्टर्न इंडियाचीच निवड करा.

के. वाय्. जोशी, बी. ए. एफ. आय., ए.
मॅनेजर

वेस्टर्न इंडिया लाइफ

इन्शुअरन्स कंपनी लि., सातारा.

Vima 30 100–52

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आ भा र

१९५१ हें अर्कशालेचें रौप्यमहोत्सव वर्ष अपेक्षेनुसार यशस्वी ठरले आहे हें अर्कशालेच्या हितचिंतकाना निवेदन करताना आनंद वाटतो.

ज्या ग्राहक, वैद्य व विक्रेत्यांनीं या वर्षी अर्कशालेस सहकार्य दिलें त्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

अर्कशालेची औषधें जनतेंत मान्यता पावत आहेत, असा या वर्षी समाधानकारक अनुभव आला. जाहिरात, प्रचार साधनें व विक्री वाढीच्या दृष्टीनें उपयोगांत आणले जाणारे इतर मार्ग हाताळण्याच्या दृष्टीनें अर्कशाला अद्याप आर्थिक दृष्टया समर्थ नाहीं. शास्त्रशुद्ध व प्रामाणिक औषधी निर्मिती हेंच अर्कशालेचें खरें बळ आहे. त्याच्या आधारावर इतर साधनें व सामर्थ्येंहि अर्कशाला मिळवू शकेल. तोपर्यंतच्या काळांत आमच्या उणीवाबद्दल आपुलकीची व सहानुभूतीची दृष्टी ठेवून अर्कशालेच्या विक्रेत्यांनीं व वैद्यवर्गानें यापुढेहि सहकार्य करावे अशी माझी त्याना अंतःकरणपूर्वक विनंति आहे.

— *वि. ल. आगाशे*
अध्यक्ष, संचालक मंडळ
आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभवसिद्ध

अर्कशाला-औषधें

यूटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

गरोदरपणीं सतत घेतल्यानें प्रकृति चांगली राहून गर्भाचें उत्तम पोषण होते.

लोहीन

रक्तवृद्धीकर, लोहकल्प

रक्तक्षीणता, पांडुरोग व मोठ्या आजारानंतरचे दौर्बल्य यांवर उत्कृष्ट गुणकारी.

वसंतमिश्रण

सुवर्ण व मौक्तिक, प्रवाळ, शृंग, गुळवेल यांचा कल्प

जीर्णज्वर, क्षयांची पूर्व व प्रारंभिक लक्षणें, शक्तिक्षीणता याकरिता

शिशुजीवन

बालकांकरिता टॉनिक

लहान मुलांचा दमा, खोंकला, अपचन इ. तक्रारी दूर होतात.

स्तन्यशोधन

दुग्धशोधक व दुग्धवर्धक

प्रसूतीनंतर सतत घेतल्यानें मातेचे दूध निर्दोष होते व वाढते.

ही औषधें विक्रेत्यांच्या दुकानीं असली पाहिजेत त्यांची मागणी सतत वाढत आहे.

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

हें मासिक श्री. *विश्वनाथ लक्ष्मण आगाशे* यांनीं *आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि.*, येथें छापलें व आयुर्वेद महाविद्यालय, सातारा येथे प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके,
आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : ब. ल. वष्ट,
आयुर्वेद विशारद.

★

डॉ. मो. ना. आगाशे–रुग्णालय अंक

डॉ. मो. ना. आगाशे यांच्या दि. २.जाने. १९४९ रोजीं साजऱ्या झालेल्या षष्ठ्यब्दिपूर्ति–प्रसंगीं डॉ. आगाशे रुग्णालय उभारण्याचा संकल्प आ. प्र. मंडळीनें जाहीर केलेला होता हें रुग्णालय नुकतेच बांधून पुरें झालें व त्याचे उद्घाटन दि. १०·फेब्रुवारी १९५२ रोजीं डॉ. जिवराज मेहता यांच्या हस्ते झालें. या कार्यक्रमाचे सविस्तर वृत्त या अंकांत दिलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



दि. २ जानेवारी १९४९ दिवशीं डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालयाची कोनशिला दे. भ. दादासाहेब मावळणकर यांच्या हस्ते बसविण्यांत आली त्यावेळचें छायाचित्र. या संकल्पित रुग्णालयाचें बांधकाम पूर्ण होऊन नुकतेच त्याचें उद्घाटन करण्यांत आलें आहे. त्या संबंधींचा वृत्तांत या अंकांत आलेला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

चालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

वर्ष ५ वें] मार्च १९५२ [अंक ३ रा

वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ती त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या वीस तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

श्वेतकुष्ठावरील नवी औषधी

'पांढरे कोड' या विकारावर सोलापूरचे विख्यात वैद्य श्री. नृ. ना. बागेवाडीकर यांनीं बराच काल संशोधन चालू ठेवले होते. या विकारावर त्यांनीं एक नवे औषध सिद्ध केलें असून त्याचा अनेक रोग्यांना समाधानकारक गुण आलेला आहे. वैद्य बागेवाडीकरांनीं या औषधाच्या अनुभवाची टिपणें ठेवलेली असून त्यावरून तें श्वेतकुष्ठाच्या प्रारंभिक व दीर्घकालीन अवस्थेंत पूर्णपणें यशस्वी ठरले आहे असें आढळून आलेलें आहे.

या औषधाच्या निर्मितीची व विक्रीची व्यवस्था श्री. बागेवाडीकरांनीं अर्कशाळेकडे सोपविलेली आहे. श्री. बागेवाडीकर हे अर्कशाळेचे औषधीकरणविषयक सल्लागार व आ. वै. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनीं या आपल्या संशोधनाचा लाभ अर्कशालेस करून देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल अर्कशाळा त्यांची ऋणी आहे.

प्रारंभी हें औषध वैद्य वर्गास विनामूल्य पुरवावे अशी योजना आहे. ज्यांच्याकडे श्वेतकुष्ठांचे रोगी असतील अशा वैद्यांनीं अर्कशाळेकडे कळवावे. त्यांना संपूर्ण सूचनांसह हें औषध पाठविण्यांत येईल. त्यांनीं आपले चिकित्साविषयक अनुभव अर्कशाळेस कळविण्याची कृपा करावी. अनुभवांची पुरेशी टिप्पणी तयार झाल्यावर हें औषध सार्वत्रिक विक्रीसाठीं बाजारांत येईल.

बहुधा पुढील महिन्यांत मागणीनुसार हें औषध वैद्यवर्गाकडे पाठविण्यांत येईल. वैद्यवर्गाच्या सहकार्याची आम्ही अपेक्षा करीत आहोत.

अर्कशाळा

शास्त्र–विभाग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छोट्या जाहिराती

वैद्य, डॉक्टर व औषध विक्रेते यांच्या माहितीकरितां

आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांची सूची

(हें सदर प्रत्येक अंकांत नियमितपणें प्रसिद्ध होते भारतांतील विशेषतः मुम्बई राज्यांतील सर्व आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांचा या सदराद्वारे वैद्य, डॉक्टर व विक्रेते आणि ग्राहक यांना सातत्यानें परिचय होत असतो. एक प्रकारे "Buyer's Guide" हें या सूचीचें स्वरूप असल्यानें या सदराचें महत्त्व जाहिरातदारांना वेगळें सांगावयास नको.

ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती इतरत्र यां अंकांत वर्षाच्या करारानें घेण्यांत आलेल्या आहेत त्यांची माहिती या सूचींत *विनामूल्य* छापली जाते. केवळ सूचीसाठीं मजकूर पाठविणाऱ्या जाहिरातदारानीं वर्षाचे करारानें जाहिरात दिली पाहिजे. वर्षाचा दर फक्त तीस रुपये आहे. ही रक्कम आगाऊ द्यावी लागेल. मजकूर जास्तीत जास्त चार ओळी असावा.)

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकाराच्या औषधी वनस्पतीचें विक्रेते. महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत येतो. वैद्य व गाहकांनीं माहिती मागवावी. वाकेरीभाते खात्रीनें मिळते.

शा जादवजी लल्लूभाई आणि कं०

सर्व प्रकारची काष्ठौषधि व औषधी निर्मितीसाठीं लागणारी कच्ची द्रव्ये यांचे विक्रेते. २४५ काळबादेवी रोड मुंबई २.

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी. (यू. पी.)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. इंजेक्शनविषयक "सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन विज्ञान" या पुस्तकाचे प्रकाशक.

अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (मध्य प्रदेश)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शनचिकित्सा (मूल्य २ रु.) या पुस्तकाचे प्रकाशक.

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर.

पुरोहित श्वासहारी, शोधना इ. विख्यात निर्माते.

आयुर्वेदिक धन्वतरी फार्मसी अहमद

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ऊंझा फार्मसी लि. उंझा (उ. गुजरा

छप्पन्न वर्षांपासून चालू असलेली संस्था. व पेटंट औषधे तयार केली जातात.

अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. वै क्शनचे शिक्षण दिले जाते. पत्रव्यवहार— प्रतापगं

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातार

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें तयार के आयुर्वेद प्रसारक मंडळी या संस्थेच्या रुग्णालयांत जातात. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, हैद्रावाद सर्वत्र विक्रेते आहेत.

संसार में सर्व प्रथम आयुर्वेदिक इन्जेक्शन की आविष्कर्ता और निर्माण

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मेसी (रजिस्टर्ड) झाँसी के

→ बने हुए ←

तार का पता इन्जेक्शन झाँसी

मिश्रा आयुर्वेदिक इन्जेक्शन्स

फोन नं.

प्रयोग कर निरोग बने

हमारे यहाँ इन्जेक्शन लगाने की शिक्षा प्राप्त करने के लिये नियम सूची मंगालें।

हें सदर अवश्य वाचा.

तें उपयुक्त आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपादकीय

...आगाशे-रुग्णालय

संकल्पापासून सिद्धीपर्यंत

आ. प्र. मंडळीची १९१८ सालापासून अव्या-...ज पावेतो सेवा करीत असलेले डॉ. मो ना. ...यांच्या कार्याचे प्रतीक म्हणून उभारण्यांत ...या रुग्णालयाचा उद्घाटन समारंभ दि. १० ...रीस साजरा झाला. या रुग्णालय योजनेच्या ...ापासून सिद्धी पावेताचा इतिहास म्हणजे संस्थेच्या ...द्दल जनतेनें दिलेलें प्रशस्तीपत्रच होय.

१९४७ च्या मे महिन्याच्या आयुर्मीमांसा अंकांत डॉ. ...यांच्या षष्टयद्बिपूर्तीचे पहिले सूतोवाच आ. व. ...द्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनीं केले. डॉ. आगाशे ...एकसष्टाव्या वाढदिवसानिमित्त त्यांचा प्रकट सत्कार ...आणि त्या निमित्तानें संस्थेसाठीं निधी गोळा करावा ...योजना या पत्रकांत मांडली होती. या निधिचा विनियोग ...आगाशे यांच्या नावानें एक रुग्णालय उभारण्यासाठीं ...असा संकल्प या पत्रकांत जाहीर करण्यांत आला. ...क सोलापूरचे वैद्य बागेवाडीकर, श्रीपाल नेमिनाथ ...ाय, वाड्याचे वैद्य वि. वा. नेंने, चिपळूणचे वैद्य ... थत्ते, शहाबादचें वै. अपरंजी, कोल्हापूरचे श्री. ...स, मुंबईच्या सौ. निर्मलाबाई मराठे, साताऱ्याचे ...ील कार्यकर्ते वै. गो. आ. फडके व दि. बि. बोडस, ...चे वैद्य भा. द. गोडबोले, कुर्डूवाडीचे वै. श्री. मो. ...कर, सांगलीचे वै. वा. वा. जोशी, कारंजा येथील ...द्र रतनसा वैद्य, मिरजेचे वैद्य गो. आ. कुलकर्णी, ...रचे वैद्य प. अ. दातार, मुंबईचे स. म. पेंडसे या ...च्या नामवंत माजी विद्यार्थ्यांनीं प्रसिद्ध केले होते.

यापूर्वीच माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्यानें संस्थेनें डॉ ...शे 'हीरक महोत्सव समितीं' स्थापन केली होती व या ...तीच्या कार्यवाहपदावर डॉ. वि. ल. उर्फ भाऊराव आगाशे ...योजना झाली होती. डॉ. भाऊराव आगाशे यांनी

१९४७ सालच्या दुसऱ्या षण्मासापासून संस्थेच्या सर्व माजी विद्यार्थ्यांना निधीविषक विनंती पत्रें पाठविण्यास प्रारंभ केला. या मोहिमेच्या प्रारंभीच यशाची प्रसाद चिन्हें म्हणून आलेल्या देणग्यांचा उल्लेख करावा लागेल. शहाबादचे श्री. ल. व्यं. अप-रंजी यांनी आठशे रुपयांचे आश्वासन जाहीर केले. श्री वि. वा. नेने यांनीं रु. ५०१ ची रक्कम प्रत्यक्षच धाडून दिली. श्री. द. का. थत्ते व श्री. प. अ. दातार यांनींहि प्रत्येकी रु. ५०० पाठवून दिले. यानंतर प्रतिमासो माजी विद्यार्थ्यांच्याकडून वाढत्या प्रमाणांत देणग्या येऊ लागल्या. आगस्ट १९४७ अखेर आश्वासने व प्रत्यक्ष देणग्या मिळून निधीची रक्कम दहा हजार रुपयांच्या वर गेली. श्री. हेमचंद्र वैद्य, श्री. उपाध्यय इ. माजी विद्यार्थी कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष कार्यास प्रारंभ केला होता. १९४७ अखेर निधीनें पंधरा हजारांची मर्यादा ओलां-डली. १९४८ अखेर हा आंकडा वीस हजारांवर गेला. यांत डॉ. आगाशे यांचे स्नेही व संस्थेचे हितचिंतक यांच्याहि देणग्या समाविष्ट होत्या. श्री. भाऊराव आगाशे यांनीं विदर्भात व श्री. गो. आ. फडके यांनीं दक्षिण महाराष्ट्रांत यावर्षी दौरे काढले व माजी विद्यार्थ्यांच्या भेटी घेतल्या. अर्कशाळेचे प्रवासी प्रतिनिधी श्री. पाध्ये यानीहि आपल्या दौऱ्यांत या कार्यांचा प्रचार चालविला होता. यासर्वांचा इष्ट परिणाम घडून आला.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सत्कार समारंभ

दि. २ जानेंवारी १९४९ ला भारतीय लोकसभेचे अध्यक्ष दे. भ. दादासाहेब मावळणकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. मो. आगाशे यांचा षष्टचब्दिपूर्ति समारंभ अतिशय थाटानें पार पडला. या समारंभासाठीं नागपूरपासून धारवाड पर्यंतचे सुमारे सवाशे माजी विद्यार्थी आले होते. अध्यक्षांचे हस्तें डॉ. आगाशे यांना ६२००० रुपयांचा निधी अर्पण करण्यांत आला. दे. भ. मावळणकरांनीं डॉ. आगाशे यांच्या सेवा कार्याचें प्रतीक म्हणून उभारल्या जावयाच्या 'डॉ. आगाशे रुग्णालयाच्या कोनशिलेचे अनावरण केलें. त्यांनीं आपल्या भाषणांत डॉ. आगाशे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले, "डॉ. आगाशे यांच्यासारखी माणसे समाजांत जितकी अधिक असतील तितकी समाजाची उंची वाढेल. या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी सत्कार निधीस सत्तावीस हजार रुपयांची देणगी दिली आहे याचा अर्थ इतक्या अनेक ठिकाणीं वैद्यकीय मदतीची केंद्रें चालू आहेत असा होतो. या संस्थेचें प्रतिनिधि म्हणून ही माणसे ठिकठिकाणीं सार्वजनिक आरोग्याचें काम करीत आहेत. डॉ. आगाशे या व्यक्तीचा हा जो उचित सन्मान होत आहे त्यांतच संस्थेचा गौरव आहे"

रुग्णालय–निधि

या षष्टचब्दिपूर्ति समारंभानंतर 'डॉ. आगाशे सत्कार–निधि' 'डॉ. आगाशे–रुग्णालय निधि या नावानें पुढे चालू ठेवण्यांत आला. कारण रुग्णालयाच्या तिमजली इमारतीच्या खर्चाचा अंदाज साडेतीन लाखांपर्यंत होता. संस्थेच्या कार्यकर्त्यांनीं इमारत बांधणीची योजना लवकरच हातीं घेतली आणि ती आता पूर्ण होत आहे. रुग्णालय–निधींत आज पावेतो आणखी थोडी फार भर पडलेली आहे. त्यांत रुग्णालय–उद्घाटनाच्या वेळच्या उल्लेखनीय देणग्या अशा आहेत. सातारच्या छत्रपति श्रीमती राणीसाहेब यांनीं एक हजार रुपयांची देणगी दिली. वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे मुंबई शाखेचे प्रमुख श्री. नारळकर यांनीं रु. १०१ धाडले, एक माजी विद्यार्थिनी सौ. बापट यांचीहि रु. १०० ची देणगी आली. गुहागरचे श्री. रप अ. दातार यांनी प्रारंभीच्या रु. पाचशेच्या देणगीनंतर आणखी रु. २५१ पाठविले. निधीचे कार्य याप् राहाणार आहे.

यापुढील अपेक्षा

डॉ. आगाशे रुग्णालयाची इमारत उभी रा पण त्या इमारतीच्या निमित्तानें संस्थेला जो कर्ज स्वीकारावा लागला त्याची चिंता संस्थेच्या क वाहावीच लागेल. संस्थेचे एकूण कर्ज सुमा लाख रुपयांचे आहे. हें कर्ज फिटल्याशिवाय संस्थेला लाभणार नाहीं व तिच्या प्रगतीला वेग येणा संस्थेच्या कार्यकर्त्यांची एक पिढी एवढ्या कार्याच्या साठीं खर्ची पडलेली आहे. याच पिढीला संस्था होऊन सुस्थिर व प्रगतिशील झालेली दिसली स्वप्न खरें होण्यासाठीं संस्थेच्या हितचित माजी विद्यार्थ्यांनीं जास्तीत जास्त सहाय्य केले कार्यकर्ते स्वार्थत्याग व कष्ट यांची परिसीमा करी पण या मार्गानीं पैसे उत्पन्न होत नाहींत. ते हितचिंतकांच्या व जनतेच्या दातृत्वातूनच निर्माण संस्थेच्या ज्या माजी विद्यार्थ्यांनीं अद्यापहि या कार्या हातभार लावलेला नाहीं. त्यांनीं आपली शक्य तेव देणगी पाठवून द्यावी. ज्यानी व्यक्तिशः देणग्या आहेत, त्यांनीं संस्थेसाठीं देणग्या मिळविण्याचा करावा. ज्यानां दीर्घमुदतीचे कर्ज देतां येणे श त्यांनींहि या मार्गानें सहाय्य करावें.

अभिमानास्पद घटना

डॉ. आगाशे यांचा सत्कार आणि रुग्णालया रणी या संस्थेच्या इतिहासातल्या अभिमानास्प आहेत. त्या घडवून आणण्यास जे जे कार्यकर्ते धनिक, हितचिंतक व संस्थेचे माजी विद्यार्थी झाले त्या सर्वांना आयुर्मीमांसेच्या वतीनें धन्यवा ज्या कार्यनिष्ठेमुळे व 'सहकार्य पूर्ण स्नेहभा साध्य झाले ते गुणविशेष या संस्थेच्या परिसरां नांदोत अशी आयुर्मीमांसेची परमेश्वराजवळ प्रार्थना करणे ... श्रेय त्यानाच आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…र्न इंडिया विमा कं. चे यश

सातारा येथील वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या ११ मूल्यमापनाचा अहवाल आमचेकडे आला आहे या अह- …वरून कंपनीचें यश वर्धिष्णु आहे असेच दिसून येते.

…र्न इंडियाची गणना भारतांतील विख्यात व पहिल्या …च्या विमाकंपन्यांत होते. कंपनीनें भारतातील प्रमुख …ी स्वतःच्या इमारती बांधलेल्या असून अनेक ठिकाणी …ा स्थापन केल्या आहेत. प्रतिवर्षी तिचा व्याप वाढत … वरील मूल्यमापनावरून पुढील वैशिष्टये स्पष्ट होतात. …त्रैवार्षिक मापनाचे वेळीं व्याजाचादर शेकडा ३.५४ …ा पडला. कंपनीचा अंदाज २.८७५ इतका होता. …चे उत्पन्नाशीं प्रमाण शें: ११.७७ पडते. वुइथ प्रॉफिट …सीच्या २२.७८ इतकी खर्चाची तरतूद केली आहे. …उट प्राफिट पॉलिसिच्या शें १६.१६ खर्चाची तरतूद … आहे. कंपनीचे चालू काम पंधरा कोटी ७५ लाखांवर

या आकडेवारीवरून कंपनीचे यश लक्षांत येते. अत्यंत …र पायावर कंपनीचे काम चालू असून तिनें जनतेचा … विश्वास संपादन केला आहे.

…भिप्राय

गृहवैद्य अथवा क्षारचिकित्सा

(ले.:- र. कृ. गद्रे एम्. बी. बी. एस्. मूल्य ३ रु. …ाशक सौ. लीला रघुनाथ गद्रे बी. ए. डॉ. गद्रे यांचा वाडा शुक्रवार, पुणें २)

हें क्षारोपचार चिकित्सेवरील सुलभ व सुबोध पुस्तक …न डॉ. गद्रे यांनीं जिज्ञासूंची फार मोठी गरज पुरी केली …. सामान्य वाचकाला समजेल अशी या पुस्तकाची भाषा …न घरगुती उपचार करण्यांस हें पुस्तक मार्गदर्शक …ल. या पुस्तकांत सुमारे पाउणशे रोगांचा परामर्श घेतला …े. परिशिष्टांत कांहीं उपयुक्त क्षार मिश्रणें दिलेली आहेत. …टी जोडलेल्या सूचीपत्रांत रोगांची इंग्रजी व मराठी नांवे …ली असून त्यांवर उपयुक्त असणाऱ्या क्षारांची माहिती …ी आहे.

डॉ. गद्रे यांचे पितामह डॉ. ग. कृ. गद्रे यानीं 'सार्थ …भट' या ग्रंथाचे संपादन केले होते. मराठी भाषेची व …काची सेवा डॉ. र. कृ. गद्रे यांनीं पुढे चालवून घराण्याची …रा अखंड राखली आहे हें विशेष होय. जिज्ञासूना हें …क संग्राह्य आहे.

नवा अविष्कार

स्त्री, पुरुष, बालक या सर्वांच्याकरिता

अत्युत्तम महौषधी

नवरत्नरस

हा हिरा, माणिक, मौक्तिक इ. नवरत्नें आणि सुवर्ण यांच्या संयोजनानें तयार करण्यांत आलेला कल्प आहे. शरीरस्थ रस, रक्त आदि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण, शुक्र, वीर्य यांची शुद्धी आणि पुष्टी करणें हे या औषधाचें विशिष्ट कार्य आहे. तसेच यानें नपुंसकत्व, वीर्यस्राव, स्वप्नदोष इ. चे निर्मूलन होऊन नवयौवन प्राप्त होते. स्त्रियांच्या गर्भाशयशोथ, प्रदर वारंवार होणारा गर्भपात, गर्भवतीच्या हातापायांवरील सूज व फिक्कटपणा यांवरहि गुणकारी आहे. वंध्यत्वाचा दोष दूर करणारी ही अपूर्व औषधी आहे. मुलांचे अस्थि-दौर्बल्य दूर करून अस्थि बलवान करणारे, कॅलसियम व व्हिटॅमिनची उणीव, दुधाचे अपचन नष्ट करून बालकांना धष्टपुष्ट करणारे असे हे औषध आहे. क्षय, जीर्णज्वर, कास, श्वास, मधुमेह, मानसिक दुर्बलता इत्यादि मध्येंहि अतिशय उपयुक्त आहे.

नवरत्नरस— निरोगी लोकांकरिता रसायन व रोगी लोकांना आरोग्य प्राप्त करून देणारे हे महान औषध आहे.

एका बाटलीची किंमत पांच रुपये

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा

(गुजराथ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इमारत निधी

आ. प्र. मंडळीच्या इमारत निधीस खालील प्रमाणें देणग्या मिळाल्या आहेत.

(१) कार्यवाह डॉ. मो. ना. आगाशे सत्कार समिति ५५००-०-०
(२) श्री. मु. ल. रानडे, पाल, (शिष्यवृत्तीसाठी) १,०००-०-०
(३) शेठ झंकारमल मुथा, सातारा ५००-०-०
(४) डॉ. म. अ. परांजपे, सांगली ५०१-०-०
(५) श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन, अधिपति, सांगली ५००-०-०
(६) अँड. ऑफीसर म्यु. स्कूल बोर्ड सातारा ४५०-०-०
(७) सौ. प्रमिलाबाई गाडगीळ, पुणे २००-०-०
(८) डॉ. मिसेस वेणुताई लेले, सातारा २००-०-०
(९) डॉ. पां. के. कोल्हटकर, सातारा २००-०-०
(१०) श्री. द. रा. कुलकर्णी मास्तर सातारा १७३-०-०
(११) कु. सोनुताई कुलकर्णी, १५०-०-०
(१२) पी. जी. भागवत, ऑडिटर मुंबई १०१-०-०
(१३) श्री. वामन पांडुरंग दिवेकर १००-०-०
(१४) क्ष तर्फे ऑ. कार्यवाह आ. प्र. मंडळी, सातारा १४६-४-०
(१५) कै. रा. ब. काळे चॅरिटेबल एन्डौमेन्ट ट्रस्ट व्याज ७४-१०-०
(१६) भाटीया सोप फॅक्टरी तर्फे श्री. रा. ना. गोडबोले ५१-०-०
(१७) भास्कर विनायक तेंडूलकर रत्नागिरी ५१-०-०
(१८) श्री. एम्. वाय्. कुलकर्णी, ढेकणे सातारा ५१-०-०
(१९) कै. गोपाळ बळवंत जोग तर्फे श्री. मो. आपटे वकील सातारा. ५०-०-०
(२०) य. दा लिमये ५०-०-०
(२१) श्री. ने. दे. पाटील ३ रें वर्ष, महाविद्यालय, पुणें ५०-०-०
(२२) श्री. डॉ. ए. एस्. रुबेन, सातारा ५०-

कर्ज देणाऱ्या गृहस्थांची यादी

(१) वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं. सातारा ४५०००-
(२) युनायटेड वेस्टर्न बँक सातारा ३०,०००-
(३) श्री. शंकर सदाशिव वैद्य, सातारा २,५००-
(४) डॉ. मे. ना. जोग, सातारा २०००-
(५) दत्तात्रय रामकृष्ण भिडे, घाटकोपर २०००-
(६) वैद्य गो. वि. जोशी, लोणंद १०००-
(७) वैद्य वा. कृ. आपटे शिपोशी ५००-
(८) श्रीमती सिताबाई भ्र. रामचंद्र विष्णु लेले २००-

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय
अशा शक्तिशाली
अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स
चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—
सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—
मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १०
व्यवस्थापक:— अरविंद केमिकल व
छिंदवाडा (सी. पी

भृंगराजासव—
जुनाट बद्धकोष्ठ व तज्जन्य सर्व विकारांवर
अत्यंत उपयोगी.
दि आयुर्वेदिक धन्वन्तरी फार्मसी लिमिटेड;
अहमदनगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉ. आगाशे रुग्णालय

उद्‌घाटन प्रसंगीं आलेले संदेश

१ मिनिस्ट्री ऑफ हेल्थ गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, न्यु दिल्ली
२ ऑनरेबल रा. ग. सोमण मुंबई
३ श्री. डी. एन्. वांद्रेकर पार्लमेंटरी सेक्रेटरी, मुंबई
४ आमदार श्री. पु. पां. गोखले. मुंबई.
५ आमदार डॉ. मो. ना. नातू, पुणें
६ श्री. एस्. जी. बर्वे म्युनिसिपल कमिशनर पुणें
७ श्री. शं. के' कानेटकर उर्फ कवि 'गिरीश' सांगली
८ श्री. शं. गो. गोखले, संपादक 'ज्ञानप्रकाश' पुणें

फॅकल्टीचे चेअरमन व सभासद

९ डॉ. बी. बी. योध, चेअरमन ऑफ दि. बोर्ड ऑफ इंडियन सिस्टिम्स् ऑफ मेडिसन मुम्बई
१० के. एस्. म्हसकर, मुम्बई, मेंबर ऑफ दि फॅकल्टी
११ वैद्य वि. म. गोगटे, नासिक, मेंबर ऑफ दि फॅकल्टी
१२ वैद्य वा. म. बाके, बेळगांव मेंबर ऑफ दि बोर्ड
१३ आर. ए. पोदार मेडिकल कॉलेज, मुम्बई
१४ प्रिन्सिपॉल, जामनगर आयुर्वेदिक कॉलेज जामनगर
१५ आयुर्वेद महाविद्यालय, पुणें
१६ श्री. ओ. एच्. नाझर आयुर्वेद महाविद्यालय सुरत
१७ अंबा प्रसाद बारोट, बडोदे
१८ आर्युविद्या प्रसारक मंडळ, मुंबई
१९ वैद्य प्रतापकुमार पोपटभाई वैद्य
२० वल्लभराम वैद्य, अहमदाबाद
२१ वैद्य इंद्रशंकर मानशंकर देसाई, राजकोट

आयुर्वेदीय संस्था व व्यक्ति

२२ आयुर्वेदाश्रम फार्मसी अहमदनगर
२३ वैद्य गं. वि. पुराणिक पनवेल
२४ संपादक 'आरोग्य मंदीर' पनवेल
२५ वैद्य पु. वि. धामणकर शास्त्री पनवेल
२६ वैद्य बिंदुमाधव पंडित व्यवस्थापक आयुर्वेद सेवा संघ नासीक
२७ वैद्य द. कृ. सांडू चेंबूर
२८ आयुर्वेद रसशाळा पुणें
२९ शेठ ताराचंद रामनाथ चॅरिटेबल आयुर्वेदिक हॉ पुणें
३० आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे, पुणें,
३१ वैद्य वा. न. ग्रामोपाध्ये, बेळगांव

वे. इं. ला. इ. इ. कं.

३२ वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी, पुणें शाखा
३३ वे. इं. ला. इं. बेळगांव शाखा
३४ वे. इं. ला. इं. लि. कोल्हापूर शाखा

माजी विद्यार्थी

३५ वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी, मुम्बई
३६ वैद्य नृ. ना. बागेवाडीकर, सोलापूर
३७ वैद्य प. अ. दातार, गुहागर
६८ वैद्य एन् एल्. जोशी, अकोला
३९ वैद्य आ रं. दिक्षीत, कोल्हापूर
४० वैद्य एस्. एन्. फाटक आमळगांव, पूर्व खानदेश
४१ वैद्य के. शं. हळदीकर, कोल्हापूर

सन्मान्य गृहस्थ

४२ के. सी. छेड्डा, मुंबई.
४३ श्री. एच्. जी. करमकर, मुम्बई
४४ फेअरिलँड फिल्म डिस्ट्रिब्युटर्स, बागलकोट
४५ उत्तर सातारा जिल्हा कॉंग्रेस कमेटी, सातारा
४६ कमलाबाई देशपांडे पुणें
४७ श्री. शं. वि. सोहनी, मुंबई
४८ सौ. इंदिराबाई नातू, पुणें
४९ श्री. व्ही. जी. आराध्ये, वे. इं. ला. इं. कं. कोल्हा
५० श्री. ह. ना. जोग सांगली
५ श्री. रुद्रभटे, फलटणं
५२ मोतीलाल वीरचंद शहा
५२ श्री. वर्तक सांगली मालेगांव
५३ श्री. राजाभाऊ वेलणकर, सातारा
५४ जी. एन्. हर्षे म्हा. प्रे. अॅडोलेसंट वेल फेअर सो पुणें
५५ बी. एन्. हेगडे १२७ शिवाजीपार्क दादर मुम्बई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



डॉ. जिवराज मेहता उद्घाटन प्रसंगीं भाषण करीत असतांना



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालय

★

रुग्णालयाचें उद्घाटन करीत असतांना
डॉ. जिवराज मेहता

★

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळीची गेली तेरा वर्षें

डॉ. आगाशे रुग्णालयाच्या उद्‌घाटन प्रसंगीं संस्थेच्या कार्यवाहांनी सादर केलेला अहवाल

आ. प्र. मंडळीचे कार्यवाह डॉ. वि. ल. आगाशे यांनीं दि. १०–२–५२ दिवशीं साजऱ्या झालेल्या डॉ. आगाशे रुग्णालयाच्या उद्‌घाटन प्रसंगीं संस्थेच्या गेल्या तेरा वर्षांतील सेवाकार्याचा धावता आढावा घेतला तो येथें दिला आहे. संस्थेचें जीवन चिंता आणि परिश्रम यांनींच विणलेलें आहे. पण त्या जीवनवस्त्राला आतां मनोहर रंग रूप आलें आहे, जनतेनें ते यापुढें अधिक समृद्ध करावे अशी त्यांनीं या अहवालांत जनतेस अंतःकरणपूर्वक विनंति केली.

ऑ. डॉ. जीवराज मेथा, नि सर्व उपस्थित बंधु गिनीनों,

डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालयाच्या या उद्‌घाटन गीं आपणा सर्वांचें संस्थेतर्फे स्वागत करण्यास मला नंद होत आहे ! या प्रसंगीं संस्थेच्या रुग्णालय विभागाचें तदनुषंगानें संस्थेच्या कार्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्याची परवानगी घेतो !

आजच्या आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाची स्थापना न १९१३ सालीं झाली. पहिली तेरा वर्षे, केवळ त्रकी बौद्धिक शिक्षण दिले जात असे. पण या शिक्षणास क्ष शिक्षणाची सोय केल्याशिवाय पूर्णता येणार नाही गोष्ट त्यावेळचे चालक जाणून होते. व म्हणून आप-पल्या दवाखान्यांत विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणाची ते सोय रीत असत. १९२६ सालीं कै. राव बहादुर काळे यांनीं पल्या वडिलांच्या स्मरणार्थ एक ट्रस्ट निर्माण केला व च्या नावानें आमचें चिकित्सालय सुरूं झालें. रूग्णालयाची प्राथमिक सुरवात होय. कै. रावबहादुरांनीं ३॥ टक्के जाच्या ५००० रुपयांच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा सर-च्या ताब्यांत ठेवल्या. त्यावर येणाऱ्या वार्षिक १७५ रुप-च्या व्याजाच्या मदतीनें "कै. रामचंद्र बल्लाळ काळे युर्वेदीय दवाखाना सुरूं केला गेला ! संस्थेचेच एक जी विद्यार्थी वैद्य सी. ना. रानडे याची दवाखान्यावर धिकारी म्हणून नेमणूक झाली व विद्यार्थ्यांना रोगी तपा-णें, चिकित्साक्रम शिकणें आदि करितां पहिली अधिकृत अशी सोय झाली. १९२८ सालीं रोगी ठेवून घेण्याचा प्रयत्नही करण्यांत आला. पण स्थिर स्वरूपाचें रुग्णालय सन १९३७ सालपर्यंत सुरूं झालें नाहीं.

१९३६ सालीं संस्थेनें हा गोजरा साहेबांचा वाडा व भोंवतालची सुमारें तीन एकर जागा खरेदी केली. व त्या वाड्यांत अवश्य त्या किरकोळ सुधारणा करून आपला संसार आपल्या स्वतःच्या जागेंत आणला. या करतां संस्थेने सुमारें २०,००० रुपये खर्च केले. शिवाय या नव्या जागेंत आजच्या वसति गृहाचा तळ मजलाही बांधून पुरा केला ! १९३७ सालीं वाईचें शस्त्रक्रियातज्ञ डॉ. वा. शं. उर्फ अण्णासाहेब दातार एम्. बी. बी. एस्. हें आठवड्यांतून दोन दिवस शस्त्रक्रिया करण्यास मुद्दाम येथें येऊं लागल्यामुळेच खऱ्या अर्थानें रुग्णालयाची स्थिर अशी मांडणी झाली. १९३७–३८ सालांतील पहिल्या पांच महिन्यांत प्रवेशित रुग्णांची १५ संख्या होती व १० शस्त्रकर्मे झाली! त्यावेळी आपण फार मोठी प्रगति केली असें आम्हाला वाटले! डॉ. दातारानीं पहिले शस्त्रकर्म आजच्या नव्या इमारतीच्या जागीं जुन्या इमारतीस जोडून असलेल्या एका पडवींत केले! !

सरकार मान्यता—

याच वर्षी कांग्रेसने प्रथम अधिकार स्वीकार केला, व या निरनिराळ्या ठिकाणीं होत असलेल्या प्रयत्नांची पाहणी करून त्यांना आर्थिक सहाय्यही देण्यांत आले! शिक्षणक्रमाची तपासणी करून सर्वत्र एक असा शिक्षणक्रम आखण्यास व या या संस्थांचें एक सूत्रीकरण करून नियंत्रण करण्यास देशी वैद्यक समितीचीही स्थापना केली! आमच्या संस्थेस याच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्षी कायमची मान्यतां मिळाली व २१००० रुपये प्रासंगिक नि वार्षिक रु. १९०० देणगीही दिली!

रुग्णालयाचा प्रथमारंभ—

यामुळे उत्साह वाढून संस्थेनें आधींच बांधलेल्या वसतिगृहाच्या तळमजल्यात आपलें रुग्णालय स्थिर पायावर सुरुं केले! आजच्या खोली नं. ९ व १० या विद्यार्थ्यांच्या खोल्यांत आमचे त्यावेळचें ऑपरेशन थिएटर होते! व १५ कॉटस्‌ची सोय केली गेली होती! २१०००. रुपये ग्रँट मिळाल्या कारणानें वसतिगृहावर पहिला मजला चढविला व आज उपयोगांत येत असलेले ऑपरेशन थिएटरही बांधणें शक्य झाले! पण दिवसानुदिवस हा विभाग वाढुं लागला तसतशी जागेची अडचण भास लागली! म्हणून आज सुरूं असलेल्या रुग्णालयाची इमारत बांधण्यांत आलीं. तेथें एकूण ३२ कॉटस्‌ची सोय करण्यांत आलीं. याचवेळीं राजकीय वातावरण बरेच अस्थिर झाले! युद्धाचा वणवाही भडकू लागला. कॉंग्रेसनें अधिकार त्याग केला व एक प्रकारें अस्थिर अशी परिस्थिती निर्माण झालीं! या नव्या इमारतीचा संस्थेला ३०,००० रुपये खर्च आला.

सन १९४१ वर्षी सौ. डॉ. शांताबाई खराडकर यांच्या सहाय्यानें संस्थेनें प्रसूति विभागही सुरुं केला. तत्पूर्वी येथील म्युनिसिपल प्रसूति गृहांत संस्थेच्या विद्यार्थिनींना प्रात्यक्षिक शिक्षणास म्युनिसिपॅलिटीनें परवानगी दिली होती.

अशा रीतीनें १९४१ अखेर चिकित्सालय, रुग्णालय, प्रसूतिविभाग इत्यादि अवश्य त्या विभागांची सोय पूर्ण केली गेली. पण संस्थेच्या दृष्टीनें तीं अल्प अशीच होती.

गेल्या तेरा वर्षांत क्रमाक्रमानें प्रगत होत जाणाऱ्या या रुग्णालयाच्या कार्याचें कांहीं आंकडे आपणास उद्बोधक वाटतील! उभय इमारतींना आतांपर्यंत सुमारे ७०,००० रुपये प्रत्यक्ष खर्च आला. पैकीं सरकारनें २१००० रुपये दिले ते यातच समाविष्ट आहेत.

गेल्या तेरा वर्षांत एकूण ५४४३ रोग्याना प्रवेश देण्यांत आला. एकूण ४०२८ शस्त्रकर्में केली गेली. चिकित्सालयात २,८९,३७० रोग्याना औषधोपचार करण्यात आला! प्रसूतिगृहाचा फायदा एकूण २०६२ स्त्रियांनीं घेतला. यांत शहराप्रमाणेंच जवळ जवळ ⅓ स्त्रिया खेड्यांत राहणाऱ्या आहेत. त्यापैकीं ⅔ स्त्रिया कष्ट प्रसूति अवस्थेतील आहेत! या सेवेबद्दल रोग्याकडून संस्थेला आजपर्यंत ८९५३८-७-० तकीं जमा झाली आहे व रुग्णालय चालविण्याकरितां २,२१,३२३ - ७ - ६ इतका खर्च करावा लाग[...] रोग्यांच्या खाण्यापिण्याची सोय अजून करतां आलेली [...] त्याकरतां व सर्वसाधारण शुश्रुषेकरतां रोग्यांच्या नातेवा[...] पैकीं कोणास तरी येथें राहणें भाग पडते!

या वरून रुग्णालय, व प्रसूतिगृह यांची कशी दि[...]नुदिवस प्रगति होत होती हें स्प्ट होईल. हे आंकडे [...] रुग्णालयाच्या मानानें लुटुपटीच्या संसारासारखेंच वा[...] पण ही सुरवातीची वर्षे आहेत! सातारा व भोंव[...] लोकवस्ती अजून मागासलेली आहे. व्यापार उदि[...] असल्यामुळें लोकांची ' येजा ' बेताचीच आहे, रुग्णा[...] शस्त्रक्रिया विभागाकडेच खरी भरती होत असते! आद्य शस्त्रचिकित्सक केवळ आठवड्यांतून दोन वे[...] असत १९४३ नंतर त्यांना इतरत्र अधिक काम पडत [...] मुळें तेही यावयाचें बंद झाले होते. १९४३ ते ५[...] जवळ जवळ सहा सात वर्षें हा विभाग तज्ञ शस्त्रचिकि[...]भावीं माझ्या सारख्याला चालवावा लागला. अडाणी [...] गरजू नि गरीब अशी खेड्यांतील रुग्ण मंडळी रुग्णा[...] तरीही येत असली, तरी सुशिक्षित नि शहरी [...] साशंकता वाटल्यास योग्यच तें होते! यामुळेही रुग्णाल[...] उपस्थितीवर परिणाम झाल्या शिवाय राहिला नाहीं.

तरी पण प्रतिवर्ष वाढत राहाणारी रुग्ण सं[...] विद्यार्थ्यांची संख्या याचा विचार करणें अवश्यच

गेली तेरा वर्षे

रुग्णालयाचा अहवाल

प्रवेशित रुग्ण	५४
शस्त्रकर्मे	४०
बाह्य रुग्ण संख्या	२८९३
प्रसूति	२०
रुग्णांकडून झालेली जमा	८९५३८
रुग्णाकरितां झालेला खर्च	२२१३२३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…पर्यंतची सर्व व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपाचीच होती ! …ण क्रमांतही क्रमशः वाढ होत होती. म्हणून सर्व सोईनीं …त व अधिक रुग्णांचा समावेश करतां येईल अशी रुग्णाल…ची नवी इमारत होणें अपरिहार्य होते ! पण युद्ध परि…तीमुळें प्रतिसाल वाढत जाणारी महर्घता, कोणत्याही नव्या …ना हातीं घेण्यास भिववीत होती. सरकारी सूत्रें …कीयांच्या ताब्यात होती ! केवळ स्वतःच्या प्रयत्नावरच हे …रिष्ट करावें लागणार होते. पण केल्याशिवाय गत्यंतरही …व्हते ! १९४६ सालीं त्यावेळच्या बाजार भावाप्रमाणें नवी …मारत उभारण्यास सुमारे ५०,००० रुपये लागत होते !

रक्कम कशी उभारावयाची ही चिंता …ला भेडसावीत असतांनाच सन १९४८ सालीं डॉ. मो. ना. …गाशे यांना ६१ वें वर्ष लागलें असल्याची माहिती मिळाली …डॉक्टरांचे संस्थेतील सन १९१८ पासूनचें कार्य व त्यांच्या …नेक विद्यार्थीवर्गाचें त्यांच्यावरील प्रेम या गोष्टींचा फायदा …घ्याचें मनाशीं ठरविलें. सोलापूरचे श्रीपाल वैद्य नि नृसिंहा… …र्य बागेवाडीकर, चिपळूणचे दत्तोपंत थत्ते वैद्य, गुहागरचे …वार वैद्य, बुरंबाडचे डॉ. साठे, वाड्याचे डॉ. नेने, कारं…चे डॉ. हेमचंद्र वैद्य अशा निवडक पण सुस्थितींत असलेल्या …द्यार्थ्यांना खाजगी पत्रें पाठवून त्यांच्यापुढें षष्ट्यब्दिपूर्ति …समारंभ साजरा करण्याची कल्पना मांडली व या समा…रंभाच्या निमित्तानें एक निधी उभारून एक रुग्णालय बांध…ण्याची योजना कायम केली.

डॉ. आगाशे सत्कार निधिः—

याचवेळीं राजकीय स्थितींत इष्ट बदल होऊन कॉंग्रेसनें …फिरून अधिकार स्वीकार केला ! आतां आशेचे किरण स्पष्ट दिसूं लागले ! योजनेला विद्यार्थ्यांचा पाठिंबाही चांगला मिळत गेला ! डॉक्टरांच्या अनेक स्नेहीमंडळींनीही …रीरीनें भाग घेतला. मुख्यतः प्रो नारळकर, रा. लंबोदरपंत …णीकर व वेस्टर्न इंडियाच्या एजंटस्नीं खूपच सहकार्य दिलें. …ता. २–९–४९ रोजीं लोकसभेचे अध्यक्ष ऑनरेबल् दादासाहेब …मावळणकर यांचे अध्यक्षतेखालीं हा समारंभ घडून आला व …या रुग्णालयाची कोनशिलाही त्यांनींच बसवली. एकूण …१००० रुपयांचा निधि या कार्याकरतां डॉक्टरांना अर्पण …करण्यांत आला ! यापैकीं केवळ माजी विद्यार्थ्यांची रक्कम …००० रुपये आहे. पूर्वीच्या कर्ज देणाऱ्यांनीं कर्जमाफी …केल्यामुळें प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष देणगी म्हणून …१२०० रुपयें आहेत. व शिवाय वेस्टर्न इंडिया बिमा कंप…नीनें ५००० रुपयें व सोल्जर्स बोर्डानें ४००० रुपयें या इमा…रतीकरतां एका रकमेनें देणगी दिली आहे.

दरम्यान संस्थेला शवच्छेदनाची सोय स्वतःच्या आवारात करणें अवश्य झाले. कायम मान्यतेच्या दृष्टीनें ही अट महत्त्वाची होती ! त्याकरतां नवी इमारत बांधण्याचें काम येथील रा. गोपाळराव कान्हेरे यांनीं सुरूही केले होते ! या शारीर विज्ञान गृहाकरतां संस्थेला एकूण ५४००० रुपये खर्च आला ! सरकारनें यापैकीं २७००० रुपये दिले तरी संस्थेला २७००० रुपये जमविणें भाग होते ! रुग्णालयाकरतां जमविलेली ही रक्कम त्यावेळीं खर्च झाली ! सन १९४२ ते १९५० पर्यंत दैनंदिन खर्चांत मनस्वी वाढ होत गेली त्या मानानें जमा मुळीच होत नव्हती. राहाणीचें मान द्रुत वेगानें चढत होतें. त्यामुळें कार्यकर्त्यांचें पगार वाढविणें अवश्य झाले ! शिवाय रुग्णालयोपयोगी सर्वच सामान महाग होत चालले. यामुळें संस्थेला प्रतिसाल तोटाच सहन करावा लागला व कर्ज काढून हा संसार चालवावा लागला! युद्धामुळे समाजातील कांहीं विशिष्ट वर्गाकडे जरी पैशाचा पूर आला तरी बहुसंख्य जनता महर्गतेमुळें टेकीस आली. त्यांच्याच कडून आजपर्यंत मुख्यतः देणग्या मिळावयाच्या त्या कमी पडू लागल्या. दैनंदिन जमाखर्चाची ही ओढाताण १९४९।५० सालपर्यंत चालली. या वर्षापर्यंत सरकार संस्थेला केवळ १९०० रुपये ग्रँट देत असे या वर्षापासून प्रथम १९००० व नंतर

गेली तेरा वर्षें

आ. प्र. मंडळीच्या इमारती

इमारतीकरितां प्रत्यक्ष खर्च	३१७७१८ रु.
मिळालेल्या देणग्या	१८७०१९ रु.
रुग्णालयांतील साधने	७५००० रु.
संस्थेची आजची मालमत्ता	सुमारे साडे सहा लाख रु.
संस्थेचे कर्ज	सुमारे सव्वा लाख रु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२०,००० रुपये ग्रँट सुरु झाली! दैनंदिन खर्चाची यापुढील चिंता तरी अंशतः कमी झाली पण पूर्वीचा कर्जाचा बोजा वाढला! हीरकमहोत्सव निधी संपला व रुग्णालयाच्या उभारणीस हातीं पैसा उरला नाहीं! इमारत बांधण्यास सरकारनें आम्हाला ५१००० रुपये प्रासंगिक देणगी दिली होती. त्यामुळें रुग्णालय एका वर्षांत उभे करणें नैतिक जबाबदारीचें होऊन बसलें! म्हणून काय होईल ते होवो हें बांधकाम सुरुं करावयाचेच हा निर्धार केला!

रुग्णाल्याची उभारणी:——

सरकारनें अंदाज पत्रकें व नकाशा मंजूर केला. पुण्याचे प्रसिद्ध आर्किटेक्ट रा. बापूसाहेब करमरकर यांनींच या कामीं पुढाकार घेतला. गेल्या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यांत मुंबईच्या ट्रियोबिल्डर्स या फर्म तर्फे रा. हेमंतराव करमरकर व रा. एम् जे. गद्रे यानीं प्रत्यक्ष कार्य शिरावर घेतले व आज मूळ नकाशांतील इमारतीपैकी दोन मजलें पूर्ण केले आहेत ते आपण पहाताच आहात. या नव्या इमारतींत स्वतंत्र ऑपरेशन थिएटर, सर्जिकल् वॉर्ड यांचीं सोय झाली असून कांहीं स्वतंत्र रुग्णाकरतांही खोल्या बांधल्या आहेत. मोठमोठ्या शस्त्रक्रियेकरतां लागणारी सर्व साधनें आतां उपलब्ध झाली आहेत. प्रतिसाल त्यांत भर घातली जात आहे शस्त्रक्रिया विभागांत २५ रुग्णांची सोय होत असून तळमजल्यावर तूर्त प्रसूतिविभाग ठेवणार आहोत. सुमारें २० प्रसूतींची सोय होऊं शकेल. या शिवाय अवश्यकताच निर्माण झाली तर आणखी १५ रुग्णांची सोय होईल. अशा रीतीनें नव्या इमारतीमुळें एकावेळीं ७५ रुग्णांची सोय करतां येईल! टिटानस किंवा अशाच सांसर्गिक रोगांनीं आजारी असणाऱ्या रुग्णांकरितां जुन्या इमारतींत जागा होऊं शकेलच.

सध्याच्या जुन्या ऑपरेशन थिएटरमध्यें क्लिनिकल लॅबोरेटरीची व्यवस्था केली जात आहे. तसेच रुग्णालयाला वापरली जात होती ती दालनें वर्ग भरविण्यास उपयोगिली जाऊन पूर्वीप्रमाणें जुन्या अिमारतीच्या तळमजल्यावर चिकित्सालयाची सोय केली जाईल. तसेच नेत्र तपासणीस व X ray करतां अंधेरे विभागही तयार केले जातील. कोरेगांवचे डॉ. देशपांडे आठवड्यातून एकवेळ, आपलें स्वतःचें मशीन घेऊन येत आहेत व तूर्त हा विभाग चालवीत आहेत!

कर्जाचा भार:——

या इमारतीस एकूण दोन लाख रुपये खर्च येत आहे. सरकारकडून यापैकीं एक लक्ष रुपये मिळाले तरी, आम्हाला एक लाख रुपये जमवावे लागणार आहेतच. रुग्णालय-उभारणीकरितां षष्ठ्यब्दि समारंभाच्या निमित्तानें प्रत्यक्ष हातीं आलेली रक्कम शारीरविज्ञान गृहाकडे खर्च झाल्यामुळें, इमारत कामाची तोंडमिळवणी कशी करावी अशी चिंता झाली! पण नामदार भाऊसाहेब सोमण, डॉ. श्रीयुत तात्यासाहेब साठे यांच्या खटपटीनें, येथील इंडिया विमा कंपनीनें चार टक्के दरानें दहा वर्षें ४५००० रुपये व युनायटेड वेस्टर्न बँकेनें ३०००० असे पाऊण लाख रुपये कर्ज दिले! कै. अण्णासाहेब यांनीही या कामीं विशेष आस्था दाखविली होती! वेस्टर्न बँकेचे कर्ज येत्या मार्चपूर्वीच फेडावयाचें आहे. २५००० रुपयांची उणीव शिल्लक राहातेच. ती देणग्या किंवा अल्प व्याजानें कर्ज रूपानेंच उभारल्या गत्यंतर नाहीं

अशारीतीनें या संस्थेच्या शिरावर सुमारें सव्वा रुपयांचें कर्ज आहे गेल्या तेरा वर्षांत नवी जागा केल्यापासून आजपर्यंत संस्थेनें १,८७,०१९ रुपये देणग्या वल्या. इमारतीकरतां आतांपर्यंत प्रत्यक्ष खर्च २,७ रुपये लागला असून नव्या इमारतीच्या खर्चापैकीं द्यावयाची रक्कम रु. ४२००० गृहीत धरली तर एकूण ३,१७,७१८ रुपये होईल! इमारतीची आजची पांच साडेपांच लाखांपुढें होईल! याशिवाय रुग्णाल इतर साधनें, फर्निचर उपकरणें आदि जवळ जवळ लाख रुपये (७५०००) खर्चावे लागले आहेत! अर्थ संस्थेची मालमत्ता सुमारें साडेसहा लाख रुपयांच्या जाईल! कर्ज केवळ सव्वा लाख रुपय आहे, यावरून कांनी कर्ज काढण्याची मर्यादासुद्धां आपल्या ऐपतीच्या जाऊं दिलेली नाहीं हे सहज लक्षांत येईल!

नव्या रुग्णालयांत इमारतीनें फार मोठी भर पडत तरी तदनुषंगिक वाढत्या जागेकरतां, कॉटस्, लॉकर्स रुग्णोपयोगी फर्निचर, रोग्यांना पुरे पडतील अशा गाद्या, ब्लँकिटे इत्यादि सामानाची तीव्रतेनें उणीव भासूं ला ऑपरेशन थिएटर करतां 'शॅडोलेस लँप, मोठें X मशीन, बायोकेमिस्ट्रीची लॅबोरेटरी, मायक्रॉस्कोप्स, जीनची मॉडेल्स इत्यादि नव्या शिक्षण साधनाची भर वीच लागेल! या शिवाय रोग्यांच्या नातेवाईकांना रा जेवण्याकरितां धर्मशाळा, परिचारिका व नोकरांना व प्रसूति विभागाची स्वतंत्र इमारत या गरजा राहातील! आणि हा उभारलेला व्याप कायम राहाण्याकरतां दैनदिन खर्च भागेल इतके व्याज एवढीं रक्कम कायमनिधी म्हणून शिल्लक पडेल त्या हें कर्ज [illegible] येईल,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…लयाची सुसज्जता

या नव्या रुग्णालयांत प्रमुख सर्जन म्हणून डॉ. दा. व. राजाभाऊ मालशे एम्. एस. एफ्. सी. पी. एस् हें …करतील! गेली दीड वर्षं ते काम करीत आहेतच. …तारकरांना व आसपासच्या खेंड्यांतील जनतेला …च्या कौशल्याची जाणीव करून देत आहेच. …च्या आगमनानें शस्त्रक्रिया विभागाची पूर्णता होत … नेत्र विभागाची डॉ. मा. द. बोकील डी. ओ. एम्. … या तज्ञ चिकित्सकांनीं आधीच जवाबदारी घेतली … प्रसूति विभागाकडे प्रसूति शास्त्र व स्त्रीरोग याचे …ष ज्ञान घेतलेल्या डॉ. श्रीमती मथुताई आठल्ये एल, … पी. अेस् एल्. ओ. जी. या नव्यानेच आल्या आहेत. काय…त्सा विभाग आयुर्वेदाचार्य गोविंद शास्त्री फडके, या …र्वेद चिकित्सा-तज्ञाकडे सोपविला असून चिकित्सालयांत …षधि तज्ञ वैद्य दिनकर शास्त्री बोडस यांची योजना केली …हे. अशा रीतीनें रुग्णालयांत निरनिराळ्या विभागा- … आतां त्या त्या विभागाच्या विशेष तज्ञांची जोड मिळत …हे; मलमूत्र रक्त आदि तपासण्याचें कार्य मुंबईच्या … ई. एम्. रुग्णालयांत विशेष शिक्षण घेऊन आलेले …मचेच एक पदवीधर रा. जी. एम्. भोसले डी. अे. …न्. एफ्. हें करणार आहेत या तज्ञांच्या जोडीला इतर …र्यकर्त्यांनी मदत आहेच! यामुळें जनतेला रुग्णालयां-…ल कार्याबद्दल साशंकता वाटण्याचें कारण नाहीं. केवळ …वाचा जुन्या एल् सी पी. अेम्. झालेल्याच्या ताब्यांत आतां …रुग्णालय नसून त्या त्या विभागांत तज्ञ येथे काम करीत …आहेत ही गोष्ट मला प्रामुख्यानें स्पष्ट करावयाची आहे

यापुढें येऊ घातलेला नवा शिक्षण क्रम, व हें वाढते …णालय यांची जवाबदारी या उच्च पदवीधर नि नव्या …च्या कार्यकर्त्यांनीच घ्यावयाची आहे, त्यांच्या कर्तव-…रीला योग्य असें क्षेत्र निर्माण केले गेले आहे. ही जबाब…री शिरावर घेऊन ही संस्था ते अधिक कार्यक्षम नि …ारत ठेवावी अशी मी त्यांना विनंति करीत आहे.

शेवटीं या रुग्णालय उभारण्याच्या कामीं द्रव्य, …रिक कष्ट, पाठिंबा इत्यादि रूपानें अनेकानीं जे सहाय्य … त्या सर्वांचें संस्था मनःपूर्वक आभार मानीत आहे. …षतः इमारतीचें नकाशे व अंदाज पत्रकें तयार करून … इमारत पुरी होईपर्यंतचे सर्व काम पुण्याचे प्रसिद्ध …किटेक्ट रा. बापूसाहेब करमरकर यांनी केलेले आहे. …चा कार्यवाह या नात्यानें संस्थेच्या … या कामांत मला कसलीच दगदग करावी लागलेली नाहीं. संस्थेनें तर बापूसाहेबांचे ऋणी राहिलेच पाहिजे पण मी व्यक्तिशः त्यांचा सदैव ऋणी राहीन. त्यांच्यामुळें मीही कामाची एक नवी दिशा शिकलो आहे. तसेच थोड्या अवधीत रेल्वे पासून दूर अशा सातारसारख्या गावांत साधनांची बिलकुल सोय नसताना आमचें कॉंट्रॅक्टर ट्रायो बिल्डर्सचे भागीदार एम्. जे. गद्रे यानीं हे बांधकाम पुरे केल्याबद्दल मी त्यांचा ही आभारी आहे सार्वजनिक संस्थेच्या इमारती बांधताना अनेकांच्या रोज नव्या नव्या कल्पना पुढें येत असतात त्यामुळें बांधकाम करणाराला मोठे जिकिरीचें होते! तरीपण आपली शांतता ढळूं न देतां सर्वांच्या सूचना शक्य तेवढ्या अधिकांत अधिक अमलांत आणणारें रा. एम्. जे. गद्रे यांचे आभार मानायला शब्दच अपुरे पडतील! त्यांचे मदतीस रा. पांढरे मिस्त्री हेही त्याच धोरणाचे. तसेच मुंबईस राहून संस्थेच्या बांधकामाला सामान मिळवण्याची खटपट करणारे रा. हेंमतंराव करमरकर या सर्व सहाय्यकांचे मी नम्र भावानें आभार मानतो! आम्ही भिक्षा मागणारी माणसे! त्यांच्या कार्याचें पारितोषिक चार गौरवाच्या शब्दाशिवाय आम्ही काय देऊं शकणार? मुंबई सरकारनें बांध कामास लागणारें लोखंड, सीमेंट, पत्रा, पाई-पिंग आदि माल कंट्रोल दरानें मंजूर केलाच पण मालाच्या अपुरे पणातही या संस्थेला प्रायॉरिटी दिली. आजच्या अध्यक्षांचेही यांत फार मोठे सहाय्य झाले आहे! याबद्दल संस्था सरकारचीं व सरकारी अधिकाऱ्यांचीही ऋणी आहे. विजेची परवानगी शेवटीं शेवटीं कां होईना पण हातीं आली. वीज कंपनीचें अधिकारीहि अत्यंत सहानुभूतीने खटपट करीत होते तसेच येथील म्युनिसि पॉलिटीनें नेहमीच आपुलकीचें धोरण ठेऊन सहाय्य केले आहे. या सर्वांचें नि माझे सहकारी डॉ. जोग डॉ. कोल्हटकर आदि व देणगीदार, कर्जदार यांचे आभार मानून हा लांबलेला वृत्तांत सपवितो!

मलेरिया शत्रु, पांढरे कोड

ही दोन पेटंट औषधें मागवून धन, यश व कीर्ति मिळवा.

माहिती मागवा

वैद्य वी. आर. बोरकर, आयुर्वेद भवन

मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (वऱ्हाड)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉ. आगाशे-रुग्णालयाचें उद्घाटन

डॉ. जिवराज मेथा यांचे अध्यक्षतेखाली हा समारंभ उत्साहानें साजरा झाला. संस्थेच्या इतिहासांतील ही घटना विशेष संस्मरणीय ठरेल.

गेल्या ता. १०-२-५२ रोजी रविवारीं सायंकाळी ५ वाजतां मुम्बई सरकारचें बांधकाम खात्याचें मंत्री डॉ. नामदार जीवराज मेथा यांचे हस्ते डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालयाचा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटानें पार पाडला.

नामदार साहेब व इतर सरकारी अधिकारी सायंकाळीं ४॥ वाजतां आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयांत येऊन दाखल झाले. संस्थेचे प्रिन्सिपॉल डॉ. मे. ना. जोग व अध्यक्ष श्रीयुत तात्यासाहेब साठे यानीं त्यांचे स्वागत करून त्याना संस्था दाखविली. नव्या रुग्णालयाच्या इमारतीचे विविध विभाग नामदारांनीं पाहिलें. नंतर चहापान होऊन मुख्य समारंभास सुरवात झाली.

समारंभास जिल्हाधिपति, डि. जज्ज श्री. घासकडबी, सिव्हिल सर्जन डॉ. नाडकर्णी, डि. एस्. पी. एक्झीक्युटिव्ह इंजिनियर श्री. साठे पती पत्नी, सुपरिटेंडेंड इंजिनियर श्री. करंदीकर व इतर मोठे मोठे सरकारी अधिकारी, नामदार मालोजी राजे नाईक निंबाळकर, नामदार ग. दे. तपासे, आमदार गोखले, वाईचे डॉ. दातार, डॉ मराठे, डॉ. भावे, मुंबईहून डॉ. मलकानी, विजापुराहून डॉ. वझे, सौ. इंदिराबाई नातू व साताऱ्यांतील वकील डॉक्टर, व्यापारी व इतर सामान्य स्त्री पुरुष मिळून सुमारे १००० वर समुदाय जमला होता! या समारंभास साताऱ्च्या राणीसाहेब व त्यांच्या भगिनी मुद्दाम हजर राहिल्या होत्या. संस्थेचें अध्यक्ष श्रीयुत तात्यासाहेब साठे यानीं अध्यक्षांची ओळख करून देऊन या समारंभाचें औचित्य व त्याकरतां नामदारसाहेबांची निवड कशी योग्य होती याचें निवेदन केलें. त्यानंतर डॉ. जीवराज यांनीं औपचारिक रीत्या रुग्णालयाच्या इमारतीचें उद्घाटन केले. व संस्थेतर्फे इमारतीचें नकाशे वगैरे तयार करणारें पुण्याचें आर्किटेक्ट रा. बापूसाहेब करमरकर व ट्रायोबिल्डर्सचें एक भागीदार रा. गद्रे इंजिनीयर यांच्या कामगिरीची माहिती डॉ. कोल्हटकर यांनीं सांगितल्यावर त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर समारंभास आलेलें विविध संदेश वाचून दाखविल्यानंतर संस्थेचें कार्यवाह डॉ. ... यांनीं रुग्णालयाचा गेल्या तेरा वर्षांचा वृत्तांत दाखविला.

डॉ. मो. ना. आगाशे यांनीं नंतर भाषणास सुरुवात केली. आपल्या नावाने उभारलेल्या या रुग्णालयाच्या उद्घाटनाबद्दल उत्कट आनंद प्रदर्शित करून उपस्थितांचे व नामदार जीवराज मेथांचे त्यांनीं आभार मानले. ते आपल्या भाषणांत म्हणाले "या रुग्णालयाच्या उभारणीनें माझें स्वप्न साकार झाल्याबद्दल मला आनंद होत आहे. या वेळीं माझ्या दिवंगत सहकाऱ्यांची आठवण होऊन संस्थेची ही प्रगति पाहाण्याचें भाग्य मला लाभल्याबद्दलही आनंद होतो. संस्थेच्या आद्य संस्थापकांपैकी तात्यासाहेब जोशी आहेत व माझे सहकारी डॉ. आठल्ये ही येथें आहेत. त्यांना हे रुग्णालय पाहून आनंदाचें भरते येईल पण त्या रुग्णालयाला माझें नांव देण्यांत आले ही गोष्ट माझ्या मनाला खटकते. रुग्णालयाच्या उभारणीस कित्येकांचे श्रम खर्ची पडले आहेत. असंख्य लोकांनीं देणग्या दिल्या आहेत. माझ्या सहकारी डॉक्टर मंडळीनी, वैद्यबंधूनीं आजपर्यंत त्यागपूर्वक ... केले आहे! त्याचें हें दृश्य स्वरूप आहे. क्रिकेटची

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारचे काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचे खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि क

२४५ काळबादेवी रोड, मुंबई

टे. नं. ३१७९६ Telegrame- AYURVED

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कल्यावर कप्तानाचा जसा गौरव होतो तसा माझा गौरव आहे. पण या सामन्याचें यश माझ्या टीममधील सर्व गड्यांचें आहे! विशेषत: गेली २०–२२ वर्षे माझ्याबरोबर कार्य करणारे डॉ. भाऊराव आगाशे मला सहकारी लाभले नसते तर हें कार्य अशक्य होते. जनतेला मला असें स्पष्ट सांगावयाचें आहें की डॉ. भाऊरावांनीं पडद्याआड केलेल्या कामाचें हें दृश्य आहे. किंबहुना कांहीं बाबतींत ते माझ्याही पेक्षां श्रेष्ठ आहेत! डॉ. दातारांचीं जोड मला वाईच्या डॉ. ...साहेबांच्या प्रोत्साहनानें मिळालो. पण डॉ. भाऊरावांनीं ... विभागांत दातारांच्या बरोबर काम करून आपल्या अभ्यासानें शस्त्रक्रियेत प्रगति केलेली आहे! अॅब्डॉमिनल ...रियन सेक्शन्स, सारखी, महत्त्वाची ऑपरेशनें ते करूं शकतात! यापुढें मी कार्यनिवृत्त झाल्यासारखा आहे! माझा भार हा त्यांच्या खांद्यावर ठेवीत आहे! जनतेनेंही त्यांच्या–वर मजप्रमाणेंच विश्वास ठेवून या संस्थेच्या कार्याकरता त्यांना दरघडी मदत करीत राहावें अशी जनतेला माझी विनंती आहे! ” शैक्षणिक कार्याचा आढावा घेऊन डॉक्टर म्हणालें कीं, “ शिक्षणाचा दर्जा वाढायला पाहिजे अशाच मताचा मी आहे. ह्या करतांच मी एकेकाळीं दुसरी संस्थाही काढली होती. व त्याकरता मी आजपर्यन्त धडपडही केली आहे शिक्षणाचें कार्य करताना विद्यार्थ्यांच्या अनेक शंकाकुशंका दूर करण्याकरितां मीही विद्यार्थी बनलो आहे! आयुर्वेद शास्त्रांचा त्यामुळेंच गेली ७।८ वर्षे पुन: अभ्यास करीत आहे! मध्यवर्ती सरकारनें ठरवलेल्या शिक्षणक्रमा मागील भूमिका मला मान्यच आहे. तपशीलांतील मतभेद एकत्र येऊन मिटवता येतील. तो सर्वत्र सुरूं व्हावयास पाहिजेच. यांत वाद नाहीं पण सध्याची जागतिक परिस्थिती, महर्गता, शिक्षणाला लागणारा खर्च, मध्यमवर्गीय पालकांची आर्थिक ओढाताण या लक्षांत घेणें अवश्य वाटते! ही गोष्ट मध्यवर्ती सरकारास सांगण्याचें काम नामदार साहेबानींच आमच्या तर्फे करावयास पाहिजे. आमचे हात मध्यवर्ती सरकार पर्यन्त पोहोचत नाहीत! आमची वकिली तुम्ही करा. सरकारची आर्थिक ओढाताण थोडी कमी होऊं द्या. जनता सुस्थितींत येऊं द्या व मग प्रगतीचा वेग वाढवूं ! जरा सबुरीनें घेतले तर याच संस्था सरकारचा शिक्षणक्रमाबद्दलचा दृष्टीकोन खात्रीनें प्रत्यक्षांत उतरवतील ! नामदार साहेबांनीं या आमच्या अडचणी लक्षांत घ्याव्या. प्रगतीचे टप्पे गाठण्यास आम्हाला सवड द्यावी अशी माझी त्याना विनंती आहे. ”

या नंतर डॉ. जीवराज मेथा बोलावयास उठले. त्यांचे भाषण हिंदीत झाले. ते म्हणाले “ मला मराठी बोलायची सवय नाहीं, इग्रजी तुम्हा सर्वांना कळणार नाहीं त्यापेक्षा हिंदीत समजेल म्हणून मी हिंदी बोलण्याची परवानगी घेतो! आपण मला हें रुग्णालय उघडण्याची संधी दिली याबद्दल मी आपला आभारी आहे! रुग्णालयाला डॉक्टर आगाशे यांचे नांव दिले ते योग्यच आहे मोठमोठ्या देणग्या देणारांची नांवे संस्थाना देतातच! प्रत्यक्ष कार्य करणाराचे नांव देणें अवश्य आहे. डॉक्टर साहेबांचे नांव दिले जात आहे हें अगदी उचित असेच आहे! आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाच्या नांवातील आंग्ल या शद्वाबद्दल आपला मतभेद दाखवून ते म्हणाले “ वैद्यकशास्त्र हें आंग्ल किंवा कोणा एका देशाचें नाहीं ते सर्व जगाचे आहे. त्याला अधुनिक वैद्यक शास्त्र म्हणावयास पाहिजे. (Modern Medical Science) ते आज सर्वत्र वापरले जात आहे. त्यावरोबरच आपल्या प्राचीन शास्त्राचाही आपण अभिमान धरावयास हवा त्यांत संशोधन

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफ्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३॥, ६ व १० किंमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विक्रत मिळतें अगर

कारखानदार
डॉ. पुरोहित फार्मसी,
कोल्हापूर (एस. एम. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावयास पाहिजे! मानवीं शरीर हें सर्वत्र एकच आहे. त्या संबंधाचे शास्त्र हे एकच असणार! रोगमुक्तता करणें हे आपलें ध्येय असावयास पाहिजे. कोणत्याही प्राचीन अर्वाचीन शास्त्राधारें हे कार्य आपणास साधावयाचे आहे ! शिक्षणासंबंधी मला येवढेच सांगावयाचे आहे की वैद्यकीय शिक्षण हें प्रत्यक्ष शिक्षण आहे. तें जितकें चांगल्या दर्जाचें होईल तितके हवेच आहे. जीवन्मरणाशी त्या शास्त्राचा संबंध आहे. तुम्ही विद्यार्थ्यांची संख्या आपल्या जवळील साधनांकडे लक्ष देऊन घ्या ! एका विद्यार्थ्यामागें ४-५ रोगी तरी असणें अवश्य आहे. विद्यार्थी जितकें रुग्णालयांत अधिक कार्य करील तितका तो व्यवहारांत यशस्वीठरेल !" जनतेला ही त्यांनीं विनंति केली कीं "सरकार मदत देत राहील पण तुम्ही जितकी रक्कम जमवाल तेवढी सरकार देईल ! तुम्ही सढळ हातानें पैसे द्या ! तुमच्या घरीं निघणाऱ्या लग्न मुंजी आदि मंगल कार्याच्यावेळीं देणग्या द्या ! तुम्ही जितकी जास्त देणगी द्याल तितकी जास्त सरकारी मदत मिळेल ! " शेवटीं कार्यकर्त्यांचा गौरव करून त्यांनीं आपलें भाषण संपविले. त्यानंतर येथील शहर म्युनिसिपालिटी तर्फे अध्यक्ष मे. आर. एस्. पवार यांनीं डॉ. जीवराज यांना पुष्पहार अर्पण केला. " मला हार घालण्यापक्षां तुम्ही संस्थेला मोठी देणगी द्या " असें त्यानीं अध्यक्ष साहेबास सांगितले. कन्याशाळेतर्फे रा. गोळेमास्तर यानींही डॉ. जीवराज यांचा व डॉ. मोरोपंत यांचा पुष्पहारानें सन्मान केला !" त्यावेळीं कन्याशाळेनें या रुग्णालयांत शिकण्याकरतां परिचारिका पाठवाव्या" असे अध्यक्षांनीं सांगितले नंतर संस्थेतर्फे डॉ. जोग यांनीं या रुग्णालयाच्या उभारणी निमित्त झालेल्या डॉ. भाऊराव यांच्या श्रमाबद्दल विशेष गौरवपर उद्‌गार काढून संस्थेतर्फे त्यांना पुष्पहार अर्पण केला गुडलक टु यू या वाक्यानें डॉक्टर साहेबानी आपल्या भावना व्यक्त केल्या.

डॉ. जोग यांनीं नंतर समारंभास जमलेल्या सर्व निमंत्रित मंडळींचें संस्थेतर्फे आभार मानले. समारंभाची सर्व व्यवस्था, नवीन रुग्णालयातील सर्व विभागांची मांडणी वगैरे जिकिरीची कामें फार घाईघाईत करावी लागली. पण डॉ. पां. के. कोल्हटकर यांनीं फार लक्ष घालून ही व्यवस्था पार पाडली. त्याचप्रमाणें त्याना मदत करणारा नोकर वर्ग वगैरेचें त्यांनीं हार्दिक अभिनंदन केले. शेवटीं " वन्देमातरम् या राष्ट्रगीतानें हा समारंभ संपला.

हैद्राबाद शहरांतील

अर्कशाला औषधांचे

प्रमुख विक्रेते

आयुर्धाम मेडिकल हॉ

★

रेसिडेन्सी बस स्टँड समोर

सुलतान बझार हैद्राबाद

यांचेकडे आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा यांची सर्व औषधें मिळतात

आयुर्वेदिय अर्कशाला

हैद्राबाद राज्य सोल एजन्सी

हैद्राबाद राज्यांतील वैद्य व विक्रेते य आयुर्वेदीय अर्कशाळेच्या मालाविषयीं खाल पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ज. बा. बापट

अर्कशाला सोल एजन्सी ऑ

आनंदस्वामी रोड

जालना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळीचे शस्त्रकर्म–तज्ञ

डॉ. वा. शं. दातार

डॉ. दा. ब. मालशे

डॉ. दातार हे वाईचे विख्यात शस्त्रक्रियातज्ञ आहेत. प्र. मंडळीच्या रुग्णालयांत शस्त्रक्रिया विभागाचा झाला तो त्यांच्याच सहकार्यानें. त्यांच्या कुशल कर्मामुळें संस्थेची कीर्ति वाढण्यास बहुमोल मदत . आज डॉ. आगाशे रुग्णालयाच्या उभारणीमुळें क्रिया विभागाचें स्वरुप अद्ययावत् बनत चालले आहे. नव्या शस्त्रचिकित्सागृहांत डॉ. दातारांचें छायाचित्र ण्यांत संस्थेच्या कार्यकर्त्यांनीं औचित्य व कृतज्ञता केली आहे. डॉ. दातारांचे सहकार्य व मार्गदर्शन स सदैव मिळत राहील याचा संस्थेस अभिमान तो.

डॉ. मालशे हे अनुभवी व यशस्वी शस्त्रक्रियातज्ञ संस्थेंत गेले दीड वर्ष काम करीत आहेत. डॉ. दातारांनीं आरंभिलेली परंपरा त्यांनीं तितक्याच तोलानें पुढें चालविलेली असून त्यांच्या नैपुण्यामुळें संस्थेच्या रुग्णालयावरील जनतेचा विश्वास दृढ झालेला आहे. नव्यानें उभारलेल्या डॉ. मो. ना. आगाशे रुग्णालयाचे पहिले शस्त्रक्रियातज्ञ म्हणून डॉ. मालशे यांचे नांव संस्थेच्या इतिहासांत नमूद केले जाईल. डॉ. मालशे यांच्या नेतृत्वाखाली हें रुग्णालय यशस्वी होईल असा दृढ विश्वास वाटतो.

★ ★

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभवसिद्ध

अर्कशाला-औषधें

यूटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

गरोदरपणीं सतत घेतल्यानें प्रकृति चांगली राहून गर्भाचें उत्तम पोषण होते.

लोहीन

रक्तवृद्धिकर, लोहकल्प

रक्तक्षीणता, पांडुरोग व मोठ्या आजारानंतरचे दौर्बल्य यांवर उत्कृष्ट गुणकारी.

वसंतमिश्रण

सुवर्ण व मौक्तिक, प्रवाळ, शृंग, गुळवेल यांचा कल्प

जीर्णज्वर, क्षयांची पूर्व व प्रारंभिक लक्षणें, शक्तिक्षीणता याकरिता

शिशुजीवन

बालकांकरिता टॉनिक

लहान मुलांचा दमा, खोकला, अपचन इ. तक्रारी दूर होतात.

स्तन्यशोधन

दुग्धशोधक व दुग्धवर्धक

प्रसूतीनंतर सतत घेतल्यानें मातेचे दूध निर्दोष होते व वाढते.

ही औषधें विक्रेत्यांच्या दुकानीं असली पाहिजेत
त्यांची मागणी सतत वाढत आहे.

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

हें मासिक श्री. *विश्वनाथ लक्ष्मण आगाशे* यांनीं *आनंद प्रिंटिंग प्रेस सातारा* लि., येथें छापलें व आयुर्वेद महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचे पुरस्कृत मासिक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८-४-५२

आ यु र्मी मां सा

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद.

या अंकांत

पारद

पु. वि. धामणकर, आयुर्वेदभूषण.

संपादकीय

संस्थेच्या भवितव्याचा चिंताजनक प्रश्न.

स्तन्यशोधन कल्प.

आयुर्वेद वार्ता—म. प्रां. संमेलन इ.

शि शु जी व न

अर्कशालेच्या या लोकप्रिय औषधाचा गेलीं २–३ वर्षे ग्राहकाना व विक्रेत्याना पुरेसा पुरवठा करता आलेला नव्हता. पण आतां भरपूर उत्पादन झालेले असल्यामुळें बाजारांतील वाढती मागणी पुरीं करता येईल असा विश्वास वाटतो. विक्रेत्यांनीं आपल्या मागण्यांतून शिशुजीवनाचा भरपूर समावेश करावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व सं त मि श्र ण

सुवर्ण, मौक्तिक, प्रवाळ, शृंग, गुळवेल, कलखापरी व मिरे यांचा संयुक्त कल्प

क्षयाची पूर्व लक्षणें, प्रथमावस्था, द्वितीयावस्था, जीर्ण–ज्वर आणि मोठ्या आजारानंतरचें दौर्बल्य यांवर हा कल्प यशस्वी ठरलेला आहे.

वैद्यवर्गानें या औषधाचा चिकित्सेंत अवश्य उपयोग करावा व आपले अनुभव अर्कशाळेकडे कळवावे अशी विनंती आहे.

या औषधाच्या चिकित्सेतील उपयुक्ततेबद्दल: साधार आकडेवारीचें संकलन करावयाचें आहे. या आगामी पुस्तिकेंत वैद्यांचे अनुभव नमूद केले जाणार असल्यानें वसंत मिश्रणाचा वापर करणाऱ्या वैद्यांनीं त्या संबंधीच्या इष्ट त्या नोंदी ठेवाव्या अशी विनंति आहे.

'शास्त्र–विभाग'

आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

वर्ष १५ वें] एप्रिल १९५२ [अंक ४ था

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते.

आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें ही त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंका-नंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

'स्तन्यशोधन' कल्पाचा प्रत्यक्षानुभव

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ मार्च १९५२ च्या अंकात "बालकांचे यकृत विकार" या विषयावर लेखक श्री. रमातनय, बेळगांव यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. या लेखांत त्यानीं स्तन्यशोधन या अर्कशाला-औषधाचा उल्लेख केला आहे, तो पुढें देत आहोत.

दुग्धदोषावर स्तन्यशोधन

"कांहीं महिलांच्या गरोदरपणांतील आहारविहारांतील दोषांमुळें स्तन्यदोष उद्भवतात स्तन्य शुद्ध आहे किंवा नाहीं ते पुढे दिलेल्या लक्षणावरून ओळखावे. (१) ज्या दुधाचा रंग पांढरा असून रस मधुर असतो. व जे पाण्यांत टाकले असतां सर्वस्वी पाण्याशीं एकजीव होते तें शुद्ध आहे असे मानावे. (२) जें तिखट, खारट, असून भांड्यांत घातल्यास पिवळ्या रंगाच्या छटा उमटतात तें व (३) जें दाट व बुळबुळीत असून पाण्यांत टाकल्यास तळास जाऊन बसते तें अशुद्ध आहे असे मानून त्यासाठीं त्याच्या शुद्धीचे उपाय योजावेत. याकामीं अर्कशाळेचें स्तन्य शोधन उपयोगी पडते असा अनुभव आहे. ज्या मातांचें स्तन्य अशुद्ध असते असा अनुभव आहे. अशाना प्रसूतीपूर्वी महिना दीड महिना स्तन्यशोधन द्यावे. असे केल्यास स्तन्यशुद्धी होईल गरोदर पणांत पथ्याहार विहाराची अत्यंत जरूर आहे."

आपला स्तन्यशोधनविषक अनुभव श्री. रमातनय यांनीं लेखांत मांडल्याबद्दल आम्हीं त्यांचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणें आयुर्वेद पत्रिकेच्या संपादकांनीं त्याच अंकांत स्तन्यशोधन कल्पाबद्दलची शास्त्रीय माहिती सौजन्यपूर्वक मुद्दाम मागवून घेऊन प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचे आम्हीं अत्यंत आभारी आहोत. वैद्य व आयुर्वेद प्रेमी डॉक्टर मंडळीनीं शास्त्रोक्त व निरनिराळ्या कंपन्यानीं पुढें आणलेल्या औष-धांबद्दल निस्पृहपणें आपले चिकित्सानुभव प्रसिद्ध करावें अशी आमची आग्रहाची सूचना आहे. मात्र हे गुणदोष दर्शविताना आत्मियतेची व शास्त्रविकासाची दृष्टी असावी. त्यामुळें औषधीकरणांत सुधारणा घडून येण्यास मदत व्हावी हे अगत्य पूर्वक सांगावेसे वाटते. आयुर्वेदीय नियतकालिकांनीं अशा लिखाणाला प्रसिद्धी द्यावी. स्तन्यशोधन प्रकरणी आयुर्वेद पत्रिकाकारानीं जी सहकार्य भावना व्यक्त केली ती स्तुत्य आहे.

अर्कशाळेला सध्या वसंत मिश्रण या औषधासंबंधीचे चिकित्सानुभव पाहिजे आहेत. हें औषध वापरणाऱ्या वैद्य व डॉक्टरांचें लक्ष या विनंतीकडे आम्ही वेधू इच्छितो.

शास्त्रविभाग, अर्कशाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छोट्या जाहिराती

वैद्य, डॉक्टर व औषध विक्रेते यांच्या माहितीकरितां

आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांची सूची

(हें सदर प्रत्येक अंकांत नियमितपणें प्रसिद्ध होते भारतांतील विशेषतः मुम्बई राज्यांतील सर्व आयुर्वेदीय औषधी-निर्मात्यांचा या सदराद्वारे वैद्य, डॉक्टर व विक्रेते आणि ग्राहकं यांना सातत्यानें परिचय होत असतो. एक प्रकारे "Buyer's Guide" हें या सूचीचें स्वरूप असल्यानें या सदराचें महत्त्व जाहिरातदारांना वेगळें सांगावयास नको.

ज्या जाहिरातदारांच्या जाहिराती इतरत्र या अंकांत वर्षाच्या करारानें घेण्यांत आलेल्या आहेत त्यांची माहिती या सूचींत *विनामूल्य* छापली जाते. केवळ सूचीसाठीं मजकूर पाठविणाऱ्या जाहिरातदारानीं वर्षाचे करारानें जाहिरात दिली पाहिजे. वर्षाचा दर फक्त तीस रुपये आहे. ही रक्कम आगाऊ द्यावी लागेल. मजकूर जास्तीत जास्त चार ओळी असावा.)

श्रीपाद फार्मसी, पेण.

विविध प्रकाराच्या औषधी वनस्पतीचें विक्रेते. महाराष्ट्रांतील आयुर्वेदीय कारखान्यांना माल पुरविण्यांत येतो. वैद्य व गाहकांनीं माहिती मागवावी. वाकेरीभाते खात्रीन्ने मिळते.

शा जादवजी लल्लूभाई आणि कं०

सर्व प्रकारची काष्ठौषधि व औषधी निर्मितीसाठीं लागणारी कच्ची द्रव्ये यांचे विक्रेते. २४५ काळबादेवी रोड मुंबई २.

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मसी, झांशी. (यू. पी.)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. इंजेक्शनविषयक "सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन विज्ञान" या पुस्तकाचे प्रकाशक.

अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (मध्य प्रदेश)

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शनचिकित्सा (मूल्य ३ रु.) या पुस्तकाचे प्रकाशक.

डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर.

पुरोहित श्वासहारी, शोधना इ. विख्यात औ... निर्माते.

आयुर्वेदिक धन्वतरी फार्मसी अहमदनगर

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें शास्त्रोक्त पद्धतीने वैद्यांच्या देखरेखीखालीं तयार केली जातात.

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा (उ. गुजराथ)

छप्पन्न वर्षांपासून चालू असलेली संस्था. शास्त्रीय व पेटंट औषधे तयार केली जातात.

अपोलो फार्मास्युटिकल वर्क्स लि.,

विविध आयुर्वेदीय इंजेक्शन्सचे निर्माते. वैद्याना इं... क्शनचे शिक्षण दिले जाते. पत्रव्यवहार— प्रतापगंज बडो...

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

सर्व प्रकारची आयुर्वेदीय औषधें तयार केली जा... आयुर्वेद प्रसारक मंडळी या संस्थेच्या रुग्णालयांत ती पा... जातात. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, हैद्राबाद या भा... सर्वत्र विक्रेते आहेत.

संसार में सर्व प्रथम आयुर्वेदिक इन्जेक्शनों के आविष्कर्ता और निर्माणकर्ता

जी. ए. मिश्रा आयुर्वेदिक फार्मेसी (रजिस्टर्ड) झांसी के बने हुए

मिश्रा आयुर्वेदिक इन्जेक्शन्स

प्रयोग कर निरोग बने

हमारे यहां इन्जेक्शन लगाने की शिक्षा प्राप्त करने के लिये नियम सूची मंगालें।

हें सदर अवश्य वाचा.

तें उपयुक्त आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दकीय.

थेच्या भवितव्याचा चिंताजनक प्रश्न

आयांग्ल वैद्यक महाविद्यालयास १९५१–५२ साला– ा मुंबई सरकारकडून मिळावयाची वार्षिक ग्रँट गेली वर्षे चालू असलेल्या धोरणानुसार न मिळता यंदा ंदांतील तोटयाच्या रकमेएवढी म्हणजे फक्त रु. ० अितकी मिळाली आहे. १९५०–५१ सालीं संस्थेस हजार रुपये वार्षिक ग्रँट मिळाली होती. ही रक्कम च्या १९५१–५२ च्या ताळेबंदात जमेच्या बाजूला अस- ळें तोटयाचा प्रत्यक्ष आकडा १३३० एवढा आला. विक ग्रँटची रक्कम वगळली तर तोटयाचा आकडा रु. ३० इतका झाला असता आणि ग्रँट म्हणून तेवढी रक्कम मिळणें अवश्य होते. आता ताळेबंदातील तोटयाइतकी म ग्रँट म्हणून देण्याच्या सरकारी धोरणामुळें १९५२–५३ ाच्या अखेरीस संस्थेस गरजेएवढी ग्रँट मिळणार ! ारी धोरण हिशेबाच्या पद्धतीस अनुसरून असले तरी धोरणाची आताच अम्मल बजावणी झाल्यामुळें संस्थेंस दैन खर्चासाठीं रकमेची मोठी व.ण पडणार आहे.

नैतिक ग्रँटचा प्रश्न

वार्षिक ग्रँट मध्यें एका अर्थीं जी आजतरी तूटीची कमच तेवढी घातल्यामुळें जी कपात झाली आहे तिच्या मरोग अिमारतीच्या खर्चापैकी सरकारकडून नैमित्तिक टच्या रुपानें यावेळीं मिळावयाची रक्कमही मिळालेली ाहीं. संस्थेनें नव्या रुग्णालयाच्या बांधणीचें काम हातीं लें त्यावेळीं सरकारकडून ५१००० रुपये ग्रँट म्हणून ाले होते. सध्या ही अिमारत पुरी झालेली असून तिला ारे दोन लाख रुपये खर्च आला आहे. अशा खर्चाच्या मी रक्कम ग्रँट म्हणून सरकारकडून मिळते. हे लक्षांत ा यावेळीं ४९००० रुपये मिळतील अशी संस्थेची अपेक्षा ती. पण बजेटांतील तरतुदीच्या अभावी ३१ मार्च १९५२ ेर संपणाऱ्या वर्षांस ही रक्कमहि मिळू शकणार नाहीं ो कळून आलें आहे. अर्थात् नव्या बजेटांत ही तरतूद केली ाईल व संस्थेस वरील रक्कम मिळेल या बद्दल शंका वाटत ाहीं, पण तीहि मुदत आता लांबलेली आहे. यामुळें अिमारती- रितां अल्पमुदतीनें काढलेलें कर्ज कसें फेडावयाचें हा प्रश्न स्थेच्या कार्यकर्त्यांपुढें उभा आहे.

नव्या शिक्षण क्रमाला प्रतिकूल काल!

सरकारनें गँटच्या बाबतीत बदललेल्या या धोरणामुळें निदान या वर्षी तरी प्रांतातील बहुतेक आयुर्वेदीय शिक्षण संस्था आर्थिक अडचणींत आलेल्या असणें संभवनीय आहे. किंबहुना नेहमीच्या आर्थिक विवंचनेंत या विशिष्ट परिस्थीती मुळें अधिक भरच पडलेली आहे. अशा वेळीं नेमका याच वर्षी फॅकल्टीनें आखलेला नवा शिक्षणक्रम सुरुं व्हाव- याचा आहे. हा शिक्षणक्रम पत्करण्यानें खर्चात आणखी वाढ होणार आहे. फॅकल्टीनें या परिस्थीतीच्या प्रकाशांत आपल्या निर्णयाविषयीं फेर विचार करावा असे आम्हास सुचविणें आगत्याचे वाटते. जर नव्या शिक्षण क्रमासाठीं कराव्या लागणाऱ्या तरतुदीकरिता वेळींच सरकारी सहाय्य मिळालें नाहीं आणि ही स्थिती लक्षांत न घेतां नवा शिक्षणक्रम चालू करण्याचा फॅकल्टीनें आग्रह धरला तर संस्थाचालकांच्या सत्वपरीक्षा पाहिल्या सारखे होईल फॅकल्टी संस्थाच्या अडचणींत भर न टाकता अुद्भवलेल्या अडचणींचा निरास कसा होईल याकडे लक्ष पुरवील अशी आम्हास उमेद आहे.

नवे मंत्रि–नव्या आशा

येत्या एक दोन महिन्यांत मुंबई राज्यांत नवें मंत्रि- मंडळ अधिकारारूढ होईल. आयुर्वेदाचें शिक्षण हा त्याच्या कर्तव्यक्षेत्रांतला एक लहानसा भाग आहे. खरा, पण त्या क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींचे व संस्थाचें तें सर्वस्व आहे. हें नाकारून चालणार नाहीं. या क्षेत्राकडे नवें मंत्रिमंडळहि सहानुभूतीनें लक्ष पुरवील व आयुर्वेदाच्या विकासाच्या दिशेनें व या संस्थांची प्रगती होण्याच्या दृष्टीनें पुढें पाऊल टाकील अशी आम्हाला आशा आहे. अशा शिक्षण संस्थांची आर्थिक चिंता दूर झाल्यावाचून शिक्षणाचा दर्जा सुधारणें कठीण आहे किंबहुना आर्थिक सहाय्याच्या अभावी त्या सदैव जीवन मरणाच्या सीमेवर राहिल्यातर त्यांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना निराशा वाटल्या वाचून राहणार नाहीं. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांत सेवा– भावनेने कार्य करणाऱ्या संस्थामध्यें व व्यक्तिमध्यें अशी भवितव्याविषयींची निराशा उत्पन्न झाली तर अशा सार्व– जनिक सेवेची परंपरा पुढें चालू राहणें कठीण आहे. वास्तविक सर्वच गोष्टी सरकारनें कराव्या अशी वृत्ती न वाढता समाजातल्या शक्ती कार्योन्मुख व्हाव्या असे आपल्या सरकारचें धोरण आहे ते योग्य आहे असेच कोणींहि म्हणेल. पण जनतेतली कार्यप्रवणता सरकारी प्रोत्साहनाच्या अभावी खुरटून जाऊ नये अशी काळजी घेतली जाणेंहि तेवढेच आवश्यक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन

आठवें अधिवेशन, पनवेल.

रुग्णालय–कोल्हापूर अधिवेशनांत संशोधकार्यार्थ अनेक समित्या नेमल्या. त्यांपैकीं रुग्णालयसमितीस स्थायीस्वरूप देण्याचा प्रयत्न ह्या संमेलनांत करण्याचा विचार आहे. तपशील—

(i) महाराष्ट्रांतील सर्व रुग्णालयांकडून तपशीलवार माहिती मागविणे.

(ii) हाती आलेल्या माहितीचें संकलन, आलोडन करून वस्तुस्थितिनिदर्शक असा एक वृत्तांत लिहिणें.

(iii) प्रत्येक रुग्णालयाचा चालक व चिकित्सक वर्ग ह्यांचेकडून एक एक प्रतिनिधि येथें बोलावून त्यांचें एक छोटे-खानी अधिवेशन भरविणें.

(iv) अधिवेशनांत सद्यःस्थिति, ती सुधारण्याचे उपाय ह्यांवर विचारविनिमय, चर्चा होऊन पुढील कार्याची दिशा आंखणें व नियोजित कार्य पार पाडण्याकरितां एक विधि-समिति नेमणें.

निबंध आणि व्याख्यानें–ह्यांकरितां वृद्ध, अधिकारी वैद्यांची निवड करून त्यांचें लिखाण अगर ज्ञान वैद्यसमाजापुढें ठेवल्यास (तरुण) विद्यार्थ्यांना त्यांचें चिकित्साव्यवसायांत मार्गदर्शन केल्यासारखें होईल. शक्य झाल्यास हें साहित्य छापून प्रसिद्ध करतां यावें, इतक्या वरच्या दर्जाचें, पण सुबोध आणि उपयुक्त असें तें असावें.

. ह्याकरितां अधिकारी व्यक्तीचा शोध आम्ही करीतच आहोंत. पण त्याचबरोबर अखिल वैद्य बंधुवर्गास आमची नम्र विनंति आहे कीं, ज्याला ज्याला जी जी कोणी अशी सुयोग्य व्यक्ति आणि तिचा विषय माहिती असेल त्याचें संपूर्ण नांव व पत्ता आम्हांस कळवावा.

निबंध व व्याख्यानें ह्यांकरितां तूर्त आम्हीं खालील विषय निवडले आहेत—

१ प्रकृति-परीक्षण (शरीर, मानस, व सारासार इ.)
२ निदान (दर्शन, स्पर्शन, प्रश्न इ.)
३ नाडीविज्ञान (प्रात्यक्षिकासह)
४ चिकित्सा (क्षय, मधुमेह, कॅन्सर, जलोदर)
५ पंचकर्म
६ शोधन व शमनचिकित्सा
७ औषधि–गुणधर्म–विवेचन (आयुर्वेदीय पद्ध

आणखी कोणी उपयुक्त वा नित्याचे व्यवहा विषय, वा त्यावरील लेखक, व्याख्याते सुचविल्यास त्य विचार अवश्य करूं निबंधलेखक व व्याख्याते ह्यांनी व त्यांचें विषय पंधरा दिवसांचे आंत कळवावेत.

प्रात्यक्षिकें–दंतोत्पाटन, रक्तविस्रुति, अग्निकर्म, मोतीबिंदूवरील आयुर्वेदीय शस्त्रकर्म.

प्रदर्शन–सुश्रुतोक्त शारीराची तक्त्यांचे सा बोधक कल्पना, त्रिधातुसप्तधातुविषयक तक्ते, विविध उप द्रव्यांचे नमुने, सिद्धौषधी ठेवण्यांत येतील. ह्याचबरोबर वैद्यांना विनंति कीं त्यांनीं खालील प्रयोगांबाबत अनुभव व सिद्ध औषध वैद्यबंधूंपुढें ठेवावें.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारचे काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचे खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Teiegrame- AYURVED.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रयोग १ भूधात्री हस्तिशुंडीभ्यां रसगंधं विमर्दयेत्
काचकूप्यां चतुर्यामं पाकः पीतो भवेद्रसः ।
वृ. रसराजसुंदर

प्रयोग २ वाराहीकंदसंयुक्त रसकेनसमन्वितम् ।
नीलवर्णं भवेभ्दस्म वलीपलितनाशनम् ।
वृ. रसराजसुंदर

प्रयोग ३ तिलपर्णीरसैस्ताम्रपत्राणि परिलेपयेत् ।
शुभ्रवर्णं भवेभ्दस्म नात्र कार्या विचारणा
वृहद्रसराजसुंदर

प्रयोग ४ नियमनांत संस्कारांनीं 'ग्रासार्थी जायते सूतः' (र. र. स.) असें म्हटलें आहे.

प्रयोग ५–तेल, ताक, गोमूत्र, निर्गुंडीरस+हळद, कुळथाचा तैल, ह्यांत सात सात वेळां वंग शुद्ध केलें आणि त्याचा वंगेश्वर केला तर तो त्या त्या शोधनद्रव्याच्या गुणाचा होतो.

प्रयोग ६–१।१ तोळा वजनाच्या कथलाच्या दोन वाट्या तयार कराव्यांत. त्यांत जेपाळ बीं व बिब्वा समभाग घेऊन भरावा. तांब्याचे पैशाच्या दोन्ही बाजूनीं त्या वाट्या लावून बांधून मातकापड करून पुट द्यावें. तांब्याचें पांढरें भस्म होतें.

प्रयोग ७–बाभळीचे पाल्यांत कथिलाचा पातळ पत्रा घालून तो पाला एका घट्ट तरटावर आंथरावा व तरटासह तो पाला वळकटीप्रमाणें घट्ट गुंडाळावा व दोरीनें बांधून सायंकाळीं निवांत जागीं ठेवून त्यावर निखारा ठेवावा. म्हणजे धूमसून सकाळीं कथलाचा पत्रा बत्ताशाप्रमाणें फुगलेला आढळतो.

प्रयोग ८–१ हिंगुलोत्थपारद, २ रसकापूर, १ गंधक यांची कज्जली करावी. ती कोंबडीचे अंड्यांत भरावी. अंड्याचें तोंड बंद करून त्यावरून पांच मातकापडे करून तीं सावलींत सुकवावीत. नंतर तो गोळा वालुकायंत्रांत मध्यभागीं ठेवून २४ तास क्रमाग्नि द्यावा. व स्वांगशीत झाल्यावर शाळिग्रामाप्रमाणें चकचकीत निळसर व अत्यंत टणक असा गोळा काढून घ्यावा. ह्याला व्याधिहरण म्हणतात. याचे गुणइ.

"गुंजाचतुष्टयं खादेन्नागवल्लीदलैर्युतम्
षंढोऽपि लभते पुंस्त्वं वाजीकरणमुत्तमम् ।
वलीपलितहृच्छूलवातश्लेष्मनिवर्हणम् ॥" रसचंडांशु ।

प्रयोग ९–पातालगरुडी, (वासनवेल, चांदवेल,) नामक वनस्पतीनें पाणी गोठतें म्हणतात. त्याचें नक्की स्वरूप काय असतें ?

प्रयोग १०–पर्पटी, सिंदूर, भस्म कल्पांबाबत कांहीं प्रेक्षणीय वस्तु, चमत्कृतिजनक अनुभव.

पत्रव्यवहाराचा पत्ता—
C/o धूतपापेश्वर कारखाना,
पनवेल–कुलाबा

आपले विनीत मंत्री
वैद्य, भा. द. गोडबोले
,, श्री. ना. हर्षे

प्रकट आभार

लोकरच होणाऱ्या प्रांतीय संमेलनाची अध्यक्षीय निवड अविरोध व्हावी या हेतूनें मी स्वतःचें नांव निवडणुकींतून मागें घेतलें आहे. तथापि या प्रसंगीं मी अध्यक्ष व्हावें या बुद्धीनें ज्या ज्या प्रांतीय सदस्यांनीं मला आपलें मत देऊन मजविषयीं आत्मीयभाव व्यक्त केला त्या सर्व सदस्य बंधूंचा मी आभारी आहे.

सर्वांचा नम्र
वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर
नशिराबाद

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय
अशा शक्तिशाली
अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स
चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—
सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—
मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.
व्यवस्थापकः— अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा (सी. पी.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रातिय वैद्यसंमेलन

अधिवेशन ८ वे, पनवेल.

भारतामध्यें आज निरनिराळी वैद्यकें प्रचलित आहेत. परदेशी सरकारच्या अंमलाखालीं इतर वैद्यकांची भरभराट व आयुर्वेदाची पीछेहाट झाली. त्यामुळें आयुर्वेद या वैद्यकाचो उपयुक्तता संशयास्पद झाली आहे. वस्तुतः तसें होण्याचें कांहींएक कारण नाहीं. आयुर्वेद पूर्वी होता तसाच तो आजहि तेजस्वी आहे. पूर्वीप्रमाणें आजहि तो भारतामधील शेंकडा ८० टक्के आरोग्यरक्षण, रोगपरित्राण हीं कार्ये करीत आहे. परकीय अंमलाखालीं आयुर्वेद ज्यांनीं टिकविला ते वैद्य व ती जनता धन्यवादास प्रात्र आहे. त्यांनीं जतन केलेल्या आयुर्वेदीय चिकित्सा–पद्धतीचें संशोधन व संवर्धन करण्याकडे आजचें सरकार व लोक यांचें लक्ष वेधलें गेलें आहे. त्यामुळें सालोसाल व जागोजाग वैद्यसंमेलनें वाढत्या संख्येनें यशस्वीतेनें पार पडत आहेत. अशांपैकी एक म्हणजेच कुलाबा जिल्हयाचें वतीनें महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनचें ८ वें अधिवेशन पनवेल येथें येत्या मे महिन्यांत ता. ४ व ५ रविवार व सोमवार रोजीं भरत आहे. संमेलनें आजच्या महागाईच्या काळांत अतिशय खर्चाचीं झालीं आहेत. परंतु तीं स्वातंत्र्याच्या प्रातःकाळामध्यें अत्यंत आवश्यक आहेत. याकरितां, आयुर्वेदिय कारखाने, संस्था व व्यक्ति यांच्या– प्रमाणेंच म्युनिसिपॅलिटी, लोकलबोर्ड, बँका, व्यापारी व अितर मातब्बर मंडळी यांनीं या संमेलनाचे कार्यास हातभार लावून आपली सहानुभूति व्यक्त करणें आवश्यक आहे. साहाय्याचे प्रकार आर्थिक इ. अनेक प्रकारचे आहेत. त्यापैकीं ज्या प्रकारचें साहाय्य ज्याला देणें शक्य होईल त्यानें तें द्यावें; स्वागत मंडळ त्याचा स्वीकार अत्यंत आनंदानें करील. कळावें ही विनंति.

श्री. वै. म. वि. ऊर्फ काकासाहेब पुराणिक. स्वागताध्यक्ष
श्री. वै. गं. वि. ऊर्फ नानासाहेब पुराणिक, कोषाध्यक्ष

स्वागतोपाध्यक्ष

श्री. वै. पुं. ग. ऊर्फ आप्पासाहेब पुराणिक,
श्री. शेठ रतनचंद भिकमदास बांठिया
श्री. वि. वा. ऊर्फ बाळासाहेब मेहेंदळे
श्री. आर. व्ही. ऊर्फ बाळासाहेब डोंगरे
वै. रा. त्र्यं. आपटे.
श्री. रवजी शेठ रंगपरिया (अध्यक्ष) निधिसमिती
वै. श्री. ना. हर्षे (प्रमुख) मंत्री
वैं. भा. द. गोडबोले
वै. न. पां. सामंत
वैं. अ. वि. फडके
श्री. भा. कृ. जोशी

आयुर्वेद वार्ता

वै. पंडित यांचें अभिनंदन

पनवेल येथें येत्या मे महिन्याच्या पहिल्या आठव[डयात] भरणाऱ्या महाराष्ट्र प्रांतिक वैद्यसंमेलनाच्या अध्य[क्षपदी] नाशीकचे वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांची निवड [झाली] आहे. वैद्यवर्गानें व्यक्त केलेल्या त्यांच्यावरील या विश्वासा[बद्दल] आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. वैद्य बिंदुमाधवशास्त्री [यांचे] कर्तृत्व व त्यांनीं आयुर्वेदशास्त्राची केलेली सेवा महारा[ष्ट्रास] परिचित आहे. त्यांच्या नेतृत्वाखालीं संमेलन आयुर्वेद हि[ताच्या] दृष्टीनें विधायक अुपक्रम हातीं येईल अशी आशा [वा...] प्रांतिक सरकार व केंद्रसरकार यांचेकडून आयुर्वेदा[...] निरनिराळ्या समित्यामार्फत चर्चा करण्यांत येत आहे. [...] कारी धोरणाला अिष्ट वळण लावण्याच्या दृष्टीनें सं[मेलन] संशोधन व शिक्षणविषयक आपला दृष्टीकोन व्यक्त [क...] अशी अपेक्षा आहे. संशोधन व शिक्षण हा विषय मूल[भूत] व दूरपरिणामी असल्यानें संमेलनानें या प्रकरणी त[...] समिती नेमून संकलनात्मक प्रबंध सरकारला सादर करावा असे सुचव[ावेसे] वाटते. केवळ ठरावरुपानें मतप्रदर्शन करून थांबण्याऐ[वजी] सरकार नियुक्त समित्यांतील विद्वानानीं विचारांत [घेणें] आवश्यक होईल अशा पातळीवरून हा प्रबंध तयार [केला] गेला पाहिजे असे आम्हास वाटते वैद्य बिंदुमाधवशास्त्री संघटना कुशल व परीश्रमी कार्यकर्ते आहेत. ते आ[पल्या] नेतृत्वाचा इष्ट तो उपयोग आयुर्वेदाला करून देतील [असा] आम्हास विश्वास वाटतो.

पनवेलचे संमेलन

पनवेल येथें भरणारे वैद्य संमेलन यशस्वी [हो]ण्याच्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील वैद्यांनीं सहकार्य करावे [अशी] आमची विनंती आहे. संमेलनाच्या व्यवस्थापक स[मितीने] विविध महत्वपूर्ण कार्यक्रम आखले आहेत. वैद्यव[र्ग] संमेलनास बहुसंख्यानें अुपस्थित राहील असा आ[म्हास] विश्वास वाटतो.

चुकीची दुरुस्ती

गतांकी वैं. मुकुंद ल. रानडे यांच्या नांवावर प्रसि[द्ध] केली गेलेली रु. १००० शिष्यवृत्तीची देणगी श्रीमती **रखमाबाई भ्रतार गोविंद लक्ष्मण कानिटकर,** धोमकर ता. वाई यांनीं दिली आहे वैद्य रानडे यांनी खटपट करून ती मिळवून दिली !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हैद्राबाद शहरांतील

अर्कशाला औषधांचे

प्रमुख विक्रेते

आयुर्धाम मेडिकल हॉल

★

रेसिडेन्सी बस स्टँड समोर

सुलतान बझार हैद्राबाद

यांचेकडे आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा यांची सर्व औषधें मिळतात

आयुर्वेदीय अर्कशाला

हैद्राबाद राज्य सोल एजन्सी

हैद्राबाद राज्यांतील वैद्य व विक्रेते यांनीं आयुर्वेदीय अर्कशाळेच्या मालाविषयीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

ज. बा. बापट

अर्कशाला सोल एजन्सी ऑफीस

आनंदस्वामी रोड

जालना

नवा आविष्कार

स्त्री, पुरुष, बालक या सर्वांच्याकरिता

अत्युत्तम महौषधी

नवरत्नरस

★

हा हिरा, माणिक, मौक्तिक इ. नवरत्नें आणि सुवर्ण यांच्या संयोजनानें तयार करण्यांत आलेला कल्प आहे. शरीरस्थ रस, रक्त आदि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण, शुक्र, वीर्य यांची शुद्धी आणि पुष्टी करणें हे या औषधाचें विशिष्ट कार्य आहे. तसेच यानें नपुंसकत्व, वीर्यस्राव, स्वप्नदोष इ. चे निर्मूलन होऊन नवयौवन प्राप्त होते. स्त्रियांच्या गर्भाशयशोथ, प्रदर वारंवार होणारा गर्भपात, गर्भवतीच्या हातापायांवरील सूज व फिक्कटपणा यांवरहि गुणकारी आहे. वंध्यत्वाचा दोष दूर करणारी ही अपूर्व औषधी आहे. मुलांचे अस्थि-दौर्बल्य दूर करून अस्थि बलवान करणारे, कॅलशियम व व्हिटॅमिनची उणीव, दुधाचे अपचन नष्ट करून बालकांना धष्टपुष्ट करणारे असे हे औषध आहे. क्षय, जीर्णज्वर, कास, श्वास, मधुमेह, मानसिक दुर्बलता इत्यादि मध्येंहि अतिशय उपयुक्त आहे.

नवरत्नरस— निरोगी लोकांकरिता रसायन व रोगी लोकांना आरोग्य प्राप्त करून देणारे हे महान औषध आहे.

एका बाटलीची किंमत पांच रुपये

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा

(गुजराथ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यीकरणशास्त्र

पारद

खकः—वैद्य—पु. वि. धामणकर, आयुर्वेद भूषण

भारतीय युद्धकालीन भारतवर्षाचा नकाशा भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांनीं तयार केला आहे. त्यांत तीरचे ईशान्येस दरद नामक देश दिसतो. ह्याच त प्राचीन काळीं हिंगूळ सापडत असे आणि त्यावरून स दरद हें नांव लाभलें. वंग, नेपाल, नाग हीं नांवें स्थानबोधकच होत. भारतीय युद्ध इ. स. पूर्वी ५००० लें. तत्पूर्वी मयासुरानें मयसभा बांधली. ह्या सभेंत गीं आरसे बसविलेले होते. ते सुद्धां हिंगुळाचेच यानें तयार केलेले असावेत. आयुर्वेदाची संहिता याच रास लिहून झाली. तीमध्येही पारा, गंधक, हिंगूळ ळ, मनशीळ इत्यादि खनिज द्रव्यें औषधी योगांत लेली आढळतात. उदा.:—

	उपयोग	रोग	आधार
	लेपन	व्रण	च. चि. अ. २५
	सेवन	हिक्का	च. चि. अ. १७
	अंजन	उन्माद	च. चि. अ. ९

अग्निवेश संहिता इ. स. पूर्वी २००० वर्षे आचार्य कांनीं प्रति संस्कृत केली. चरक, सुश्रुत संहिता वरून श्री नें अष्टांग हृदय लिहिलें. त्यांतही वरील द्रव्यांचे षधी योग दिलेले आहेतच. उदा.—

पदार्थ	उपयोग	रोग	आधार
	लेपन	व्रण	अ. हृ. उ. तं. अ. २५
	सेवन	रसायन	,, ,, ,, ,, ,, ३९
	अंजन	तिमिर	,, ,, ,, ,, ,, ,,
	,,	,,	,, ,, ,, ,, ,, ,,
	सेवन	कुष्ठ	,, ,, ,, चि. अ. १९

किमयेला धातुवाद किंवा धातुविद्या अशींहीं पर्याय नांवें हेत. ह्या विद्येचा जनक वा प्रणेता श्री. नागार्जुन. ह्या बलानें तो शतकानुशतकें आयुरारोग्य लाभ याचे औषधी र रसायन योग तयार करी. ह्या विषयावर त्यानें ग्रंथही हून ठेवले आहेत. नागार्जुन इ. स. चे पहिल्या अगर दुसऱ्या कांत होऊन गेला; असें म्हणतात. ह्याचा मुख्य भर मयेवर होता. तरीपण त्यांनींही कांहीं रोगहर असे औषधीपाठ संयोजलेले आढळतात. उदा. आरोग्यवर्धिनी. सातव्यां शतकांत पूज्य गोविंदाचार्य झाले. त्यांनीं मात्र धातुविद्येतील आयुर्वेदाला पोषक असा भाग काढून त्याचा समावेश आयुर्वेदांत केला. ह्या ग्रंथाचें नांव रसहृदय. ह्यानंतर आयुर्वेदाचे क्षेत्रांत पारदाचा संचार वाढतां वाढतां नवव्या दहाव्या शतकांत एक स्वतंत्र रसवैद्यकच निर्माण झालें. त्या नंतर रसशास्त्रावरील संकलित ग्रंथ लिहिले गेले.

यूरोपमध्यें पाऱ्याचा शोध इ. स. पूर्वी ३०० वर्षे लागला. तिकडेही प्रथम प्रथम किमयेचा विलक्षण प्रसार झाला. तो इतका कि संबंध राज्येंच्या राज्यें ह्या नादापायीं नामशेष झालीं. १६६० ते १६८५ पर्यंत इंग्लंडच्या गादीवर राजे चार्लस् धी सेकंड होते. त्यांच्या दरबारांतील अप्सरा हा पारद कांति, लावण्यवर्धक व वार्धक्य प्रतिबंधक म्हणून रोज १।१ तोळा खात असत. अर्थात हा त्यांचा प्रयोग अज्ञान मूलक होता, हा भाग निराळा. पण पारा पोटांत घेण्याला त्यांनी सुरवात केली; असा तिकडचा इतिहास आहे. संशोधन प्रयत्नांनीं आंग्लवैद्यकांतही पाऱ्याला मोठें क्षेत्र लाभून दिलें. असें जरी आहे तरी पाश्चात्य वैद्यकांतले पारद कल्प अद्याप विषरूप आहेत. आणि आयुर्वेदानें तर पारदाला अमृत स्वरूप केव्हांच दिलें आहे.

पारद निर्मिती

पारद एकाकी स्वरूपांत अगर अगदीं निर्भेळ वा स्वच्छ अच्छ रूपांत कधींच सांपडत नाहीं. तो इतर खनिजांशीं संयुक्त असतो. त्यांतून तो युक्तीनें अलग करावा लागतो. हीं खनिजें दोन प्रकारचीं असतात. १ पांढरे २ तांबडे, पैकीं पांढऱ्या खनिजास परदेशांत Native calomel व भारतांत सौवीर, डाळ चिकणा, दार चिकना म्हणतात. आणि तांबड्यास तिकडे Native cinnabar व इकडे खड्या हिंगूळ म्हणतात. आजकाल हे पदार्थ मूलभूत अगर नैसर्गिक स्वरूपांत उपलब्ध होत नाहींत. त्यांचे अभावी तद्युक्त औषधी योगही अकार्यक्षम ठरले आहेत. तेव्हां हे पदार्थ मिळण्याची सोय निर्माण करून त्यांचे औषधी योगांचें पुनरुज्जीवन करणें हें संशोधकांना नवीन काम उपस्थित झालें आहे. जगाच्या नेहमींच्या गरजा भागविण्यास ९५००० पौंड पारा दरसाल खाणींतून काढतात.

खनिजांपासून पारा अलग करण्याची पद्धति सर्वदूर एकच आहे. आणि ती म्हणजे डिस्टिलेशन (उर्ध्व, अधः, तिर्यक्) पातन.

CC-0 In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पारदाची नांवे

लॅटिन:--हायड्रार्जिरम् । पाण्यासारखा पातळ असतो, म्हणून हायड्रा आणि चांदीसारखा पांढरा असतो म्हणून अर्जेरियम्, पाणी किंवा चांदी ह्या पदार्थांच्या सादृश्यावरून प्रथम प्लीनीनें हायड्रार्जिरम् । हे संयुक्त नांव पारदास दि

इंग्लिश:—क्विक्सिल्हर-चांदीसारखा चंचल दि म्हणून हें नांव पडलें असावें. मर्क्यूरी हे नांव आकाश ग्रहांचें नांवावरून पडलेलें दिसतें. मर्क्यूरी-शुक्रतारा.

संस्कृत नांवें

१ ईश	९ शार्वः	१ अमृतं	१० यशोदः	१ त्रिलोचमः	९ रसोत्तमः	१७ शिवाव्हयः
२ चलः	१० शिवः	२ अमरः	११ रसेंद्रः	२ दिव्यरसः	१० रजस्वलः	१८ सूतराट्
३ जैत्रः	११ शीतः	३ खेचरः	१२ रोपणः	३ महारसः	११ रसधातुः	१९ सिद्धधातुः
४ देवः	१२ श्रेष्ठः	४ चपलः	१३ रुद्रजः	४ महानीलः	१२ रुद्ररेतः	२० स्कंधाशकः
५ नीलः	१३ सूत	५ दुर्धरः	१४ लोकेशः	५ महातेजः	१३ लोकनाथः	२१ हरतेजः
६ प्रभुः	१४ स्कंधः	६ देहदः	१५ सूतकः	६ रसराजः	१४ शिवबीजः	२२ हरबीजः
७ पारं	१५ स्वामी	७ पारतः		७ रसलोहः	१५ शिवपुत्रः	२३ हेमनिधिः
८ रसः	१६ जानं	८ पारदः		८ रसनाथः	१६ शंभुबीजः	२४ हरवीर्यम्

अचित्यजः मृत्युनाशनः रसायन श्रेष्ठः एकूण नांवे ५८

नांवांचा अर्थबोध

१ अमरः नम्रियत इति । मरत नाहीं जो अविनाश

२ खेंचरः खेचरति इति । आकाशांत विहरणारा.

३ चपलः चोपति इति । गतिमानः 'चलः'। ह्याच अर्थी

४ जैत्रः । जयनशीलः जय पावण्याचा स्वभाव असलेला 'यशोदः'

५ दुर्धरः । धारयितुं अशक्यः । अनेक गतिमत्वामुळें हाती लागण्यास अवघड.

६ देहदः । देहं ददाति इति । देह देणारा बीज ही उपमा आहे.

७ दिव्यरसः । एकोऽ सौ. रसराजः शरीरमजरामर कुरुते । ह्या प्रभावामुळें अमृत, स्वर्गीयरसः मृत्यूनाशक हीं नांवें.

८ प्रभुः । प्रभवति इति । समर्थ होतो जो. ह्याच अर्थी 'स्वामी'

९ पारम् । पार्यंते उत्तारण कर्म अत्र समाप्यते । आश्रययार्थं उत्तरताहेत ज्याचे ठायीं. तीराची उपमा

१० पारदः । पारंददाति इति । तीराला नेणारा. रोग पंकाब्धि मग्नानां पारदानाच्च पारदः । रोगरूपी चिखलांत फसलेल्याना तीराला नेऊन पोचविणारा.

११ पारतः । पारं तनोति इति । संसार पार कर

१२ महारसः । महच्चा ऽ सौ रसश्च । रसामध्यें वरच्या प्रतीचा

१३ मुकुंदः । मुकुं मुक्ति । यच्छति इति । देतो जो.

१४ रसः रसमिनात्सर्व धातूनाम् रसत्युच्यते बुधैः धातू पचवितो म्हणून पाऱ्यांस रस म्हणतात. "जराभृत्युविनाशाय रस्यते वा रसोमतः ।" आणि मरण हीं टाळण्याकरितां सेवन करतात म्हणून रस म्हणतात.

१५ रसराजः । रसांना राजाः । रसांचा "रसनाथ रसेंद्र"

१६ रसोत्तमः । रसेषु उत्तमः । रसामध्यें प्रतिचा रस.

१७ रसलोहः । संतिष्ठते द्रवाकारं । द्रवरुपांत राह धातु

१८ रजस्वलः । रजः । अस्ति अस्य । ज्याचे अत्यंत सूक्ष्म आहेत असा. अत्यंत सूक्ष्म कणानीं एकव रजस्वल हें नांव पारदाचे भौतिक स्वरूप विशद करतें. म्हणजे अत्यंत सूक्ष्म कण. अल म्हणजे गुळगुळीत. पा कण अत्यंत गुळगुळीत असल्यानें ते एकमेकांस चि नाहींत. ते एकमेकांपासून दूर राहतात. पण अत्यंत त्यामुळें कण कणांतील अवकाश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...त्या स्पष्टतया प्रतीत होत नाहीं. व त्याच्या रुपत्वाचा ...स निर्माण होतो. पाण्याचें रूपही असेंच आभासरूप ... पाण्याचे कणातही अंतर असते पण तें सहसा दिसत ... चलतचित्रपटांतील अनेक चित्रें दृष्टीसमोरून इतक्या ...गतीनें जातात कीं ती अनेक चित्रे मिळून एकच चित्र ...ते. सातरंगी तवा वेगानें गरगर फिरविला कीं एकचएक ...रा रंग दिसतो. पेटलेली उदबत्ती जोरांत गोल फिरविली ...एका विंदुचे एक मोठें अग्निवर्तुळ दिसते. पारदाचें घनत्व ...व अशींच आभासरूप आहेत.

रजस्वलः। (दुसरा अर्थ) शुद्ध पारद हवा पाण्याच्या ...र्शापासून दूर ठेवला तरी कालांतरानें तो किंचित मळकट ...व धुरकट दिसूं लागतो. (इं. Covered with dust ...hen perfectly pure, mercury in not ...ered by air or water, but as it is or- ...inarilly found it developes a slight ...arnish. U. S. D.

१९ रसेंद्रः। रसोपरसराजत्वाद्रसेंद्रइति। रसोपरसांत ...द.

२० रोपणः। रोहति इति। व्रण भरून आणणारा.

रसायन श्रेष्ठः। लाभोपायोहि शस्तानां रसादीनां ...यनम्।

येज्जराव्याधि शमनं तद्रसायनम्। अशा रसायन ...र्थांत श्रेष्ठ.

२१ शीतः। शीतं अस्य अस्ति इति। पान्याचा स्पर्श ...थंड आहे.

२३ श्रेष्ठाः सर्व पदार्थेषु श्रेष्ठाः। सर्व द्रव्यांत उच्च ...तीचा.

२४ सूतः। देह लोहमयीं सिध्दीं सूतेऽ सौ सूतः स ...स सूतकः। झिजणारें शरीर लोहादि धातूंप्रमाणें दृढ ...करणारा.

२५ सूतराट् सूतानां राजा। निरनिराळचा सिध्दी ...मिळवणाऱ्या पदार्थांत सर्वोच्च.

२६ हेमनिधिः। निधिरुपेण हेमयिस्मिन् वर्तते। ...सुवर्ण संचय आहे ज्यांत

२७ हरतेजः। वीर्य- बीज= शंकराचा शुक्रधातु ...वृध्दि समानैः सर्वेषाम् ॥ अ. हृ.

समान गुणरूपांच्या द्रव्यानें तत्समान द्रव्याची वृध्दि होते. त्याच नियमानुसार "मांसं मांसेन वर्धते।' असें म्हटलें जातें. वीर्य किंवा शुक्र हचा द्रव्याची गोष्टही अशीच आहे. मानव रेत ग्रहणानें स्त्रियांच्या आकारांत व रूपांत फरक पडतो; व त्या सुधारतात. अश्वशुक्र सेवनानें मांनवांचे ठिकाणचा जोम वाढतो. हस्तिवीर्यानें अल्पशुक्रता नष्ट होते. नक्ररेतसानें नपूसकत्व नष्ट होतें. हे त्या वीर्यांचे विशेष गुण होत प्राण्यांचें वीर्य आणि उभ्दिज्जांचें बीज हचापासून तत्सदृश देह निर्माण होऊं शकतो. पारदसेवनानें हीं सर्व कार्यें होतात. म्हणून त्यासहि वीर्य, तेज, शुक्र, रेत, बीज हचा संज्ञा दिल्या गेल्या आहेत. अितकेंच नव्हे तर एकाच पदार्थाचे ठिकाणीं हें सर्व गुण एकवटले असून ते सर्वाहून जोरदार आहेत; म्हणून त्यास 'महा' हे उपपदही लावतात. अप्रतिम पारदाचा वेग अमोघ आहे. असा वेगवान पदार्थ प्रचंडवेगवती गंगा रोखून धरणारा, श्रीशंकरच धारणा करूं शकेल; अशी कल्पना करून जगत्पित्या शिवाचें तें वीर्य गणलें. अशा आणखीही कल्पना आढळतात. उदा " आलिंगने समर्थो द्वौ प्रियत्वाच्छिव रेतसः।" वृ. र. रा. सु. " देव्या- रजो भवेग्दंधो धातुः शुक्रं तथाभ्रकम्।" किंवा सुवर्णाला अग्निवीर्य म्हटलें आहे. हचा कल्पना दिसायला ठीक नव्हत. पण त्यांतही कांहीं तरी उच्च आणि गूढ अर्थ भरलेला असावा. संशोधनानें तो कळूं शकेल.

पारदाचें स्वरूपवर्णन

अच्छ पारद--दिसायला पांढरा शुभ्र, स्पर्शाला थंड, वजनानें अत्यंत जड, चंचल, घन सूक्ष्म, निर्लेप व तेजस्वी असतो.

बाजारी पारद--बाजारांत मिळणारा पारा बहुधा शुद्ध असतो. पण त्याचें चांगल्य व्यवहार योग्य व्हावें हचा अन्य हेतूनें कधी कधीं त्यांत कथील, शिसें, बिस्मथ हचापैकीं एक वा अनेक धातु अगदीं थोडचा थोडचा प्रमाणांत मिसळतात.

हा पारद निस्तेज, मंद कागदावर अगर फडक्यावर घांसला असतां काळीसर रंग देतो. बाटलींत घालून घुस- ळला तर काचेवर काळसर रंग चढतो. त्यांच्या गुठुळचा अत्यंत बारिक व सफाईदार होत नाहींत. त्यांची गति मंदच असते. उन्हांत ठेवला असतां निःशेष उडत नाहीं. भेसळीचें प्रमाण मोठें असल्यास तिचा सांका बाटलीचें बुडाशीं बसलेला आढळतो.

शुद्ध पारदः—चंद्राप्रमाणें पांढरा शुभ्र तेजस्वी, हात वस्त्र, कागद, बाटली हचाना काळा रंग न देणारा ज्यांत प्रतिबिंब उत्तम दिसते इ. तो पारद शुद्ध जाणावा.

औषधी योग रासायनीय प्रयोग आणि धातुविद्या हचांत शोधनाचे विधी साधन व शुद्धिलक्षणें हीं विभिन्न असतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पारदाचे स्वाभाविक धर्म

विशिष्ट गुरूत्व—१३·५

घनी भवन बिंदु—(शून्य बिंदुचे खाली) ३८·८७°C

बाष्पीभवन बिंदु—३०० ९०°C

उकळण बिंदु —३३६·९°C

परमाणु भारांक—२००–६१°C (हैड्रोजन परमाणु भारांक एक)

पारदाचे नैसर्गीक प्राचीन प्रकार

प्रकार	रंग	दोष	विशिष्ट गुण	उपलब्धि
१ रस	लाल	निर्दोष	रसायन	...
२ परमाणु	श्याम	,,	रुक्ष	,,
३ सूत	ईशत्पीत	सदोष	रूक्ष	क्वचित
४ पारद	श्वेत	,,	चपल	,,
५ मिश्रक	मयुरवर्ण	,,	,,	,,

पारदाच्या गति

पारद किती तऱ्हेनें स्थलांतर करतो, निघून जातो. अगर दृष्टीआड होतो. ह्या बाबत

प्राचीनांचा अनुभव

१ जलगतिः—पारद धुतांना पाण्याबरोबर निघून जातो

२ मलगतिः—दोष घालवितांना त्यांचे बरोबरही गमन करतो.

३ हंसगतिः—उन्हाने हवेंत उडतो.

४ धूमगति—संस्करण विधींत धुराबरोबर जातो.

५ अदृश्यगतिः—वरील चारही मार्ग पक्के बंद केले तरी पारा उडून जातो. घटतो. हे समजत असूनही त्याचा मागोसा अगर मार्गाचा सुगावा लागत नाहीं. म्हणुन ह्या गतीला दैवी म्हटलें आहे. आणि तिला जीव गतीची उपमा दिलीं आहे.

पारदाचे उपयोग—

१ सोनें रुपें इ. धातूंच्या खाणी असतात, पण हे पदार्थ सुट्या रूपांत असत नाहींत. एकमेकांशीं संलग्न आणि दगडाच्या शिरेंतून भरलेले असतात. ती शीर शोधून काढून धातूचे रोखानें पारा आंत भरतात. म्हणजे तें खनिज पारदाशी मिसळून सुटे पडतें मग तें दगड फोडून हे मिश्रण अलग करतात. नंतर पातन विधीनें पारा अलग करतात. म्हणजे धातू हाती येतो ह्या क्रियेला वेध देणें म्हणतात. व ह्या धातूंना वेधज म्हणतात.

२ शरीर व हवा यांतील उष्णता व रक्ताचा माफक यंत्र.

३ नीलातीत प्रकाश किरण दिवा दुष किरणदायी नलिका.

४ मर्क्युरी बॉयलर्स, आरसे इ. तयार करण्याकरतां

५ औषधी निर्मिति, ६ किमयेंत.

पारदाचे गुणदोष

मूलभूत गुण–षड्रसः, चक्षुष्यः योगवाही, महा त्रिदोषघ्नः रसायनः

नैसर्गिक दोषः–(३) विष, वन्हि, मल.

योगिक दोषः—(२) नाग, वंश इ. धातुसंसर्ग

औपाधिक दोषः–(७) भूमि, गिरी, वारि, वंगापासून २।२

कंचुक दोषः–(७) पर्पटी, पाटनी, भेदी, द्रावी, मल व अंधकारी

अवस्था परत्वें पारदाचें कार्य

मूर्च्छित पारदः—सर्व रोग विनाशकः ।

बद्ध पारदः—खेचर सिद्धिदायकः । मुक्तिदः ।

लीन पारदः—सर्व सिद्धीदः ।

निरुद्ध पारदः—देह सिद्धिदः ।

मृत पारदः—अमरी करोति ।

रसलिंग

विधाय रसलिंगं यो भक्तियुक्तः समर्चयेत् ।

जगत्रितय लिंगानां पूजा फल मवाप्नुयात् ।

पारदाचे लिंग करून जो त्याची भक्तीभावाने त्रैलोक्यातील सर्व (शिव) लिंगांची पूजा केल्याचें श्रेय मिळतें

पारदाचा घनी भवन बिंदु शून्य उष्णतामानाचें ३८·८७' आहे. घनीभूत पारा चांदीप्रमाणें पांढरा घन घातक्षम व तंतु निघण्यास योग्य असा होतो. रस बनविण्यास ही स्थिति योग्य होय. पण ही अवस्था वातावरणाचे उष्णतामानांत टिकाव धरीत नाहीं. तरीपण प्रा रसवैद्य रसलिंग करीत. आराध्य देवतेचे आवाहन, पूजा अर्चन करून त्याचे विसर्जनही करीत. सामान्य उष्णतामानावर पाऱ्याची पिंडी बने व कांहीं काल ती स्थिर राही. तेव्हां त्यांचेजवळ तशीच कांहीं युक्ती असली पाहिजे

(पुढें मूर्ति व महाबंध पहा)

आजहि कांहीं युक्त्या सुचतात; त्या अशाः—

१ बर्फाचे साहाय्यानें उष्णतामान शून्यावर आणता येते. बर्फालाच मीठाची जोड दिली तर तें उष्णतामान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...कालींही आठबिंदुपर्यंत नेतां येतें. ह्याच विधीनें ...स्क्रीम करतात.

२ रेफ्रिजिटरमध्यें अमोनियाचे साहाय्यानें पाण्याचा ...करतां येतो. म्हणजे उष्णतामान शून्यापर्यंत नेतां येते.

३ आईस्क्रीम व बर्फ उघड्या हवेंत थोडा वेळ टिक– ...हाच काल वाढविण्याची युक्ती चलजमनी, हात जोडी ...री रिंगणी, शिवलिंगी श्वेतशणपुष्पी, बृ. जीवंती अशा ...स्पतींचें सहाय्यानें साध्य झाली असावीसे वाटतें. रस– ...करी, रसनियामिका, वेगाद्रस नियमिका अशा प्रकारचीं ...आहेत ह्या वनस्पतींना. हा ही एक संशोधनाचा ...य आहे.

पारदाचे लिंग, पारदाच्या मूर्ति आजही पहावयाला ...तात, पण त्यांत कथिल सांपडतें प्राचीनाना ही युक्ति ...त होतीकां ?

...रदाचे संस्कार

१ स्वेदन	५ पातन	९ गगनग्रास	१३ जारण
२ मर्दन	६ रोधन	१० संचारण	१४ ग्रास
३ मूर्छन	७ नियमन	११ गर्भद्रुति	१५ सारण
४ उत्थापन	८ दीपन	१२ बाह्यद्रुति	१६ संक्रमण

१७ वेधविधी १८ सेवन–(र. र. स.)

धातूविधेंत पारदाचे आठराही संस्कार करावे ...गतात. औषधी प्रक्रियेंत मात्र पहिले आठ संस्कार पुरेसे ...तात. जसें:—

इत्यष्टौ सूत संस्काराः समाद्रव्ये रासायने ।
शोषाद्रव्योपयोगित्वान्नते वैद्योपयोगिनः । बृ. र. रा. सुं

आठ संस्कार पुष्कळ लोक करतात. आम्ही ते दोन वार केले. पण आमचा अगर इतर कोणा साधकाचा पारा बुभुक्षित अगर सुवर्णग्रासी झाला नाहीं. अशी माहिती आम्हास मिळाली. स्वतःचा अनुभवही तोच. मात्र ही गोष्ट अगदी अशक्य प्राय आहे असें वाटत नाहीं. पारदास दीपन करण्याची युक्ति कांहीं लोकांस साधली आहे. आणि त्याचा विधी अगर साधक, द्रव्य संग्रह मुद्रित पुस्तकांत आढळत नाहीं.

स्वेदन संस्कारानेंच रासायनिक दृष्ट्या अत्यंत अच्छ असा पारद तयार होत असतां पुढच्या संस्कारांचे काय माहात्म्य आहे त्याचा उलगडा होत नाही. प्रत्येक संस्कारा–नंतर पारा तपासला तरतो chemically pure असा शेरा आणतो. तेव्हां प्रत्येक संस्काराचें महत्व प्रयोजन लक्षण इ. गोष्टी स्पष्ट व्हायला पाहिजेत. त्याशिवाय आठ संस्कारांची उपयुक्तता सिद्ध होणार नाहीं. ह्याकरितां कसोटीचे कष्ट आणि चिकाटीच्या प्रयत्न युक्त संशोधनाची अत्यंत आवश्यकता आहे.

पारदाचे बंध

पारदाच्या नांवांत चंचल, दुर्धर, अशीं नांवें वाचलीं. त्याच्या गतीही वाचल्या, तेव्हां असा पारद कार्यप्रवण करा–यचा झाला तर त्याला कांहीं युक्ती योजली पाहिजे. ह्या युक्तीचे प्रकार ग्रंथोक्त पंचवीस आहेत. त्याशिवाय पांच आहेत. त्यांची नांवें व त्यांचे उपयोग येणेंप्रमाणें.

बंध	फल	बंध	फल	बंध	फल
अग्नि	आकाशगमन	तरूण	वृष्य, बल्य व रसायन	महाबंध	गुटिका भवन
आभास	रोगकारक	द्रुति	दुःसाध्य रोगघ्न	मूर्ति	मूर्ति घडते.
आरोट	रोगनाश	निर्जीव	सर्व रोगहर	वृद्ध	देहलोहकर
कल्क	योग फलद	निर्बीज	सर्व रोगहर	श्रृंखला	देहलोहकर
कज्जली	योगवाही	पंक	संयोगकर	सजीव	निरुपयोगी
कुमारक	रसायन	पाट (पर्पटी)	सर्व रोगहर	सबीज	निपुल प्रभावन
क्रियाहीन	अपथ्य केलें तर रोगकर	पिष्टिका	दीपन पाचन	सुसंस्कृत	
खोटे	सर्व रोगहर	पोहली	प्राणदायी	सिंदूर	सर्व रोगहर
जल	योगवाही रसायन	बाल	रसायन	हठ	रोगकारक
जलौका	स्त्री विद्रावण	पोटली	रसायन	क्षार	दीपन, शूलघ्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील तीस बंधांपैकीं कज्जली, पंक, पर्पटी, पोटली आणि सिंदूर हे बंध अगदी सोपे आहेत. तेच प्रचारांतही आहेत. जलौकाबंध कोणी कोणी करतातही. इतरांचा अभ्यास केवळ परिक्षेपुरता. कारण ते बंध साधायाचे म्हणजे परिश्रम आणि पैसा फार लागतात. त्यांच्या अभावीं हे बंध अत्यंत उपयुक्त असूनही मागे पडले.

पारदाचे शोधन

हा विभाग अगदी व्यावहारिक आहे. चिकित्सकांना द्रव्य आणि यश यांचा लाभ करून देणारा असल्यानें तो प्रचलितही आहे. पारदांत यौगिक, नैसर्गिक, औपाधिक, आणि कंचुक असे चार प्रकारचे दोष असतात. (तपशील पूर्वार्धात) ते घालविण्याकरतां त्याचें शोधन करावयाचें असतें. पैकी यौगिक दोष परीक्षण विश्लेषण पध्दतीनें जमतें. नैसर्गिक दोष उपरुग्ण पध्दतीनें समजतात. इतरांबाबत मात्र अद्याप उपाययोजना व्हायची आहे.

धातुविद्या आणि आयुर्विद्या हीं दोन स्वतंत्र क्षेत्रें आहेत. पण दोन्हीं मध्यें पारदास प्राधान्य आहे. अर्थात शुध्दि हेतु विभिन्न. त्यामुळें शोधकवर्ण व शोधन विधीही भिन्नच ठरतात. धातुविद्याविहीत शुध्दि क्वचित्प्रसंगीं आयुर्विद्येंत उपयुक्त ठरूं शकेल. पण उलट प्रकार संभवणें अजिदात अशक्य.

आयुर्वेदीय औषधी क्षेत्रांत एकाच हेतु करितां, अनेक अगर अनेक हेतूंकरितां एक अशीं द्रव्यें योजलेलीं आढळतात. पुनः प्रांता परत्वे मतभेद दिसून येतात. ते चिंतनीय ठरतात. उदा. मल, वन्हि, आणि विष यांचे नाशनार्थ यो. र. बाहवा. चित्रक, त्रिफला अशा क्रमानें द्रव्यें सुचविली आहेत. तर आ. प्र. मते हा क्रम कोरफड, त्रिफला चित्रक असा असायला पाहिजे. अर्थात हा ही एक संशोधनाचा विषय उपस्थित झाला.

शोधनद्रव्यें

दोष	द्रव्य	दोष	द्रव्य
नाग	विटकर, हळद, घेरोसा लोकर, चुना, लिंबूरस.	वन्हि	चित्रक
		चांचल्य	काळाधोत्रा
वंग	कडूदावनमूळ, अंकोलमूळ कांजी	गिरी	त्रिकटु
मल	बाहवा, कोरफड	विष	त्रिफळा

(योगरत्नाकर)

प्रकार २ रा.:--एकच एक लसूणरस किंवा कोरफड पारदाची शुद्धि करूं शकतात. असा अनुक्रमें धन्वंतरीसंहिता व योग चिंतामणींत उल्लेख अथवा अभिप्राय आहे.

पारदाचें भस्म—

पारदाचे भस्माचे स्थान भेदानें दोन व रंगभेदानें चार प्रकार आहेत. बाटलीचे कंठाशीं किंवा संपुटांचे वरचे भागीं लागतें तो उर्ध्वग प्रकार आणि बाटली किंवा संपुष्ट हयांचे तळाशीं बसतें तो तलस्थ प्रकार होय. रंगांत पांढरा, काळा, तांबडा आणि पिंवळा असे चार प्रकार आहेत. पारदाचीं भस्में जशीं अनेक प्रकारचीं तसें त्याचे विधीही अनेक. त्यापैकीं कांहीं छोटे विधी येथे देत आहे.

कंठस्थः—१६ पारा, १६ गंधक, १६ नवसागर काचरूपी वालुका यंत्र क्रमाग्नि चारप्रहर ह्याला रसकर्पूर म्हणतात. यो. र.

तलस्थः—१६ पारा, १६ गंधक, १६ नवसागर मुखमुद्रा-अंतर्धूम विपाचन-क्रमाग्नि १२ प्रहर र. रा. सु.

पांढरें:—टंकण, मध, लाख, लोकर, गुंज, पा. भावना-माकारस-खल १ दिवस भात्यावर फुंकावें कापराप्रमाणें पांढरे शुभ्र भस्म होते. र. चं.

पिवळें—भुई आवळीं, हस्तिशुंडी (शेवळें) गंधक-एकत्र मर्दन काचकूपी, वालुकायंत्र, क्रमाग्नि ४ र. रा. सुं.

दमा हटतो
तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रल्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफुसें मजबूत होऊन कांहीं काळानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३॥, ६ व १० किमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विक्रिस मिळतें अगर
कारखानदार
डॉ. पुरोहित फार्मसी,
कोल्हापूर (एस. एम. सी.)
पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताम्बडें:—पारा, गंधक, निर्गुडीरस,–काचकूपी–वालुकायंत्र, क्रमाग्नि चार प्रहर र. चं.

निळें:--१ पारा, १ गंधक, १ कलखापरी–भावना कंदरस काचकूपी, वालुकायंत्र, क्रमाग्नि र. रा. सुं.

काळे—पारा, गंधक, भावना,–कुमारीरस–मर्दन–र. सुं.

मृतपारदलक्षण

अतेजा अगुरुः शुभ्रो लोहहाऽचंचलो रसः ।
यदानावर्तते वन्हौ नोर्ध्वगच्छेत्तदास्मृतम् ।।
अन्यश्चः--अगुरुतेजा शुभ्रो वन्हिस्थायी स्थिरोऽधुमः
हेमादिधातु भोक्ताच । तत्कर्ता स्यान्मृतः सूतः ।।
आ. प्र. अ. १।४०८

पारदाचे भस्म लकाकीरहित, हलकें. पांढरें घातुमारक असतें तें अग्नीवर टाकलें असतां द्रवत नाहीं, उडून जात नाहीं, किंवा त्याचा धूरहीं येत नाहीं.

मृतत्व म्हणजे काय

भस्मता या रसेंद्रस्य महामूर्च्छेति सा स्मृता ।
रसस्य मारणं नास्ति शंभुनेति प्रकीर्तितम् ।। रसेंद्र चू.

वर मृत पारदाचीं लक्षणे दिलीं आहेत. पण तीं खरीं नाहींत कारण पारदाचे मरण नाहीं. असें साक्षात शिवाचें सांगणें आहे. तेव्हां हें भस्म म्हणजे पारदाची मृतावस्था नसून तें एक प्रकारचें मूर्च्छनच आहे. हे मोठें असतें म्हणून त्याला महामूर्च्छा म्हणतात.

पारदाचे कृष्ण भस्म–कज्जली
,, रक्त ,, -सिंदूर
,, श्वेत ,, कापूर

असें मानून भस्म विधींत ह्यांचा उपयोग करतात. व ती भस्में रसमारित असें समजतात. पण ही समजूत चुकीची आहे, कारण ह्यापैकीं कोणताही पदार्थ रसभस्माचे कसोटीला उतरत नाहीं. तेव्हां यांना पारदाचीं भस्में मानणे केव्हांही युक्त होणार नाहीं.

पारद स्वतः अतिशय अग्नि अक्षम आहे. आणि त्याचे मारण तर अग्नीचें सहाय्यानेंच करावयाचे असतें. तेव्हां तो प्रथम अग्निस्थायी, अग्नीवर टिकणारा असा करावा लागतो. आणि हें कर्म तर फार दुष्कर किंबहुना असाध्यच तेव्हां पारदाचे भस्म ही गोष्ट आजकाल तर अशक्य कोटींतच गणली गेली आहे, कांहीं सिद्ध पुरुषांना तें साधतें पण त्याचा प्रसार नाहीं.

पाश्चात्य वैद्यकांतही विविध रंगाचे पारद कल्प पुष्कळ आहेत. पण त्यापैकीं एकही रस भस्माचे कसोटीस उतरत नाहीं.

पारद सेवन

पारद स्वतः अतिशय जड आहे. चंचलही आहे. स्वतःचे गुरुत्वामुळें तो भराभर सरकत जातो. एकाकीं अच्छ स्वरूपांत घेतलेला पारा शरीरांत बिलकूल शोषला जात नाहीं. मग अपाय उपाय कसचा.

परंतु वर सांगितलेल्या एखाद्या बंधानें तो युक्त असला तर मात्र शरीरांत भिनतो. हा पारा अन्नवह स्रोतसांची अंतस्त्वचा, पांथरी, हृदय, स्नायू फुप्फुसें, तरुणास्थि, अस्थि इ. सर्व अवयवांत संचार करतो. व शरीरांतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक उत्सर्गावाटे तो बाहेर पडतो. हे उत्सर्जन पहिल्या आठवड्यांत झपाट्यानें होतें. मग मात्र तें कित्येक वर्षें मंदगतीनें होत रहातें. सतत सेवन केलेला पारा शरीरांत स्थिर होतो. मृत्यूनंतरही तो तेथें सांपडतो. कित्येक वर्षे पारद सेवन न केलेल्या माणसाचे मूत्र पिंडांत त्याचे मृत्यूनंतर ·५ ग्रॅम पारा सांपडला.

प्राचीन काळीं रसवैद्य असें समजत कि प्राणोत्क्रमण कालीं ज्याचे शरीरांत पारा स्थिर झालेला आढळतो तो नर भयंकर दुष्कृतापासून मुक्त होत्साता परमपदाप्रत जातो. जसें.

“ उदरे संस्थिते सूते यस्यो त्क्रामति जीवितम् ।
समुक्तो दुष्कृताद्धोरा त्प्रयाति परमं पदम् ॥ ” र. र. स.

रसवैद्यांचा पारा आणि हा पारा एकाच स्वरूपाचे असतील असें म्हणतां येईल. अर्थात फल प्राप्तिमध्यें फरक पडणार हें उघड आहे. तरीपण परलोक विद्या विशारदांकडून ह्याबाबत शहानिशा करून घेता येण्यासारखी आहे कां पहावें !

पारद विषबाधा

वरील बंधांपैकीं कांहीं विषवत् आहेत. उदा. कर्पूरबंध किंवा पारदाचें पांढरे भस्म (?) हा पदार्थ उपदंशहर म्हणून ख्यातनाम् आहे. परंतु तो जर अशुध्द सेवन केला तर शरीरांतले कार्य उरकून हांडाचा भेद करून बाहेर पडतो. ह्या अस्थिव्रणास लासूर अगर नासूर म्हणतात. पण तोच शुध्द करून, म्हणजेच तुपावर परतून, लवंग चूर्णाचे गुठळींतून घेतला तर गुणांचा लाभ व दोषांचा परिहार होतो.

पाश्चात्यांचे बहुतेक पारद कल्प विपरूपाचे असतात. ह्यामुळें त्या ग्रंथांत पारदकल्प वापरणारास [illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धोक्याच्या सूचना दिलेल्या आढळतात. त्याचे वर्णनांत पारदविषबाधेच्या तीन अवस्था कल्पिलेल्या आहेत.

अवस्था पहिली — पाऱ्याची मात्रा अधिक झाल्यास अगर तो सोसल्यास त्याची विषलक्षणें प्रतीत होऊं लागतात. पाऱ्याचे वास्तव्य मोठ्या मात्रेनें रक्तांत असतें. त्यामुळें रक्त जेथें जाऊन पोंचेल तेथें त्याचे कार्य सुरु होतें. प्रथम तो कळकळीत पणा निर्माण करतो. तोंड व घसा लाल करतो, हिरड्या काळ्या व दुखऱ्या होतात. दांत आंवळले असतां ते शिवशिवतात.

अवस्था दुसरी:— हिरड्या व गांठीं सुजतात. त्यांचे पृष्ठभागावर एक पांढुरकी रेघ दिसूं लागते. उच्छ्वासाला विशिष्ट प्रकारचा पण अत्यंत अप्रिय असा दुर्गंध येतो व लाळ सुटूं लागते.

अवस्था तिसरी--लाळेचे प्रमाण वाढतें. ती चिकटही होते. हिरड्या, जीभ घसा, चेहेरा हृयांना केव्हां सूज येतें. तोंडांतील पिच्छा त्वचेवर छाले येतात, तेथें चट्टेही पडतात. जबडा फार ठणकतो. जीभेवर जाड, पांढुरकी अशी बुरशी येते. लाळ तर सारखी वाहूं लागते.

पारद विष चिकित्सा

गाठींना सूज येणें, लाळ गळणें ह्याचा अर्थ शरीराकडून पारा बाहेर टाकण्याचा प्रयत्न सुरूं आहे, असा होतो. तेव्हां ह्या दिशेनें चिकित्सेचे धोरण आंखणें सोयीचें पडतें ह्या-बरोबर कोथ प्रतिबंधक, जंतुनाशक अशी औषधें द्यावींत. उदा. पॉटआयडाईड, सिल्व्हर नायट्रेट, अॅट्रोपिन इ.

१ चोपचिनी, २ सारिवा, ३ गोखरूं ४ वाकेरी मातें ५ पाथरी ६ कार्ले ७ तांदुळजा ८ कासविंदा ९ नागवेल १० माका, ११ वेळू हा वर्ग पारददोषहर समजला जातो. चोपचिनी चूर्ण तर पॉट आयोडाईडचे तोडीचें औषध आहे. पॉ. ऑ. सेवनानें होणारा त्रास मात्र ह्यापासून होत नाहीं. शिवाय कार्य झपाट्यानें होतें. इतर औषधें त्यांचें विशिष्ट गुणांनीं पारदाच्या दोषांचे मार्जन करतात.

तयार औषधापैकीं गंधक रसायन हें औषध पारदाचे उत्तम बंधक व दोष प्रतिबंधक समजले जाते. हें औषध जेथें जेथें जाईल तेथील तेथील पारदाचे कज्जलींत रूपांतर करविते व त्याचे दोषिक कार्य थांबवितें अशा तऱ्हेनें पारद विषबाधेचा परिहार करतां येतो.

पारा वापरण्याची आयुर्वेदीय पद्धती

पाऱ्याचा शोध प्रथम किमयागारांनीं लावला. त्यांचे प्रयोग चालले असतां त्यांकडे आयुर्वेदीय यांचे लक्ष गेलें पाऱ्यासंबंधाची माहिती लक्षांत घेतल्यावर हा पदार्थ वैद्य औषध म्हणून उपयोजितां येईल कीं नाहीं या संबंधानें आयुर्वेदीयांचे संशोधन सुरूं झालें. संशोधन प्रयत्नांत त्यांना पारदाचे गुण, त्याचे दोष गुणांचे संवर्धन, दोषांचे क्षय प्रतिबंधक या गोष्टी स्पष्टपणें कळल्या. ह्यांतच पारा गंधक रासायनिक प्रीति आहे, या प्रीतिचा उपयोग प्राणिशरीरांत कांहीं काल स्थिर होणें त्याचे पचन शोषण होणें व पारदाच्या गुणांचा लाभ होणें या गोष्टी गंधकाच्या संयोगानें घडणें शक्य आहे. असें त्यांच्या निदर्शनास आले. दुसरी गोष्ट गंधक संयोग पारदाचा विपदोष प्रतिबंधक ही ठरतो. असेंहि त्यांस आढळून आलें. पारा गंधक रासायनिक प्रीति आहे, पण ती फारशी दृढ वातावरणाच्या हवामानाच्या संसर्गानें ती सुटू शकते. कज्जली हा अशा प्रकारचा आहे. पण यापेक्षां दृढतर बंधांची त्यांना आवश्यकता भासूं लागली. तेव्हां त्यांनीं पर्पटी, पोटली आणि सिंदूर हे उत्तरोत्तर दृढ असलेले बंध शोधून काढले. वैद्य चिकित्सेमध्यें हेंच प्रकार प्रामुख्यानें प्रचलित आहेत.

गंधक विरहित पारद योग ग्रंथामध्यें सांगितलेले आढळतात. अर्थांत ते फारच तुरळक आहेत आणि सांगितलेल्या पाठाप्रमाणें औषधांचें संमिश्रण करूं गेल्यांस त्यांत पारा मिसळत नाहीं. अशा वेळीं त्या ठिकाणीं रससिंदुर घेतात.

केंवळ पारा बाह्योपचारांकरिता वापरतांत डोक्यांत उवा, लिखा पडण्याकरितां केवळ पारद रात्रीं निजतांना तेलाबरोबर डोक्यास मर्दन करतात. व सकाळीं केंस धुवून टाकतात. याच कार्याकरितां हायड्रा,जिरी, आयोडाईट (शिर्पोक?) याचाहि उपयोग असाच करतात.

मलेरिया शत्रु, पांढरे कोड

ही दोन पेटंट औषधें मागवून धन, यश व कीर्ति मिळवा

माहिती मागवा

वैद्य.—बी. आर. बोरकर, आयुर्वेद भवन मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (वऱ्हाड)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिशुजीवन

मी त्याला नियमितपणें "शिशुजीवन" देते.

कारण हें उत्कृष्ट शक्तिवर्धक आहे. "शिशुजीवन" नियमित घेतल्यानें मुलांचें किरकोळ आजार दूर होऊन तीं आनंदी व खेळकर होतात, हें मला अनुभवानें पटलें आहे.

आपणही आपल्या मुलांना "शिशु-जीवन" द्या. तें स्वादिष्ट असल्यानें मुलें आवडीनें घेतात.

आयुर्वेदीय अर्कशाळा लिमिटेड
सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

R. No. B. 5225

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभवसिद्ध

अर्कशाला-औषधें

यूटोन

गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

गरोदरपणीं सतत घेतल्यानें प्रकृति चांगली राहून गर्भाचें उत्तम पोषण होते.

लोहीन

रक्तवृद्धिकर, लोहकल्प

रक्तक्षीणता, पांडुरोग व मोठ्या आजारानंतरचे दौर्बल्य यांवर उत्कृष्ट गुणकारी.

वसंतमिश्रण

सुवर्ण व मौक्तिक, प्रवाळ, शृंग, गुळवेल यांचा कल्प

जीर्णज्वर, क्षयांची पूर्व व प्रारंभिक लक्षणें, शक्तिक्षीणता याकरिता

शिशुजीवन

बालकांकरिता टॅनिक

लहान मुलांचा दमा, खोकला, अपचन इ. तक्रारी दूर होतात.

स्तन्यशोधन

दुग्धशोधक व दुग्धवर्धक

प्रसूतीनंतर सतत घेतल्यानें मातेचे दूध निर्दोष होते व वाढते.

ही औषधें विक्रेत्यांच्या दुकानीं असली पाहिजेत
त्यांची मागणी सतत वाढत आहे.

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे यांनीं आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा लि. येथें छापलें व आयुर्वेद वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

प्रमुख संपादक : वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य.

कार्यकारी संपादक : ब. ल वष्ट, आयुर्वेद विशारद.

ऑगस्ट १९५२

वार्षिक वर्गणी ? रुपये

किरकोळ अंक ८ आणे

१०६
२२/८/२०००

या अंकांत—

पर्पटीचा प्रवाहिकेंत उपयोग
मराठवाड्याचें विविध दर्शन
नाशिक जिल्हा वैद्य संमेलन
महाविद्यालय वार्ता
वाचकांचा पत्रव्यवहार

वसंत मिश्रण

गेले कांहीं महिने अर्कशालेच्या वसंत मिश्रण या औषधाचा पुरवठा होऊ शकला नव्हता. पण आता तें तयार झालेले आहे. ग्राहकांनीं मागणी करावी अशी विनंति आहे.

— आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुकुल-परिवार, गुरुकुल काँगड़ी

आयुर्वेद प्रसारक मंडळी सातारा या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा

[१५ वे]   आगस्ट १९५२   [अंक ८ वा

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होता येते

आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारी मतें ही त्या त्या लेखकांची मानली जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचें सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंका– नंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी नें पाठविला जातो.

अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक आयुर्मीमांसा, अर्कशाला बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

संपादकीय

संस्थेची आर्थिक गरज

आयुर्वेदिक स्टेट फॅकल्टीच्या आदेशाप्रमाणें आयांग्ल वैद्यक महाविद्यालयानें नवा शिक्षणक्रम अंगिकारलेला आहे. हा शिक्षणक्रम आखताना आयुर्वेदाच्या व आधुनिक वैद्य– काच्या ज्ञानाची पदवीधरांची पातळी अधिक उंच व्हावी असें धोरण असल्याचें अधिकृत व अनधिकृत रीत्या सांगण्यांत आलें. पण शिक्षणाचा अपेक्षित दर्जा राखण्यासाठीं शिक्षणसंस्था साधनसंपन्न असल्या पाहिजेत. त्यासाठीं या संस्थांना भरपूर आर्थिक मदत मिळणें आवश्यक आहे. ही मदत मिळवून देण्याची नैतिक व प्रत्यक्ष जबाबदारी फॅकल्टीवर येते. त्या दिशेनें फॅकल्टीचा प्रयत्न चालू असेल अशी आम्हाला आशा आहे.

मुंबई सरकारनें आयुर्वेदीय शिक्षणसंस्थांना या वर्षी ग्रँटस् देताना या संस्थांच्या गरजा सहानुभूतिपूर्वक समजा– वून घ्याव्या अशी विनंति करावीशी वाटते, आ. वै. महा– विद्यालयासारख्या दूरस्थ संस्थांचा आवाज सरकारी कार्या– लयांत वारंवार उमटू शकत नाहीं. पण म्हणून अशा संस्थांची उपेक्षा होणार नाहीं अशी काळजी घेण्याची सरकारी अधि- काऱ्यांवर अधिकच जबाबदारी येते. साताऱची संस्था ही त्यागी कार्यकर्त्यांच्या बाबतींत संपन्न असली तरी धनिकांच्या आश्रयाच्या दृष्टीनें ती विपन्नच आहे. नव्या रुग्णालयापायी काढलेल्या कर्जाची तिच्यावर जबाबदारी आहे. योग्य अधिकाऱ्यांकडे संस्थेनें आपल्या परिस्थितीविषयीं निवेदन केलेलेंच आहे. त्याचा इष्ट उपयोग होईल अशी आशा आहे.

नवे कार्यवाह–नवे कार्यकर्ते

या वर्षीपासून सहकार्यवाह म्हणून श्री. ल. आ. जाजू वकील हे संस्थेचें काम पाहू लागले आहेत. आतापावेतो ते संस्थेचें हितचिंतक व संस्थेच्या नियामक मंडळाचे सभासद म्हणून काम करीत होतेच. पण कार्यवाह या नात्यानें त्यांच्या कर्तृत्वाचा संस्थेच्या जीवनांत दैनंदिन उपयोग होईल. नागरिकांचा प्रतिनिधी संस्थेचा प्रत्यक्ष कार्यकर्ता होणें ही एक इष्ट प्रथा आहे. श्री. जाजू वकीलांना संस्थेविषयीं प्रेम आहे आणि सार्वजनिक कार्याचा अनुभव आहे. त्यांच्या या प्रत्यक्ष सहकार्यामुळें संस्था आपल्या अडचणींतून यशस्वीपणें पार पडेल अशी खात्री वाटते. संस्थेच्या सहाय्यकांत श्री. शि. गो. भावे हेहि यंदा समाविष्ट झाले आहेत. सार्वजनिक कार्य– कर्ते आणि कर्तृत्ववान संस्थाचालक म्हणून ते अनेक वर्षे प्रख्यात आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाचा संस्थेचा लाभ होत आहे हें [illegible] आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निरोप

गेल्या मे महिन्यांतील मॅनेजिंग कौन्सिलच्या सभेंत आयुर्वेद प्रसारक मंडळीच्या कार्यवाहाच्या जबाबदारीतून मला मोकळे केल्याबद्दल सर्व कौन्सिल सभासदांचे मी अंतःकरण पूर्वक आभार मानतो.

१९३० जूनमध्यें मी संस्थेचा कार्यवाह झालों. त्या वेळच्या कार्यकर्त्यांत मीच सर्वांत लहान होतो. अनुभव मुळीच नव्हता. हुषारीही ऊतू ग्रेत नव्हती. पण डॉ. मोरोपंत आगाशे यांच्या मार्गदर्शनाखालीं, डॉ. वा. वि. आठल्ये यांच्या प्रोत्साहनानें मी हें काम स्वीकारलें. चुका करीत शिकण्याच्या नव्या शाळेंत मी दाखल झालो!! जवळ जवळ २२ वर्षे होत आली. एकाच माणसाकडे इतक्या दीर्घ काळ कांहीं सार्वजनिक संस्थांचें अधिकार राहावे ही सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें अनिष्ट गोष्ट असूनही माझ्या कडून ही सेवा घेतली गेली. मी हें माझे भाग्यच समजतो. मी प्रथम या जागेवर रुजू झालो त्यावेळचे संस्थेचें स्वरूप व आजचें स्वरूप यांत केवढा तरी मोठा फरक पडलेला आहे. जनतेच्या दृष्टी समोरच हा फरक होत गेल्यामुळें या संबंधी अधिक सांगण्याची आवश्यकता नाहीं. माझ्या वैयक्तिक दृष्टीनें या गेल्या वीस बावीस वर्षांतील कार्याचा माझ्यावर पुष्कळच परिणाम झालेला आहे! ही संस्था म्हणजें अक्षरशः मला गुरुकुलच लाभले! विविध प्रकारचे बरे वाईट अनुभव आले. अनेक तरूण विद्यार्थ्यांशीं मला समरस होता आले. विद्यार्थि जीवनाचा अगदी जवळून असा अभ्यास करता आला. याच काळांत मी माझें आयुष्यही समृद्ध करूं शकलो. एरवी माझ्या इतपत वैद्यकीय ज्ञानाच्या माणसास जी संधी मिळाली नसती ती मला मिळाली. शस्त्रक्रियेच्या बालवर्गात तरी मला प्रवेश मिळवता आला. अनुभवाचीही मोठी भर पडली. सुरवातीच्या काळांतील चुकांची परमावधी, पण वडीलधाऱ्या माणसांचे मार्गदर्शन नि आपुलकी, यामुळें दररोज एकप्रकारे नवीन शिक्षण मिळत गेले. हे मला सहजरीत्या मिळवून देणाऱ्या आर्यांग्ल वैद्यक विद्यालयाचें ऋण मला कधीही फेडता यावयाचें नाहीं!!

कार्यवाहाची जबाबदारी संभाळताना मी अनेकाना नाराज केले आहे. अनेकांशों कठोरपणानें वागलो आहे. अनेकांच्या गाठी भेटी घेऊन त्यांना त्रास दिला आहे. व इतकेही करून मला सहकार्य कधीच कमी पडलें नाहीं याबद्दल मी माझ्या सर्व सहकाऱ्यांचा अत्यंत ऋणी आहे. माझ्याबरोबर काम करणारे माझे सहकारी शिक्षक, संस्थेची नोकर मंडळी, कार्यकारी मंडळ व मॅनेजिंग कौन्सीलचे वेळोवेळचें सदस्य, माझा विस्तृत विखुरलेला माजी विद्यार्थि वर्ग व माझ्या येण्यापूर्वीचें संस्थेचें जुनें माजी विद्यार्थी या फार मोठी मदत केली म्हणूनच हो कार्यवाहाची मला पार पाडतां आली. आज ही जबाबदारी करताना मी सर्वांचें मनःपूर्वक आभार मानतो!

कार्यवाह म्हणून मी निवृत्त होत असलो तरी शिक्षक म्हणून मी अजूनही कार्य करीत राहाणार त्यामुळें संस्थेशीं माझा संबंध अजूनही आहेच! मात्र वर अधिकारी कार्यकर्ते जेवढी जबाबदारी तेवढी आपल्या मगदुराप्रमाणें मनापासून पार पाडीत येवढेंच माझें ध्येय राहील!

आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय व रुग्णालय आदि चालविताना जनतेनें मला जे सहाय्य केले ते वाढत्या प्रमाणांत दिले जावें अशी माझी विनंति आहे. व्याप फार मोठा झाला आहे. आता हें कार्य एका राहिले नाहीं. अनंत हस्तांनीं ही गाडी ओढली गेली कार्यवाहाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या डॉ. कोल्हट रा. जाजू वकील यांच्या पाठीशीं सातारा शहरवा सदैव राहून त्याना हरएक प्रकारची मदत दिली म्हण 'संस्था साताराचें मानस्थान बनेल यांत शंका वाटत नाही!

शेवटीं पुन्हा एकदा सर्व सहकाऱ्यांचें व जनतेनें मानून अत्यंत समाधानीं वृत्तींत मी आपला सर्वांचा घेत आहे.

वि. ल. आगाशे

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय
अशा शक्तिशाली
अरविंद आयुर्वेदिक इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी क व यश मिळवा. शक्ति व शुद्धता याबद्द पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—
सचित्र आयुर्वेदीक इंजेक्शन चिकित्सा—
मूल्य २ रु. पोस्ट खर्च १० आ.
व्यवस्थापकः—अरविंद केमिकल वर्क्स
छिंदवाडा (सी. पी.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राठवाड्याचे विविध दर्शन

ले:–ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद

मराठवाड्यांतील अर्कशालेचे विक्रेते व वैद्य यांना त्यांचा समक्ष परिचय करून घेण्याकरिता व अर्कज्या विक्रीक्षेत्राच्या दृष्टीनें त्या प्रदेशाची पाहाणी करितां मी आणि अर्कशालेचे सेल्स आर्गनायझर . ना. श्री. पाध्ये दि. २५ जून पासून दि. १० र्यंत मराठवाड्याच्या दौऱ्यावर होतो. या दौऱ्यांतले नुभव आणि निरीक्षण ही आयुर्मीमांसेच्या वाचकांना वनीय वाटतील अशीं अपेक्षा आहे.

लीस कारवाईनंतर रंग पालटला

मराठवाडा हा महाराष्ट्राचा मूळ गाभा, मराठी संतांचें हेरघर आणि तीर्थक्षेत्रांची भूमी म्हणून मराठवाड्याविषयीं आपल्याला आत्मीयता वाटते. नैसर्गिक सीमारेषावर जकीय सीमाक्षेत्रांनीं मात केल्यामुळें हा भाग महाराष्ट्रापासून अलग झालेला आहे. जुन्या निजामी राजवटींत या तांचा मराठी तोंडावळा बदलून टाकण्याचे दीर्घकाळ प्रयत्न करण्यांत आले. शिक्षण अुर्दूतून, राज्यकारभार र्दूतुन, रस्त्यावरच्या पाटचा, लोकांचे पेहराव, बाजारा बोली यावर अुर्दूची, मुसलमानी संस्कृतीची छाप! पोलीस ॲक्शननंतर हा रंग पालटला. बहुसंख्य मराठी वस्तीचा हा भाग, पण राजदरबारी आणि लोक व्यवहारांत मुस्लीम जमातीचें प्राबल्य असे. पोलिशी कारवाईनंतर या भागाचें मूळचें मराठी स्वरूप नव्या उमेदीनें प्रकट झालेलें आहे.

सर्वत्र मराठीकरण

शिक्षणांत मराठी माध्यम आलें. राज्यव्यवहार मराठीतून चालू झाला. इतकेच नव्हे तर सरकारी कार्यालयावरही मराठी–संस्कृत पाटचा लागल्या. डिस्ट्रिक्ट पोलीस ऑफीसवर 'जिल्हा अधीक्षक कार्यालय', कोर्टावर 'न्यायालय' सुपरिंटेंडेंटच्या ऐवजीं 'पर्यवेक्षक' असेंब्लीच्या ठिकाणीं 'विधानसभा' या कार्यालयांना मूळची उर्दू, अरबी नांवें कोणतीं होती याचा आतां मागमूसहि राहिलेला नाहीं. हैद्राबादमध्यें स्मॉलकॉजेस कोर्टावर 'लघुवाद न्यायालय' अशी पाटी लटकावलेली पाहून मला या संस्कृतीकरणाचे आश्चर्य आणि कौतुक वाटले. ऑफीस ऑफ दि बोर्ड ऑफ रेव्हिन्यू ऐवजी 'राजस्व मंडल' हे शब्द पाहिल्यानंतर सामान्य मराठी भाषिकाला अर्थासाठीं संस्कृत कोशच चाळायला हवा! रस्त्यावरच्या गांवनिदर्शक फलकावरील मूळचे उर्दू पुसून तेथें मराठी नामावळी झळकलेली पाहिल्यानंतर हा भाषिक कायापालट किती हिरीरीनें करण्यांत आला आहे हें ध्यानांत घ्यानांत येतें.

मराठी शिक्षकांची वाण

सरकारनें प्रदेशभाषांना मूळचें स्थान प्राप्त करून दिलें त्याबरोबर लोकही अुत्साहानें पुढे सरसावलेले आहेत. शिक्षणसंस्था अुभारल्या जात आहेत, त्यासाठीं निधी गोळा होत आहे, जुन्या इमारती खरीदल्या जात आहेत, नवीन उभारल्या जात आहेत. पण स्थानिक शिक्षकांना मराठींतून शिक्षण देणें अडचणीचे वाटू लागले आहे. क्रमिक पुस्तकें मराठी आली त्याबरोबरच भूमिती, नागरिक शास्त्र इ. निराळे विषयहि आले. पदार्थ–विज्ञान आणि रसायन शास्त्र यांची मराठी परिभाषा उर्दूतून शिक्षण घेतलेल्या मूळच्या शिक्षकांच्या पचनी पडत नाही. मराठवाडयांत मराठींतून शिक्षण देणाऱ्या प्राथमिक आणि दुय्यम शिक्षकांची वाण आहे! महाराष्ट्रांतील सुशिक्षित बेकारांना तेथें गुन्तविण्याचें मराठवाडयांतील नागरिकांनीं ठरविल्यास उभयतांचीहि सोय होईल.

वेरूळ–देवगिरी

निजामीं राजवटींत हौशीं प्रवाशांचीं पथकें हैद्राबाद राज्यांत किती जात असतील कोण जाणें? पण आता हें दळणवळण आढलें आहे. महाराष्ट्राच्या सीमेला लागून असलेल्या व वस्तुतः महाराष्ट्राचाच भाग असलेल्या या प्रदेशांत रसिकांना रिझवतील अशी कितीतरी सौंदर्यस्थळें आहेत. शाळा, कॉलेजातल्या तरुणांची सुट्टीच्या दिवसांत आणि व्यवसायिकांनी रजेच्या काळांत वेरूळ दौलताबादची ट्रीप जरूर काढावी, मनमाडहून हैद्राबादला जाणाऱ्या रेल्वेनें औरंगाबादला उतरले कीं तेथून एका दिवसांत सह। प्रेक्षणीय स्थळें पाहून होतात. औरंगाबाद हें सुभ्याचे शहर आहे. कॉंक्रीटचे रस्ते, उस्मान पुऱ्यासारखी नवी वसाहत, गजबजलेली व्यापारपेठ आणि वाढती लोकवस्ती यामुळें औरंगाबादला आधुनिक शहरानें स्वरूप आलें आहे. तुम्ही श्रीमंत असाल तर स्टेट हॉटेलसारखे राजशाही हॉटेल आपल्या सेवेला तेथें सादर आहे. थोडक्या पैशांत ही ट्रिप आवरावयाची असेल तर गांवांत अनेक पथिकाश्रम आहेत. औरंगाबादहून प्रवासी मंडळीसाठीं वेरूळ देवगिरीकरिता टॅक्सीज मिळतात. टॅक्सीवाला सकाळपासून संध्याकाळपर्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवगिरी, वेरूळ, घृष्णेश्वर, खुलताबाद, बिबीका मुकबरा व पाणचक्की ही स्थळें तुम्हाला दाखवील. आणि टॅक्सीतल्या सहासात जणांकडून एकूण पंचवीस ते तीस रुपये घेईल. प्रत्येकीं पांच साडेपांच रुपयांत ही ट्रिप पार पडते. शिवाय हे पैसे निजामी चलनांत द्यावयाचे असतात. आपला एक रुपया म्हणजे निजामी चलनाचे सुमारे एक रुपया अडीच आणे ! औरंगाबादपासून सहासात मैलावर राजा रामदेवराव यादवाचा देवगिरी उर्फ दौलताबाद किल्ला आहे. प्रचंड तटांच्या रांगा, युद्धशास्त्राच्या दृष्टीचे उभारलेले अनेक मोर्चे, मूळची रचना लक्षांत येण्याइतपत राहिलेले हजार वर्षापूर्वीच्या इमारतीचे अवशेष, चारपाचशें वर्षे झाली तरी नुकताच बांधल्याप्रमाणें वाटणारा प्रचंड उंचीचा चांद मिनार, यादवकालीन लाकडावरील कोरीव काम, तोफा आणि मंदीरे, जनार्दन स्वामींची गुहेतली समाधी, अजूनही सुस्थित असलेला औरंगजेबाचा दरबार हॉल, महंमद तघलकानें दिल्लीहून आपल्या साम्राज्याची राजधानी दौलताबादेस आणल्या-नंतर किल्ल्याच्या व्यवस्थेंत घातलेली भर आणि किल्ल्याचा रेखीव विस्तार हें सर्व पाहिल्यानंतर खरीखुरी ऐतिहासिक वास्तु पाहिल्याचे समाधान लाभते.

देवगिरी उतरून आल्यावर टॅक्सी किल्ल्याला डावीकडे टाकून वेरूळकडे जाते. अर्ध्यापाऊण तासांत तुम्ही पहिल्या लेण्याच्या पायथ्याशीं जाल. प्रचंड खडक फोडून त्या एकसंध पहाडांत कोरलेली एकाहून एक विस्तीर्ण लेणी पाहतांना मन बुद्ध अशोकाच्या आणि चंद्रगुप्त शातवाहनाच्या काळांत भरारी मारते. लेण्यातलें प्रचंड विस्ताराचे एकमजली दोन मजली तीन मजली प्राकार भिंतीवर कोरलेलें रेखीव शिल्प आणि बुद्धांच्या प्रचंड मूर्ति मनाला स्तिमित करतात. बाहेरचा एकहि दगड न आणतां एकाच पहाडांत खोदलेलीं ती सभागृहे आणि शतकानुशतके एक भाव, एक मुद्रा, आणि एक आसन धारण करून उभ्या असलेल्या, आसनस्थ झालेल्या, त्या प्रचंड रेखीव मूर्ति पाहतांना त्या प्राचीन कलावंतांच्या सामर्थ्याबद्दल आश्चर्य आणि आदर यावाचून दुसरी भावना मनांत येत नाहीं.

बुद्ध लेण्यानंतर वैदिक संस्कृतीचे वैभव दर्शविणारी विशाल लेणी लागतात. त्यांतलें सोळावे कैलासलेणे म्हणजे शिल्पकलेचे महाकाव्य आहे. तीन्ही बाजूनीं तीन मजली प्रचंड सभागृहे, मधल्या चौकांतील उंचच उंच मंदिरे आणि दशावतार, शिव पार्वतीची विविध रूपे, रामायण महाभार-तांतील प्रसंग, पुराणांतील साकार दृश्ये, यांनीं सर्वत्र नटलेलें नेत्रवेधकच नव्हे तर मनोरम शिल्प म्हणजे [illegible]

शक्तीची अमर्याद क्रीडाच आहे. हे एक लेणें पाहिलें आपण कलेच्या सामर्थ्याचा साक्षात्कार घेतल्यासारखें चार सहा तासाच्या अवधींत पंधरावीस लेण्यांचें धावतें घेऊन बाहेर पडतांना आपलें मन तेथेंच रेंगाळत राहतें!

वेरूळजवळच थोडया अंतरावर घृष्णेश्वर हे ज्यो-लिंगाचे स्थान आहे. भाविकांना तेथें तीर्थाचें समाधान तर रसिकाना एक नमुनेदार हिंदु मंदिर पाहिल्यासारखे घृष्णेश्वरावरून औरंगाबादकडे परत येतांना खुलताबाद औरंगजेबाचे थडगे आहे. दख्खनमध्यें धुमाकूळ उडवि-या सम्राटाची समाधी पहातांना महाराष्ट्रीयाच्या मनांत विचारतरंग उमटतील. सम्राटाच्या थडग्या शेजारचे धिकारी फकीर बक्षिसासाठीं जेव्हां पैसे मागू लागतात हे पैसे तिथल्या धूपदीपासाठीं हवे आहेत असे ते सां- तेव्हां जगाच्या संपत्तीवर एकेकाळी अधिकार लागणाऱ्या आलमगिराची आठवण येऊन कालाय तस्मैन्नमः असे म्ह- वाटते.

औरंगाबादच्या सीमेवर टॅक्सी येऊन पोहोचली ताजमहालची आठवण देणारे मुकबऱ्याचे मिनार दिसू लाग- औरंगजेबाच्या एका बेगमेचे हे थडगे आहे. पण आग्र- ताजमहाल जणू उचलून आणावा अशी या मुकबऱ्याची र- आहे. अगदीं तसेच मिनार, तसलाच घुमट, तीच झाडे आणि कारंजी ! तीनशे साडेतीनशे वर्षांपूर्वीच्या इमारतीसाठीं वापरलेला चुना आणि त्यावरली बर्फासारखी शुभ्र आणि काचेसारखी गुळगुळींत आहे. बऱ्याचे छायाचित्र आणि ताजमहालचे छायाचित्र ठिकाणें न पाहिलेल्याला दाखवलें तर त्यांत त्याला वेगळेपणा सांगता येणार नाहीं एवढें हें साम्य आहे.

औरंगाबाद शहरांत शिरतांना पाणचक्की निळया पाण्याचा सुंदर तलाव, त्या तलावांत उंचीं पडणारे पाणी आणि त्या पाण्याच्या वर्षावाचा उपयोग चालणारी पिठाची चक्की अशी येथें योजना आहे. सुंदर बाग आहे, तांबडया दगडांची रेखीव मशीद आहे. लोकांना संध्याकाळीं येऊन बसण्यासाठीं मोकळया आहेत. वेरूळ, दौलताबाद, औरंगाबादखेरीज अधिक असेल तर परळी वैजनाथ, नांदेडचे गुरुद्वार, औंढया नाग- आंबे जोगाई यासारखी अनेक तीर्थे आणि प्रेक्षणीय मराठवाडयांत आहेत.

सुशिक्षित वैद्य डॉक्टरांचे दुर्भिक्ष

मराठवाडयांत पेनिसिलीन, स्ट्रेप्टोमायसीन [illegible] आयसिडीन आली, पण पदवीधर डॉक्टर किंवा वैद्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...र तेथें अभाव आहे. परभणीसारख्या जिल्ह्याच्या गांवी ...के डॉक्टर वैद्य असल्याचे आम्हाला कळलें. जालना नांदेड, ...गाबाद यासारख्या सत्तर ऐंशी हजार वस्तीच्या गांवी ...लिफाइड वैद्य किंवा डॉक्टर अद्यापहि हाताच्या बोटा- ...मोजण्याइतकेंच आहेत ! महाराष्ट्रांत रोग्यांची वाट ...त ताटकळणाऱ्या अनेक पदवीधर वैद्य डॉक्टरांना मराठ- ...ड्यांत भरपूर क्षेत्र आहे. गांधीवधानंतरच्या जाळपोळींत ...ान झालेले कोल्हापूरकडील एक वैद्य गेली दोन वर्षे ...ड येथे स्थायिक झालेले आहेत. ते साताऱ्याच्या संस्थेचे ...ी विद्यार्थी. इकडील व्यावसायिक अनुभव उत्तम असल्याचा ...प्राय त्यांनीं व्यक्त केला.

...वैद्य आणि विद्वान वैद्य

महाविद्यालयांत शिक्षण किंवा विश्वविद्यालयांची पदवी ...ा अभाव असला तरी कांहीं अत्यंत यशस्वी वैद्य पाह- ...ण्याचा आम्हाला योग आला. अुमरी या लहानशा गांवीं ...सेवा करीत असलेल्या श्री. भगवानराव खिस्ती यांना वैद्य उपपदापेक्षां मी संत हीच पदवी देईन. गोणपाटाच्या आसनावर रोग्यांच्या कोंडाळ्यांत सदैव वेढले गेलेले हे वैद्य आपल्या उपचाराबद्दल रोग्यांकडून कसलाहि मोबदला घेत नाहींत. त्यांच्याकडे दवाखान्याचा कसलाच थाट नाहीं. पण दररोज शेकडो रोग्यांची रीघ तेथे लागलेली असते. प्रत्येकाला त्याच्या आर्थिक कुवतीप्रमाणें ते औषध योजना लिहून देतात, पथ्यपाणी सांगतात आणि संतानें आर्ताचा परामर्श घ्यावा तसा त्यांना दिलासा देतात. रोग्यांची आणि जनतेची त्यांच्यावर अलोट श्रद्धा आहे. निष्काम वृत्ति, हा व्यवसाय म्हणजे जणू परमेश्वराचीच सेवा आहे ही भावना आणि रोग्याच्या श्रद्धेची मिळालेली जोड यामुळेंच त्याच्या उपचाराला अपूर्व यश येंत असावे. औषधोपचारापेक्षा त्यांची वैद्यकी म्हणजे मानसोपचारच होय. निर्लोभ, निर्व्याज आणि लोकसेवासक्त अशा या वैद्यराजांकडे पाहिल्यानंतर त्रिविध तापाचा क्षय करणाऱ्या संताचीच आठवण न झाली तरच नवल !

विद्वत्ता आणि निर्लोभी सेवावृत्ती या दोहोंचाहि संगम असलेले विद्वान वैद्य म्हणून ज्यांचा उल्लेख करतां येईल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे हैद्राबादचे वैद्यराज मुकुंदाचार्य जहागिरदार हे होत. आचार्यांनीं सोळा वर्षे काशी येथें राहून प्राचीन शास्त्राचे अध्ययन केलेले आहे. गीर्वाणगंगा त्यांच्या वाणीतून सदैव स्रवत आहे. तर्क, न्याय वेदांत व्याकरण, आणि शेवटी आयुर्वेद या सर्व प्राचीन शास्त्रांचा आचार्यांचा व्यासंग स्पृहणीय आहे. त्यांच्याशी बोलत असताना संस्कृत काव्य, व्याकरण, तर्क यातले दृष्टांत आणि प्राचीन वाङ्मय यांतले रुचिर संदर्भ वाक्यागणीक त्यांच्या भाषणांतून सहजोद्‌गारासारखे बाहेर पडत होते. आचार्यांना शास्त्रे मुखोद्‌गत आहेतच पण शास्त्रार्थाकडे पाहण्याची अंतदृष्टी आणि नव्या संशोधनाचे बौद्धिक सामर्थ्य हेंहि त्याना लाभलेले आहे. वैद्यकीय व्यवसायाकडे ते आर्तपरित्राण या भावनेंनेच पहातात. त्यामुळें त्यांच्या व्यक्तित्वाप्रमाणेंच त्यांच्या व्यवसायालाहि अध्यात्मिक बैठक लाभलेली आहे.

जालन्याचे वैद्य नागोरावजी पत्की यांचे मराठवाड्यांतील वैद्य वर्गात विशेष स्थान आहे. हैद्राबाद राज्यामध्यें आयुर्वेदाचा प्रसार व विकास व्हावा या दृष्टीनें वैद्य पत्की यांनीं परिश्रम केलें आहेत. ते स्वतः वैद्यभूषण हिर्लेकरशास्त्री यांचे विद्यार्थी शिक्षण दानाची हिर्लेकरांची परंपरा त्यांनीं पुढें चालविलेली असून श्री. पत्कींच्याकडे शिक्षण घेतलेले अनेक वैद्य मराठवाड्यांत मानानें व्यवसाय करीत आहेत.

हिंगोलीचे वैद्य रामराव साखळकर हे या परंपरेतले एक अत्यंत यशस्वी वैद्य आहेत. मनमोकळा स्वभाव, सेवावृत्ति आणि व्यवसायावरील निष्ठा यामुळें ते स्वतः लोकप्रिय झाले आहेत आणि आयुर्वेदालाहि त्यानी लोकप्रियता प्राप्त करून दिली आहे. त्यांच्यासारख्या तडफदार वैद्यामुळें मराठवाड्यातल्या आयुर्वेदाच्या भवितव्याबद्दल आशा वाटतें.

निरपेक्ष भावनेनें रोग्यांना वैद्यकीय सल्ला देणाऱ्या लोकसेवकांची परंपरा मराठवाड्यांत विशेषे करून आढळून आली. नांदेडचे श्री. माधवराव वकील आणि श्री काशीनाथराव गोरडे मास्तर यांचा या दृष्टीनें उल्लेख करावयास हवा.

मराठवाड्यांत देशी औषधें वापरण्याची परंपरा अद्याप प्रबळ आहे. हैद्राबाद राज्य सरकारनें या परंपरेचा प्रभाव अधिक प्रखर करावा अशी सूचना करावीशी वाटते.

महाविद्यालय वार्ता

— आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचें नवीन वर्ष जून पासून प्रतिवर्षाप्रमाणें सुरू होत आहेत.

— आयुर्वेदीय स्टेट फॅकल्टीच्या आदेशाप्रमाणे १९५२ पासून आयुर्वेदीय शिक्षणक्रमांत आमूलाग्र बदल असून नव्या नियमाप्रमाणें हा शिक्षणक्रम सुरू करणें पडलें आहे. मुम्बई प्रांतांतील आयुर्वेदीय शिक्षण सर्वच नियंत्रण मुम्बई सरकारच्या कायद्यान्वयें स्टेट फॅकल्टीकडे दिले गेलें असल्यामुळें शिक्षण यापुढें त्यांच्या आदेशानुरुपच आपलें कार्य करीत रहावे आहे. नवा शिक्षणक्रम व त्यामुळें उद्‌भवणारी परि यांहीं संस्थेच्या जीवनांत निर्माण झालेली आहेच. पण हा विषय चर्चेच्या कक्षेबाहेर गेला आहे.

— आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयानेंही अत्यंत प्र परिस्थितींत नवा शिक्षणक्रम सुरू करण्याचे धारिष्ट केलें कार्यकर्त्यांची चिकाटी, संस्थेच्या गेल्या ३८।३९ व प्रदीर्घ काळांतील कार्याची पुण्याई व जनतेचा पाठिंबा जि प्रमाणांत मिळत राहील तितक्या प्रमाणांत भवि आशादायी राहील असा विश्वास वाटतो.

— नव्या शिक्षण क्रमाकरतां इंटर सायन्स होण्याची सक्ती आहे. या संस्थेंत २४।२५ आवेदनपत्रें होती पैकी १८ विद्यार्थी दाखल झाले आहेत.

नवे वर्ष नवे प्रश्न

—गेल्या मार्च मध्ये (३१ मार्च अखेर) होणाऱ्या वर्षात सरकारकडून मिळणारी इमारती दैनंदित खर्चाची देणगी अनपेक्षित रीत्या हाती न आ संस्थेच्या संकटांत भरच पडली ! सरकारनें ऐन या देणग्या बंद केल्या असा पुष्कळांचा समज झाला तो चुकीचा आहे ! सरकारनें देणग्या बंद केल्या नाहींत त्या बंद करण्याचा त्यांचा विचारही नाहीं. फक्त देतांना जी पद्धति आजपर्यंत स्वीकारली जात होती बदलून अगदीं नवी पद्धति स्वीकारली गेली व या पद्ध अवलंब सरकार करणार आहे ही कल्पना संस्था चा पूर्वी दिली गेली नाहीं, त्यामुळें ओढाताणीनें जीवन संस्थावर हा आघात झाला व त्यातून कसें निभावून ही समस्या चालकांच्यापुढें उभी राहिली.

फॅकल्टीनें नवा शिक्षणक्रम सुरू करण्याचा त्याकरतां ज्या उपकरणांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...लागणार आहे त्यापैकीं संस्थांनीं आपआपल्या उणिवा ...रिण्याविषयी फॅकल्टीनें आदेश दिलें होते. संस्था प्रमुखांनीं ...सभाहि घेतलीं होती. त्यावेळीं असें लिहून आलें कि, ...शिक्षणक्रमाची तयारी करावयास किमान ५०,००० ...तरी प्रत्येक संस्थेला खर्चावे लागणार होते! फॅकल्टीनें ...देणगीची पूर्तता करण्यांकरता सरकारकडें मागणी केली ...पण सरकार ही जबाबदारी आजच घ्यावयास तयार ...की नाहीं हें अनिश्चितच होत. १९५२ जून पासून ...क्रम तर सुरूं होणारच, तेंव्हा ही एक दुसरी मोठीच ...चालकांच्या पुढें राहिली !

पंचवार्षिक निवडणुकीं होऊन ठिक ठिकाणचें निकाल ...होत होते. त्यामुळें साहजिकच जुनें मंत्रिमंडळ नव्या ...हातीं घेत नव्हते! नवे मंत्री अधिकारावर यावयाचे ... त्यामुळें एकप्रकारची अनिश्चित व अधांतरी स्थिति ...ण झाली होती. नवा शिक्षणक्रम सुरु करावा का इथेच ...म घ्यावा या प्रश्नाचें उत्तर मिळेना! त्यामुळें साधारणतः ...मे महिन्यांत नव्या वर्षाची जी तयारी करावी लागते स्थगितच होती!! मे १४ पर्यंत अधांतरी नि अनिश्चित स्थितींत काळ गेला ! शेवटीं मंत्रिमंडळ अधिकारावर आले ! आरोग्य खाते ऑ. श्रीयुत ...लाल शहा यांच्याकडे सुपूर्त केले गेले. त्यांच्याकडे ...ची बाजू विषद करणारें पत्रक पाठवलें व त्यांची भेट ...ही चर्चाही केली गेली. या चर्चेतून कांहीं सुपरिणाम ...असा विश्वास निर्माण झाल्यामुळेंच संस्थेचें कार्य पूर्व- ...चालूं ठेवण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनीं घेतला.

हा निर्णय घेताना आर्थिक दृष्ट्या भविष्य काळ अजून ...धांतरीच आहे. पण दैनंदिन कार्याचा गाडा ओढणाऱ्या ...शिक्षक मंडळींनीं नि सहकाऱ्यांनीं पूर्वीप्रमाणेच काम ...लू ठेवण्याचें एक दिलानें ठरवल्यामुळें हा निर्णय घेता ...! नव्या शिक्षण क्रमांत अंतर्भूत असणाऱ्या सर्व जबाब- ...पार पाडणें बरेच कठीण आहे. तरीही हा शिक्षणक्रम ...करून " प्रयोग " करण्याचा संस्थेचा विचार आहे.

"एप्रील मे जून" या गेल्या तीन महिन्यांत संस्थेपुढें ...समस्या निर्माण झाल्या व जी दारूण परिस्थिति उद्भवली ...ला सार्वजनिक कार्य करणाऱ्यांच्या जीवनांत कोणते स्थान ...हा प्रश्नच आहे ! पण यातूनही मार्ग निश्चत आहेत व ...ही दिवस जातील व प्रकाश दिसू लागून भविष्य आशा- ...यी होईल " या आधारावर कार्यकर्त्यांना नवा उत्साह ...र्माण करावा लागला आहे.

अभिनंदन

फॅकल्टीच्या वार्षिक परीक्षा एप्रील मे मध्यें पुण्या होऊन ...न ४ ला निकाल जाहीर झाले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्था अभिनंदन करीत आहे. निकाल इतरत्र दिले आहेत. ज्यांनीं परीक्षेंत यश मिळवून या संस्थेतर्फे बसलेल्या विद्यार्थ्यांत प्रथमांक द्वितीयांक मिळवले त्यांचे संस्था कौतुक करीत आहे. या यशानें त्यांचे जीवन तर समृद्ध होतेच पण त्याबरोबरच संस्थेचा लौकिक वाढविण्याचें श्रेयही ते मिळवीत आहेत !

जून १९५२ पासून येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षणाची सुरवात झाली आहे. येथील लोकप्रिय सिव्हिल सर्जन डॉ. नाडकर्णी हे विद्यार्थ्यांना मार्ग-दर्शन करीत असून ऑनररी फिजिशिअन् डॉ. बिलमपल्ली व ऑ. सर्जन डॉ. मालशे यांच्या मार्गदर्शनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळत आहे.

नवे वर्ग नियमितपणें सुरूं झाले असून, अभ्यासाचें वातावरणही निर्माण झालें आहे. प्राध्यापक वर्गांत फारसा बदल झालेला नाहीं. तरी श्री. डॉ. मथुताई आठल्ये प्रसुति-शास्त्र शिकवूं लागल्या आहेत व डॉ. एन. आर. आपटे यांनीं पुनरपि अध्यापनास सुरवात केली आहे. नवे वर्ग सुरु झाल्या-नंतर विद्यार्थि वर्गातील गडबड उडविणारी घटना म्हणजे " जिमखाना निवडणुकी ". यंदा बऱ्याच जागा अविरोध निवडल्या गेल्या. तरी एकंदरींत जागांच्या निवडणुकी मोठ्या चुरशीच्या झाल्या !! भारतीयाना आतां यापुढें निवडणूक तंत्र चांगलेच आत्मसात करावयाचें आहे. त्या दृष्टीनें ही चुरस अभिनंदनीय होय. अर्थात् निवडणुकी संपल्यावर या दंगलीचें काव्य मात्र राहता उपयोगी नाहीं नि खऱ्या लोकशाही मनःप्रवृत्तीची वाढ होणें हेंच इष्ट होय ! विविध खात्यांचे मंत्री पुढीलप्रमाणे होत—

वि. शा. मं. आ. वै. म. वि. सातारा

अध्यक्ष—प्रि. मे. ना. जोग एम. बी.बी. एस.
कार्याध्यक्ष—डॉ. पां. के. कोल्हटकर एल.सी.पी, एस.
प्रमुख कार्यवाह—श्री. दा. पां. पलंगे
वादसंवाद मंत्री—श्री. श्री. द. जळूकर
क्रीडा मंत्री—श्री. व भा. कुलकर्णी
वाचनालय मंत्री—श्री. भी. नाडपुरोहित
अभ्यास मंत्री—श्री. ज. द. थत्ते

वर्गप्रतिनिधी—
वर्ष ३ रे—श्री. प्र. ग. भावे
वर्ष ३ रे—श्री. ना. पां. डांगे
वर्ष १ ले—(G.F. A.M.) श्री. भू. आ. लांडे

नवे कार्यवाह

आयुर्वेद प्रसारक मंडळीच्या अधिकारी वर्गांतही अल्पसा फेरबदल गेल्या जूनपासून केला गेला आहे. गेल्या अनेक अनेक वर्षे कार्यवाहाची जबाबदारी वाहणारे डॉ. वि. ल. आगाशे हे त्या जबाबदारीतुन मुक्त झाले आहेत व ही जबा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बदारी प्रामुख्यानें डॉ. पां. के. कोल्हटकर यांनी शिरावर घेतली डॉ. कोल्हटकर यांच्या जोडीला येथील एक उत्साही सार्वजनिक कार्याची तळमळ असणारें रा. ल. आ जाजू वकील यांचीही सहकार्यवाह म्हणून योजना झालेली आहे. या संस्थेच्या कार्यांत जाजू वकील आजपर्यंत भाग घेत होतेच. गरीब व मध्यम वर्गीय रुग्णांच्या औषधोपचारार्थ या संस्थेच्या रुग्णालयाकडून त्यांची फार मोठी अपेक्षा प्रथमपासूनच होती. आज ते ही कार्यधुरा आपल्याकडे प्रत्यक्ष घेऊन प्रयत्न करीत आहेत. उभय कार्यवाहांची कार्यनिष्ठा, सार्वजनिक कार्याची स्वयंभू वृत्ति व त्यागाची जोड यामुळें संस्थेचें भवितव्य खात्रीनें उज्वल आहे असा विश्वास वाटतो. शिक्षण विभागाचें भवितव्य ठरविण्याचें कार्यकर्त्यांच्या हातीच नसल्यामुळें त्यांना या विभागापुरते तरी सरकार, फॅकल्टी यांच्या धोरणावर चालावें लागणार आहे. पण रुग्णालय कार्याबाबत या उभय कार्यवाहांच्या हातीं संस्था यशाचा पल्ला खात्रीनें गाठूं शकेल.

अशा रीतीनें संस्थेच्या कार्य-धोरणांत एक नवे पान उघडले जात आहे. कोणत्याही सार्वजनिक कार्यात अशा-रीतीनें नव्या धोरणाचा आविष्कार कांहीं ठराविक कालमर्यादेनंतर सक्तीनें होत राहणे अवश्य आहे. म्हणजे कार्यांत जिवंतपणा व नाविन्य निर्माण होऊन जीर्णताही कमी होत जाईल.

नियामक मंडळांत येथील वे.ई.ला इ.कंपनीचे एक प्रमुख कार्यकर्ते रा. शि. गो. उर्फ राजाभाऊ भावे बी. ए. एल्. एल्. बी. वकील यांचीही नव्यानें नियुक्ति झाली आहे. या संस्थेचे हें भाग्य होय कि रा. भावे यांचे लक्ष या संस्थेच्या कार्याकडें वळावे.! संस्थें पुढें दिग्मूढ करणाऱ्या ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत. व ज्यामुळें संस्थेच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. अशा वेळीं रा. भावे हें पुढें आले व त्यांनी चालकाना धीर देऊन एक प्रकारें अंधकारांत प्रकाशच निर्माण केला! रा. जाजू वकील व रा. भावे यांचा दुर्दम्य आशावाद व प्रयत्नांची रेखीव मांडणी यामुळें संस्थेचे वातावरण जणु कांहीं उजाळले आहे!! या त्यांच्या खटपटीचे लवकरच दृश्य स्वरूप दिसूं लागेल असे वाटते!

या गोंधळाच्या परिस्थितींत आयुर्विद्या वैद्यक महाविद्यालयाचे भवितव्य धोक्यांत असलेले दिसत असतानाही धीरानें स्थिर राहून आपल्या जागीं कर्तव्य पार पाडीत राहाणारे महाविद्यालयाचे प्रिन्सिपॉल डॉ. मे. ना. जोग यांची ही संस्था ऋणी आहे इतर कोणाही कच्च्या दिलाच्या माणसास हें साधलें नसते. डॉ. मे. ना. जोग, डॉ. पां. के. कोल्हटकर नि नि. रा. ल. आ. ऊर्फ बाबूराव जाजू या त्रिमूर्तीच्या मार्गदर्शनानें यापुढील वाटा प्रकाशमय होतील याबद्दल शंका वाटत नाहीं.

एप्रिल १९५२ फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक ॲंड यु... टिब्बी सिस्टिम्स ऑफ मेडिसिन यांचेतर्फे झालेल्या वर्ष १ लें, २ रें, ३ रें, ४ थें या परिक्षांचे निकालपत्रक

वर्ष १ लें

१ अ. रा. अष्टेकर, २ त्रि. वि. बापट, ३ ने. भोमाज, ४ भ. म. चौगुले, ५ ना. पां. डांगे, ६ द. देशपांडे, ७ शां. फु. गांधी, ८ पा. ए. गवसणे, ९ रा. जोशी, १० कृ. बा. कांचनकोटी, ११ ग. चिं. कोल्ह... १२ कु. तारामती दत्तात्रय लुब्री, १३ चं. भी. मण... १४ रा. द. मेहता, १५ हि. के. मेथा, १६ प्रे. के. ... १७ ना. भी. नाडपुरोहित, १८ म. शि. ओझर्डे, १९ रा. पाठक, २० का. स. पाटील, २१ अ. भा. फडके, २२ वि. फडके, २३ पां. ग. रानभरे, २४ ध. न. ... २५ पां. व्यं. उचगांवकर.

वर्ष पहिलेंमध्ये विद्यार्थी श्री ना. पां. डांगे हे ... आले. त्यांना श्री. व्यंकटराव घोरपडे स्कॉलरशिप दरम... देण्यांत आली. व दुसरे विद्यार्थी श्री. मा. शि. ओझर्डे दुसरे आले. त्यांना कै. काळे शिष्यवृत्ति देण्यांत आली.

वर्ष दुसरें

१ अभ्यंकर श्री. मा. २ आफळे दि. वि. ३ ... ना. श्री. ४ भावे प्र. ग. ५ देशपांडे ना. ह. ६ दे... श्री. द. ७ जळूकर श्री. द. ८ कानडे मो. गो. ९ ... पु. ना. १० कुलकर्णी व. भा. ११ कु. मारवाडी गो... जी. १२ १३ राजपुरोहित कृ. रा. १४ शेंडे ना. ... थत्ते ज. द.

१ द्वितीय वर्षांत विद्यार्थी श्री. ज. द. थत्ते हे ... आले. त्यांना कै. रा. ब. साने शिष्यवृत्ती देण्यांत आली.

२ द्वितीय वर्षात श्री. द. जळूकर यांना (द्रव्य... पहिले आल्याबद्दल) श्रीमती रखमाबाई कानिटकर ... वृत्ती देण्यांत आली.

३ द्वितीय वर्षात कु. गोदावरी जीवराज मा... यांना श्रीमती सरस्वतीबाई पतके स्कॉलरशिप देण्यांत आली.

वर्ष तिसरे

१ बर्वे य. म. २ दातार मा. रा. ३ गोरे ह. ४ गुजर का. गु. ५ साने श्री. द. ६ वर्धमाने अ. म.

वर्ष तीसरेंमधे पहिले आल्याबद्दल विद्यार्थी श्री. ह. गोरे यांना कै. रा. ब. साने शिष्यवृत्ती देण्यांत आली.

वर्ष ४ थें

१ गेदाम पुं. दौ. २ कु. जोशी इंदुमती रा. ३ ... कर. न. द. ४ खटावकर प्र. अ. ५ कुलकर्णी भा. ... कुलकर्णी ग. शं. ७ मसूरकर अ. वि. ८ परांजपे द... ९ सायगांवकर श्री. बा. १० सौ. शहा प्रभावती कांति...

वर्ष चवथेंमध्यें विद्यार्थी श्री. ब. द. खाडील... पहिले आले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रवाहिकेंत पर्पटीचा उपयोग

ले:- गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य.

शुद्ध पारा व गंधक यांची कज्जली करुन विधिपूर्वक ...ची केलेली *रसपर्पटी*, अतिसार व प्रवाहिका या ...रांत पुष्कळ वेळा, वैद्यकीय व्यवसायांत वापरली जाते. ...र्पटी, आंत्र, पक्वाशय यावर व यांतील द्रव्यांवर कार्य ...ते. रसपर्पटी कृमिघ्न आहे. त्याचप्रमाणें अग्निमांद्याचा ...णाम म्हणून आंत्रांतील अन्नाचें पचन नीट व्यवस्थित ...झाल्यामुळें ते अन्न सडते, कुजते, आंबूस होते. त्याचा विकृत ...म होतो. या आमामुळें ग्रहणी व पक्वाशय यांतील दोषांचा ...ष होऊन अतिसार व प्रवाहिका हे रोग निर्माण होतात. ...सर्व विकृती आमपाचन क्रियेनें कमी करुन स्वास्थ्यसंरक्षण ...णाऱ्या द्रव्यापैकीं रसपर्पटी ही एक श्रेष्ठ आहे. निदान ...रिवर्जन करून या पर्पटीचा उपयोग केला तर चांगला ...योग दिसतो. आंत्रांतील अन्नरस ग्रहण करण्याची ग्रहणी-शक्ती या पर्पटीने वाढते. शिवाय आंत्रांत पाझरणारा ...चा व कफाचा स्राव लवकर कमी होतो.

शिवाय रसपर्पटी योगवाही आहे. ती ज्या द्रव्यांशी मिश्र ...रावी त्या द्रव्याचे गुणकर्म अधिक प्रमाणांत वाढविते. त्यामुळें ...या द्रव्यांची अल्पमात्रा असली तरी ती अधिक कार्यकारीं ...ठते. प्रवाहिकेंत नुसता कुडा किंवा बालबिल्व, किंवा त्याचा ...घनार्क पुष्कळ प्रमाणांत वापरावा लागतों. व शिवाय त्याने लवकर ...कार्य होईलच असें नाहीं. यांचे जोडीला पर्पटी दिली म्हणजे ...ांचे थोंडकें प्रमाण पुरतें. व तें चांगले कार्य करिते. हा योग-वाही गुण रसपर्पटींत चांगला नजरेस येतो. गेल्या उन्हाळयांत ...अतिसार प्रवाहिकेचे बरेच रोगी आढळले. त्यापैकीं बाह्य ...रुग्णविभागातील प्रवाहिकेचे उदारहणादाखल तीन रोगी पुढें ...त आहे. त्यावरून रसपर्पटीचे हे गुंण दिसून येतील. ...रोगी स्त्री, विवाहित वय वर्षे २५ पोटांत मुरडा होवून शौचा-...टे आंव पडतें ह्या तक्रारी घेऊन आलीं. ता. ४-५-५२. ...तीन दिवसापूर्वी प्रथम तीन चार वेळा पातळ शौचास झाली. ...नंतर दुसरे दिवसापासून पोटांत कळ अथवा मुरडा येवून ...बारंवार शौचास होते.

शरीराचे उष्णतामान ९८ (डिग्री फॅ.) अंशापर्यंत ...होते. नाडीची गति दरमिनिटांस ८८ होती. श्वासोश्वास प्राकृत होते. पोटांत नाभीचे खालीं डावे बाजूस दाबले असतां दुखलें. जीभ पांढरट होती. क्षुधा नव्हती.

औषधी योजना—

कुडा घनार्क ३ गुन्जा, बेल घनार्क ३ गुंजा, कनक सुन्दर १ गुन्ज, रसपर्पटी अर्धा गुन्ज अशा चार पुड्या मधांतून दर सहातासानीं घेण्यास दिल्या.

आहार— मुगाचे कट, यूष, ताक व सुंठ.

परिणाम—

या योजनेनें दुसरें दिवशीं, शौचास जाण्याच्या वेळा कमी झाल्या पण दर वेळीं आंव पडतच होती. तिसरें दिवशीं शौचास होण्याचे प्रमाण तीन चार वेळांवर आले. रोग्याला भूक लागून अन्न खाण्याची इच्छा निर्माण झाली. थोडा तूप, भात मुगाचे कढणाबरोबर खाण्यास परवानगी दिली. पांचव्या दिवशीं शौचास प्राकृतिक झाली. भूक लागू लागली. कळ कमी झाली. पुढें चार पांच दिवस पथ्यानें रहाण्यास सांगून औषध बंद केलें.

रुग्ण २

रोगी वय वर्षे १४ शालेय विद्यार्थी. पोटांत वारंवार कळ येतें. व कळ येऊन शौचास होते. शौचावाटे आंव व थोडें रक्त पडतें. ह्या तक्रारी घेवून आला. त्याला शंभर अंशापर्यंत ज्वर होता. नाडीची गती दर मिनिटास ९८ होती. श्वासोश्वास २२ होते. नाभीचें खाली, व विशेषत: डाव्या बाजूला (स्पर्शासहत्व) हातानें दाबले असतां दुखलें. जीभ पांढरट होती. भूक नव्हती. लघवीला थोडी होई व त्यावेळीं आग होई. तहान पुष्कळ होती.

औषधी योजना—

कुडयाची साल, बेलफळ, नागरमोथा, धने, बडिशेप, प्रत्येकीं तीन तीन मासे, पाणी दोन पावशेर घालून चतुर्थांश काढा करून तो दोन भागांत सकाळीं व सायंकाळीं थोडी साखर घालून घेण्यास सांगितला. शिवाय रसपर्पटी ½ गुन्ज शंखभस्म २ गुन्जा अशा दोन पुड्या दुपारीं एक व रात्रीं एक अशा मधांतून घेण्यास दिल्या.

आहार—

पहिले दिवशीं संपूर्ण लंघन घातले. वाळा, धने, सुन्ठ बडिशेप घालून शिजवून थंड केलेले पाणी वारंवार ज्यावेळी सहज ... सांगितले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिणाम—

दुसरे दिवशी ताप, वारंवार परसाकडे जाणें, आंव व रक्त पडणें या सर्व तक्रारी पूर्वी प्रमाणेंच चालूं होत्या. औषधी योजना—वरील काढा व पुड्या तशाच चालूंच ठेवल्या. तिसरे दिवशी रोग्याचा ज्वर ९८ होता. भूक लागली होती. शौचाला जाण्याच्या वेळा कमी झाल्या. पण थोडी आंव व रक्त पडतच होते.

औषधी योजना पूर्वीचींच चालूं ठेविली. आमसुले घालून केलेले मुगाचें कढण व ताजे ताक दोन वेळा घेण्यास सांगितले.

चवथे दिवशीं ज्वर कमी झाला. शौचाचे प्रमाण तीन चार वेळेंवर आले. आंव व रक्त पडणें थोडे कमी झाले.

औषधी योजना पूर्वी प्रमाणेंच चालू ठेविली. आहारांत थोडा तूप भात घेण्यास सांगितला.

पांचवे व सहावे दिवशीं सर्व तक्रारी कमी कमी होत गेल्या. सातवे दिवशीं काहींच तक्रारी उरल्या नाहींत. पथ्यानें राहण्यास सांगून औषध बंद केले.

रुग्ण ३

रोगी मुलगा वय वर्षे तीन अधिक वेळा शौचास होते. व शौचावाटें रक्त व आंव पडतें. या तक्रारीनें आणला गेला. मुलाची प्रकृती सुदृढ होती. त्याला ताप नव्हता. पोट चाचपून पाहता पोटांत कुठेच स्पर्शासहत्व लक्षण फारसे आढळलें नाहीं. यकृत–प्लीहा प्राकृत होती. जीभ जरा पांढरट होती. दांत आलेले होते. रक्त व आंव कालपासून पडत आहे याखेरीज कांहींच तक्रार त्याची नव्हती.

औषधी योजना—

बिल्व व कुडा घनार्क १।१ गुन्ज, रसपर्पटी १/४ गुन्ज मोचरस २ गुन्जा चूर्ण अशा सहा पुड्या दर चार चार तासाला एक पुडी याप्रमाणें तूप मधांतून त्याला घेण्यास दिल्या.

आहारांतील भात दूध, पोळी यांचें प्रमाण कमी केलें. फक्त कॉफी पाजण्यास सांगितले.

परिणाम—वरील योजनेनें दुसरेंच दिवशीं रक्त व आव पडण्याचे प्रमाण कमी झाले हीच चिकित्सा पुढे चार दिवस चालूं ठेविली. फक्त सहा पुड्यांचे प्रमाण पांच, चार तीन दोन, याप्रमाणें रोज कमी कमी करत आणले. या योजनेनें मुलाचीआंव व रक्त पडण्याची तक्रार लवकर कमी झाली. पुढे त्याला तूप, भात ही क्रमाक्रमानें देण्यास सांगितले.

नवा अविष्कार

स्त्री, पुरुष, बालक या सर्वांच्याकरिता

अत्युत्तम महौषधी

नवरत्नरस

★

हा हिरा माणिक मौतिक इ. नवरत्नें आणि सुवर्ण यांच्या संयोजनानें तयार करण्यांत आलेला कल्प आहे. शरीरस्थ रस, रक्त आदि सप्त धातूंचो शुद्धि, वृद्धि व पोषक. शुक्र, वीर्य यांची शुद्धी आणि पुष्टी करणें हे या ओषधाचें विशिष्ट कार्य आहे. तसेच यानें नपुंसकत्व, वीर्यस्राव, स्वप्नदोष इ. चें निर्मूलन होऊन नवयौवन प्राप्त होते. स्त्रियांच्या गर्भाशयशोध, प्रदर वारंवार होणारा गर्भपात, गर्भपतीच्या हातापायांवरील सूज व फिक्कटपणा यांवरहि गुणकारी आहे. वंध्यत्वाचा दोष दूर करणारी ही अपूर्व औषधी आहे, मूलांचे अस्थि-दौर्बल्य दूर करून अस्थि बलवान करणारे कॅलशियम व व्हिटॅमिनची उणीव, दुधाचे अपचन नष्ट करून बालकांना धष्टपुष्ट करणारे असे हे औषध आहे. क्षय, जीर्णज्वर, कास, श्वास मधुमेह, मानसिक दुर्बलता इत्यादि मध्येंही अतिशय उपयुक्त आहे.

नवरत्नरस—निरोगी लोकांकरिता रसायन व रोगी लोकांना आरोग्य प्राप्त करून देणारे हे महान औषध आहे.

एका बाटलीची किंमत पांच रुपये

ऊंझा फार्मसी लि. ऊंझा

(गुजराथ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाशिक जिल्हा वैद्य संमेलन

नाशिक जिल्हा वैद्य संमेलनाचे ३ रे अधिवेशन ...क येथें दिनांक ६-७-५२ रविवारी दुपारी ३॥ ...तां लोकसत्ता हॉल मध्यें भरले. सम्मेलनास मुंबई येथील ...सिद्ध वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी, वैद्यपंचानन, ग. म. ...कर, हकीम देवसिंग रामसिंग, श्रीमती लक्ष्मीबाई ...वणकर तसेच नाशिक येथील बिंदुमाधवशास्त्री पंडीत ...महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ, वैद्यरत्न विष्णुशास्त्री ...कर, वैद्य विष्णुशास्त्री दाते, वैं. शिवशंकर शास्त्री शौचे ...ग. न. लोखंडे, वैं. के. वि. मुळें, वै. वि. म. गोगटें, वैं. ...ल. रामय्या, वैद्य ल. भा. काळें तसेच जिल्ह्यातील ...म. के. देशपांडे वैं. द. वि. जोशी, सि. त्र्यं. मुळे, वैं. ...रं. जोशी, वैं. द. वि. गायधनी वैं. पु. प्रे. मारवाडी ...द. तो. सोमवशी वैं. व. ना. रानडे वगैरे मंडळी उपस्थित ...ती.

संमेलनाचे उद्घाटन करण्याकरितां व संमेलनास ...आशीर्वाद देण्याकरिता श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य ...कूर्तकोटी) यांना विनंती केली होती. त्यांचे आग-...मनंतर नाशिक येथील वैद्य द. के. हडपे यांनीं श्री ...तरीचे व स्वागतपर पद्याचे कर्णमधुर स्वरांत गायन ...ले.

वैद्य विष्णुशास्त्री दाते यांनीं श्रीना संमेलनास ...आशीर्वाद देण्यास व संमेलनाचे उद्घाटन करण्यास पुष्पहार ...घालून विनंति केली. श्रीनी आपले भाषणांत आयुर्वेदशास्त्र ...ज्ञानाला सोडून नाहीं, असें प्रतिपादन केले. त्या प्रमाणें ...भारतांतील अनेक शास्त्रे व कला पूर्व वैभवाच्या शिखरावर ...त्या त्यातील वैद्यकशास्त्र हे एक आहे. उपनिषदांत ...गलेला वैद्यकाचा श्रेष्ठ दर्जा आहे. तरी वैद्यांनीं आपले ...सत्व सोडू नये असे बजावून श्री धन्वन्तरीचे कृपेनें आयुर्वेद ...ला पूर्वीचा दर्जा प्राप्त करीलच असा आशीर्वाद देऊन ...यांनी आपले भाषण संपविले.

वैद्य विष्णुशास्त्री दाते यांनीं मंडळातर्फे श्रींचे आभार ...मानले.

संमेलनास आलेल्या संदेशापैकीं नामदार भा. स. हिरे ...नामदार शांतीलाल शहा, वैं. गं. वि. पुराणिक, वै. रा. स ...वेदपाठक, वैं. पु. वि. धामणकर, वैं. आण्णासाहेब सांडू ...वै. ब्रम्हदत्त शर्मा, वै. हिम्मतलाल मुनी, आमदार वसंतराव नाईक, वैं. जळूकरशास्त्री, वैं, हर्षे, वै. जंगले वगैरेंचे संदेश वैं. ग. म. लोखंडे यानीं वाचून दाखविले.

स्वागताध्यक्ष वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर यांनीं सर्वांचे स्वागत करून वैद्यराज ना. ह. जोशी यांना संमेलनाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. त्यास वैद्य विष्णुशास्त्री दाते, वैं. भि. के. देशपांडे, वैं. द. नि. जोशी यांनीं अनुमोदनें दिली. त्यानंतर अध्यक्ष स्थानापन्न झाले. त्यांना पुष्पहार अर्पण करण्यांत आला वैं. के. वि. मुळें मंत्री नाशिक जिल्हा वैद्य मंडळ यांनीं मागील अहवाल व जमाखर्च वाचून दाखविला व त्यास त्यासभेनें मंजुरी दिली. नंतर अध्यक्षांचे भाषण झाले, अध्यक्षांचे भाषणानंतर वैं. बिंदुमाधवशास्त्री पंडित, अध्यक्ष महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य मंडळ, वैद्य वे. बा. जोशी, वैं. लक्ष्मी बाई बोरवणकर, हकीम देवसिंग रामसिंग वै. वि. म. गोगटे वै. ग. म. अभ्यंकर यांना पुष्पहार घालून वैद्य विष्णुशास्त्री दाते यांनीं जिल्ह्यातर्फे सत्कार केला. नंतर खुले अधिवेशन सुरु झाले. त्यांत मुख्यत्वेकरून केवळ आयुर्वेदाचा म्हणजे शुद्धायुर्वेदाचाच अभ्यासक्रम सरकारनें आखावा; आयुर्वेदीय शिक्षणासाठी मंजूर केलेली रक्कम सरकारनें मिश्र शिक्षणाकरितां उपयोगात आणू नये. तर त्या रकमेचा विनियोग शुद्धायुर्वेदाचे शिक्षणाकरितांच करावा. केंद्र सरकारनें सुगंधी (औषधी करणां लागणारी) द्रव्यें व औषधी द्रव्यें यावर भारी कर ठेवला आहे, तो रद्द करुन वैद्याना व औषधी कारखानदाराना ही द्रव्यें स्वल्प दरांत पुरवावीत. सन १९३८ चे वैद्यक कायद्यांत आयुर्वेदाला पोषक अशा सुधारणा करण्यासाठी वैद्यांचीच समिती नेमावी. त्यांत वैद्येतरांचा समावेश नसावा. पराप्रांतातील रजिस्टर्ड वैद्याकडून रजिस्ट्रेशनची फी घेऊन सरकारनें त्याना रजिस्ट्रेशन द्यावे. सरकारनें आखलेल्या आयुर्वेदाचे अभ्यासक्रमाप्रमाणें ज्या विद्यार्थ्यांनीं गुरुगृही अगर विद्यालयांत शिक्षण घेतले असेल त्यांची परीक्षा घेऊन प्रत्यक्ष अनुभव रुग्ण चिकित्सेचा, औषधीकरणाचा, प्रसुती वगैरेचा घेतल्यावर त्यांना व्यवसाय करण्यांस सरकार मार्फत परवानगी द्यावी. तसेच वनस्पती संबंधी संवर्धन वगैरे ठराव एक मतानें मंजूर झाले. शेवटी विष्णूशास्त्री दाते यांनीं सर्वांचे आभार मानले. संमेलनाला जोडूनच मंडळानें प्रदर्शन ठेवले होते. त्याचे सर्व काम आयुर्वेद सेवा संघाचे कार्यकर्ते वैं. बिंदुमाधवशास्त्री पंडित, वै. वा. स. मराठे, वैं. शा. धों. कुलकर्णी, यांनीं अंगिकृत केले होते. प्रदर्शन आकर्षक व [illegible] होते. त्यांचेहि वैं. विष्णूशास्त्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाते, यांनीं आभार मानले. शेवटीं वै. के. वि. मुळे, मंत्री, नासिक जिल्हा वैद्य संघ यांनीं नाशिक शहर वैद्य मंडळानें हे संमेलन भरविलेबद्दल कार्यकारी मंडळाचे हार्दिक आभार मानून राष्ट्रगीत व कॉफीपान झाल्यावर समारंभ समाप्त झाला.

ठराव १ ला—नासिक जिल्हा संमेलनाचे या अधिवेशनाचे सभेस वै. श्री. वा. मो. रानडे, नासिक वै. सुंदरलाल नाथालाल जोशी नडियाद, यांचे अकाली निधनाबद्दल अत्यंत दुःख होत आहे व त्यांचे कुटुंबियांचे दुःखात ही सभा सहभागी आहे.

ठराव २ रा—सन १९३८ चे वैद्यक कायद्यांत आयुर्वेदाला पोषक अशा सुधारणा करण्याकरितां आयुर्वेदतज्ञांची एक समिति मुम्बई सरकारने नेमावी त्यांत वैद्येतरांचा समावेश नसावा.

(अ) आयुर्वेदिक अॅन्ड युनानी तिब्बी बोर्ड व फॅकल्टी या दोन संस्थांचा आणि सरकारनें नेमलेल्या ट्रिब्युनल (समिती) यांचे अध्यक्ष हल्लीं डॉक्टर आहेत. सदर अध्यक्षपदीं वैद्यच नियुक्त करावा. वैद्येतर नसावा.

(ब) बोर्ड व फॅकल्टी या दोन संस्थांचे सभासद ... नियुक्त असावेत व त्यांनींच आपणापैकीं एकास ... निवडावे.

(क) आयुर्वेदाचा धंदा करणाऱ्या वैद्याकरितां ... नियम स्वतंत्र करण्यांत यावेत व ते करण्याकरितां ... कारनें वैद्यांचीच समितो नेमावी.

अशी ही सभा सरकारला विनंती करते.

अनुमोदक...शं. य. मंगरूळकर सूचक...विष्णूशास्त्री

ठराव ३ रा—मुम्बई सरकार अंदाजपत्रक तयार ... तांना आयुर्वेदाचे शिक्षणाकरितां कांहीं रक्कम मंजूर ... परंतू त्या रकमेचा विनियोग मिश्र शिक्षणाकडे केला ... म्हणून ही सभा सरकारला विनंती करते कीं ... ही रक्कम केवळ आयुर्वेदाचे शिक्षणाकरितांच उप... आणावी.

अनुमोदक...भि. के. देशपांडे. सूचक...ग. म. ...

ठराव नं. ४ जंगलातील औषधी वनस्पतींचे ... सरकारनेंच करावे व त्या औषधीं वनस्पती वैद्याना ... औषधी कारखानदाराना सरकारनें माफक दरांत पुरवा... अनुमोदक. सिताराम रंगनाथ जोशी (सर्वानुमते मंजूर) ...वि. म. गोगटे

हैद्राबाद शहरांतील

अर्कशाला औषधांचे

प्रमुख विक्रेते

आयुर्धर्म मेडिकल हॉल

★

रेसिडेन्सी बस स्टँड समोर

सुलतान बझार हैद्राबाद

यांचेकडे आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा यांची सर्व औषधें मिळतात

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारचे काष्ठौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका) शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचे खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितो,

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

टे. नं. ३१७९६ Telegrame- AYURVED

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठराव नं. ५ ही सभा अेक मतानें ठराव करते की, सरकारनें सुगंधी व अितर औषधी द्रव्यावर जुदा. लवंग, कळी, हिंगूळ, पारा, प्रवाळ, गंधक, मिरी, जायफळ आदि वस्तूवर भारी कर ठेविला आहे. तरी ती द्रव्यें वैद्यांना औषधी करण्या करितां माफक दरांत सरकारनेंच पुरवावीत. असे करण्यानें जीवन सहायाचे श्रेय सरकारला मिळेल.

ठराव नं ६ सरकारनें केवळ आयुर्वेदाचाच अभ्यास क्रम आखावा अशी ही सभा मुंबई सरकारकडे आग्रहाची मागणी करते.

अनुमोदक....शं. य. मंगळूरकर... सूचक...विष्णुशास्त्री दाते.

ठराव नं.७ भारतांत वैद्यकीय मदतीची फारच आवश्यकता आहे. सरकारनें वरील कारणाकरितां एक आयुर्वेदाचा अभ्यासक्रम आखावा आणि त्याप्रमाणें गुरुगृही व इतर विद्यालयांत शिक्षण (आयुर्वेदाचे) घेतलेल्या छात्रांची परीक्षा घेऊन त्याना प्रमाणपत्रे द्यावीत. व त्यानंतर योग्य प्रात्यक्षिक शिक्षण आयुर्वेदीय रुग्णालये प्रसुतीगृहे, औषधी निर्माण शाळा, यांत देऊन व्यवसाय करण्यास परवानगी द्यावी. सूचक... बिंदूमाधवशास्त्री पंडित. अनुमोदक... ल. भा. काळे. पुष्टी... भि. के. देशपांडे. व शिवशंकरशास्त्री शौचे.

ठराव नं ८ अितर प्रांतात रजिस्ट्रेशन झालेल्या वैद्याना मुंबई सरकारनें त्यांचेकडून फी घेऊन त्यांना रजिस्ट्रेशन द्यावे असें या सभेचे मत आहे. व त्याकरिता ही सभा सरकारला विनंती करते. सूचक... ना. वि. काळे. अनुमोदक... सौ. अिन्दुमती खडकीकर विष्णुशास्त्री दाते.

ठराव नं. ९ वरील ठराव योग्य त्या अधिकाऱ्याकडे मांडण्याकरिता खालील वैद्यांचे शिष्टमंडळ हि सभा नियुक्त करीत आहे.

वै. ना. ह. जोशी	वै. विष्णुशास्त्री दाते.
वै. शं. य. मंगळूकर	वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित
वै. पु प्रे मारवाडी	

वेस्टर्न इंडीया आयुर्विमा कंपनीची प्रगति

प्रतिवर्षाप्रमाणें १९५१ सालीहि वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें प्रगतीची गति कायम ठेवलेली असून भारतांतील विमाकंपन्यामधील आपले मानाचें स्थान कायम राखलें आहे. १९५१ सालीं कंपनीकडे एकंदर ३,०७,५७,००४ रुपयाचे १२,९९८ विमा अर्ज आले. या वर्षी एकंदर २, ६८, ५२३५८ रुपयांचे विमे दिले गेले. या वर्षात आयुनिधीमध्यें रु. ३८,९३,१६५-७-४ ची भर टाकली. या सालासाठीं ३० टक्के बिनाकर डिव्हिडंड भागीदारांना देण्यांत आले. १९४७ सालापासून भारतांतील विमाव्यवसायांत घट दिसून येत असल्याचें सरकारी अहवालावरून दिसून येते. तरीहि वेस्टर्न इंडियानें दर वर्षी नवीन विम्याचे वाढते काम करून आपली विकासाची परंपरा अबाधित राखिली आहे हे कंपनीच्या संचालकांना व कार्यकर्त्यांना भूषणावह आहे.

अध्यक्षीय भाषण

ता. २२ जून १९५२ च्या वार्षिक सभेपुढें भाषण करताना कंपनीचे चेअरमन डॉ. मो. ना. आगाशे यांनी कै. आण्णासाहेब चिरमुले यांचें आदरपूर्वक स्मरण करून श्रद्धांजली अर्पण केली. विमा व्यवसायाच्या सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेताना ते म्हणाले,

" गेल्या सालीं सर्व बाबतींत मंदीची झळ जाणवू लागली. अन्न, वस्त्र व निवारा यावाबतची परिस्थिति अधिक विकट झाली. व त्याचा विमाव्यवसायावर अनिष्ट परिणाम झाला. यांतच भर म्हणून रिझर्व बँकेनें आपला व्याजाचा दर वाढविल्यामुळें व्यापारी वर्गाची कुचंवणा झाली. व त्या वर्गातुन जे काम मिळावयाचे त्यालाहि पायबंद बसला. नवीन दुरुस्त विमा कायद्यामुळें १९५१ च्या सुरवातीपासून स्पेशल एजंट आदि कार्यकर्त्यांचे कमिशन व इतर बाबीवर निर्बंध आल्यामुळें त्याचाहि कामावर थोडाफार परिणाम झाला. परंतु परिस्थिति अशा प्रकारे प्रतिकूल असताहि आपण १९५१ सालीं आपल्या कामांत गतसालापेक्षा वाढ दाखवू शकलो ही अभिमानाची गोष्ट आहे. "

कंपनीच्या अकराव्या मूल्य मापनाविषयीं ते म्हणाले, " गतवर्षी अपेक्षिल्याप्रमाणें १९५० अखेरच्या अकराव्या मूल्यमापनाचा निकाल सर्वतोपरी समाधानकारक आहे. सदर मूल्यमापनावरून कंपनीची आर्थिक सुस्थिति, प्रगति, व उत्कर्ष अबाधित राखली गेली आहेत. अितकेंच नव्हे तर आपल्या कंपनीची अेक अनुकरणीय व सर्वांगीण नमुनेदार संस्था अशी ख्याती आज भारतवर्षात होउन तिची गणना प्रमुख विमाकंपन्यामध्यें प्राधान्यानें केली जाते. या गोष्टींचा अभिमानानें अुल्लेख करण्यास मला अत्यानंद होत आहे. "

डॉ. आगाशे यांनी आपल्या भाषणांत प्राप्तीकर, व्याज आणि गुंतवण, विमा दुरुस्ती कायदा इ. विवेचन करून कंपनीच्या संलग्न संस्थांच्या प्रगतीचा आढावा घेतला व कार्यकर्त्यांचे आभार मानून आपले भाषण संपविले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

नुकतेच पनवेल येथें आयुर्वेदिक संमेलन अध्यक्षीय भाषण आणि आयुर्वेद पत्रिकेतील लिखाण वाचले म्हणजे डॉक्टर हील दायसेल्फ फर्स्ट असेच म्हणावे लागेल.

१ हत्ती व ७ आंधळे

'आयुर्वेद हें काय शास्त्र आहे याचा संपूर्ण बोध अद्याप कोणालाच झालेला नाहीं' असें विधान पं. बिंदूमाधवानी आपल्या अध्यक्षीय भाषणांत केले आहे. त्यांच्या मते कांहीं लोकांना आयुर्वेदशास्त्र हें अॅलोपॅथीप्रमाणें विरुद्धोपशम पद्धतीचे आहे असें वाटतें. कोणी दोषावर कोणी धातूवर तर कोणी रसवीर्यविपाकांवर जोर देतात. दुसरे कांहीं लोक होमिओपॅथीचे सिद्धांतहीं आयुर्वेदांत पहातात. (कै. गुणेशास्त्री हल्लींच्या काळांतील दुर्बल प्रजा लक्षांत घेऊन त्यांच्या प्रकृतीला मानवेल असा सूक्ष्म सुवर्णकल्प केवळ संशोधन बुद्धीनें वापरत असत) आणि म्हणूनच पं. बिंदुमाधव १ हत्ती व ७ आंधळे 'हा दृष्टांत देऊन 'मलतः प्रकृति परीक्षणाचा' (त्यांच्या मते एकमेव) सिद्धांत छातिठोकपणें मांडत आहेत.

मलतः प्रकृति परीक्षण

मल नित्य निर्माण होतात. त्यांच्या वृद्धिक्षयाचा नीट अभ्यास केल्यास सूक्ष्म ज्ञान मिळते. मलतः प्रकृतिपरिक्षणाची थोरवी सांगताना पं. बिंदुमाधवानीं एका वैद्याचे दिलेले उदारहण (कपड्याच्या घामाच्या वासावरून निदान करी) म्हणजे नाडीवरून सर्व रोगनिदान होते. ह्या प्रचलित कल्पने प्रमाणेच हास्यास्पद आहे.

डॉ. बालिंगे आणि बाळासाहेब खेर

१९४८ सालीं चेंबूर आयुर्वेदिक संमेलनांत माजी पंतप्रधान यांनी शुद्ध आयुर्वेदाच्या अभिमान्याना सवाल केला कीं आयुर्वेद हा राष्ट्राच्या आरोग्याची जबाबदारी घेऊं शकेल कां? अर्थात हा सवाल म्हणजे आयुर्वेदाची टिंगल नि:संशय नव्हे. हरघडी नवे नवे शोध लागत असलेल्या या कालांत आयुर्वेद जनतेचे स्वास्थ्य राखण्यास अपुरा पडेल असाच त्यांच्या भाषणाचा रोख होता. पण शुद्ध आयुर्वेदीयाना हें कसे पटणार?

१९५२ साल उजाडले. पं. बिंदुमाधव पनवेल संमेलनाचे अध्यक्ष झालें. त्यांचे स्नेही डॉ. बालिंगे उद्घाटक म्हणून नागपूरहून आले डॉ. बालिंगेनीं उद्घाटनाचे वेळी वक्तव्य केले त्यानें इतराना नाहीं तरीं पं. बिंदुमाधवांच्या मनाला हायसे वाटले.

माजी आरोग्यमंत्री डॉ. बलिंगे यांचे माजी पंतप्रधान खेर यांना चोख उत्तर

या शीर्षकाखालीं बाळासाहेब खेरांचा फोटो आयुर्वेद पत्रिकेच्या मुखपृष्ठावर छापला. आपल्या वर्तुळाबाहेरील व्यक्तीची निंदा करणाऱ्या संपादकाचा हात कोण धरणार! ज्या डॉ. बालिंगेनी आयुर्वेदाची उत्कृष्ट वकिली केली असें बिंदूमाधव समजतात त्याच वकिल बालिंगेनीं आरोग्यमंत्री असतांना आयुर्वेदाची किती अवहेलना केली हें वै. भिगारे यानीं पूर्वीच दाखवून दिले आहे. (आयुर्वेद पत्रिका १ सप्टेंबर १९४९)

आयुर्वेदीय औषधी कारखाने

आयुर्वेदीय औषधी कारखानें श्रेष्ठ दर्जाची औषधे बनवीत नाहींत अशी तक्रार बिंदूमाधवानीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत केली आहे. स्वत: औषधी कारखानदार असूनही तक्रार जनतेपुढें मांडली; त्याअर्थी आयुर्वेद संघाची ...

दमा हटतो
तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफ्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३॥, ६ व १० किंमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विक्रीस मिळतें.
डॉ. पुरोहित फार्मसी, कोल्हापूर (एस. एम. सी.)
पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्त्रशुद्ध असलीच पाहिजेत असे मला वाटते. पण आयुर्वेद केचे अंक चाळत असतां माझा अंदाज सपशेल खोटा ठरला संघही आपली औषधें शास्त्रशुद्ध बनवीत नाही; असा ट कबुली जबाब औषधी भवनाच्या व्यवस्थापकानीं दिला हे. (१६ आक्टोबर १९५१ पान २५३)

आयुर्वेदीय रुग्णालयें

पं. बिंदुमाधवानी आपल्या अध्यक्षीय भाषणांत युर्वेदिक रुग्णालयांत केल्या जाणाऱ्या ॲलोपॅथिक उपचा- बद्दल टीका केली आहे. ते म्हणतात ' बाहेर दुधाचे नात म्हणून पाटी लावावी व आंत दारूचा व्यापार चालू वावा अशा पैकींच हा प्रकार आहे. त्यांच्या टीकेंत डासा सत्यांश आहे. आयुर्वेदिक रुग्णालयेंहि मिश्रशिक्षण स्यानी चालविली असल्याकारणानें नाइलाजानें कांहीं वतींत (मुख्यत: शस्त्रक्रिया) ॲलोपाथिक उपचार केले तात, मिश्रशिक्षण संस्थांच्या बाबतींत ही गोष्ट क्षम्यच हे. पण स्वत: शुद्ध आयुर्वेदीय म्हणून घेणाऱ्यांनी आयुर्वेदीय गोष्टीस प्रोत्साहन देणें अनिष्ट आहे.

सौ. यमुताई गोगटे यानी नासिक येथें ' आयुर्वेद यास मंडळाच्या ' वार्षिक सप्ताहात केलेलें भाषण पहा. चा अर्जिरॉल सल्फानिलमाईड पेनिसिलीन मरक्युरोक्रोम टेलिन फोर्ट A. T. S. वगैरे औषधींचा अत्कृष्ट भव आयुर्वेदीय गुणधर्मशास्त्राधारें सिद्ध करता येईल य ? (आयुर्वेद पत्रिका १६ जून १९५२) हीच गोष्ट बिंदुमाधवांच्या आशिर्वादानें चालू असलेल्या " वैद्यक व्यवहार वर्ग येथें शिकविल्या जाणाऱ्या गोष्टींची. तेथेंही त्याच गोष्टी ॲलोपॅथी पद्धतीला अनुसरूनच शिकविल्या जातात.

आयुर्वेदिक इंजेक्शन्स

" आयुर्वेदिक इंजेक्शन " हें काय थोतांड आहे हें मी वीच दाखवून दिले आहे. (आयुर्विमांसा १ आक्टोबर १९५१ पान २३) माझ्या सारख्या सामान्य माणसानें पंडित बिंदूमाधव सारख्या असामान्य व्यक्तींशी टक्कर देणें अत्यंत धाडसाचे सूनही माझें डोकें शाबूत राहिले ह्याचा अभिमान वाटतो.

पनवेल संमेलनांत " आयुर्वेदिक इंजेक्शन्स ' चे प्रात्याक्षिक झाले. प्रात्याक्षिक किती अशास्त्रीय आहे यासंबंधीं रसायन शास्त्री नामजोशी व वैनतेय यानीं केलेली टीका म्हणजे शुद्ध आयुर्वेदीयावर टाकलेला ॲटमबॉंबच आहे. रसायन शास्त्री नामजोशी (आयुर्वेद पत्रिका १६ जून १९५२ पान ८१३...... वैनतेय (भिषविलास जुलै १९५२ पान ७६ वर पहावे.

बोर्ड व संघटना

मुळांत कायद्याप्रमाणें बोर्डाकडे कांहींच कारभार ठेवला नाहीं. महाविद्यालयांची मान्यता, त्यांचा अभ्यासक्रम, पुस्तकें, परीक्षा, परीक्षक शिष्यवृत्या वगैरे सर्व महत्वाची कामें स्टेट फॅकल्टीकडे सोपविली आहेत. (पर्यायानें मिश्रवादियाकडे) रजिस्ट्रार व इतर नोकरवर्ग यांचेवर हुकुमत व वैद्यक व्यवसायिकांवर मेडिकल इथिक्स अन्वये देखरेख एवढीच्र कामें बोर्डाकडे सोपविली आहेत. स्पष्टच बोलावयाचे म्हणजे सरकारनें शुद्ध आयुर्वेदीयांची ओरड बंद करण्याकरितां १ चतकोर तुकडाच त्याच्या तोंडावर फेकला आहे. (कारण कायद्याप्रमाणें शुद्धआयुर्वेदीय स्टेट फॅकल्टीवर निवडून येणें शक्यच नाहीं)

अशी वस्तुस्थिति असतां विशेष कांहींतरी करून दाखविण्याच्या इर्षेनें वै. बिंदुमाधवानी ' संघटना ' निर्माण केली. आयुर्वेद पत्रिकेद्वारां जोरदार प्रचार करून बिंदुमाधवानी बोर्डाची निवडणूक जिंकली. (कोणाविरुद्ध ?) पण लौकर भ्रमाचा भोपळा फुटला.

अनेक सभा संमेलनांतून एक मुखी विरोध झाला असताही संघटनेंनें रिन्युअल फी व नवीन अभ्यासक्रमास मान्यता दिली. कदाचित संघटना वीरांच्या सदसद् विवेक बुद्धीचा हा चमत्कार असेल पण बिंदुमाधवांचा अधःपात मात्र खासच आहे. बोर्डाच्या कारभारासंबंधी वारंवार टीका करणारे बिंदुमाधव याच बाबतीत मात्र स्थितप्रज्ञ बनले, त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांतुन व आयुर्वेदपत्रिकेतून ' संघटना ' हा शब्दच गाळून टाकला, मग वरी बाईट टीका करणें लांबच राहिले.

—वैद्य व्ही. व्ही. बाक्रे

ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह

या नवीन ग्रंथांत अनेक रोगावरील सुमारे ३५० प्रिस्क्रीप्शनें व इंजेक्शनें दिलेली असून इतर महत्वाची चिकित्सा वर्णिली आहे.

पाश्चात्य चिकित्साजिज्ञासू वैद्यांस अति उपयुक्त ग्रंथ. लेखक-पं. जगन्नाथशास्त्री. किंमत ह. खर्चासह ५ रुपये. आजच मागवा.

पत्ता-डॉ. मोकाशी, ठाणे (मुंबई)

(शरच्चंद्र बेळगांव)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

WILICO
STRONGHOLD OF PROTECTION

— वेस्टर्न इंडियाचें —

यशस्वी कार्य

भरीव काम व निश्चित प्रगती याबद्दलची आपली उज्वल परंपरा वेस्टर्न इंडियानें १९५१ सालीही कायम राखली आहे.

१९५१ मधील कांहीं ठळक वैशिष्ट्यें

एकूण नवीन काम	रु.	२½ कोटीवर
एकूण चालू काम	,,	१६ कोटीवर
एकूण हप्त्यांची आवक	,,	८६ लाखावर
एकूण आयुर्निधी	,,	५ कोटीवर
एकूण क्लेम्स दिले	,,	१¾ कोटीवर

दर हजारीं आकर्षक त्रैवार्षिक बोनस

हयातींतील विमा	हयातीनंतरचा विमा
रु. २७।—	रु. ३३।—

हप्त्यांचे दर मात्र पूर्वीचेच अत्यंत माफक. आपला विमा व प्रतिनिधित्वासाठीं एक सर्वोत्कृष्ट आदर्श विमा संस्था. उत्कृष्ट व लाभदायक जीवन—व्यवसाय हवा असणाऱ्या उत्साही व महत्वाकांक्षी तरुणांना विमा क्षेत्रांत भरपूर वाव.

सविस्तर माहितीसाठीं भेटा वा लिहा.

—: मॅनेजर :—

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.,

सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभवसिद्ध अर्कशाला-औषधें

युटोन
गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन
रक्तवर्धक, पौष्टिक, मेंदूस बलदायक

वसंत मिश्रण
जीर्णज्वर, रक्तक्षीणता क्षयाचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें यांकरितां

शिशुजीवन
बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन
मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृद्धिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण आगाशे यांनीं आनंद प्रिंटिंग प्रेस, सातारा, लि., येथें छापलें व आयुर्वेद महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक [illegible]

२२५५
६
६ — २००८

आयुर्मीमांसा

गुरुकुल-पत्रिका,
गुरुकुल कांगड़ी.

प्रमुख संपादक

वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

कार्यकारी संपादक

ब. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद

६.२.५२

आक्टोबर १९५२

वार्षिक वर्गणी ३ रु.

किरकोळ अंक ८ आणे

या अंकांत

दोषधातुमलविज्ञान : अथ धातु :
—गो. आ. फडके

स्नेहसाधन विधि
—पु. वि. धामणकर

Rasa Guna Veerya Vi[illegible]a Prabhava

संपादकीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

EVEREST GM. 2

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदप्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

संचालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

वर्ष १५ वें] आक्टोबर १९५२ [अंक १० वा

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.

* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.

* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.

* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.

* सर्व पत्रव्यवहार 'व्यवस्थापक, आयुर्मीमांसा, अर्कशाला, बिल्डिंग, सातारा' या पत्त्यावरच करावा.

अर्कशाळेचे हैद्राबाद राज्यांतील विक्रेते

रामसिंग मेडिकल हॉल, परभणी

परभणी शहरांतील रामसिंग मेडिकल हॉल हे एक प्रमुख औषधविक्रेते आहेत. त्यांनीं अ[illegible]ळेचे विक्रेते [illegible]ानें सहकार्य देण्यास प्रारंभ केला असून त्यांच्या प्रयत्नानें त्या भागांत कंपनीच्या मालाची विक्री निश्चित वाढेल असा विश्वास वाटतो.

गोगटे फार्मसी औरंगाबाद

औरंगाबादेंतील हे जुने व यशस्वी औषधविक्रेते आहेत. अर्कशाळेचे सेल्स मॅनेजर व ऑर्गनायझर यांनीं श्री. गोगटे यांची गेल्या जूनमध्यें भेट घेतली त्यावेळीं श्री. गोगटे यांनीं अर्कशाळेस सहकार्याचें आश्वासन दिलें व कंपनीचा माल आपल्या दुकानीं विक्रीस ठेवण्यास संमति दिली. ज्या कांहीं मराठवाड्यांतील विक्रेत्यांनीं कंपनीच्या कार्यकर्त्यांशीं मनमोकळी चर्चा केली व वस्तुस्थितीचें नेमकें निदर्शन केलें त्यांत श्री. गोगटे यांचा समावेश होतो. त्यांच्या पाठिंब्यानें औरंगाबादमध्यें कंपनीची विक्री क्रमशः वाढेल अशी खात्री वाटते.

नरहरी स्टोअर्स, मानवध

नरहरी स्टोअर्सचें सहकार्य अर्कशाळेस प्रारंभापासून लाभलेलें आहे. हैद्राबादचे मे. आयुर्धाम मेडिकल हॉल व नरहरी स्टोअर्स यांचे सहकार्य आहे. या उभयतांच्या प्रयत्नानें अर्कशाळेची विक्री वाढत आहे. नरहरी स्टोअर्सचे श्री. शहाणे यांच्या आपुलकीच्या सहकार्यामुळें कंपनीची मानवध येथील विक्री सतत वाढत आहे.

आपल्या हैद्राबाद राज्यांतील वैद्य व विक्रेत्यांना
येती दिवाळी आणि नवें वर्ष
सुखाचें व उत्कर्षाचें जावो
असें आम्ही चिंतितों.
आयुर्वेदीय अर्कशाला लि. सातारा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपादकीय

पृष्ठसंख्येंत वाढ

आयुर्मीमांसेची पृष्ठसंख्या कांहीं महिन्यांपूर्वी आठ पृष्ठांनीं कमी करण्यांत आली होती. त्यामुळें मजकूर पुरेसा देतां येत नव्हता. आतां कागदाचे दर उतरलेले असल्यामुळें पृष्ठसंख्या पूर्ववत् करण्यांत आली आहे. आयुर्मीमांसेच्या ग्राहकांनीं ही वाढ लक्षांत घेऊन मीमांसेस असलेला आश्रय यापुढेंहि चालूं ठेवावा अशी विनंति आहे.

वैद्य लेखकांना विनंति

आयुर्मीमांसेकडे अपेक्षेप्रमाणें लेख येत नाहींत. आमच्या वैद्य वाचकांना त्यांचे चिकित्साविषयक अनुभव व शास्त्रीय लेख पाठविण्याविषयीं आम्हीं पूर्वीं विनंति केली होती. तीच विनंति पुन्हां एकदां करीत आहोंत. आयुर्मीमांसा हें आपल्या अनुभवांच्या व विचारांच्या प्रकटीकरणाचें साधन आहे असें समजून वैद्य मंडळींनीं या साधनाचा भरपूर उपयोग करावा अशी आमची आग्रहाची सूचना आहे.

नवी लेखमाला

वैद्यरत्न श्री. गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य यांची दोष-धातुमलविज्ञानावरील लेखमाला चालू झालेली आहे ही लेखमाला विद्यार्थी व वैद्यवाचक यांना वाचनीय वाटेल अशी आशा आहे. हा विषय आयुर्वेदाचा मूलाधार आहे. या विषयाची जेवढी विस्तृत चर्चा होईल तेवढी हवी आहे.

ग्राहकांना प्रार्थना

आयुर्मीमांसेच्या उणीवांची आम्हांस जाणीव आहे. आम्ही त्या दूर करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करीत आहोंत. आमच्या ग्राहकांनीं मीमांसेवरील लोभ कायम ठेवावा अशी प्रार्थना आहे. मीमांसेची वर्गणी नाममात्र आहे. वैद्यमंडळींनीं मोठ्या संख्येनें वर्गणीच्या रूपानें सहाय्य केलें तर मीमांसा अधिकाधिक उपयुक्त करणें सुकर जाईल.

दीपावली शुभचिंतन

आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, आयुर्वेदीय अर्कशालेचे वैद्य, विक्रेते व ग्राहक, आयुर्मीमांसेचे वर्गणीदार, जाहिरातदार व वाचक

या सर्वांना

यंदाची दिवाळी व नवें वर्ष
सुखाचें, आनंदाचें व उत्कर्षाचें जावो.

आ. वै. महाविद्यालय, अर्कशाळा व आयुर्मीमांसा यांच्याशीं निगडित असलेल्या सर्व सहकाऱ्यांचें मिळून एक व्यापक कुटुंब निर्माण झालें आहे. सहकार्य व परस्पर सदिच्छेची भावना यांच्या आधारावर आपण सर्वांच्याच प्रगतीसाठीं दीपावलीच्या शुभप्रसंगीं प्रयत्नांना प्रारंभ करूंया.

—आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय
—आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा
—संपादक आयुर्मीमांसा मासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्नेहसाधन-विधी

(लेखक—वैद्य पु. वि. धामणकर, आयुर्वेदभूषण)

— लेखांक दुसरा —

पहिल्या लेखांत श्रीमच्चरक, सुश्रुत, वाग्भट, निघंट-रत्नाकर, निघंटशिरोमणि यांतील तुपें व तैलें यांचे गुणधर्म दिले. आतां ह्या लेखांत डॉ. देसाईकृत औषधी संग्रह व ब्रिटिश फार्माकोपीयांतील तैलें आणि रस-योग सागरांतील औषधी योगांत ह्या तैलांचा कशा-रीतीनें उपयोग केला आहे तें दिलें आहे. ह्यावरून तैलांचे गुणधर्म व विविध उपयोग वाचकांचे ध्यानीं येतीलच.

औषधीसंग्रह (डॉ. देसाईकृत) तैलवर्ग

१ अंकोल– (पान नं. ३७३) बी. उपदंश, रक्तपीति, चाई, व्रण, अंगावरील चकंदळें. केश्य

२ अमसोल– (१२२) बीं. आंवेवर पोटांत घेणें. विपादिका जळवातावर मर्दन.

३ अळशी—(१५७) बीं. अर्श, व्रण, मलबद्धता.

४ उंडी—(१२५) फळ. डोक्यावरील खवडे, संधिवात.

५ ऊद—(४६०) साल. ताज्या जखमेवर लावल्यास.

६ एरंड—(६५३) बीं. विरेचक, संधिवात, वातरोग, अभ्यंग, पान अंजनास शस्त, उकडून काढलेलें दाहजनक-दावून काढलेले.

७ कडुनिंब (२०३)—बीं. उत्तेजक, कोथप्रशामक, रसायन, व्रणशोधन रोपण, वातघ्न, पूतिहर, क्वचित्प्रसंगीं दाहजनक.

८ करंज (२५७)—बीं. कुष्ठ, कृमि, आमवात, व्रण, कास, गजकर्ण, चाई, लूत, खरूज, आगपैणनाशक, व्रणशोथ, प्रतिकारक, खरजेंतला किडा मारून टाकतें.

९ किकणेल (४६७)—बीं (विषगर्भ तलास आधार म्हणून प्रशस्त) स्वेदजनक, उत्तेजक. (वृद्धपीलु) चेतनावर्धक. हें विषारी आहे. ज्वरांत अंगास चोळलें कीं घाम येतो. संधिवातांत दुखऱ्या भागावर चोळावें. वेदना थांबतात.

१० क्याजीपुट (३१६)—पान–पोटशूलावर पोटांत देणें, सर्दीकरितां हुंगणें, संधिवातावर अभ्यंग.

११ कोशाम्र (मकासर २१७)—डोकींतला खवा जातो. शिरःशूल राहतो. अंगदुखी बंद होते. खरूजसुद्धां बरी होते.

१२ खष्टेल (कडूकंवठ १०५)—बीं–खरूज, इसब, लूत, त्वक्दाह, कृमि, कंडू, वेदना, त्वग्दोषहर, रक्तशोधक, व्रणशोधनरोपण, महाकुष्ठ, गंडमाला, क्षय, ग्रंथी, ह्यांवर वस्ताद, पोटांत द्यावें. नाकांत घालावें. वाहेरून-ही लावावें.

१३ खरासिग—कन्वह खवडे, इ. त्वग्रोगावर.

१४ खोबरेल–मुठेल—कॉडलीव्हर ऑईल समान.

१५ गर्जन — रक्तपितींत बाह्याभ्यंतर. परम्यावर पोटांत देणें.

१६ गंधाविरोजा – (६९६) साल — सद्योव्रणांतील रक्त-स्राव तावडतोब बंद होतो. सूरंद्रवं (लेपनाने) जखमेंत पूं होत नाहीं. असलेली कूज दूर करतें. ... व्रण बरे होतात.

१७ चारोळी – बीं (२३६) — केंस काळे करण्यास डोक्यास लावतात. बदामतेलाचा प्रतिनिधि.

१८ चालमोग्रा (१०६) — कडूकवठीप्रमाणेंच पण त्यापेक्षां उच्चप्रतीचे गुण आहेत. शिवाय अस्थिव्रण, उरःक्षत, तोंड व हातावरील इसव, खवडे, खरुजहर.

१९ चंदन – (६५०) नार — दाहशामक, स्वापजनन, खर-जेवर चोळतात.

२० चहा (७८०) (ओला)— रोहिष तेलाप्रमाणें.

२१ जायफळ (६२८) — जुनाट संधिशोथांत उपयुक्त. वेदनास्थापक.

२२ जेपाळ (६६२) — तीव्र विरेचक. जलविरेचक म्हणून प्रशस्त.

२३ तीळ (५५२) — सर्व तेलांत हेंच तेल उत्तम, व्रण-शोधन रोपण.

२४ तुळस (५०७)— } युक्यालिप्टस्, क्याजिपुटप्रमाणें.
२५ तैलमदर (३१५) – }

२६ देवदार–(३९५) नार–टरपेंन्टाईनपेक्षां सौम्य गुणात्मक मूत्रल उत्तम. जीर्णत्वग्रोगनाशक.

२७ दालचिनी — (६३९) त्वग्— क्षयज व्रणांवर चोपडले असतां व्रण शुद्ध होतात. दाहजनक.

२८ धणा—बीं—(३६६)—संधिवातांत वर चोळतात. व पोटांतही देतात. शूलघ्न, मूत्रल.

२९ धोत्रा— (५२९) बीं— वाजीकर (विड्याचे पानास लावून विडा खातात.)

३० पिसोळा—(८७) बीं— मृदुविरेचक. कुष्ट. आगपैण, गजकर्ण, आंव, आध्मान. पोटशूल, हें पोटांतही देतां येतें. गजकर्णावर वस्ताद आहे.

३१ पुदिना— (५८३) कृमिदंत, दंतशूलघ्न.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३२ बदाम— (३१०) बीं मार्दवकर, केश्य, वर्ण्य, पौष्टिक, नासाव्रणनाशक, घुणा फुटल्यास हें नाकांत घालतात.

३३ बडिशेप– (३६५) बीं—आंव–मुरडानाशक.

३४ बादयाणा–बीं— आंव–मुरडानाशक. शूलघ्न, वातहर.

३५ बावंची– बीं —(२६२) कृमित्वग्रोग, व्रणशोधनरोपण, (चालमोग्राचा–सौम्य प्रतिनिधी)

३३ बिब्बा–फळ—(२३०) दाहजनक, स्फोटक

३७ बेहेडा (३०८)— फलमज्जा–केश्य, सूजेवरील कंडू, व दाहघ्न (अभ्यंग).

३८ भुईमूग (२६१)—कंद–अनुलोमिक, व्रणरोपक, व्रण-प्रसादक, पौष्टिक, इतर गुण ऑलिव्ह ऑईलप्रमाणें.

३९ मालकांगोणी—बीं–हयाच तेलास पिंग्वेल म्हणतात. स्वेदल, जळवात, त्वग्रोगघ्न, बुद्धिस्मृतिकर.

४० मोह (४४७)— बीं– लवकर खंवट होते. साबणांत प्रशस्त-औषधांत अनुपयुक्त, तळणें इ. कामांत उपयोजतात.

४१ रोषेल (७७९)—गवत– ऊष्ण, स्वेदल, मूत्रल, ज्वरघ्न, उत्तेजक, टकलावर (ओलें) लावल्यास केंस येतात. त्वचेवर चोळल्यास त्वचा लाल होते. चेतनाकारक, वेदनाहर, संधिवातहर.

४२ लसूण (७३०)— कंद– मूत्रल, शूलघ्न, कफघ्न.

४३ लवंग — फळ– शीर्षशूल.

४४ वेलची (७१५) —फळ.

४५ शहाजिरें (३६७)—बीं– ओंव्याचे फुलाप्रमाणें. ओंवा-फूल, दंतशूल, कृमिदंत पोटशूलहर.

४६ शिरस (९१)— बीं–अनुलोमिक, केश्य, वातहर.

४७ सबजा (५८०)— पान– तुळशीप्रमाणें (ओलें) पिसा... तैल–नवीन–वामक असतें. सबब १ वर्षाचें जुनें वा... रावें. मूळ बीं– तैल पाण्यापेक्षां जड असतें.

अर्कशाळेचीं

पेटंट व इतर सर्व प्रकारचीं औषधें

पुण्यांत

आतां सुलभतेनें मिळूं लागलीं.

प्रमुख विक्रेते

आदर्श एजन्सी,

३९५।७ सदाशिव पेठ, पुणें २.

ब्रिटिश फार्माकोपियांतील कांहीं तेलें

१ अळशी—फळ (पान नं.) ७१६ I मर्दन II स्वेदन } अनुलोमन, रुचि चांग... नसतें. मूळव्याध–मूत्र... बस्ति सकाळ–सायंकाळ मिश्र करून लावतात. अग्नि... दग्धव्रणावर, चूर्णोदकाबरोबर वॉर्निश पेंटमध्यें फार वापर... तात. मात्रा ½ ते १ औंस.

२ ओंवा–बीं (६७९) - कोथ प्रशमन, वातहर–थायमोल... तोडीची क्रिया होते. मात्रा ½ ते ३ थेंब.

३ एरंड–बीं (७३३)— मर्दन–सौम्यविरेचक, नूतन अति... सारांत फार उत्तम. स्वेदन–अन्न विषरोगशयाव्रणा... इतर मार्दवकर तैलाबरोबर लावणें. मात्रा–बस्ति दि... असतां मळाचे गठ्ठे पडतात. लहान मुलांचे आंत्रशूल... ५ ते १० थेंब देतात. केसांचे तैलांत उपयोग करता... डोळयांतील शल्य काढल्यावर डोळयांत घालावें. सकाळ... चे जेवण्यापूर्वी १ तास हें तेल घ्यावें. मात्रा १ ते ४ ड्राम...

४ कंकोळ–फळ (७०३) — उर्ध्वपातन–कोपवाचे तेला... गुणाशीं फार साम्य. अर्कयंत्र–सेवनानें श्वासनलि... जननेंद्रिय, मूत्रेंद्रियें, हयांना उत्तेजक, मूत्रल, कोथप्रश... श्वासनलिकाशोथ, परमा, गरमी सिस्टायटीस उत्त... मूत्रपिंड, श्वासनलिका व त्वचेवाटें बाहेर पडतें. पोटा... घ्यावें, श्वासावाटे हुंगावें. मात्रा ५ ते २० थेंब.

५ कपास – बीं (७०८) — ऑलिव्ह ऑइलचा प्रतिनि... म्हणून छान आहे. मात्रा ½ ते १ औंस.

६ कडूकवठ – बीं (७१०) — चालमोग्राचा प्रतिनि... महारोगावर देतात. मात्रा ५ ते १५ थेंब.

७ केजिपुट – पान (६९०) — आक्षेप प्रतिबंधक, वातहर, आंतडयांत कोथप्रशमक, आंत विषजन्य. जुनाट अति...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातांत देतात. क्षयांतही देतात. श्वासनलिकेवाटें बाहेर पडतें. बाह्योपयोग – त्वग्रोगकृत. संधिवातांत – टरपें– टिनशीं मिश्र करून लावतात. मात्रा १ ते ३ थेंब साखरेबरोबर.

कापूरतेल – (सार) कापूरधंद्यांतला उपपदार्थ. त्वग्रोगकृत, पुरळ आणणारे पण सौम्य संधिवात अगर संधिशोथांत, स्वतंत्र अथवा ऑलिव्ह् ऑईलबरोबर मिसळून लावणें.

कोकम – फळ – बीं — मर्दन मार्दव करणार्थ सपोझिटरि, पेसरी, बोगीज करतात. उन्हाळयांत अगर उष्ण प्रदेशांत ह्यांत थोडें मेण घालावें. म्हणजे लौकर पातळ होत नाहीं.

१० खोबरें – फळ — हें शरीरांत सहज शोषलें जातें. म्हणून ह्याची योजना मलमांत करतात. हें तेल केश्य आहे. अभ्यंग व मर्दनाकरितां वापरतात.

११ गुलाबी अत्तर – फूल (७३४) — हें मिठाईत वापरतात. मलमें, सौंदर्यप्रसाधनें ह्यांतही घालतात.

१२ चंदन – नार (७३९) — परमा, मूत्राशयशोथामध्यें देतात. तें लघ्वीवाटे बाहेर पडतें. बस्तिक्षयांतलें रक्ताभिसरण ह्यानें कमी होतें. मात्रा ५ ते १५ थेंब.

१३ जेपाळ – बीं (७०२) — तीव्र त्वग्स्फोटक, क्षोभक, तीव्रविरेचक व वामक.

१४ जायफळ – फळ (७२३) — सुगंधी, वातहर, पदार्थांना वास देण्यास उपयोजतात. केसास लावावयाचे पदार्थांत घालतात. मद्यांही घालतात. शोषणानंतर मेंदूवर चांगलेंच उत्तेजक काम करतें. सौम्य पुरळ आणणारें. मात्रा १ ते ३ थेंब. विरेचक किंवा वटीत मुरडा प्रतिबंधनाकरितां घालतात.

१५ जिरें (७०४) — सुगंधी, वातहर, पशुवैद्यकांतील औषधीमध्यें फार उपयुक्त.

१६ टरपेंटिन— (७४५) कोथप्रशमन, जंतुघ्न, सेवनानें पोटांत व तोंडांत गरम संज्ञा होते. वातघ्न, शूलघ्न, अपान वायु अनुलोमक, रक्तांत सरळ मिसळतें. व श्वेताणूंची संख्या वाढवितें. त्वचा, फुप्फुस व मूत्रपिंडद्वारा बाहेर पडतें. श्वासावाटें बाहेर पडतांना कफोत्सर्जक आम पडण्यास मदत होते. त्वचेवाटे बाहेर पडतांना घाम येतो. मूत्रवाहिन्यांचा विकास होतो व मूत्रोत्सर्जन होतें. लघ्वीमध्यें ग्लिसरोनि एसिडसह सांपडतें. सूज कमी होते. लघ्वीची घाण दूर करतें. मोठ्या प्रमाणांत मूत्रनलिका व मूत्राशय ह्यांना सूज आणतें. छोटी मात्रा तीव्र आजारांत सूज वाढविते. त्वचेस लावल्यास तेथें लाली येते. बारीक पुरळ येतो. त्वचेचा क्षोभ होतो. हुंगल्यानें पिच्छिल स्राव कमी होतो. पण बाजारांत मिळणारी प्रत तितकीशी जंतुघ्नक्षम नसते.

क्षयांत व श्वासनलिकादाहांत सूक्ष्म मात्रेनें देतात. मोठी मात्रा विरेचक व कृमिघ्न आहे. ती शरीरांत शोषली जाऊं नये म्हणून ह्याबरोबर एरंडेल देणें. दोरी अगर सुतासारखे जंत पडण्याकरितां बस्ति देतात. बस्ति दिल्यानें पोटफुगी उतरते. टायफाईड तापांत फीव्हरमधली पोटफुगी उतरण्याकरितां ऑलिव्ह् ऑईल + टरपेंटिनचा बस्ति देतात. हें गरोदरपणीं देऊं नये. छातीचे रोग व जुनाट संधिवातांत वरून चोळतात. नाकांतून अगर दातांमधून रक्त येत असल्यास तेथें ह्याचा बोळा ठेवतात. ब्रॉंकायटीसमध्यें खोकल्यांत हें हुंगण्यास देतात. अतियोग झाल्यास वामक स्नेहक द्यावें. लवणयुक्त विरेचन द्यावें. वेदनाहरणार्थ अफू द्यावी. मात्रा ३ ते १० थेंब. टायफॉईडमध्यें टर्पेंटाईनस्टूप (१/२ शेर गरम पाण्यांत चमचाभर टरपेंटाईन टाकून त्या गरम पाण्यांत बोळा भिजवून त्यानें पोट शेकावें.) देतात. व इंजेक्शन करितांही वापरतात. उदा. २ ते ४ ड्राम टरपेंटाईन घेऊन २।३ पिंट कोंबट पाण्यांत टाकून त्याचा एनिमा देणें, हेंही इंजेक्शनच आहे.

१७ तीळ (७४१) —ऑलिव्ह् ऑईलचा प्रतिनिधी, मलमपट्ट्या, मलमें, साबूलेप, इ. मध्यें उपयुक्त.

१८ दालचिनी (६९७) — जंतुघ्न वातहर–क्षयांत हुंगण्यास देतात. सर्दी पडशांतहि हुंगतात लपेटतात. टिकाऊ म्हणून वापरतात. क्षयांत (३० थेंब ते ५० तो. पाणी) १+२०पॅराफिन लिक्विड पोटांत देणें. मात्रा १ते३ थेंब.

१९ नारिंग (६८६) —मिठाईंत घालतात. सुगंधी पदार्थांत घालतात.

२० पेपरमिंट (७१८) — सुगंधी उत्तेजक, वातहर, पोटफुगी, पोटशूल, मुरडाहर, स्थानिक संज्ञाहर, सौम्यजंतुनाशक, टूथ पावडर्समध्यें घालतात.

२१ बदाम–गोड (६८०) —पौष्टिक, स्नेहल, सारक, फुटीर, हातास मार्दव आणण्याकरितां लावतात. केथेटर्सना लावतात. इंजेक्शनकरितां (Vehicle) योगवाहक म्हणूनही योजतात. याचा १ ते ४ ड्राम इतर एकाद्या तीव्र द्रव्याचे उदाहरणार्थ, मूळव्याध वगैरेकरितां इंजेक्शन द्यावयाचें असलें तर Acid सौम्य करण्याकरितां हें तेल वापरावयाचें असतें. म्हणून त्याला वेहिकल म्हणतात. वेहिकल = अनुपान असा अर्थ आहे.

२२ बदाम–कडू (६८१) —मिठाईंत स्वादाकरितां घालतात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत हायड्रो रासायनिक ॲसिड असतें. त्यामुळें फार जपून वापरावें लागतें. अतियोग झालाच तर ॲसिडम् हायड्रोरासायनिकम् डिल्यूटम् हें द्यावें. मात्रा ½ ते १ थेंब. अतियोगावर तेंच औषध पुन: द्यावयाचें याचा खुलासा करतां आल्यास पहावें.

२३ बडिशोप (७०६)—सुगंधी, वातहर, पोटांत मुरडा होऊं नये म्हणून हें विरेचक औषधाबरोबर देतात. लहान मुलांचे पोटशूलांतहि देतात. मात्रा ½ ते ३ थेंब.

२४ बादयाणा (६८३)—सुगंधी, वातहर, आनाहहर, सौम्य, कफोत्सर्जक, ज्येष्ठमधाबरोबर कासघ्न गुटींत योजतात. सुगंधी मुखधावन द्रव्यांत टाकतात. मात्रा १ ते ३ थेंब.

२५ बाळंतशोप— विशेषत: लहान मुलांचे आनाहात सुगंधी वातहर. मात्रा १ ते ३ थेंब.

२६ भुईमूग— इमल्शन स्वरूपांत लहान मुलांना पौष्टिक म्हणून देतात. भुईमूग तैल हा ऑलिव्ह ऑईलचा प्रतिनिधी आहे. साबण, प्लॅस्टर्स, लिनिमेंटस, मलमें इ. पदार्थांत वापरतात. ½ ते १ औंस (तेल पाणी एकत्र करून खूप हलविल्यास जें स्वरूप होतें तें इमल्शन)

२७ तीलतैल (७४१) —सर्व धर्म भुईमूग तैलाप्रमाणें. पोकळचा अपारदर्शक व्हाव्यात याकरितां त्या पोकळचांत तिळेल तेल सोडायचें म्हणजे त्या पोकळचांचा आकार वगैरे दिसावयास सोयीचें होतें.

२८ मोहरी तैल (७४२)— दाबून काढलेलें- कापूरयुक्त तैलाऐवजीं छाती व संधिशोथ ह्यांत चोळतात. हें सौम्य त्वग्दाहरोग कृत आहे.

मोहरीचें उडवून काढलेलें तेल फार तीव्र व शीघ्र स्फोटक आहे. आंत खोलवर पीडाशूल असल्यास हें डायल्यूट करून त्या भागावर लावतात. स्फोट उत्पन्न करणारा पदार्थ (ब्लीस्टर) लावतां येत नाहीं अशा जागीं उ. कर्ण पार्श्व-भागीं हें लावतात. प्ल्यूरिसी न्यूमोनियांतले अंतर्भागाचा खोल रुजलेला शूल दूर होण्यास ह्याचा उपयोग होतो.

२९ युक्यालिप्टस— कोथप्रशमक, वासनाशक, स्वरभेद, श्वासमार्गाचे रोग, मूत्राशयाचे रोग, यांत पोटांत देतात. हुंगण्यासही देतात. सपोझिटरीज, बोगीज, पेसरीज मध्यें म्हणून घालतात. मात्रा १ ते ३ थेंब.

३० लवंग (६९३) पोटांत दिल्यास १ जंतुघ्न, २ कोथशामक, ३ संरक्षक } कफाचे बेडके कमी पडावेत म्हणून क्षयांत ३ ते ५ थेंब देतात. बाहेरून लावल्यास त्वग्रोग, त्वग्दाहकृत् त्वग्बाधियंकर, तंतुज्ञानरहित भागावर १+२ शेंगदाणातैल एकत्र करून लावावें. डांग्या खोकला, संधिवात, श्वास-नलिकादाह म्हणून उपयोजतात.—पोटफुगी ओसरण्या[स] साखरेवर अगर कॅप्सूलमधून देतात. विरेचनवटी[त] लवंगतैल घातल्यास मुरडा होत नाहीं. दंतदुखींत तैला[त] बोळा ठेवतात. ह्यानें दांतांतील कीड मरते. मायक्रोस्कोपीत ह्याचा उपयोग होतो. मात्रा १ ते ३ थेंब.

३१ लव्हेंडर —(७१३) फुलांचें तैल—सुगंध देण्याकरि[तां] मिठाईमध्यें वगैरे वापरतात. नाकांतले, कानांतले कृ[मि] पडल्यास त्यांत घालतात. हें सौम्य, सुगंधी, वातह[र] वेदनाहर आहे. अप्रियगंध झांकण्यास ह्याचा उपयो[ग] करतात.

३२ लिंबू—(७१५) पोटांत फार क्वचित् देतात. तरीप[ण] वातहर आहे. मिठाईकरितां वापरतात. मात्रा १ [ते] ३ थेंब.

३३ वेलची-(६९१) वातहर, शूलघ्न, सुगंध देण्यास.

३४ शहाजिरें-(६९२) पोटफुगी, पोटशूल, मुरडाहर, विरेचक औषधांत मुरडाप्रतिबंधक म्हणून घालतात. १ [ते] ३ थेंब.

३५ सताप- (७३७) आर्तवजनक, शूलघ्न, अपस्मारह[र] बालग्रह (आंकडी)

हैदराबाद शहरांतील

अर्कशाला औषधांचे

प्रमुख विक्रेते

आयुर्धाम मेडिकल हॉल

★

रेसिडेन्सी बस स्टँड समोर

सुलतान बझार, हैद्राबाद

यांचेकडे आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा यांचीं सर्व औषधें मिळतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रसयोगसागरांतील सिद्धौषधी योगांत उपयोजिलेलीं तेलें

पदार्थ	अंग	उपयोग	आधार	स्पष्टीकरण
१ अर्क (रुई)	बीं	भस्मभावना	५०३ गोमेद रसायन	अर्क बी तैलांत गोमेद खलून अग्नि देणें.
,,	,,	सिद्धमालिश अभ्यंग	३०८ कुष्ठांतकरस	
,,	,,	भावना	२०७ कालकष्टकरस	सहा वेळ भावना देऊन गोळ्या करणें.
२ अंकोल	,,	,,	२९ चतुर्मुख	१ ,, ,, ,, खल ,,
३ अतसी	,,	भर्जनम्	४७३ वा. या. गजांकुश	तेलावर परतणें—अग्नि अति मंद
,,		गुटिकाकरणम्	३३५ धत्तूरतैल बद्धवटि	एरंड अथवा अणुतैलांत खलून गोळी करणें,
४ अणु	बीं	भावना	६३ रसचूडामणिरस	हेमतेलांत खलून लघुपुट द्यावें.
५ उन्मत्त	,,	पारदमूर्च्छन	३६७ खेचरीगुटी	८ तो. तेलांत सात दिवस खल करावा.
,,	,,	पाचन	३३५ ध. तै. व. वटि	तां गुटिकां सिद्धां तैले धत्तूरणे पचेत्
,,	,,	भावना	२५८ प्रदेभांकुश	
,,	,,	पाचन	१२ पंचबाणरस	हिंगुळास दोरा बांधून तो गोळा उडिदाचे पिठांत घालून तळणें.
,,	,,	तळणें	३९६ ब्रह्मांतरस	
६ एरंड	बीं	भावना	५९१ ग्रहणीकपाट	वातारि तैलेन युतं पुटित्वा
,,	,,	भावना	३३५ ध. तै. व वटि	क्रामणार्थं ३०९ आनंद वटिका.
,,	,,	अनुपान	१५ ताम्रपर्पटी	वातारितैलसंयुक्ता सर्वशूलनिवारिणी.
,,	,,	भावना	३९९ नागसिंदूर	मर्दयेद्वातारितैलेन । काचकुप्यां वालुकायंत्रे पाचयेत्।
,,	,,	अनुपान	४४१ वन्हिपुत्र	कोष्णमेरंड तैलं स्थात्सद्यो वातगदान्हरेत् ।
,,	,,	भावना	४४४ वन्हिभास्कर	विरेचकरसः
,,	,,	,,	३७९ सिद्धदरदामृत	
७ कटु	बीं	भावना	३५० इंद्रब्रह्मवटी	सर्वपोत्थेन तैलेन गंधक संयुतं पक्त्वा समुद्रय-वटी कारयेत् ।
,,	,,	ताळण्याक	३६७ खेचरी गुटी	पारदसारण करंजी तळणें
,,	,,	,,	१९ ताम्रपिष्टि.	
,,	,,	पाचन	१६८ तृप्तिसागर	कटु तैलेन रुध्वा वालुकायंत्रे चूल्यां विपाचयेत्।
,,	,,	,,	५९७ मूत्रकृच्छ्रांतक	तद्रोलं सार्षपे तैलें
,,	,,	भावन	४४१ वन्हिपुत्र	
,,	,,	पाचन	२१ योगामृत	
,,	,,	भावना	६७३ मृतोत्थापन	
८ कंगुणी	,,	,,	३५० इंद्रब्रह्मवटी	
,,	,,	,,	१७९ त्रिगंध	
,,	,,	,,	४५७ नीलरसायन	
,,	,,	,,	३७९ सिद्धदरदामृत	
,,	,,	,,	२५५ प्रभावतीवटी	
,,	,,	,,	३९९ ब्रह्मास्त्ररस	
,,	,,	,,	३६५ विषूचिरिरस	
,,	,,	,,	२५८ सन्निपातकृतान्तक	
९ कंपिल्ल	,,	,,	४९४ विरकालवक्त्रभैरव	
१० करंज	,,	अनुपान	४५ चंद्रकांतरस	
११ काकतुंडी	,,	नस्यानुपान	४६९ गांधारीवटी	तैलांत उगाळून नस्य देणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२	कार्पासी	,,	भावना	१९५ ज्योतिः पुंजरस	गजचर्मनाशनंलेप
१३	चांचन	,,		१ शकटाक्षकिट्टवटी	उदादार्थ चाचवं तैल
१४	चित्रक	?	पाचन	२५८ प्रदेभांकुशरस	२४ तासांत ४ तो. तेल जळेल इतक्या मंद विस्तवावर पान्याचें पाचन करावें.
१५	जयपाल	बीं	अनुपान	६७३ मृतोत्थापनरस	नेपाल–जेपाल–जयपाल–एकच अर्थवाचक.
			भावना	१०५ शिलासिंदूर	
	,,	,,	भावना	२५८ प्रदेभांकुशरस	
१६	जातीफल	बीं	भावना	२५८ प्रदेभांकुशरस	
१७	तिल	,,	आलोडन	१३० पारदादि लेप	तेलांत चूर्णें कालवून त्याची वात करून तैल पाडणें
	,, कृष्ण	,,	भावना	६९४ मृत्युंजयरस	
१८	त्रिफळा	,,	,,	४४६ गंधक पोटलीरस	
१९	देवद्रुम	नार	अनुपान	१४१ कांतरसायन	लीढं देवद्रुतैलैः
२०	निंब	बीं	भावना	२४० कालानल	
	,,	,,	,,	१०४ चित्रकारि	
२१	पलाश	बीं	अनुपान	५७४ मार्तंडीगुटी	क्रामणं प्रपिवेन्नित्यम् ।
	,,	,,	लेप	३८७ नागभस्मविधी	नागपंत्रास तेल, मनशीळ पारद, लेप देऊन पुट.
	,,	,,	भावना	३८९ ब्रह्मपंचर	तप्तखलां मर्दन.
	,,	,,	,,	३ शक्तिरस	पालाशतैलेन मर्दयेद्दिन सप्तकम्
२२	बाकुची	,,	अनुपान	८६ चर्मभेदीरस	
	,,	,,	भावना	४५ चंद्रकांत	
	,,	,,	,,	१०४ चित्रकारि	
	,,	,,	,,	१०५ चित्रनागन्तक	
२३	भल्लातक	,,	पारदमर्दन तैलजारण	२५५ अर्शकुठार	पारदमर्दन ३१० कुष्ठारि
	,,	,,	भावना	१६० राजवल्लभ	अनुपानार्थ २५५ प्रभावतीवटी
	,,	,,	भावना	१०४ चित्रकारि	भावना ६४६ व्रणान्तकरस
	,,	,,	स्वेदन	३०३ कुष्ठारि	स्वेदन ३१० कुष्ठारिरस
	,,	,,	भावना	३०५ शिलासिंदूर	
२४	मधुक	,,	भावना	४६५ सूचिकाभरण	मर्दयेद्दिवसत्रयम् ।
	,,	,,	भावना	३७९ सिद्धदरदामृत	
२५	विजया	,,	,,	२५८ प्रदेभांकुश	४४७ वाजीकरणयोग ५८३ वीर्यस्तंभनवटी भावना व भर्जन
२६	विष	सिद्ध	,,	२४० कालानल	
	,,	,,	,,	१०५ शिलासिंदूर	
२७	रसोन	कंद	लेपनार्थ	१४६ पाशुपतास्त्र	लशुनस्यच तैलेन (लेपनार्थे) ब्रह्मरंध्रे विलेपयेत् ।
	,,	,,	अनुपानार्थ	६७३ मृतोत्थापन	
	,,	,,	मर्दन	३१० कुष्ठारि	
२८	शिग्रु	बीज	भावना	२४० कालानल	
२९	समुद्रशोष	बीं	,,	२५८ प्रदेभांकुश	
३०	हृद्धात्री (मनशीळ)	सिद्ध	लेपनार्थ	३०६ कुष्ठारवीकुठार.	

ह्याशिवाय भा. भै. रत्नाकरांतील तैलें.

१	धत्तूरबीज	भावना	७९११ वीर्यस्तंभनवटिका. वै. जी.
२	बिभीतकमज्जा		५२९५ महानील तैल. भै. र. ग. नि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषधातुमलविज्ञान

अथ वायु:

(लेखक : गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य)

—लेखांक २—

वात शब्दाची निरुक्ति

तत्र 'वा' गतिगन्धनयोरिति धातुः । सुसु. २१।५

'वा' या गत्यर्थक धातूपासून व्याकरणाच्या विशिष्ट नियमानुसार वात हा शब्द तयार झाला आहे.

वाताचें स्वरूप—

शरीराचें जीवन चालण्यास, शरीरबाह्य जगांतील पांच भौतिक द्रव्यांचा संग्रह आणि त्यांच्या पचनक्रियांची आवश्यकता आहे. अन्न म्हणून घेतलेले परमाणू पचवून त्यापासून 'रस' निर्माण झाल्यावर तो रस हृदयाकडे नेणें, हृदयामार्फत परत तो सर्व शरीरभर पसरविणें, एका धातूंतून अन्य धातूकडे पोषक पदार्थ पाठविणें, धातूंचे मलिन घटक या त्या मलायनाकडे नेऊन त्यांचें शरिराबाहेर विसर्जन करणें या सर्व क्रियेंत गतीची आवश्यकता आहे. ही चालना अथवा गति वायूची आहे.

शरीराचे सर्व व्यापार वायूमुळें चालतात. रसादि धातूंची चक्राकार परिवृत्ति, श्वासोच्छ्वासाची क्रिया, अन्न खाल्ल्यापासून त्याला आंतड्यामार्फत पुढें ढकलण्याची क्रिया असे सर्व अंतर्व्यापार, किंवा शरिराचें चालणें, पळणें, ओझें उचलणें, असे. बाह्य व्यापारही वायूमुळेंच चालतात.

रूपरहित स्पर्शवान् वायुः ।

वायु दृष्टीला दिसत नाहीं. तो अव्यक्त आहे. पण कार्यावरून तो ओळखावयाचा असतो. तो 'व्यक्तकर्मा' आहे. वायूला विजेची उपमा देतां येईल. विद्युत् हा काय पदार्थ आहे ? तो दिसत नाहीं. पण कार्यावरून तिचें अनुमान करितां येतें. दिवा लागून प्रकाश देणें, गिरण्या चालविणें, दळणें, ट्रॅम्स्, रेल्वेगाड्या चालविणें, पंखे फिरवून थंडगार वारा घालणें, विहिरींतील खोल पाणी वर ओढणें, स्वयंपाक, करणें अशा विविध स्वरूपाच्या व जीवनोपयोगी कामगिऱ्या विद्युत् नित्यशः करीत असते. पण ती स्वतः कोणाला दिसत नाहीं. शहरभर तारेमधून तिचा प्रवाह सतत चालू असतो. म्हणूनच आपल्याला वरीलप्रमाणें उपयोग होतो. कधीं ती दीपाशीं निगडित होऊन प्रकाश देते, कधीं ती उष्णता देते, संबंधित पंख्याशीं झाली तर थंडगार वारा देते. आरोहकाशीं जोडली तर आपणाला ती तळमजल्यावरून वरच्या मजल्याला, किंवा वरून खालीं नेते. ज्याच्याशीं तिचा जसा संबंध येईल त्याप्रमाणें ती क्रिया करून दाखवते. अशीच स्थिति शरिरांतर्गत वायूची आहे. चलनवलनादि स्नायूंचे सर्व व्यापार, श्वसन, वाक्प्रवृत्ति, हृदयाचा संकोच, विकास, हे वायुमुळेंच घडतात. स्पर्श हा वायूमुळेंच. बाह्य अर्थांचा इंद्रियाशीं संयोग, धातूंचें वहन, 'अभिसरण' पित्तोत्पादन, अग्निप्रज्वालन, कफादि भावांची प्रवृत्ति, वियोजन, मलविसर्जन या क्रिया वायूच्याच आहेत. बुद्धीचे व्यापार, मनाचे व्यापार, विषयग्रहण, धारण, स्मरण इत्यादि मानसिक व शारीरिक असंख्य व विविधरूपी व्यापार करणारी जी शक्ति शरीर-परमाणूंचे आश्रयानें असते तिला वात म्हणतात. वात हें एक द्रव्य आहे या द्रव्याच्या आश्रयानें गति ही शक्ति असते. विविध तऱ्हेनें ती व्यक्त होते. त्रिधातुमध्यें वात हा प्रमुख आहे. कफ व पित्त यांनाहि सामर्थ्यसंपन्न करण्याचें कार्य वाताकडे आहे. त्यांच्या क्रिया शरिरांत होतात. पण त्या औपचारिक होत. त्या घडविणारा वायूच आहे.

रूक्षलघुशीत दारुणखरविशदाः षडिमे वातगुणाः भवन्ति ।
च. सू. १२।४

तत्र रूक्षो लघुः शीतः खरः सूक्ष्मश्चलोऽनिलः ।
वा. सू. १।१४

तस्य तद्वचनं श्रुत्वा प्राब्रवीद्द्विजवरः ।
स्वयंभूरेष भगवान् वायुरित्यभिशब्दितः ।

दमा हटतो

तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षे सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धाप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफ्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३॥, ६ व १० किंमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विकत मिळतें अगर

कारखानदार
डॉ. पुरोहित फार्मसी,
कोल्हापूर (एस. एम. सी.)

पुरोहित श्वासहारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वातंत्र्यान्नित्य भावाच्च सर्वगत्वात्तथैव च ।
सर्वेषामेव सर्वात्मा सर्वलोकनमस्कृतः ।
स्थित्युत्पत्ति विनाशेषु भूतानामेष कारणम् ।
अव्यक्तो व्यक्तकर्माच रूक्षः शीतो लघुः खरः ।
तिर्यग्गो द्विगुणश्चैव रजोबहुल एव च ।

यासाठीं वायु 'स्वतंत्र' आहे असें म्हटलें जातें. आपलीं कर्मे करण्यास त्यास दुसऱ्या कोणाकडूनही प्रेरणा घेण्याची जरूरी पडत नाहीं. उलट त्याच्यामुळेंच सर्वांना प्रेरणा मिळते.

वायु रजोबहुल आहे. त्रिगुणात्मक असूनही वायूंत रजोगुणाचें आधिक्य आहे. याच गुणामुळें वायूला चल गुणाचा असें म्हटलें जातें. सर्व भावांना अथवा पदार्थांना प्रवृत्ति या रजोगुणामुळें मिळते. मनांत रजोगुण प्रगट झाला म्हणजे मन एका विषयावर स्थिर राहात नाहीं. या विषयावरून त्या विषयावर, दुसऱ्यावरून तिसऱ्या—अशा तऱ्हेनें सारखें गमन करीत असतें. पदार्थाचें एकास्थानीं बसणें याला स्थैर्य अथवा स्थिरत्व असें म्हणतात. एका स्थळापासून दुसऱ्या स्थळीं जाणें याला चलत्व असें म्हणतात. हर्ष कामादिक राजसभाव यामुळेंच मनांत निर्माण होत असतात. मनाचे व्यापारावरून जरा स्थूल देहाच्या व्यापारासंबंधीं आपण ज्या वेळीं बोलतों त्यावेळीं ही भाषा बदलून वायु अशी भाषा बोलली जाते.

चलत्व वा स्थिरत्व हे गुण सापेक्षत्वानें बोलले जातात. पशु, पक्षी एका स्थलापासून दुसऱ्या स्थलीं जातात. म्हणून ते गतिमान किंवा चल आहेत. दगड, किंवा त्यांजपासून बांधलेल्या इमारती जागच्या जागीं स्थिर आहेत. असें आपण म्हणतों. पण भूगोल हा सारखा आपल्याभोंवतीं अहोरात्र गतीनें फिरत आहे. तसाच तो सूर्याभोंवतींही फिरतो. म्हणजे त्याच्या गतींत गति आहे. पर्वतांतील परमाणू समुदायांतही अशीच गतिमत्ता आहे, परमाणूंतील विद्युत्कणही असेच गतिमान आहेत. अशी वातशक्ति अथवा गतिमत्ता प्रत्येक सृष्टद्रव्यांत आहे. गती अथवा हा रजोगुण हें स्थूल मानवी सृष्टीचें आदि तत्त्व आहे.

आपल्या शरिराची हीच स्थिति आहे. त्याला 'नित्यग' असें संबोधिलें जातें. क्षणाक्षणाला तें गमन करीत आहे. ज्या द्रव्यांना अर्थात् सापेक्षतेनें गति नाहीं असें आपण संबोधतों त्यांचा चालक किंवा प्रेरक वायूच असतो. या वैद्यकशास्त्रांत 'रस' 'शोणित' असे शब्द वापरले जातात. हे गत्यर्थक धातूपासून बनलेले आहेत. तत्र 'रस' गतौ धातुः, अहरहः गच्छति इति रसः। रस रक्तांत जी गती आहे ती वायूचीच असते. आहार्य म्हणून घेतला गेलेला प्रत्येक पदार्थ अन्न, पाणी अथवा हवा तोंडांत घातल्यापासून तो शरीरपरिणामभावाप्रत पोंचेपर्यंत त्याच्या परमाणूंत एकसारखी गती असते. ते आहारस्थानांतून रसांत जातात. तेथून त्यांना धातुरूप प्राप्त होतें. धातू म्हणून कांहीं काळ ते असतात. ती कालमर्यादा संपली कीं तो धातू-हीनकस टाकाऊ मल होतो. व मग हे परमाणू मल म्हणून शरिरांतून बाहेर टाकले जातात. यांत प्रारंभापासून अखेरपर्यंत अव्याहत व एकसारखी गति आहे. ह्या गतीवरच शरीरव्यापार चालतात. ही गती वाताची म्हटली जाते. इंद्रियांनीं आणलेल्या बाह्य विषयाचें ज्ञान आपल्या बुद्धीला कळतें. त्याला कारण गतीच आहे. रूपरसादि ग्रहण करणाऱ्या धमन्यांवर बाह्य विषयांचा परिणाम होऊन त्यावर एकप्रकारची विशिष्ट गति निर्माण होऊनच आपणाला ते ते विषय समजतात. हातापायांच्या बाह्य हालचाली किंवा अंग, हृदयादिकांचे अंतर्व्यापार यांतही गतीच आहे. ही गति अथवा गतिमत्ता ज्या शरिरद्रव्याच्या आश्रयानें राहतें त्याला 'वायु' असें म्हटलें जातें. अंतर्बाह्य सर्व हालचालींना जी जी प्रेरणा मिळते ती वायूच्या 'चल' अथवा रजोगुणाची द्योतक असते.

गुरुशीत रसस्निग्ध मंद सूक्ष्म मृदु द्रवम् ।
औषधं स्नेहनं प्रायो विपरीतं विरूक्षणम् ॥ वा. सू. १६
रूक्षं खरत्वं वैशद्यं यत् कुर्यात्तद्धि रूक्षणम् ।
च. सू. १२।१०

स्नेहमार्दवकृत्स्निग्धो बलवर्णकरस्तथा ।
रूक्षस्तद्विपरीतः स्याद्विशेषात्स्तंभनः खरः ॥—सु. सू. ४६

रूक्ष हा एक वायूचा गुण आहे. रजोगुणाला परिपोषक तो असतो. कषायकटु तिक्त रसाची कडुनिंब, खैर हीं द्रव्ये वैद्यकशास्त्रांत रूक्ष म्हटलीं जातात. त्याचप्रमाणें वायु हाहि रूक्ष आहे. रूक्ष गुणाचें कार्य शोषण करणें हें आहे. पचनमार्गांत अन्नावर क्लेदक कफाच्या स्निग्ध गुणाचें कार्य होऊन अन्नाचे घटक क्लिन्न होतात. त्यांतील परमाणूंचे संयोग विस्कळित होतात. संघात मोडतात. विद्रावित होतात. व त्यामुळें प्रत्येक परमाणूवर अग्नीची क्रिया होण्यास सोपें जातें. पचनकार्य झाल्यावर यांतील क्लेदाचा भाग वायूच्या सहाय्यानें पक्वाशयांमधील स्रोतसामार्फत घेतला जातो. व त्यामुळें शेष उरलेला भाग ज्याला आपण पुरीष म्हणतों तो घन बनतो. त्याला पिंडीभाव प्राप्त होतो. यांत वायूच्या रूक्ष गुणाची क्रिया दृष्टीस पडते. याचप्रमाणें तोंडांत निर्माण होणारी लाळ, अंगांत उत्पन्न होणारें पित्त, किंवा मूत्राशयांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसणारें मूत्र हें सर्व रक्त किंवा मांसादि धातू हे ज्या प्रमाणांत क्लिन्न ठेवण्याची आवश्यकता आहे त्या प्रमाणांत ठेवले जातात. त्यांतील फाजील क्लेदाचें शोषण केलें जातें.

शोणितं स्वाग्निना पक्वं वायुमात्र घनीकृतम्

तदेवमांसं जानीयात् स्थिरं भवति देहिनाम् ॥ च. चि. २५

शोणितावर धात्वग्नीकडून पचनकार्य होतें. वायूमुळें तें घन होतें. त्याला मांस म्हणतात. तें स्थिर असतें. ह्या क्रियेला अग्निजलाप्रमाणें वायूचीही मदत लागते. मृत्तिकेपासून घट बनवीत असतांना मातींत पाणी (क्लेद) घालून मातीचा गोळा करून त्यापासून घट केला जातो. प्रथम तो जास्त ओला असतो म्हणून कांहीं काळ सुकत ठेवावा लागतो. मग त्याला विशिष्ट घनत्व आल्यावर तो अग्नींत घालून पक्व केला जातो. घट करण्यांत जें वायूचें शोषणकार्य झालें त्या वायूच्या गुणाला रूक्ष गुण असें म्हणतात. साकारत्व येण्याला प्रत्येक द्रव्यांत विशिष्ट प्रमाणांतच क्लेदाचा अंश लागतो. तितका ठेवण्याचें कार्य वायू करितो. अधिक असलेला क्लेद रूक्ष गुणामुळें शोषून टाकला जातो. शोषणाऱ्या क्रियेंतही एक प्रकारची गति आहे व ही गती वायूचीच आहे. शरिरांत वायूचा रूक्ष गुण फाजील वाढला तर स्रोतसामधून त्या त्या द्रव्याचें गमन होणार नाहीं. नाकांतून हवा जाण्यास अडथळा होईल. तोंडांत रूक्ष गुण वाढला तर अन्नाचा घास गिळता येणार नाहीं, बोलतां येणार नाहीं. आंतड्यांतून अन्न पुढें ढकललें जाणार नाहीं. मूत्र,वात, पुरीष यांची प्रवृत्ति सुखानें होणार नाहीं. त्या त्या स्रोतसांत योग्य तितक्या प्रमाणांत क्लेद पाहिजे.

लघु----

द्रव्यस्य लंघने कर्मणि शक्ति लघु :—वा. सू.

ज्या गुणानें शरिराला हलकेपणा येतो त्याला लघु असें म्हणतात. लघुद्रव्यानें देह वृद्ध होत नाहीं, मनाची तृप्ति होत नाहीं किंवा बल वाढत नाहीं. उलट शरीर कृश होतें. बळ कमी होतें. तिक्त, कटु आणि आम्लरसात्मक द्रव्यें प्रायः लघु असतात. जीवन जगण्यास रोज जशी अन्नाची जरूरी आहे तशीच शरिराची झीज होण्याचीही जरूरी आहे. रोजच्या रोज धातूचा क्षय होणें व तो परत आहारानें भरून येणें यालाच जगणें असें म्हणतां येईल. धातूंचे अपकर्षण, वायूच्या लघु गुणामुळें होतें.

(२) ऊर्ध्वगामी द्रव्यें लघु असतात. वायु व अग्नि भूयिष्ट द्रव्यें ऊर्ध्वगामी असतात व पृथ्वी जल भूयिष्ट द्रव्यें अधोगामी अतएव गुरु असतात. मदनफळ ऊर्ध्वगामी आहे. लघु आहे. तसेंच सुगंधी द्रव्यें लघु असतात. कर्पूर, दालचिनी, लवंग, जायफळ, वेलदोडे, यांची तैलें,स्पिरिट वा क्लोरोफॉर्म असे पदार्थ लवकर उडून जातात. शरिरांत गेल्यावर हे पदार्थ अग्निसंपर्कानें पचन झाल्यावर फुफ्फुसावाटें म्हणजे ऊर्ध्वमार्गानें बाहेर पडतात व बाहेर जातां जातां त्या मार्गावर अनुकूल वा प्रतिकूल कार्य करितात.

(३) जें द्रव्य पचावयास सोपें किंवा लवकर पचलें जातें त्याला लघु असें म्हणतात. लघुपाकी द्रव्यामुळें लवकर भूक लागते. अग्नि प्रदीप्त राहतो. उदाहरणार्थ साठेसाळी.

(४) लघु-पाक गुरू व लघु असे दोन पाक आहेत. मधुरविपाकाला गुरू व कटुविपाकाला लघु असें म्हटलें जातें. जाठराग्नीच्या संपर्कानें ज्या द्रव्यांचें पचन होऊन ज्या पाकांत तेज, वायु व आकाश यांच्या गुणांचीच उत्पत्ति अधिक होते, त्याला लघुपाक किंवा कटु असें म्हणतात.

या चार अर्थांपैकीं पहिला जो अर्थ तो शरीरस्थ वाताच्या दृष्टीनें मुख्यतः घेतला जातो. लंघन शरीराला घडलें तर मेदादि धातू क्षीण क्षीण होऊन कृश होत जातात. त्यामुळें शरीर हलकें बनतें. या लंघनांत धातूंचा नाश आहे. धातूंची क्रमाक्रमानें झीज होऊन त्यांचें पर्यवसान धातूमलांत होत जातें. ही लंघनावस्था वातवर्धक असते. या ठिकाणीं वाताच्या शक्तीचा विनियोग संघटनेकडे न होतां तो उलट विघटनेकडेच जास्त केला जातो. यांत वायूची जी गति असते, त्यावरून वातवृद्धीचें अनुमान केलें जातें.

शीत

शीत हा एक वायूचा गुण आहे.

ल्हादनः स्तंभनः शीतोमूर्च्छातृट्स्वेद दाहजित् ।

—सु. सू. ४६

स्तंभनं स्तंभयति यद्गतिमंतं चलं ध्रुवम् ।—च. सू. २४

स्तंभने हिमः । वा. सू. १ हे.

स्तंभन करण्याची जी शक्ति तिला शीत असें म्हणतात. ही शक्ति वाताची आहे. आमाशयांत, व पच्यमानाशयांत अग्नीची क्रिया अन्नावर होईपर्यंत तें अन्न थोपवून धरावें लागतें. अन्न पचल्यानंतर त्यांतून अन्न रस ग्रहण होईपर्यंत तें अन्न ग्रहणींत धारण करून ठेवावें लागतें. ह्याच्या उलट तें शीघ्र गतीनें पुढें निघून गेलें तर अतिसार हा विकार होईल व शरीराला पोषक असा रस मिळणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूत्राशयांतील मूत्र, तो आशय भरेपर्यंत थोपवून ठेवण्याचें कार्य या स्तंभन गुणामुळेंच होतें. शरीरांतील व्यापार व्यवस्थित चालण्यास कांहीं भागाचा रस रक्तादिकांचा पुरवठा थोपवून ठेवावा लागतो. पचनकाळीं अन्तरभागाकडे हा प्रवाह जातो. व्यायामामध्यें अंतकोष्ठींतील प्रवाह बंद करून तो शाखेंत नेला जातो. याप्रमाणें प्राकृतिक व्यापार चालण्यास या स्तंभन गुणाचा उपयोग होतो. शरिरांतून विविध मलायनावाटें कफपित्तादि मल बाहेर पडत असतात. पण त्यांतील शरीरधारणास, व व्यापार चालण्यास उपयोगी तेवढे मल थांबवून धरून बाकीचे बाहेर टाकले जातात. असें स्तंभन कार्य प्राकृत स्थितींत वाताला करावें लागतें. तें ज्या गुणानें होतें त्याला शीत असें म्हणतात.

(२) शीत व उष्ण असे स्पर्शही असतात. त्यांतील शीत हा वाताचा. शीत व उष्ण हे स्पर्श सापेक्ष असतात. थंड पाणी हें उष्ण पाण्यापेक्षां शीत आहे. पण बर्फापेक्षां उष्ण आहे. वात हा शीत आहे. पण त्यापेक्षां कफ अधिक शीत आहे. आर्यवैद्यकांत वायूला शीत म्हटलें आहे. कणादादिक वायूला अनुष्णशीत असें मानतात. तो उष्णही आहे, शीतही आहे. योगवाही आहे. तेजाबरोबर संमिश्र झाला म्हणजे तेजाच्या उष्ण या गुणाची वाढ करितो–तो जलाशीं संयुक्त झाला कीं वायूंतील शीत गुण प्रस्फुट होऊन तो जलाच्या शीत ह्या गुणाची वृद्धि करितो. शीत व उष्ण असे दोन्हीही गुण दाखविणारा वायू आहे. उन्हाळ्यांतील आतपाच्या संयोगानें वाहणारे वारे आपणाला जास्त ताप देतात. तसेंच पर्जन्यकाळीं पावसाचे परमाणू घेऊन येणारे वारे अत्यंत शीत असतात.

योगवाहः परंवायुः संयोगादुभयार्थकृत् ।
दाहकृत्तेजसा युक्तः शीतकृत् सोमसंश्रयात् ॥

–च. चि. ३।३८

यास्तव वायू हा ज्याच्याशीं मिश्र होईल त्याचे गुण दर्शविणारा म्हणजे योगवाही असें म्हटलें जातें. पण संयुक्त नसतांना, केवळ असंयुक्त वाताचा गुण शीत आहे असें वैद्यकशास्त्राचें म्हणणें आहे. तेजाशीं संयुक्त असला म्हणजे दाह करितो. पण त्यांतील शैत्य नसतें असें कांहीं म्हणतां येत नाहीं. त्यांत शैत्य असतें पण तें त्यावेळीं प्रगट होत नाहीं इतकेंच. वैद्यक हें चिकित्सेचें शास्त्र असल्यामुळें वायूवर शीतगुण ठेवतांना शीतानें वात वाढतो व उष्णानें त्याचें शमन होतें हें मुख्यतः येथें दाखवावयाचें आहे. शैत्यामुळें वात वाढतो. शीतकालांत बाह्य शैत्याशीं झगडण्यासाठीं शरीराला अधिक झीज सहन करावी लागते. शीत स्पर्शामुळें अंगावर रोमांच उभे राहतात. अंगांत हुडहुडी भरून अंग कापूं लागतें. खालचा जबडा वरच्या जबड्यावर आदळून दांत वाजूं लागतात. ही सर्व हालचाल वाढविल्याखेरीज बाह्य शैत्याचा प्रतिकार होत नाहीं. हालचाल वाढली कीं वाताची क्रिया अधिक झाली, वात वाढला. या सर्व हालचालींत उष्णता निर्माण होते व ती बाह्य शीतता कमी करण्यास उपयोगी पडते. यांत शैत्यानें शरीरस्थ वाताची वृद्धि झालेली असते.

सूक्ष्म–

विवरणे सूक्ष्मः । हे.

सूक्ष्मस्तु सौक्ष्म्यात् सूक्ष्मेषु स्रोतः स्तनुसरः स्मृतः ।

–सु. सू. ४६.

वायू स्थूल नाहीं, उलट सूक्ष्म आहे. सूक्ष्म म्हणजे सूक्ष्म स्रोतसांत प्रवेश करणारा. आंतड्यांमधून अन्नरस घेऊन हृदयाकडे जाणाऱ्या रसवाहिन्या प्रारंभीं अतिसूक्ष्म असतात. अशा अत्यंत सूक्ष्म स्रोतसांत जाण्यास वायूला प्रवेश मिळूं शकतो. सर्वच स्रोतसें प्रारंभीं सूक्ष्म असतात. त्यांत प्रवेश मिळण्यास सूक्ष्म व्हावें लागतें. हें सूक्ष्मत्व म्हणजे सूक्ष्म स्रोतसांत प्रवेश मिळण्याचें सामर्थ्य ज्या द्रव्यांत असतें त्या द्रव्याला सूक्ष्म असें म्हणतात. स्थूलस्रोतसांत स्थूल द्रव्याला हा प्रवेश मिळूं शकतो. पण सूक्ष्म स्रोतसांत त्याला प्रवेश मिळूं शकत नाहीं. सूक्ष्म स्रोतसांत विवरण व्हावें लागतें. संकुचित असलेल्या किंवा झालेल्या स्रोतसांचें विकसन करण्याचें सामर्थ्य स्थूलांत नसतें. याच्या उलट सूक्ष्म स्रोतसांचें विकसन करण्याचें सामर्थ्य सूक्ष्मांत असतें. त्यामुळें सूक्ष्माला त्या स्रोतसांत प्रवेश मिळूं शकतो, स्थूलाला मात्र मिळत नाहीं. दूध व तेल हीं दोन्हीही द्रव्यें आहेत. पण त्यांत दूध हें स्थूल आहे व तैल हें सूक्ष्म आहे. संकुचित स्रोतसांत दुधाला प्रवेश मिळत नाहीं; पण तैलाला मिळतो. स्थूल व सूक्ष्म हे गुण आकारावर नाहींत, द्रव्यस्वभावावर आहेत. खडीसाखर किंवा मिठाचे खडे आपण पेलाभर पाण्यांत टाकले म्हणजे क्रमाक्रमानें ते पाण्यांत मिसळतात. प्रथम पाणी पाण्यासारखें लागेल. मग जरा खारट लागेल. जरा वेळानें तें अधिकच खारट लागेल. जसजशी साखर किंवा मीठ पाण्यांत मिसळतील त्याप्रमाणें गोडपणा किंवा खारटपणा वाढत जातो. यांत साखरेचे परमाणू सूक्ष्म होत जातात. पाण्याच्या परमाणूंत त्यांना अवकाश मिळतो. व साखरेचे किंवा मिठाचे खडे दिसेनासे होतात. त्यांना जलपरमाणूंत अवकाश मिळेल इतकें सूक्ष्मत्व लाभूं शकतें. पाण्यांत विद्रावित होणें येवढीच कल्पना सूक्ष्मत्वांत नाहीं. अन्नाचें घटकरसांत विद्रावित होऊन सूक्ष्म अथवा केशाकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…हिनींतून सहज वावरूं शकतील इतकें सूक्ष्मत्व त्यांना किंवा …रीरांत वावरणाऱ्या प्रत्येक द्रव्याला यावेंच लागतें. पण …धातूपेक्षां रक्तधातूवह स्रोतसाचीं मुखें सूक्ष्म आहेत. …तापेक्षां मांसवह स्रोतसाचीं मुखें सूक्ष्मतर आहेत. त्यापेक्षां …दोवह व अशाच तऱ्हेनें अस्थिवह–मज्जावह व सर्वांत …क्ष्मतम शुक्रवह स्रोतसांचीं आहेत.

सूक्ष्मसूक्ष्मतरास्येषु दूरदूरतरेषु च ।
दोषोरक्तादि मार्गेषु शनैरल्पश्चिरेण यत् ॥ सं. नि. २

हें सूक्ष्मत्व येण्यास रसांमधील घटकपरमाणूवर पचन …किंवा संस्करण व्हावें लागतें. असें पचन रूपांतर सूक्ष्मत: …तसजसें होत जाईल तसतसें त्यांना पुढच्या पुढच्या धातूंतील …स्रोतसांत प्रवेश मिळत असतो. असें सूक्ष्मत्व येणें याला …सूक्ष्म म्हणतात. सर्वांत मनोवह स्रोतसें सूक्ष्म आहेत.

दोषा: प्रकुपिता: हृदयमुपसृत्य मनोपहानि
स्रोतांस्यावृत्य जनयन्त्युन्मादम् ॥—च. नि. ७।४

म्हणजे मनापर्यंत किंवा आत्म्यापर्यंत पोंचण्यास अधिक सूक्ष्मतम सारतम रूप यावें लागतें. याला सूक्ष्म म्हणतात. …पिंपळी, तैल, मद्य, पारद, हीं द्रव्यें सूक्ष्म आहेत. यांचेप्रमाणें वायूही सूक्ष्मतम स्रोतसांचें विकसन करून प्रवेश स्वत: मिळवूं शकतो व आपल्याबरोबर त्यानें आणलेल्या कफ, पित्तांनाही त्यामुळें या सूक्ष्म स्रोतसांत अवकाश सांपडतो. …मांस, दूध, तूप या द्रव्यांत बृंहण करणारा गुण आहे. पण …तीं पुढच्या पुढच्या धातूंत शिरावयास हवींत. त्यांच्याबरोबर मद्य तैलादिक सूक्ष्म द्रव्यें असलीं म्हणजे सूक्ष्मत्वामुळें संकुचित स्रोतसांचें विकसन करितात. व मग या बृंहण करणाऱ्या द्रव्यांना त्या त्या स्रोतसांत अवकाश सांपडतो. ही सूक्ष्मत्वाची क्रिया प्राकृतिक स्थितींत त्रिधातूंपैकीं वात हा करीत असतो.

वातपित्तश्लेष्मणां पुन: सर्वं शरीरचराणां सर्वाणिस्रोतांस्ययन भूतानि ॥——च. वि. ५

खर—

लेखने खर: ।
धातून्मलान्वा देहस्य विशोष्योल्लेखयेच्च यत ।
लेखनं तद्यथाक्षौद्रं नीरमुष्णं वचायवा: ।—भा. प्र.

खर हाही एक वाताचा गुण आहे. खर म्हणजे खरखरीत. खरखरीतपणा आपणाला स्पर्शानें समजूं शकतो. सागाचें पान, घाणेरीचें पान, किंवा गाईची जिव्हा यांना आपला हस्तस्पर्श झाला कीं ते पदार्थ आपणाला खरखरीत लागतात. आपलीं हाडें खरखरीत लागतात हा खर स्पर्श वाताचा आहे. काणस पॉलिश किंवा सँडपेपरनें पदार्थावर घासले म्हणजे त्या पदार्थाचा नाश होतो. हीच क्रिया शरिरांतर्यामीं पहावयास मिळते. वायूच्या खर गुणामुळें धातू किंवा ज्यांना पुढील मल हें रूप प्राप्त झालें आहे त्यांची शरिरांत फाजील वाढ होत नाहीं. संचय झाला कीं लगेच त्याचें निर्दालन केलें जातें. वायूच्या या तासण्याच्या क्रियेमुळें वृद्ध धातू शिथिल होतो व त्याचें साम्य प्रस्थापित केलें जातें. शरिरांत धातूंची फाजील वाढ होऊं न देण्यास या खर गुणाची आवश्यकता आहे. तसेंच हीणकस मलस्वरूपाला पोंचलेले धातू प्रसादभूत धातूपासून त्यांचे संधी सोडवून काढण्याची, दुखवून विलग करण्याची जरूरी असते. त्याशिवाय शरिरांतील मल सुटणार नाहींत. शरीरशुद्धी व्यवस्थित होणार नाहीं. हें करण्याचें कार्य प्राकृतिक स्थितींत वायू आपल्या या खर गुणामुळें करीत असतो.

खर गुण जास्त झाला, तर वायूची लेखनक्रिया अधिक होते व त्यामुळें धातूंचा नाश अधिक होतो व धातूंना शैथिल्य येतें. धातू परमाणूमध्यें परस्पर जो निबिड संधि असतो तो सैल अथवा शिथिल होतो. त्यामुळें ते संघटित राहूं शकत नाहींत.

याचे उलट शरिरांत धातूंची फाजील अधिक वाढ झाली तर झालेली वाढ कमी करण्यासाठीं लेखन औषधें द्यावीं लागतात. यव, वावडिंग, यवक्षार, रसांजन, मध, त्रिफळा हीं औषधें पोटांत घेतलीं असतां मलादि धातुशुद्धी व तज्जन्य ग्रंथी, अर्बुदादि विकार लेखनकर्म करून कमी करतात.

लेखन हें एक शस्त्रकर्म आहे. व्रणांतील फाजील मांसांकुर, किंवा पापण्यांना झालेल्या खुपऱ्या आपणास लेखनकर्म करून काढून टाकतां येते किंवा हिराकस, सैंधव, रसांजन, करंज फळ यांचीं चूर्णें उत्सन्न मांसावर टाकून त्याचें अवसादन करतां येतें. खर द्रव्यें अशींच पण पोटांत देऊन–आपल्या वीर्यानें रूक्ष गुण वाढवून फाजील झालेली धातूंची वाढ कमी करितात.

दारुण–दारुण हा एक गुण चरकांनीं सांगितला आहे. पण चरकाच्या म्हणण्याप्रमाणें (दारुणत्वं चलत्वं) त्याचा अंतर्भाव चल गुणांत होतो. किंवा दारुण याचा अर्थ कठिण असा कित्येक वेळां होतो. (शोषणत्वात् काठिण्यम्) पण वायूच्या रूक्ष गुणामुळें द्रवाचें शोषण होऊन त्या द्रव्याला काठिण्य येत असते. रूक्ष गुणाशीं दारुण गुण सदृश समजला तरी चालेल.

विशद–

पिच्छिलो जीवनोबल्य: सन्धान: श्लेष्मलो गुरु:
विशदोविपरीतो ऽस्मात् क्लेदाचूषणरोपण: ।
—सु. सू. ४६

हा एक वाताचा गुण आहे. विशद म्हणजे स्वच्छ. यानें जीवन, संधान, कफवर्धन, बलवर्धन हीं कार्यें होत नाहींत. यानें क्लेदाचें शोषण होतें. व्रणांतील पूं, स्राव बंद होतात व व्रण भरून येण्याचे मार्गास लागतो. रूक्ष व लघु या गुणांचीच हीं संमिश्र कार्यें आहेत.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

RASA GUNA VEERYA VIPAKA PRABHAVA

(The second Charcha-parishada has fixed this subject for discussion and the following view is submitted by Dr. N. R. Apte, M. B., B. S. for consideration in the Parishada.)

1. The most important thing to be taken note of at the start, to my mind, is the determination of whether the above terms are the 'properties' (gunas) of all the 'dravyas' (substances) in the world, as stated both by Wagbhata (Soo: 9/10) and Charaka (Soo 26/12),

"Jagatyewam anoushadpibhootam na kinchit vidyate dravyam"

जगत्येवमनौषधिभूतम् न किञ्चित् विद्यते द्रव्यम्

"Anena upadeshena nanaushadhibhootam jagati kinchit dravyam upalabhyate tam tam yuktim artham cha tam tamabhipretya"

अनेनोपदेशेन नानौषधिभूतम् जगति किंचितद्रव्यमुपलभ्यते तां तां युक्तिमर्थं च तं तमभिप्रेत्य॥,

or they are supposed only to be the descriptions of 'karya-dravyas' (formed substances) which are principally used by man as his 'Food' (*ahara*) or 'Medicine' (*oushadhi*) :

[I may here mention my own view that it should, or might, also be possible for 'ayurvedists' to describe the 'Veerya' (potency) etc. of other types of 'dravyas' which come in contact with man through his environment (*vihara*), but the science of Ayurveda having left this subject to be] treated by *Atharva Veda*, does not describe them in detail; Yet, to those who have an acquaintance with modern bacteriological diseases, the different reactions in the body caused by the Bacilii of Diphtheria, Typhoid and Dysentery, although their port of entry into the body is the same, might give an idea of how these bacteria can actually be considered as 'dravyas' having a specific type of influence on the body-processes, and lead mainly to the derangement of the Kapha Pitta or Vata, respectively. This derangement, however, not going through the usual processes of Chaya (accumulation), Prakopa (absorbability), Prasara (circulation in the body) Sthan-samshraya (lodgement) etc ,— or going through the processes very very rapidly as in some other bacterinal diseases—Ayurveda, quite correctly, styled them as "*Achayapoorva Prakopas*" (absorbption without accumulation) and styled the diseases caused by them as *agantu* (environmental) i. e. where the symptoms appeared first, and the derangement of the 'Dosha' appeared only later.]

Personally I would like to emphasize that the 'Rasa—Veerya etc. are restricted to the usual *ahara* (food) and *oushadhi* (drugs) of man, and just as no one imagines them to be the attributes of the Nyaya Vaisheshika dravyas like Dik,(Space or Void) Kala (Time) Atma (Self or Soul) and Mana (Mind), so also it should be taken that the above quotations from both Vagbhat and Charaka are only in the nature of exaggerations (it may be possible to justify them only in the ultimate sense, and not in everyday practice,) to be taken only in the broad sense, their exaggerated nature being put down to **Arthawada.**

The simple fact of everyday occurrence that dravyas like certain fruit-seeds, or paraffin oil, do not act in the body, or on the body, by either of their Rasa-Guna etc.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

properties), or, in modern scientific parlance, are 'inert' substances, should be enough to convince one of the truth of this statement. Charaka himself has stated at another place (SOO: 1/44) that the 'bhavas' (Dravyas, Gunas and Karmas) lead to an increase in the 'similars' or a decrease in the 'dissimilars' *only if* both of them get an entrance and *position* in the body;

....सर्वदा सर्व भावानां सामान्यं वृद्धिकारणं, ह्रास हेतुर्विशेषश्च प्रवृत्तिरुभयस्य तु ।

and this entrance can obviously be from either the Mahasrotas (alimentary canal or intestines etc.) or the other ports of entry described in the verse:—

"Prasangat, Gatrasamsparshat, Nishwasat Sahabhojanat, Saha–Shayya–Sanat Chapi Gandha–Malyanulepanat. Oupasargika Rogashcha Sankramanti Narannaram."

प्रसङ्गाद्गात्रसंस्पर्शान्निश्वासात् सहभोजनात् । सहशय्यासनाच्चापि वस्त्रमाल्यानुलेपनात् औपसर्गिकरोगाश्च संक्रामन्ति नरान्नरम् ।। सु. नि. ६।३४.

[By close contact (congress), by contagion of limb, through the breath, by partaking of food in the same dish, by the use of the same bed or seat or by using the same cosmetics or garlands contagious (infective) diseases spread from man to man. Followers of the modern scientific medicine would not fail to observe the very complete definition of 'fomites' and transference of 'droplet infections' etc. in this definition.]

which defined how the 'doshas' entering in these ways caused what were termed Agantu, 'Environmental', diseases which apparently caused symptoms without the usual Chaya–Prakopa etc. referred to above, and the 'inert' dravyas obviously had no 'Pravrittihi' प्रवृत्तिः (position and absorption) in the body, **in any way.**

The Dravyas

If we conclude, therefore, that the descriptions of definitions given by the above terms,

रस **Rasa** : Taste (?)

गुण **Guna** : Physical or chemical properties, controlling, physiological or pharmacological action.

वीर्य **Veerya** : Potency

विपाक **Vipaka** : Change brought about in the body which in some instances apparently changed the chemical structure or physical arrangement of its molecules so as to give it a physiological or pharmacological action different than the one inferred by its crude classification based on 'Taste' alone.

प्रभाव **Prabhava** : Specific action which is inexplicable;

are only restricted to the 'food' and 'drug' (Aharya and Oushadhi dravyas)—(We have already seen why no arrangement was apparenty made for the classification of the 'Vihar' or 'environmental' dravyas,) we may refer to the controversy of some importance which seems to have been raised atleast from the time of the compilation of the 'Sushrut–Samhita' namely:

"What was of more importance? the substance or the properties like the Rasa" etc.

द्रव्यं प्रधानं....रसास्तु प्रधानं....वीर्यं प्रधानम्.... कस्मात्? सु. सू. ४०।३,४,५

In this connection I would here like to put before the 'Parishada' my humble view that the controversy is wholly redundant, and probably arose as a result of the encroachment on the field of Ayurveda of commentators who tried to 'interprete' the exitsting Ayurveda with a 'bias' for the views of a

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

particular Philosophy, of which they were authorities; (we may observe the same trend existing even to-day). To my mind it should be obvious that so far as the science of Ayurveda was concerned it always considered the 'ultimate' 'gunas' (final transformation of a *functional* kind) properties of a substance to be of most importance, as might be justifiably inferred from the explicit statement:—

"Parinamatastu Aharasya **Gunaha** Shareera-**Guna**bhawam Apadyante Yathaswam **Avirudhdhaha** :" (Charaka : sha 6/16.

परिणमतस्त्वाहारस्य गुणाः शरीर गुणभावमापद्यन्ते यथास्वमविरुद्धाः च. शा. ६।१६.

as stated by Charaka : It would be observed that this definition very admirably states the basical principles of 'dietetics'—and also, inferentially, of pharmacology—even of the modern scientific systems. Thus the 'guna' (or operative property) like Rasa, Veerya or Vipaka being important in Ayurveda, (especially, as we shall see, the **guna** 'Rasa,') it became a sort of a "*swa–samdnya*" (a connotation ascribed to a word which is applicable when the word is used in that science only; its meaning when used by other sciences may be quite different.) and, as the Rasa of a dravya (substance) gave the ayurvedic physician his first idea and estimate of the probable actions of a substance in the body, the RASA came to be known as the 'operative guna' (something akin to the 'alkaloid' of modern scientific pharmacology which is known as the "active principle"), although in the language of the philosopher-commentator the **property Rasa**, could not exist apart from its supporting dravya substance, and thus came to be described as having "actions" of its own.

Unfortunate as it is, what seems to me to be the short-sightedness or bias of commentators has resulted–and thus, incidentally, has helped the above controversy in getting a firm footing,—in a very 'superficial' type of meaning being ascribed to the word 'Rasa.' It became conclusively, and **alone**, the Rasana-grahya (knowable by tongue) guna (property) and no longer remained what it probably must have been in Ayurveda; (Yatha) Rasati-iti-rasaha; ("How enters, and is circulated, i. e. with what type of a complex which would be 'operative'); Instances of this kind of meaning of the word 'Rasa' would not be difficult to find, and, as we shall see in dealing with the 'rasa', it can be supported by irrefutable arguments; If this definition of the word 'rasa' is accepted much of the controversy raised by unnecessarily accepting the restricted and cramped meaning (Rasa is a 'guna' which could **only** be inferred by 'taste') would disappear.

Let us consider a simple experiment to see whether the whole lot of 'dravyas' found in the world, and/or their 'taste' could be important or conclusive in deciding the 'action' of a **dravya**. Imagine a man swallowing a few perfectly spherical and smooth glass beads of such a size that they could not be absorbed by the villi or capillaries of the alimentary canal. We can expect that these will be voided out of his body without having caused the least harm to him of any kind. Nor would the glass—and it must be an 'Oushadhi' according to the above definitions—have acted on the 'doshas' in any way. Now let us imagine that he was

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

asked to crush the beads with his teeth before swallowing them and we are sure to find that the 'crushing' has given the 'Shlakshna' (smooth) glass an immediate 'Teekshna' (penetrative) property which would exhibit itself by piercing the blood vessels of his 'tongue', and, further, of his intestinal walls, or other organs of his alimentary canal, *although the crushing did not bring on any change in the 'taste'*: From the results of such an experiment which I think would not be disputed we will have to conclude that it is the 'physical and/or chemical **properties**' of a dravya that are of importance and which cause it to act on, or in, the body, and **not** the dravya by itself.

[The gelatin-capsule so often used by the modern 'doctors' either to cover the 'taste' of a drug and render it bland, or to 'protect' it from the action of certain body juices till it reaches a particular place in the intestines, should also serve as a good example to imagine what must have been the true meanings of the above terms. The **bland** 'taste' of the gelatin-capsule may lead the orthodox Ayurvedist to come to conclusions regarding the action of the drug which will be completely at variance with those actually found when the quinine is liberated from the capsule when it is acted upon by the gastric juice. This should perhaps have been the meaning of *vipaka* (or vishishta paka, that is a **special** change which is not in accordance with the usual or general rule) and may help one to determine the meaning of '*rasantara*'—change in mode of operation brought about by action in the body, (Jatharen agnina yogat जाठरेणाग्निना योगात्); But this is a matter of a great controversy in Ayurveda, the current—and absurd!—view being that the 'Taste' of a substance changes to Sweet (मधुर Madhura,) Sour (अम्ल Amla), and Pungent (कटु Katu) in the stomach, small bowel and large bowel respectively: !]

The 'dravya' in Ayurveda should, therefore, be taken only to mean a 'vehicle' which carries particular gunas, (properties: physical or chemical etc, whith may be changeable by Samskara—processes etc.) and the criteria of recognising these 'gunas' are treated by the terms 'Rasa', Veerya, Vipaka and Prabhava.

This does not mean, however, that the 'dravya' would have no value at all. In Ayurveda the dravya is "Pancha-bhautik" (an aggregate of five 'tatvas' or fundamentals,) and takes 'shape' (existence) by being 'parthiva' (Prithak—capable of independent existence) first; "Kshmam Adhishthaya Jayate. क्षाम् अधिष्ठाय जायते।

But, further, as we have seen, Ayurveda does not deal with all Panchabhautik (elemental) dravyas but with combinations of them which are found in the world in the shape of 'food' 'drug' (and bacterial-agantu) substances; These dravyas are much grosser than the 'Panchabhautik' or elemental dravyas and are known as Pancha-Maha-Bhautik (pancha-maha-bhootatmakam Tattu: Wagbhat s 9/1) The Parthiva, (gross or solid), Apya (gross liquid), Taijas (giving heat light etc.) Vayaveeya (volatile or gaseous), and Akasheeya etc. should refer to these Pancha-Maha-bhautik dravyas. And even here, as we shall later find, it is not the sense of touch of ginger (Shunthi) which is 'khara (un-even and hard) which

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

determines whether it is to be construed as Parthiva (solid) etc., but the 'operative property' and thus it is to be known by the 'predominant' 'bhoota' (tatva) as stated by Wagbhata : Vyapadeshastu Bhooyasa.

This, I feel, needs some explanation. For again, a lack of proper understanding of the 'purpose' of these definitions in Ayurveda and a free use of the 'philosophical jargon' has created a confusion about this matter too The "Bhooyaha" (preponderance) in the above definition is misconstrued, and the philosopher-commentators of Ayurveda have stated that the

" Guru-Manda-Hima-Snigdha-Shlakshna-Sandra—Mridu—Sthir Sasookshma—Vishad with their opposites "

can be subdivided and the guru-hima-snigdha-etc. bahulani (preponderant) and the drava-etc-bahulani known as **Rasa-bahulani** (predominant liquid) will be Parthiva and Apya or Jaleeya in the body, and will—as in the case of the latter, act in the body as Mardava-Pralhadakarani. (creating softness and sense of satisfaction) To my mind, it should have been obvious that to expect, say, 98% alcohol and cane sugar juice to act as 'mardava' and 'prahlada—kara' because both of them were **drava** (and therefore **Jaleeya** or Apya) would be the height of absurdity; I would much rather have thought that "the bhooyasa vyapadesha (naming according to the predominent **active**) meant naming according to the active 'tatwa', principle.

(Students of modern sciences have quite a few occasions to see that a substance is so named by its inherent properties with reference to a 'quality'; Such substances as are known as 'conductors' of electricity, or 'electrolytes', or 'colloids' do not receive these names with reference to their 'solid' 'liquid' or 'gaseous' etc. characters, but because of their behaviour towards electricity, or the size of their molecules respectively.)

Let us, for example, apply the definition of Charaka:—

" Khara-Drava-Chaloshnatwam Bhoojalaniltejasam Akashasyaprateeghato-sparshanendriyagocharam " (Charak)

to some dravyas of modern scientific medicine. Pepsin, the gastric enzyme which the last Charcha-Parishada has itself defined as Pitta, can be obtained in the form of a powder which can be rendered 'shalakshna' (smooth) to the sense of touch, but all the same its action in the body will uniformly be that of hydrolysis of protein molecules in the presence of an acid medium; The orthodox Vaidya, if he were to stick rigidly to the erroneous definition above, wonld have inferred that because of this 'shlakshnatva' it would have been 'mardava-kara' in the body, though actually the **active** property of pepsin—as I will later state is given by Ayurveda itself, but which is misconstrued,-is the Amlatva, i. e. its character of having the Prithvi and Agni 'tatwas' in predominence, and, therefore, its mention as 'amla' (that is bringing on the function of teekshna —separating—guna) bhooyishtha is perfectly consistent with actual facts, which, as above stated, are those of a 'teekshna' guna and of a physiological 'prakritic' Pitta.

[I think it would be advantageous if I were to digress for a moment from the present discussion and state how the real 'Panchabhautik' conception of the 'dravyas' or substances, fits in almost perfectly with

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

the 'structure of an atom' of the modern sciences; and how the atom of the smallest (i. e. lightest) element Hydrogen is, in this sense, Pancha-bhautik. Let us for a moment reflect that 'bhoo' means to 'be', and thus from the 'Void' (Akasha), which is the precursor of all the dravyas both according to the Vedantik and Samkhya philosophies, whatever was formed or arose, could be called **bhoota**; The 'Akasha' (Void) itself arose from *Atma*–according to the Vedanta philosophy– or from the Bhootadi-Ahamkar (specification producing gross matter,) according to the Samkhya philosophy—and was thus a 'bhoota'; From this Akasha or Void arose:

VAYU: WAVE: I would like to emphasize with great stress that this 'vayu' has nothing in common with the 'gases' of the modern sciences,—as some ayurvedists with training in the modern sciences also seem, unfortunately, to imagine—which are obviously panchabhautik; It refers to the 'wave–form' which any charged particle, electron, positron, etc. takes when it is made to leave an atom of a formed **element**, of the modern sciences. The photon, which is so essential for 'photo-synthesis', whioh, in its turn, is so indispensable for animal life, is also such a 'wave'. The 'waves' only become 'charges' (or charged particles) when they enter 'matter' (become Panchabhautik); This **wave** or undulation, which by some means is made to enter into the system of an atom in such a way as to **remain** in the atom, is termed a **charge** or energy, i. e. "Teja"

TEJA:— The charged particles of every atom, the least number being an 'electron' (negative charge) and 'proton (positive charge) are the first appreciable 'particles' of energy or 'shakti', (in contradistinction to 'matter' which is 'frozen' 'energy'), and can be perceived by the senses as in 'lightning', Modern sciences have actually combined the *wav* from the wave, and the *cle* from the particle to form a word *wavicle*, in an attempt to accurately describe the behaviour of the particles, which is "now that of a wave, and now that of a particle".

APA:—The freezing of the 'teja' particles, which keeps a number of 'negative' charges, from one to many, depending on the nature of the atom, revolving round a number of 'positive' charges (or fusing with some to form chargeless particles or Neutrons which serve to increase the atomic weight) and, incidentally, other properties of the 'atom' of the element, is, to my mind, comparable to the 'Meson' particle of the modern sciences and describes the conception of 'APA', admirably; I have always liked to construe the 'Adhogaminyaha Apaha' (water always tends to flow down!) and the 'Pindeebhawawat Vrittitwam' of the older terminology to mean:—

(I) the force which keeps the 'waves' together as 'particles', and, holding them together, gives them the 'quality' of descent towards the planet Earth, and

(ii) the property which has the capacity of maintaining the oppositely charged particles together but away from each other (without fusing), respectively;

I have always looked upon very skeptically on the rather 'crude' definitions of these qualities given by the orthodox Shastris, namely,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(i) the nimna-gamitva (flow-down along a slope!) and (ii) the forces of 'adhesion' which keep two particles of flour together, (choornadi pindeebhawa-vritti).

PRITHVI:— When these above four 'things' which are essential to form an 'element' but are not an 'element' themselves, and which have a 'gunawatwa' (property) and 'kriyawatwa' (capacity for action) but are not 'material' substances are given a support which enables them to stay as an 'element' capable of independent existence on 'Earth' they are said to have assumed a 'Pritthveetva' (parthakya–capacity for separate independent existence) and the above five Tatwas form the smallest 'element' of the modern sciences which, thus, is Panchabhautik; Each Tatwa being a 'bhoota.'

Each 'element' of the modern sciences is thus 'panchabhautik' but Ayurveda can not be said to deal with the 'elements' as such. Even modern scientific medicine has hardly any occasion—except very recently when radio–isotopes of the element Carbon are being used to study the behaviour of certain substances in vivo—to use such 'elements'; Ayurveda obviously deals with the substances formed of the combinations of these 'modern elements'. If we note this point we may understand how solid Earth, liquid Water, gaseous Air, Fire and Lightning (and Void or Akasha) were to be known as Pancha—Maha Bhootas, that is they were each formed of all the 'sookshma bhootas'.

It must, however, be noted that the above 'tatwas' have no indivisible particles nor had they any 'permanence' ('*anus*', or '*paramanus*' which were 'nitya' and indivisible'); As a matter of fact the tatwas have been 'inferred' and thus their definition (Tat–anumeeyate anena तदनुमीयते अनेन that is inferred from; or Tat–eva; that alone, तदेव) made in the Samkhya philosophy which styles them as Tanmatras of Sound, Touch, Light Taste Odour, (Shabda, Sparsha, Roopa, Rasa and Gandha) is unexceptionable. Although the 'elements' could be construed to develop according to the Arambha-wada' of the Nyaya-Vaisheshika school or philosophy which thought of Anus which formed aggregates (Dvyanuka Tryanuka or Trasarenu etc.), to imagine that every solid substance has a 'solid' anu which is not further divisible and so on for the 'liquid' and 'gaseous' substanees was an argument which would hardly be considered as tenable in the light of present-day knowledge. Many substances, which are gaseous at room-temperature and atmospheric pressure can be shown to take on the properties of a solid at higher pressures and lower temperature and thus we shall be forced to imagine—if we decided to stick to the Nyaya–Vaisheshika view,—that the Nitya Anus of the Prithvi, Jala etc. etc. were interconvertible. The simplest and purest 'Apa' paramanu would have to be converted into a 'Prithvi' Paramanu when water froze to solid ice. Although no historical proofs can be cited, I have a notion that the Greek philosopher Aristotle, who, incidentally, was the originator of the present day exact sciences incuding that of Medicine, postulated his Earth, Water, Fire, Air, and 'quintessence' by learning them from some visiting Nyaya—Vaisheshika Shastri of these times, and thus, unfortunately, served to digress the stream of knowledge into a confusion which took many years of

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

patient laboratory study in the West for being righted again, and brought back to the Samkhya view: The West, if I may say so, is still grappling with the 'material' world and the greatest scientists wonder how matter comes to be turned into the 'mind' and what relations this latter further has to 'intellect', 'reason' etc. and to 'Creation'! In a few more years perhaps they would further discover the necessity of imagining the mind also as a necessary component of matter, which has 'devoluted' from the cosmic mind, which itself could only be said to 'exist', or be appreciated as 'existing', if there is someone to **activate** it,....as the Samkhya philosophy has already done. The Nyaya school and its dogmatic followers **particularly**, have thus rendered a great disservice to the ancient 'trikal-darshee' (Omniscient, including the Time component of the space-time-continuum', (!) Rishis of India.)

I would like the Charcha-Parishada to consider the Samkhya view of the origin of the Panchabhootas. There first are the 'elements' (Tatwas or Tanmatras), which are not **material or substantial**, but when they 'remain' together in an infinitesimal but independent 'particle' of **matter** (the modern atom), it may be said to have formed a 'measurable' (Parichinna parimanavat, परिच्छिन्न परिमाणवत् ।), yet 'sookshma' Pancha-abhautik substance. The different 'compounds' (the chunks of matter) of these 'sookshma bhootas' are the pancha-MAHA bhootas or the 'subjects of the gross senses (Indriyarthaha इन्द्रियार्थाः) Once this is accepted it could easily be seen how the different rearrangements of the 'sookshma' bhootas could give rise to the different 'compounds' of the modern scientific system, as also how the different arrangements of the 'tatwas' inside these 'sookshma-bhootas'..* in the correct way, Prakriti-Sama-samawaya प्रकृति सम समवाय or in some abnormal way Vikriti-Vishama-Samawaya विकृति विषम समवाय may lead to the possibility of deter-

---

* I may even point out a further **similarity** of conception, which, I must say has atleast upto now, not proved to have any relation with 'function', the similarity being in the 'Satva—' laghu-prakashaka लघु-प्रकाशक positron, the **Raja**-' Chala-upashtambhaka (taking part in making compounds with 'covalence' and 'electro-valence) चल, उपष्टम्भक electron, and the Tama-guru-avarakam गुरुआवरक 'heavy and determining the character of the 'element', proton and neutrons; It may be very interesting to see whether the 'atoms' of the **mind** exhibit either of these properties Raja and Tama in excess when it cannot decide things correctly (Manasah punaruddishto-Rajashcha Tama Evacha मानसः पुनरुद्दिष्टो रजश्च तम एवच) and cause mental disease. The different electro-encephalo-grams observed in the cases of 'epileptics' would point to a different electrical potential being formed as a result of some such defect in the 'electronic configuration of the structure of the 'brain cell', and whether the regulation of the 'diet and behaviour,' posture, 'breathing in' 'not thinking of other things', 'concentration of the mind on something sublime, 'fixation' and 'oneness' (Yama, Niyama Asana; Pranayama, Pratyahara, Dhyana, Dharana Samadhi यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधि) which are the eight 'essentials' of Yoga leads to a configuration which results in correct and sublime thinking....]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

mining their actions in the body by their 'Rasa' (Taste), or Vipaka (change in the molecular arrangement brought about in the body during metabolism); or even by Prabhava—inexplicable action for which also the 'sanskrit expression' Vichitra–Pratyarabdhatva विचित्रप्रत्यारब्धत्व), peculiarly different beginning, may supply a clue.

To me this theory of the *panchamahabhootas* appears to be quite irrefutable and almost completely in accordance with the latest advances of modern sciences of Physics, Chemistry and Pharmacology. Simple experiments could be devised to find out whether the theory is applicable to all 'ayurvedic preparations', and, I believe, the results would justify the theory.

If, however, we were to insist on mixing this 'Parinama-vada' theory of the 'Samkhyas' with the Arambha-vada dvyanuka tryanukas of the Nyaya-Vaisheshika school, we will enter into a cul-de-sac of confusion. The last Charcha–parishada at Patna appointed a Committee to classify the 92 elements of the modern sciences into the Akasheeya, Vayaveeya, Taijas, Apya And Parthiva etc. I have not seen the report of the Committee, if they have submitted one, but I have a notion that the task of the Committee was originally impossible of achievement. I cannot imagine how the Committee would classify, for example, the three 'gases' (at ordinary room temperatures and atmospheric pressure) Hydrogen, Oxygen and Chlorine, seeing that two atoms of Hydrogen united with one of Oxygen to produce the 'Jala' of the Nyaya-Vaisheshikas—Water— which can act as a solvent to many substances (which form man's food) without bringing on any chemical changes in them, and that one atom of it (Hydrogen) unites with one atom of the other gas, *also to produce a liquid* (therefore *APYA*?) which, however, has the property of being very 'Teekshna', is sour to 'taste', i. e. is 'Amla', and can only dissolve substances by bringing on chemical changes in them !!

It would be best, therefore, to accept the above hypothesis of the 'Dravyas'.

(to be continued.)

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता यांबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—

सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन–चिकित्सा

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापकः—अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (सी. पी.)



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवा आविष्कार

स्त्री, पुरुष, बालक या सर्वांच्याकरितां

अत्युत्तम महौषधी

नवरत्नरस

हा हिरा, माणिक, मौक्तिक इ. नवरत्नें आणि सुवर्ण यांच्या संयोजनानें तयार करण्यांत अलेला कल्प आहे. शरीरस्थ रस, रक्त आदि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषक. शुक्र, वीर्य यांची शुद्धी आणि पुष्टी करणें हें या औषधाचें विशिष्ट कार्य आहे. तसेंच यानें नपुंसकत्व, वीर्यस्राव, स्वप्नदोष इ. चें निर्मूलन होऊन नवयौवन प्राप्त होतें. स्त्रियांच्या गर्भाशयशोथ, प्रदर वारंवार होणारा गर्भपात, गर्भवतीच्या हातापायांवरील सूज व फिक्कटपणा यांवरहि गुणकारी आहे. वंध्यत्वाचा दोष दूर करणारी ही अपूर्व औषधी आहे. मुलांचें अस्थि-दौर्बल्य दूर करून अस्थि बलवान करणारें कॅल्शियम व व्हिटॅमिनची उणीव, दुधाचें अपचन नष्ट करून बालकांना धष्टपुष्ट करणारें असें हें औषध आहे. क्षय, जीर्णज्वर, कास, श्वास, मधुमेह, मानसिक दुर्बलता इत्यादिमध्येंही अतिशय उपयुक्त आहे.

नवरत्नरस—निरोगी लोकांकरितां रसायन व रोगी लोकांना आरोग्य प्राप्त करून देणारें हें महान् औषध आहे.

एका बाटलीची किंमत पांच रुपये

उंझा फार्मसी लि. उंझा

(गुजराथ)

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्टौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितों.

गुलकंद आणि मोरावळा हे दोकुबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २.

टे. नं. ३१७९६ Telegrame–**AYURVED.**

नित्योपयोगी अर्कशाला औषधें

एग्युमिक्श्चर

कोणत्याही ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, किंबहुना प्रारंभीं एकमेव औषध म्हणून एग्युमिक्श्चरचा उपयोग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें येणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्चर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

R. No. B. 5225

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभवसिध्द
अर्कशाला औषधें

युटोन
गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन
रक्तवर्धक, पौष्टिक, मेंदूस बलदायक

वसंत मिश्रण
जीर्णज्वर, रक्तक्षीणता, क्षयांचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें याकरितां

शिशुजीवन
बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन
मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृद्धिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा.

हें मासिक श्री. विश्वनाथ लक्ष्मण भागाशे, यांनीं आदर्श मुद्रणालय, ३९५।५ सदाशिव, पुणें
ये [illegible] सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचे पुरस्कृत मासिक

आयुर्मीमांसा

प्रमुख संपादक
वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य

कार्यकारी संपादक
व. ल. वष्ट, आयुर्वेद विशारद

नोव्हेंबर १९५२

वार्षिक वर्गणी ३ रु.
किरकोळ अंक ८ आणे

या अंकांत

स्नेहसाधन विधि
—पु. वि. धामणकर

दोषधातुमलविज्ञान
—गो. आ. फडके

पंडित सातवळेकर यांचे व्याख्यान

Rasa, Guna, Veerya, Vipaka, Prabhava

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदप्रसारक मंडळी, सातारा, या संस्थेचें मासिक

आ यु र्मी मां सा

चालक : आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

र्ष १५ वें] नोव्हेंबर १९५२ [अंक ११ वा

वार्षिक वर्गणी ३ रुपये : किरकोळ अंक ८ आणे

कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

* आयुर्मीमांसेंतील लेखांतून व्यक्त होणारीं मतें हीं त्या त्या लेखकांचीं मानलीं जातील. संपादक त्यांशीं नेहमींच सहमत असतात असें नाहीं.
* आयुर्मीमांसेंत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणाविषयींचे सर्व हक्क संस्थेच्या स्वाधीन आहेत.
* वर्गणी ज्या अंकाअखेर संपत असेल त्या अंकानंतर त्या त्या वर्गणीदारांना पुढील वर्षाची वर्गणी पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जातात. ज्यांची वर्गणी संपली आहे अशा ग्राहकांनीं हें पत्र मिळतांच म. ऑ. नें वर्गणी पाठवावी. म. ऑ. आली नाहीं अगर अंक नको असल्याबद्दलहि पत्र आलें नाहीं तर त्या वर्गणीदारांना पुढील अंक व्ही. पी. नें पाठविला जातो.
* अंक मिळाला नसल्याची तक्रार त्या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत करावी. म्हणजे शक्य असल्यास दुसरा अंक पाठविला जातो.
* सर्व पत्रव्यवहार ' व्यवस्थापक, आयुर्मीमांसा, अर्कशाला, बिल्डिंग, सातारा ' या पत्त्यावरच करावा.

हैद्राबाद राज्य-वार्ता

डॉ. कांतिलाल देवरामभाई यांचे अभिनंदन

डॉ. कांतिलाल देवरामभाई यांनीं विजयादशमीच्या मुहूर्तावर बदनापूर येथें आयुर्वेदीय दवाखाना सुरु केला आहे. डॉ. कांतीलाल तरुण, सुशिक्षित व कर्तबगार डॉक्टर आहेत. बदनापूर येथील जनतेची ते परिणामकारक सेवा करतील याबद्दल संशय नाहीं. बदनापूर व आसपासची ग्रामीण जनता यांना डॉ. कांतीलाल यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा लाभ होईल. आम्ही डॉ. कांतीलाल यांना यश चिंतितों.

हैद्राबाद राज्यांतील अर्कशाळेचे नवे विक्रेते

लक्ष्मीकांत मेडिकल स्टोअर्स, बीड

अर्कशाळेचे सेल्स ऑर्गनायझर श्री. ना. श्री. पाध्ये यांनीं सप्टेंबरमध्यें मराठवाड्यांत काढलेल्या दौऱ्यांत बीड येथील ' लक्ष्मीकांत मेडिकल स्टोअर 'चें सहकार्य संपादन केलें. ' लक्ष्मीकांत मेडिकल स्टोअर 'च्या चालकांचें आम्ही अभिनंदन करतों.

एस. आर. बोरा, मोमिनाबाद

श्री. बोरा यांच्या सहकार्यामुळें मोमिनाबाद येथें अर्कशाळेचा माल मिळण्याची व्यवस्था झाली आहे. मराठवाड्यांतील महत्त्वाच्या व्यापारपेठांत सर्वत्र अर्कशाळेस विक्रेत्यांचें सहकार्य लाभत आहे. श्री. बोरा यांच्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

अर्कांविषयीं अभिप्राय

अर्कशाळेच्या घनार्कांविषयीं हैद्राबादचे प्रख्यात वैद्य श्री. मुकुंदाचार्य जहागीरदार यांनीं आपला अभिप्राय कळविलेला आहे. या अर्कांचा चिकित्सेंत उत्तम उपयोग होत असून ते प्रभावी आहेत असा आचार्यांचा अनुभव आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाविद्यालय वार्ता

सन्माननीयांच्या भेटी

गेल्या महिन्यांत मुंबईराज्याचे अुपमंत्रि डॉ. नरवणे यांनीं आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय व डॉ. आगाशे रुग्णालय यांना भेट दिली व संस्थेच्या कार्याविषयीं समाधान व्यक्त केलें. संस्थेच्या कार्यकर्त्यांशीं त्यांची आयुर्वेदीय संशोधन व शिक्षण यांबद्दल मनमोकळी चर्चा झाली.

नागपूर येथील प्रख्यात डॉ. बी. आर्. चांदोरकर व डॉ. जे. के. सबनीस यांनीं गेल्या महिन्याच्या चोवीस तारखेस महाविद्यालय, रुग्णालय व अर्कशाळा या संस्थांना भेट दिली. डॉ. चांदोरकर हे नागपूर येथील पक्वासा समन्वय रुग्णालयाचे कार्यकर्ते आहेत. त्यांनीं येथील प्राध्यापक व चिकित्सक यांच्याशीं विविध विषयांवर चर्चा केली. संस्थेच्या कार्यपद्धतीबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. डॉ. चांदोरकर यांचे समवेत त्यांच्या भगिनीहि महाविद्यालय पाहाण्याकरितां मुद्दाम आल्या होत्या. त्या या संस्थेच्या आरंभकालांतील माजी विद्यार्थिनी आहेत. संस्थेनें गेल्या तीस वर्षांत केलेली प्रगति पाहून त्यांनीं संतोष व्यक्त केला.

वैद्य लेखकांना विनंति

आयुर्मीमांसेकडे अपेक्षेप्रमाणें लेख येत नाहींत. आमच्या वैद्य वाचकांना त्यांचे चिकित्साविषयक अनुभव व शास्त्रीय लेख पाठविण्याविषयीं आम्हीं पूर्वीं विनंति केली होती. तीच विनंति पुन्हां एकदां करीत आहोंत. आयुर्मीमांसा हें आपल्या अनुभवांच्या व विचारांच्या प्रकटीकरणाचें साधन आहे असें समजून वैद्य मंडळींनीं या साधनाचा भरपूर उपयोग करावा अशी आमची आग्रहाची सूचना आहे.

ग्राहकांना प्रार्थना

आयुर्मीमांसेच्या उणीवांची आम्हांस जाणीव आहे. आम्ही त्या दूर करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करीत आहोंत. आमच्या ग्राहकांनीं मीमांसेवरील लोभ कायम ठेवावा अशी प्रार्थना आहे. मीमांसेची वर्गणी नाममात्र आहे. वैद्यमंडळींनीं मोठ्या संख्येनें वर्गणीच्या रूपानें सहाय्य केलें तर मीमांसा अधिकाधिक उपयुक्त करणें सुकर जाईल.

बालकाचे पहिल्या वर्षांतले विकार

प्रथम वर्षांतील बालकांच्या विकारांचें मूळ बहुधा स्तन्यदुष्टींत असतें. बिघडलेलें मातृस्तन्य मुलाच्या पोटांत गेल्यानें त्याला पचनमार्गाचे विविध विकार जडतात. त्याचें तोंड येतें, मूल प्यालेलें दूध दह्यासारखें भडभड ओकतें. त्याला तें दूध पचत नाहीं. पोट फुगतें. पोटांत गुबारा धरतो. मुलाला चैन पडत नाहीं. तें आळोखे पिळोखे देतें. त्याला शौचाला आणि लघ्वीला साफ होत नाहीं. याचे उलट कधीं शौचास होऊं लागलें म्हणजे भसरट, कुजकट, दुर्गंधियुक्त चोथापाणी होतें. या तक्रारीमुळें मूल कृश होतें, व पोट मात्र मोठें उबारल्यासारखें होतें. अशा विकृतींत वाग्भटाचार्यांनीं सांगितलेला स्तन्यशोधक औषधांचा काढा मातेनें घ्यावा. अर्कशाळेच्या ‘स्तन्यशोधन’ या कल्पांत हीं सर्व औषधें समाविष्ट आहेत. हें औषध घेऊं लागल्यापासून चारसहा दिवसांत तिचें दूध सुधारून मुलाला क्रमाक्रमानें तें पचूं लागतें व त्याची प्रकृति निरोगी होते, असा अनुभव आहे.

श्वासमार्गाचे विकार

मुलाला स्तन्यदुष्टीमुळें कित्येक वेळां वारंवार पडसें येतें; खोकला येतो किंवा प्रत्यक्ष श्वासाचाच आवेग येतो. मुलाचें पोट अुडूं लागतें. श्वासोच्छ्वास जबर होतात. छातीजवळ कान नेल्यास ‘घुरघुर’ असा आवाज ऐकूं येतो; व मुलाला दम लागलेला असतो. अशा ठिकाणीं मातेचें दूध बिघडलेलें असणें हेंच प्रामुख्यानें कारण असतें. स्तन्यशोधनानें तें सुधारते व तद्द्वारा मुलाचे सर्व रोग बरे होतात.

त्वचारोग

व्रण, विसर्प, खरूज, विचर्चिका असे त्वचारोग कित्येक वेळां बालकांना झालेले आढळतात. मूल अंगावरल्या दुधाखेरीज कांहींच घेत नसतें. अशा स्थितींत अुठलेले खरूज, पीटिका, तोंडावरील, हातापायावरील आगपैण, गांठी हे सर्व बाळाचे त्वचारोग स्तन्यशोधनानें बरे झाल्याचीं अनेक अुदाहरणें आहेत. फोडांची आग, कंड, लस हीं लवकर थांबतात. यासाठीं हें मातेला द्यावें, व मीठ वर्ज्य करण्यास सांगावें म्हणजे लवकर गुण दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्नेहसाधन-विधी

— लेखांक तिसरा —

[स्नेहसाधन ह्या लेखमालेचें परिशिष्ट गेल्या दोन अंकांत विभागून दिलें. आतां मूळ विषयाला प्रारंभ होत आहे. हे लेखांक तीन आहेत आणि ते तिन्ही आमचेकडे आले असून तें आम्ही क्रमानें देण्याचें योजिलें आहे.

ह्या लेखांत स्नेह शब्दाचा अर्थ, स्नेहसाधन कल्पनेचा उदय, स्नेहाच्या संज्ञांचे सोपपत्तिक अर्थ, स्नेहाचे प्रकार, स्नेह पुरविणारे वनस्पती अवयव, छोट्या मोठ्या प्रमाणांत मिळणाऱ्या तैलांची यादी, तैलांचें वर्गीकरण ह्याविषयीं माहिती पहावयास सांपडेल.

—संपादक]

स्नेह हा शब्द स्निह धातूपासून झाला आहे. स्निह = प्रेम करणें, चिकटणें, स्नेह = चिकटपणा, गुळगुळीतपणा हें स्निग्ध पदार्थाचे मुख्य गुण. ह्यावरून स्निग्ध पदार्थांना स्नेह अशी संज्ञा मिळाली. स्नेहयते ऽ सौ स्नेहः । किंवा स्निह्यते ऽ सौ स्नेहः । असे दोन विग्रह आहेत स्नेह शब्दाचे. स्निग्धत्वात् संहतिः । ह्यावरून एकत्र येण्याच्या किंवा राहण्याच्या धर्मासही स्नेह म्हणण्याची प्रथा पडली आहे. स्निह्यति इति स्निग्धः । असाही एक विग्रह आहे. सर्वांचा अर्थ एकच कि चिकट, गुळगुळीत, बुळबुळीत पदार्थ तो स्नेह अगर स्निग्ध पदार्थ. इंग्रजींत Fats & Oils ह्या शब्दांनीं स्नेहांचा बोध होतो. पण मेद, चरबी (Fat) ह्या सर्व सामान्य नांवानें सर्व स्नेह ओळखले जातात.

स्नेहसाधन कल्पनेचा उदय

स्नेहमेव परं विद्यात् दुर्बलानलदीपनम् ।

वा. चि. १०।६–७९

रुग्णांच्या निरनिराळ्या स्थितींत त्यांना निरनिराळे कल्प द्यावे लागतात. विशिष्ट अवस्थेला योग्य असा कल्प लाभला तर चिकित्सनाचें कार्य फार सुकर होतें व रुग्णासही लौकर आराम वाटूं लागतो. ह्या अनुभवामुळेंच विविध कल्प जन्मास आले. स्नेह सिद्ध करण्याबाबतहि हाच हेतु आहे. रुग्णांना सिद्ध स्नेह देण्याची योग्य अवस्था सांगतांना ' ज्या रुग्णांचा अग्नि दुर्बल झाला आहे अशा लोकांना स्नेह हाच एक कल्प हात देणारा आहे' असें वाग्भटाचार्य म्हणतात.

आयुर्वेदांत स्नेहाचें १ घृत, २ तैल, ३ वसा, ४ मज्जा असे चार प्रकार केले आहेत. ते उत्तरोत्तर पचायला अधिकाधिक जड आहेत. सामान्यतः लवकर पातळ होणारा स्नेह लौकर पचतो.

वितळण बिंदु

लोणी– २८ते ३३ सें. **डुकराची चरबी**– ३६ते ४६ सें.

तूप – ३३ ते ३७ सें. **गाईची चरबी**– ४० ते ४८ सें.

मेंढीची चरबी– ४६ ते ५० सें.

तुपांत प्राणवायूचें प्रमाण जास्त असतें म्हणून तें पचनास हलकें असतें.

संज्ञांचें सोपपत्तिक अर्थ

घृतम् – घ्रियते जिघर्ति इति वा घृतम् । दीप्तिमत् करितें जें किंवा क्षरण पावतें जें.

तैल– तिलोद्भवं तैलम्, तिलस्य इदं तैलम् वा । तिळांचें तें तैल.

वसा– वस्ते इति मज्जा । आच्छादन करणारा मांसजन्य स्नेह. तनुरूपेण शुद्ध मांसस्य यः स्नेहः सा वसा

वा. सू. अ. ५।११

मांसस्नेहः । हेमाद्रि, वा. सू. अ. ५।११

शुद्ध मांसस्य यः स्नेहः सा वसा परिकीर्तिता । सुश्रुत. शा. अ. ४

मेद – मेधतीति मेदः । स्नेह करणारा । चरबी, मांदें.

मज्जा – मज्जति इति मज्जा । मज्जित (गर्भित) असतो जो.

ह्यापैकीं तूप, वसा आणि मज्जा हे प्राणिज तर तैल हा उद्भिज्ज स्नेह होय. तैलसदृश्य पदार्थ खाणींतूनही निघतात. व्यवहारांत त्यांनाही तैल संबोधलें जातें. पण वरील स्नेह व खनिज स्नेह ह्यांत रासायनिक दृष्ट्या फार फरक असतो. स्नेहांतला मुख्य ओशट धर्म तो त्यांत दिसून येत नाहीं.

प्राणिज मेदाचे प्रकार तीन. पण त्यांतही वसेंत दोन प्रकार. तैलाप्रमाणें पातळ असणाऱ्या प्राणिज स्नेहांना साधारणतः वसा म्हणण्याचा प्रघात आहे. ही द्रव अच्छ स्वरुपांत

लेखक : **वैद्य पु. वि. धामणकर**, आयुर्वेदभूषण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असते किंवा स्नायूंच्या आश्रयानें असते. पण पोट, स्तन, स्फिक् इ. शिथिलभागीं जाड थरानें सांठणाऱ्या घनस्नेहास मेद म्हणतात.

तूप– रक्तामधून वाहणारा किंवा दुधाचें द्वारें मिळणारा स्नेह

वसा– मांसाचे आश्रयानें किंवा मांस खंडांत असणारा स्नेह.

मेद– त्वचा ह्या आवरणाखालीं सांठणारा स्नेह.

मज्जा– अस्थींमध्यें राहणारा स्नेह.

पैकीं तूप, मेद नि मज्जा हे स्नेह घन तर वसा द्रव असते. जलचर प्राण्यांचे मेद द्रव, भूचरांचे घन. त्यांतले त्यांत शाखाहारी प्राण्यांचे मेद मांसाहारी प्राण्यांचे मेदापेक्षां अधिक घट्ट असतात. पातळ मेद अधिक शोषणीय असतात. प्राण्यांच्या आहारविहारावर व वसतिस्थानावर मेदाची घटना व मात्रा अवलंबून असते.

प्राणिज चरबींतून स्टिएरीन व पामेटिन हे दोन घटक अलग केले कीं लोण्यांत मुख्यतः ओलेईन खालीं उरतें. ह्यापासून कृत्रिम लोणी तयार करतात. त्याला मार्जरीन म्हणतात. हें लोण्याप्रमाणेंच पचन शोषणसुलभ असतें. पण त्यांत लोण्यांतील जीवनसत्वें मात्र नसतात.

स्नेहानां द्विविधा चासौ योनिः स्थावर जंगमा :।

च. सू. अ. १३।९

आयुर्वेदांत सामान्यतः स्थावर जंगम असेही स्नेहाचे दोन वर्ग आहेत. स्थावरांत सर्व उद्भिज्ज तैलांचा तर जंगमांत घृत, वसा आणि मज्जा ह्या तीन प्राणिज स्नेहांचा समावेश होतो. पैकीं तैलांत मोहोरी, कोकम, वावंची इ. चीं तैलें घन असतात तीं अग्निसहाय्यानें अगर वाफेनें गरम द्रावांत अगर घाण्यांत काढावीं लागतात. हीं तैलें गरम असतांना द्रव व थंड झाल्यावर घन असतात. प्राणिज स्नेहांत तूप हा स्नेह फक्त स्त्रीवर्गाकडून मिळतो. कारण हा दुधांतून मिळतो नि दूध फक्त स्त्रीच देते. वसेंतही दोन प्रकार असतात. पैकीं द्रव वसा जलचर प्राण्यांचे यकृतामधून बहुधा सांपडतें. ह्या प्राण्यांना नेहमीं पाण्यांत रहावयाचें असतें. पाण्यापासून तर अपाय होऊं नये म्हणून ह्या प्राण्यांच्या शरीरावर वसेचें आवरण असतें. ह्याकरितां वसा पुष्कळ लागते, पातळही लागते. म्हणून ह्या प्राण्यांत द्रव वसेचें प्रमाण अधिक सांपडतें. पिण्याकरितां वसा वापरतात ती हीच. कॉडलिव्हर ऑईल ही वसाच होय. द्रव वसेमध्यें हीच श्रेष्ठ वसा होय. वसेचा दुसरा एक प्रकार आहे. तो तुपासारखा घन असतो. हा प्रकार भूचर प्राण्यांत सांपडतो.

सर्व प्राण्यांत मेद असतो. पण त्याचे घटकावयव भिन्न भिन्न प्रमाणांचें असतात. शाकाहारी जनावरांचे मेद मांसाहारी जनांवरापेक्षां प्रमाणानें कमी व घन असतात. शेळींत चरबी अगदींच कमी तर म्हैस, मेंढी, डुकर ह्यांत चरबी पुष्कळ असते. वसा आणि मज्जा हे मेद प्राण्यांच्या दोन्ही जातींत असतात.

सर्पिर्मज्जा वसा तैलं स्नेहोदृष्टश्चतुर्विधः।
पानाभ्यंजन वस्त्यर्थं नस्यार्थं चैव योगतः।

च. सू. अ. १।८६

चत्वारो महास्नेहाः

सामान्यतः तूप, तैल, वसा, मज्जा हे चार स्नेहाचे वर्ग आहेत. हे स्नेह पोटांत घेणें, डोळ्यांत अगर नाकाकानांत घालणें, बस्ति देणें, किंवा अंगास लावण्यास शस्त मानतात. असें जरी आहे तरी प्रत्येक स्नेहास विशेष गुण आहे. अर्थात् तदनुसार प्रयोजनही असणें अत्यंत स्वाभाविक होय. उदाहरणार्थ–१ तूप, २ वसा, ३ मज्जा, ४ तैल.

सर्पिस्तैलं वसा मज्जा सर्वस्नेहोत्तमा मतः।
एभ्यश्चैवोत्तमंसर्पिः संस्कारस्यानुवर्तनात्।

च. सू. अ. १३।१३

नान्यः स्नेहस्तथा कश्चित्संस्कार मनुवर्तते।
यथा सर्पिरतः सर्पिः सर्व स्नेहोत्तमं मतम्। चक्रपाणीटीका
घृतं पित्तानिलहरं रस शुक्रौजसां हितम्।
निर्वापणं मृदुकरं स्वरवर्ण प्रसादनम्।

च. सू. अ. १३। श्लो. १४

स्नेहानामुत्तमं शीतं मधुरं रसपाकयोः।

अ. हृ. सू. अ. ५

सहस्रवीर्यं विधिभिः घृतं कर्म सहस्रकृत्।

च. सू. अ. २७।२२८

सर्व स्नेहांत चार स्नेह उत्तम. त्यामध्येंही तूप सर्व श्रेष्ठ. कारण त्यावर जी जी मेहनत घ्यावी, जो जो संस्कार करावा, तो तो फलदायी होतो. तूपाइतका संस्कारवश व कार्यक्षम दुसरा स्नेह नाहीं. तूप हा पदार्थ नेहमींचे खाण्यांतला म्हणून त्याची मातबरी विशेष वाटत नाहीं. पण हें जितकें मऊ तितकेंच कार्य करण्यांत कणखर आहे. सोमलासारखें जहाल विषसुद्धां घृतपानानें निर्वीर्य होतें. मग वचनागाचें निर्दालन होईल ह्यांत नवल तें कोणतें? त्याला कारण १ सात्म्यत्व २ तनुत्व ३ लघुत्व ४ चपलत्व ५ दीपन. तूप हा प्रकृतीस मानवलेला पदार्थ आहे. सहाय्यक म्हणून लाभतांच शरीर त्याचे मदतीनें जोराचा प्रतिकार करूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागतें. तूप हे तेव्हांच विरघळतें, पसरतें ही सटकन, अत्यंत सूक्ष्म स्रोतसांत अगर फटींत शिरून विषकण व शरीर घटक ह्यांचेमध्यें पडदारूपानें उभें राहतें. त्यामुळें आधीं विष व शरीर ह्यांचा संयोग दुरावतो. तदनंतर ते अग्नीला बल देऊन त्याचेकडून विषाचें पाचन करितें. अशा ह्या पराक्रमामुळें तें सहस्र वीर्य व सहस्रकर्म करणारें ठरलेलें आहे.

हें तूप अनेक प्राण्यांपासून मिळते. त्यामध्येंही पुनः आहार-विहारावरून श्रेणी लागतात. मांसाहारी हिंस्र प्राण्यांपेक्षां शाकाहारी प्राण्याचें तूप चांगलें; त्यामध्येंही गाईचें तूप सर्वांत उत्तम.

गव्ये क्षीरघृते श्रेष्ठे निंदिते चाविसंभवे। अ. हृ. अ. ५।४२
हितम्— गव्यं सर्पिः सर्पिषां । अहितं आविकं सर्पिः सर्पिषाम् । च. सू. अ. २५

घृतवर्ग

चरकानें दुधांचे गुणधर्म पृथक् पृथक् दिले. आणि तुपांचे गुणांबाबत 'क्षीरवत्' असा थोडक्यांत हवाला दिला. तुपाचे सामान्य गुण दिले आणि तेथेंच ते थांबले. सुश्रुतानें मात्र प्रत्येक तुपाचे गुण स्वतंत्रपणें वर्णिले आहेत. वाग्भटानें चरकाचें अनुकरण केलें. तर भावप्रकाश, निघंट रत्नाकर, निघंट शिरोमणी यांनीं सुश्रुत अनुसरला. दुग्धवर्गाप्रमाणेंच घृतेंही आठच प्रचलित होतीं. त्यांत नि० शिरोमणीकारांनीं एडकीची अधिक भर घातली. घृत पुरविणारे प्राणी १ गाय, २ म्हैस, ३ शेळी, ४ मेंढी, ५ घोडी, ६ नारी, ७ हत्तीण, ८ उंटीण, ९ एडकी, १० वाघीण इ.

तुपाचे प्रकार

क्षीरघृत, सद्योघृत, घृत, जीर्णघृत, कुंभघृत, महाघृत असे सहा प्रकार आहेत. तुपाचे क्षीरघृत = दुग्धमंथ संजातं घृतं क्षीर घृतम् । क्षीर मंथनात् समुद्भूत नवनीतोत्थितं घृतं क्षीर घृतम् ।– डल्हण. नीरसें दूध घुसळून लोणी काढतात. त्याला हैयंगवीन म्हणतात. हैयंगवीनाचें तुपही क्षीरघृत म्हणतात. लोणकढें तूप, गरमागरम, तेंच सद्योघृत. थंड झालेलें लोणकढे तूप तें घृत. ह्यावरील द्रवभाग निवळी तो घृतमंड.

जुनें तूप

लोण्यांत दोन प्रकारचें पाणी असतें. एक सामान्य अथवा मिश्र व दुसरें द्रवत्व राखणारें अंगभूत जल. मिश्रजल लोणी काढतांना उडून जातें व शेष पदार्थास घृत ही संज्ञा लाभते. ह्यांत लोण्यांतले दुसऱ्या प्रकारचा जलांश आलेलाच असतो. हा जलसंयोग अति पक्का असतो. तो सहसा सुटत नाहीं. पण काल तो संयोग सोडवूं शकतो. तुपांतलें पाणी जसजसें कमी होत जाईल तसतसे त्याचे गुण बदलतात किंवा वाढतातही. मात्र हें कार्य होत असतांना त्यांत कोणतीही विकृति अगर भेसळ होतां कामा नये.

हवा, प्रकाश आणि आर्द्रता ह्यांचे संसर्गानें स्नेह खंवट होतात. तैलांत पामिटिन, ओलेईन, स्टिअरीन, फॅटी ॲसिडस्, आयडीन असतात. पैकीं ओलेईनमुळें तो स्नेह द्रव राहतो, त्यांत थिजण्याचा धर्म रहात नाहीं. तसेंच फॅटी ॲसिडमुळें तैलें खंवट होतात; हीं अम्लें स्नेहापासून अलग होतात. नंतर भंगतात. त्यामुळें त्यांना खंवट वास येतो. ही विक्रिया हितावह नसते. पण तुपांतलें पाणी उडवायचें असतें त्यामुळें जुनें व्हावयास ठेवावयाचें तूप हवा, उजेड नि सर्दी ह्यांचा संपर्क बिलकूल होणार नाहीं, अशा दक्षतेनें मातीचें भांड्यांत उष्णस्थळीं ठेवावें.

वनस्पती तुपें उदा. डाल्डा तयार करतांना ओलेईन व फॅटी ॲसिडस् प्रथम दूर करतात. त्यामुळें तें तैल थिजतें व लवकर खंवट होत नाहीं. मात्र ह्या पदार्थास तैलाचें स्निग्धत्व व सूक्ष्मगामित्व हे धर्म सोडून गेलेले असतात.

स्वच्छ कणीदार तूप कोऱ्या मडक्यांत गच्च भरावें नि तें मडकें अंधाऱ्या खोलींतल्या जमिनींत खोल पुरावें. वर

आयुर्वेदाच्या क्षेत्रांत अद्वितीय

अशा शक्तिशाली

अरविंद आयुर्वेदीय इन्जेक्शन्स

चा उपयोग करून रोग्यांना शीघ्र निरोगी करा व यश मिळवा. शक्ति व शुद्धता यांबद्दल पूर्ण गॅरंटी दिली जाते. सूचिपत्र मागवा—

सचित्र आयुर्वेदिक इंजेक्शन–चिकित्सा

मूल्य ३ रु. पोस्ट खर्च १० आ.

व्यवस्थापकः—**अरविंद केमिकल वर्क्स, छिंदवाडा (सी. पी.)**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जमीन पक्की करावी. हचा विधींत प्रकाशकिरणें तुपावर कांहीं परिणाम करूं शकत नाहींत. त्यामुळें हचा तुपांत खंवटपणा येत नाहीं. दिवसेंदिवस तें घट्ट घट्ट होत जातें. महाघृत दगडासारखें बनतें. तें पाण्यांत उगाळलें कीं पुनः त्याचें उत्तम तूप होतें हें खरें जुनें (Dehydrated) तूप होय.

अशा तऱ्हेनें १० वर्षाचे जुनें झालेल्या तूपास पुराण तर १०० वर्षाचे जुन्या तुपास कुंभ आणि १११ वर्षें पुरीं झालेल्या तुपास महाघृत म्हणतात. पैकीं पुराण व कुंभ घृताचे उपयोगही चिकित्सेंत केलेले आढळतात. उदा. उन्माद चिकित्सा च. सं.

घृतपान

केवल, एकाकी वा अच्छ घृत निरनिराळ्या कारणास्तव पिण्यास देतात पण सामान्यतः शरदऋतूंत, घृतपान हा एक स्वास्थ्य रक्षणोपाय सांगितला आहे. कारण वर्षाऋतूंत सांठलेलें पित शरदऋतूंत प्रकुपित होतें त्याचे उपशमाकरितां शरदांत घृतस्नेहाचें पान आवश्यक ठरतें.

वसा

ही पातळ व घट्टही असते, पण दोन्ही प्रकार एकमेकाऐवजीं वापरतात. वसेचे सामान्य गुणः—

विद्ध भग्नाहतभ्रष्ट योनिकर्ण शिरोरुजि।
पौरुषोपचये स्नेहे व्यायामे चेष्यते वसा।
च. सू. अ. १३।१६

वसेचे उपयोग

तळण्याकरितां–वऱ्हाह वसा च. चि. अ. २।११
व्रणपरिसेचनार्थ–" " " अ. २६
अनुपानार्थ–" " " अ. ३०।८५
अनुवासनार्थ– " " सु. उ. अ. ४२।२२–२३

दुसऱ्या भागावर अभ्यंग अगर मर्दना (मालिश)-करितांहि योजतात.

वाग्भटानें उपयोजिलेली वसा– सिंह, वाघ चि.अ. ८ सर्प, घुबड, डुक्कर, कोंबडा, उ. अ. १३ र. र. स. मधील वसा :— माणूस, कोल्हा, बेडूक, कांसव, खेंकडा, सुसर, गाय, रानडुक्कर, शेळी, उंटीण, गाढवीण, म्हैस इ. पैकीं डुक्कर, चुलुकी मासा, हंस, कोंबडा शेळी हचांचे मेद चरकानें हितावह मानले तर म्हैस (कुंभीर), पाणकोंबडा (काकमुग्द), करडुवा (कारंडव) आणि हत्ती हचांचे मेद अहितावह सांगितले.

डुकराची चरबी विशेषतः त्याचे पोटावर जाड थरानें सांठलेली असते. ती सुट्टी असते. पोटाची कातडी फाडून ती पाण्यांत धुवावी, रक्त व घाण दूर झाल्यावर तो भाग वाफेचे भांड्यांत ठेवावा. उष्णतेनें पाणी उडतें, चरबी पातळ होऊन बाजूस होते. ती गाळून घ्यावी. ही रंगानें पांढरी व गंधानें मंद सुगंधी आणि घट्ट असते. हिची देवाणघेवाण सहजीं होऊं शकते.

डुकराचे इतर अंगावयवांतही चरबी असते. पण ती अशी अच्छ, स्वच्छ नि स्थिर नसते. ती थंडींत अति घट्ट होते, तर उन्हाळ्यांत पाघळते. शिवाय तिच्यामध्यें घन व द्रव असे दोन भागहि राहतात. त्यामुळें डुकराची चरबी म्हटली कीं ती पोटावरचीच, असा संकेत रूढ झाला आहे.

प्राणिजस्नेह

डुकराची चरबी पाण्यांत विरघळत नाहीं. ४०/९०% अल्कोहोलमध्यें, टरपेंटीनमध्यें ०६% इथरमध्यें २२% विरघळतें.

भेसळ – मेण, सरकी अगर तिलतैल.

उपयोग -पिणें,तळणें,अभ्यंग, खाणें, त्वचेंत शोषल्या जाणाऱ्या मलमांत घालणें. ही लवकर खंवट होते. म्हणून बेंझॉइक अॅसिड् घालून ती वापरतात. ही स्वतः क्षोभक नाहीं. पण बेंझॉईक अॅसिड संसर्गानें ती थोडीशी क्षोभक होते. त्यामुळें अंजनांत अगर नाजूक ठिकाणच्या रोगांवरील मलमांत अशा मिश्र चरबीचा उपयोग करतां येत नाहीं. तसेंच विषयुक्त मलमांतही ही घालूं नये.

उर्णामेद– (मेंढीचे केसांची चरबी) पाण्यांत विरघळते. थंड कोहलमध्यें फार थोडी पण उष्ण कोहलमध्यें मुळींच विरघळत नाहीं. स्वतः स्वतंत्रपणें त्वचेंत भिजत नाहीं. तेलाबरोबर चांगलीच झिरपतें त्वचेंत. 'इतकेंच नव्हे तर औषधें आत्मसात करण्याचा त्वचेचा धर्मही वाढवितें' डुकराचे चरबीप्रमाणें ही लवकर खंवट होत नाहीं. १ पाणी + २ मेद = मिश्रण चांगलें होतें. ही सौम्य शीत आहे. मलमांत अत्युपयोगी.

माशाची चरबी– चरकानें चुल्लुकी मत्स्य वसा श्रेष्ठ ठरविली. आज कॉड नांवाच्या माशाची वसा मोठ्या प्रमाणांत रूढ झाली आहे. ही वसा आहेही उत्तम. पण तींतही वैशिष्टच आहे. नॉर्वेच्या सर्व किनाऱ्यावर कॉड मासा सांपडत असला तरी न्यू फौंडलंडगतचा मासा, कांहीं विशेष आहे. त्याची वसा गुणांनीं सर्वश्रेष्ठ ठरली आहे. ही वसा मूलतः द्रवच असते नि पुढेंही ती तशीच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहते. मात्र ही पोटावर नसून माशाचे यकृतांत असते. निष्कासन विधी डुकराचे चरबीप्रमाणें. ह्या वसेमध्यें ओलेईन, स्टिअरिन, पामिटिन, मिरिस्टीन, आयडीन इ. घटक असतात. तसेंच अ आणि ड हीं जीवनसत्वेंही भरपूर असतात.

कॉडलिव्हर ऑईल–औषधापेक्षां अन्न म्हणूनच ह्याची ख्याति आहे. सगळ्या तेलांत अथवा मेदांत हेंच लौकर पचतें. शरीराची साधारण स्थिति सुधारते. ही चरबी स्वतः तर पचतेच पण इतर पदार्थांतील अधिकांत अधिक चरबी अंश खेंचून घेऊन पचविण्याची शरीरशक्ति वाढविते.

अ सत्वजनक कॅरोटीनपेक्षां अ सत्व अंत्रांत सुलभतेनें शोषलें जातें. सामान्य चरबी, डुकराची चरबी, लोणी, तूप आणि कॉ. लि. ऑईलमध्यें असत्व औसांत १, १, ३, ३, ४ ग्रॅमस् असतें. तर ड सत्व ०, ०, १, १, ४ ह्या प्रमाणांत असतें. तेव्हां जीवनसत्वांचे दृष्टीनें कॉ. लि. ऑ. सर्वांत श्रीमंत आहे. तसेंच अ सत्वजनक कॅरोटीनपेक्षां अ सत्व अन्नांत सुलभतेनें शोषलें जातें. म्हणून यकृतोत्पन्न वसा गुणानें आढ्य तशीच तारतम्यानें पचनसुलभ आहे. तेव्हां आज कॉ. लि. ऑईल हीच वसा अच्छ पानास सुयोग्य होय.

तूप व तैलावर संस्करण करतात. वसेवरही करतात, पण प्रघात फार कमी. स्वास्थ्यरक्षणाकरितां वसंतांत, बलवर्धनाकरितां हेमंतांत वसापान इष्ट तर शरदऋतूंत वसापान वर्ज्य मानलें आहे.

मज्जा

बलशुक्र रसश्लेष्ममेदोमज्ज विवर्धनम् ।
मज्जाविशेषतोऽस्थ्नांच बलकृत्स्नेहने हितं ।
च. सू. अ. १३।१७

मांसाहार गर्ह्य ठरल्यापासून आयुर्वेदीय प्राणिपदार्थ मागेंच पडले. तरीपण मांसाहार करणारे लोक हाडें उकळून तीं चोखतात. व त्यामधील मज्जा सेवन करतात. परदेशी औषधांमधून मज्जेचा उपयोग करतात. तसा आयुर्वेदीय वैद्यांनीं करण्यास सुरवात करावी. विशेषतः अस्थिक्षयांत, मज्जातंतुक्षीणतेंत ह्याचा उपयोग विशेष होईलसें वाटतें.

मज्जा हा पदार्थ दुधाचे खरवडीसारखा सुकट, फुगीर, मऊ आणि स्निग्ध असतो. गरम केल्यास पातळ होतो, निवाल्यावर पुनः थिजतो, व मेणासारखा दिसतो. हा पचायला बराच जड असतो. गरम दुधाबरोबर दिल्यास पचतो. प्रकाशकिरण, उष्ण हवा, प्राणवायु ह्यांचे संसर्गानें हा विघडतो.

तैल

तैलं स्वयोनिवत्तत्र मुख्यं तीक्ष्णं व्यवायिच ।
त्वग्दोष कृदचक्षुष्यं सूक्ष्मोष्णं कफकृन्नच ।
कृशानां बृहणायालं स्थूलानां कर्षणायच ।
बद्धविद्क क्रमिघ्नंच संस्कारात्सर्व दोषजित् ।–अ. हृ.
विष्यस्य तैलस्य न किंचिदंतरम् ।
मृतस्य सुप्तस्य न किंचिदंतरम् ।
ऋणस्य दासस्य न किंचिदंतरम् ।
मूर्खस्य काष्ठस्य न किंचिदंतरम् ।—नि. शि.
मारुतघ्नंच श्लेष्मवर्धनम् बलवर्द्धनम् ।
त्वच्यमुष्णं स्थिरकरं तैलं योनिविशोधनम् ।
—च. सु. अ. १३।११

स्नेहाचे प्रकार चार असले तरी सहज, सुलभ असे प्रकार दोनच नि ते म्हणजे तूप व तैल. ह्या दोहोंत श्रेष्ठ कनिष्ठ कोण हें ठरविणें कठीण आहे. कारण तूप लघु, मृदु, सूक्ष्म स्रोतोगामी, व्यवायि पण तैल सुक्ष्म स्रोतोगामित्व व व्यवायित्व ह्यांत तुपापेक्षां चढ आहे. त्यामुळें दोषपरत्वें जेथें जें युक्त त्याची निवड करावी हेंच योग्य.

आयुर्वेदीय कारखानदार व वैद्य यांस लागणारीं औषधि द्रव्यें

दुर्मिळ अस्सल अष्टवर्ग, केशर, सर्व प्रकारची काष्टौषधि, कस्तुरी, अंबर मौक्तिक (मोती खाका), शौक्तिक, शंख, शुद्ध शिलाजित, सुवर्णमाक्षिक, गोरोचन, प्रवाळ, पारा, गंधक, इ. सर्व प्रकारचीं खनिज व वनौषधि द्रव्यें घाऊक व किरकोळ प्रमाणांत पुरवितों.

गुलकंद आणि मोरावळा हे ठोकबंद मिळतील.

अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य !!

विशेष माहितीसाठीं साप्ताहिक दरांचें छापील पत्रक मागवून घ्यावें.

शा. जाधवजी लल्लुभाई आणि कं.
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २.
टे. नं. ३१७९६ Telegrame–AYURVED.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तैलवर्ग उद्भिज्ज पदार्थांपासून निघतो. हा वर्ग प्राणिज मेदांसारख्याच घटकांनीं युक्त असतो. पण ओलेईन घटक अधिक असल्यानें हा वर्ग द्रव राहतो तर पामिटिन, स्टिअरीनचे आधिक्यानें प्राणिज मेद घट्ट राहतात.

चरकाचाच क्षीरवर्ग तदनंतरच्या लोकांनीं कायम राखला. तसा सुश्रुतोक्त घृतवर्ग सर्वसंमत झाला. चरक, सुश्रुत, वाग्भट, भावप्रकाश. र. र. स, निघंट रत्नाकर, निघंट शिरोमणी इ. नीं तैल देणाऱ्या पदार्थांची यादी दिली आहे. सर्वांत मोठी यादी सुश्रुतांची आहे. आणि सर्व मिळून तैलद उद्भिज्जांची संख्या फार मोठी आहे.

हे सर्व पदार्थ एकाच अंगावयवांतून तैल प्रसवतात असें नाहीं. उद्भिज्जांच्या निरनिराळ्या वर्गाचे मेद निरनिराळ्या अंगीं – जागीं सांठविलेले असतात असें दिसतें. उदाहरणार्थ,

१ **मूळ** – मुळा, वाळा, तगरगांठ इ.

२ **कंद** – भुईमूग, लसूण इ.

३ **नार** – चंदन, सरल, देवदार इ.

४ **साल** – कापूर, दालचिनी इ.

५ **पान** (ओलें)– चहा, सबजा, तुळस, पुदिना, ओंवा, ब्राह्मी इ.

६ **फूल** – गुलाब, जाई, जुई, चमेली, मोगरा, लवंग इ.

७ **फळ** – तीळ, बडिशेप, अळशी इ.

८ **फलमज्जा**– बदाम, पिस्ते, चारोळी, नारळ, अक्रोड इ.

९ **फळसाल**– संत्रें, लिंबू, पपनस, ईड, महाळुंग इ.

१० **बीं** – मुळा, लिंबू, एरंड, करंज, कर्डई, मोहरी, जेपाळ, धोत्रा इ.

११ **पंचांग** – तिळवण, आर्द्र, रोहिसगवत.

चरक, सुश्रुत, वाग्भट, निघंट रत्नाकर, निघंट शिरोमणी, रसयोगसागर, औषधी संग्रह, ब्रिटिश फार्माकोपिया ह्या ग्रंथांमधून दिलेला तैलवर्ग त्याचे गुणवर्णनासह लेखांक १ व २ मध्यें दिला आहे. तैलांची निवड आधार (BASE) म्हणून करतांना मूळ पदार्थाचे सामान्य व विशेष ही दोन्ही माहिती जमेला असल्यास आधार तैलाची निवड करणेचें काम सोपें होऊन अचुकही होईल असा भरंवसा वाटतो.

—तैल द्रव्यांची संक्षिप्त यादी—

१ अळशी	११ कंकोळ	२१ चारोळी	३१ धोत्रा	४१ बिब्बा	५१ शालमोग्रा
२ अंकोल	१२ कोशाम्र	२२ चहा	३२ धणा	४२ बेहेडा	५२ शेवगा
३ ऊद	१३ कडूकविढ	२३ जीरें	३३ पिस्ता	४३ बावची	५३ सबजा
४ उंडी	१४ कॅजिपुट	२४ जायफळ	३४ पळस	४४ भुईमुग	५४ सागरगोटा
५ एरंड	१५ कडुनिंब	२५ तीळ	३५ पुदिना	४५ मोह	५५ संत्र
६ ओंवा	१६ कापूर	२६ तुळस	३६ पिंगवी	४६ मोहरी	५६ सरल
७ करंज	१७ कपाशी	२७ तुवरक	३७ पीसोळा	४७ रोहिष	५७ सरस
८ कर्डई	१८ खोबरें	२८ देवदार	३८ बदाम	४८ लसूण	५८ सताप
९ कांगणी	१९ गुलाब	२९ दालचिनी	३९ बडिशेप	४९ लवंग	५९ हिरडा
१० कोशिंब	२० चंदन	३० दंती	४० बादयाणा	५० वेखंड	६० हिंगणबेट.

मोठ्या प्रमाणांत मिळणारीं तैलें

तीळ	नारळ	एरंड	शिरस	गुईभस
उंडी	करंज	जेपाळ	कोकम	
निंब	कर्डई	पिंगवी	बावची	
मोह	खष्टेल	कांगणी	मोहरी	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तैल वर्गीकरण

तैलांचें वर्गीकरण निरनिराळ्या तऱ्हेनें करतां येतें. हें वर्गीकरण दोन प्रकारचें आहे. १ त्रिविध २ द्विविध ह्या वर्गांच्या पोटसंज्ञा, त्यांचें इंग्रजी अर्थ व उदाहरणें प्रथम देऊन त्यावरून तैलाचें मूळ स्वभाव लक्षांत येऊन त्याची योजना करणें सोपें होईल.

त्रिविध रूपें सहज समजण्यासारखीं. द्विविधतासुद्धां समजण्यास सोपी आहे. फक्त स्थिर नि अस्थिर शब्दांची फोड थोडी दिली म्हणजे झालें. हीं दोन्हीं तेलें असतात उद्भिज्जच. पण जी जरा चिकट, मंदगंधी, मंदगति आणि जरा घन असतात जीं दाबून अगर उकडून काढतां येतात त्या तेलांना स्थिर (*Fixed*) तैलें म्हणतात. उदा. तिल तैल, एरंडेल.

अस्थिर म्हणजे चंचल. हेंच चलत्व शोषणांत व गंध उडण्यांत प्रतीत होतें. हीं तैलें द्रव अगर शुष्क स्वरुपांत असतात. बंद भांड्यांत घालून किंवा पातन यंत्रांत (*still*) घालून तैल अगर वाफेच्या सहाय्यानें अलग करावीं लागतात. ही सुगंधी असतात. उघड्या हवेंत हीं तैलें ठेवल्यास तीं गंधरूपानें उडून जातात. ठिकाणावर कांहींही रहात नाहीं. त्यांच्या ह्या उडून जाण्याच्या धर्मामुळें त्यांना उयशील असेंही संबोधतात. उ. कापूर, चंदन इ. हीं तैलें शरीरांत लौकर शोषलीं जातात. हीं चोळावीं लागत नाहींत. तसा ह्यांचा कपड्यास डागही पडत नाहीं. शरीरांत न सोसलेला भाग हवेंत विरतो. त्यामुळें स्निग्ध ही संज्ञा त्यांना लागू होत नाहीं. ह्यामध्यें स्नेहाचे कोणतेच घटक नसतातः पण तैल सादृश्य त्यांत असल्यानें तीं तैल वर्गांत गणलीं जातात इतकेंच. खनिज तैलांबाबतही हाच प्रकार दिसून येतो. रॉकेल पेट्रोल ह्यामध्यें ओशटपणा, गुळगुळीतपणा मुळींच असत नाहीं. उयशील तैलांशीं खनिज तैलांचें फार साम्य आहे.

त्रैविध्यं	उदाहरणें
१ खनिज	रॉकेल
२ उद्भिज्ज (स्थावर)	तिल
३ प्राणिज (जंगम)	वसा
+ +	
१ शुष्यत्	अळशी
२ अर्धशुष्यत्	कपास
३ अशुष्यत	बदाम
+ +	
१ द्रव	भुईमूग
२ घन	बावची
३ शुष्क	कापूर
+ +	
१ अंतरोपयोगी	मोहरी
२ बाह्योपयोगी	सरल
३ उभयविध	कर्डई
+ +	
१ त्वगुदूषक	बिब्वा
२ अंतरत्वगूदूषक	एरंड
३ उभयविध	दंती
+ +	
१ अशुद्ध	तिलतैल

द्वैविध्यम्	उदाहरणें
१ स्थिर	उंडल
अस्थिर	तुळस
+ +	
२ थिजणारी	खोबरेल
न थिजणारी	तिळेल
+ +	
३ ज्वालाग्राही	रॉकेल, पेट्रोल
नज्वालाग्राही	एरंड
+ +	
४ त्वग्शामक	खोबरेल
त्वग्क्षोमक	कॅजिपुट
+ +	
५ उत्तेजक	ज्योतिष्मती
अवसादक	चंदन
+ +	
६ सविष	कडू बदाम, क्रोटन
अविष	तिलतैल
+ +	
७ वामक	जेपाळ
विरेचक	एरंड
८ टिकाऊ	तिल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ शुद्ध	निर्गंधतिलतैल	विनटिकाऊ	शेंगदाणा
३ सिद्ध	अणुतैल		
+ +		+ +	
१ शामक	ऑलिव्ह	९ सूर्यतापी	मुठेल
२ क्षोभक	ज्योतिष्मती	अग्नितापी	बावची
३ शोधक	एरंड		

द्वैविध्यम्	उदाहरणें	द्वैविध्यम्	उदाहरणें
१० शीत दाबहृत	नारळ	१३ नैसर्गिक	अत्तरें
उष्णदाबहृत	कोकम	कृत्रिम	"
× × ×		× × ×	
११ उकडून काढलेले	मोहरी	१४ अच्छ	खोबरेल
उडवून काढलेले	टरपिन	मिश्र	"
× × ×		× × ×	
१२ नवे	तिल	१५ पाण्यापेक्षां जड	मुळा
जुनें	ज्योतिष्मती	" " हलकें	एरंड
× × ×		× × ×	

स्नेहसाधन-विधि

सप्टेंबर व आक्टोबर अंकांतील मुद्रणदोषांचें शुद्धिपत्र

अंक	पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
सप्टेंबर अंक	९	४०	कर्षं	कंपेच
"	१२	४	पाडव	पाटव
"	१४	२	मूत्रपि	मूत्राणि
आक्टोबर अंक	३	१९	लावल्यास	रक्त वाहणें
"				बंद होतें व जखम रुजते-
"	३	२२	काढलेलें	औषधोपयोगी
"	३	३४	खवा	खरवा
"	३	६	कन्वह	कन्वट्ट
"	५	१८	बस्तिक्षयांतल्लें	बस्तिशोथातलें
			रक्ताभसरण	अुन्हाळें
"	७	१९	सर्वपोत्थेन	सर्षपोत्थेन

वरील मुद्रणदोषांबद्दल आम्ही दिलगीर आहों.

— संपादक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यक व धर्मशास्त्र

दिनांक २७–९–५२ रोजीं पंडितजी सातवळेकर यांनीं, सातारा येथील आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालयास भेट दिली. त्यावेळीं, तेथील विद्यार्थीवर्गापुढें पंडितजींचे उद्‌बोध असें व्याख्यान झालें. त्याचा सारांश पुढें देत आहों–

पं. श्री. दा. सातवळेकर यांचें व्याख्यान

हजारों लोकांना, विशिष्ट आचारानें हजारों वेळां अनुभव आले. त्या अनुभवावरून शास्त्र किंवा शास्त्राचे नियम बनत गेले. अशा हजारों वर्षांच्या, व व्यक्तींच्या अनुभवावरून निर्माण झालेल्या शास्त्राला "वैद्यक शास्त्र" असें म्हणतात. अशा अनेक अनुभवास आलेल्या नियमांच्या सारांतील साराला धर्मशास्त्र असें म्हणतात.

योगशास्त्र व वैद्यक

फार प्राचीन काळीं आपल्या भरतखंडांत, वैद्यकशास्त्र, योगी लोकांच्या ताब्यांत होतें. वैद्य म्हटला कीं, तो योगशास्त्राचा अनुभवी असावयाचाच. त्यामुळें तो योगशास्त्र व वैद्यकशास्त्र या अुभय शास्त्रांचा उपयोग करावयाचा. योगशास्त्रांत ध्यान, धारणा, आसन, प्राणायाम इत्यादि अनेक अंगांचा विचार येतो. नुसत्या आसनानें अनेक व्याधी जडत नाहींत. झाले असले तर ते वरे होतात. मलावरोध, अपचन अशा पोटाच्या विकारांत प्रायः पोटाला ताण पडेल अशीं आसनें रोग्यांना करावयास सांगून पोटाची व्यथा ते दूर करीत. आसनाबरोबर प्राणायामहि ते सांगत असत. साधारणतः मौंजीबंधन झालें, कीं, त्या मुलाला संध्या व प्राणायाम हीं शिकविलीं जात असत. असें योगशास्त्र धर्म म्हणून पूर्वकाळीं उपलब्ध होतें. आसन व प्राणायाम यांमुळें त्या ब्रह्मचाऱ्याला अनेक फायदे होत असत. त्याचें शरीर, बेडौल न होतां, तें बांधेसूद, यथायोग्य, समतोल होतें. आपलें शरीर आसन व प्राणायाम यामुळें जसें ताब्यांत राहते, त्याप्रमाणें मनही ताब्यांत राहतें. प्राणायामामुळें वदनावर प्रसन्नता राहते, एक प्रकारचें तेज चमकूं लागतें. आवाज प्रस्फुट, ओजस्वी, तेजस्वी बनतो. व सर्वांत मोठा उपयोग म्हणजे "बिंदुजय" मिळवितां येतो. बिंदुजय म्हणजे शुक्र अथवा वीर्य यांचें रक्षण करितां येतें. आणि अरोगता लाभते. व्याधि अजिबात होऊंच नयेत व दीर्घ आरोग्य लाभावें याला या योगशास्त्राची जरूरी आहे. योग म्हणजे योजना. वैद्यलोक जी औषधी योजना पत्रकावर लिहितात (प्रिस्क्रिप्शन) त्यालाहि योगच म्हणतात. हे दोनीहि योग पूर्वीचा वैद्य यथावस्था वापरीत असे.

आसनें, प्राणायामादिक यौगिक साधनांनीं, व्याधींची उत्पत्तीच कमी असावयाची. पण यदा कदाचित, हवा, पाणी, काल, अशा जागतिक आपत्तींनीं व्याधी जडलाच, तर औषधीयोग व योग या उभय योगांनीं त्यांचें निराकरण केलें जाई. व त्या उभय योगांनीं रुग्णांना बरें वाटत असे. पूर्वीच्या काळांत व्याधी होऊंच नये याकडे अधिक लक्ष असे. निरोगी माणसाचें आरोग्य कायम टिकावें यासाठीं वैद्याला पैसा मिळत असे. व्याधीनें जर्जर झाला असतां त्याला नाडून पैसा लुबाडण्याची त्या काळीं वैद्यवर्गाची प्रवृत्ति नव्हती.

आयु:, आरोग्य, व ऐश्वर्य यांच्या प्राप्तीसाठीं आपण सर्व कांहीं करीत असतों. असें वैभव पूर्वकाळीं लोकांना लाभत असे. याचें कारण ते लोक धर्मानें वागत असत. त्यांचे आचारविचार धर्मनिष्ठ असत. सामान्यतः १२० वर्षें ही आयुष्याची मर्यादा होती. पहिलीं आठ वर्षें बालपणांत जात. पुढील बारा वर्षें विद्याभ्यासांत जात. वयाच्या वीस वर्षापासून १२० वर्षापर्यंत म्हणजे पुढें शंभर वर्षें त्याला लाभत असत, व त्याला या काळांत शंभर यज्ञ करावे लागत. या काळांत शक्य तों सर्व अपमृत्यु टाळले जात असत. त्यामुळें त्यांना ऐहिक भोग भोगतां येत असत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हैदराबाद शहरांतील
अर्कशाला औषधांचे
प्रमुख विक्रेते
आयुर्धाम मेडिकल हॉल
★
रेसिडेन्सी बस स्टँड समोर
सुलतान बझार, हैद्राबाद
यांचेकडे आयुर्वेदीय अर्कशाला लि.,
सातारा यांचीं सर्व औषधें मिळतात.

दमा हटतो
तो कायमचाच. पुरोहित श्वासहारी हें एकच २८ वर्षें सतत प्रख्यात व अनुभविक असें डॉक्टरी औषध आहे कीं, जें तात्काळ आराम देऊन आस्ते आस्ते दमा बरा करतें. औषध घेण्यास सुरुवात करतांच कफ सुटतो, धांप कमी होते, पचनक्रिया सुधारते व फुफ्फुसें मजबूत होऊन कांहीं कालानंतर दमा निखालस बरा झाल्याचा अनुभव येतो. रु. ३।, ६ व १० किंमतीच्या पॅकिंग मधून सगळीकडे विक्री मिळतें अगर
कारखानदार
डॉ. पुरोहित फार्मसी,
कोल्हापूर (एस. एम. सी.)
पुरोहित श्वासहारी

भगवान श्रीकृष्णांनीं आपल्या अवताराची परिसमाप्ति केली त्यावेळीं त्यांचें वय १२५ वें होतें " राष्ट्रधर्म प्रस्थापनेचा कार्यक्रम मी पुरा केला. माझें कार्य संपलें. आतां मी जातों, " असें म्हणून ते निघून गेले. आपण म्हणाल कीं, भगवान श्रीकृष्ण अवतारी पुरुष होते. पण मी म्हणतों कीं आपण प्रत्येकजण अवतारच आहोंत. भगवानांच्या शक्ति वाढीला लागल्या, आपल्या मात्र वाढीला लागल्या नाहींत. त्या शक्ति आपण आपल्या आचरणानें वाढविल्या तर आपणही निःसंशय अवतारी पुरुष होऊं.

दीर्घायुष्य व ते निरोगी भोगण्यास धर्माचरणाची जरूरी आहे. आरोग्याचार चालूंच आहे. त्यांतून वैद्यकशास्त्र भरलेलेंच आहे. त्या सारांचे सार तें धर्माचरण समजावें. उठल्यावर पहाटे गंगास्नान करावें. रोज संध्या करावी. हातपाय ओले ठेवून जेवावे. इत्यादि आचार ठेवला तर मनुष्य शंभर वर्षे जगतो. ही अनेक लोकांनीं, अनेकदां अनुभव घेऊन ठरविलेली गोष्ट आहे. त्या प्रमाणें आचरण ठेवल्यास निश्चित दीर्घ व निरोगी आयुष्य लाभतें. धर्मशास्त्रांतील सर्व नियम वैद्यक व योगशास्त्र यांच्या कसोटीवर घासून ठरलेले आहेत. त्यांत पुनः विचार करण्याचीहि जरूरी नाहीं.

सकाळीं उठल्यावर शीतोदकानें स्नान करावें. यामुळें आपली शक्ति दसपट वाढते. स्नानानंतर ईशचिंतन करावें, परमेश्वर व आपण यांत तन्मयता लावावी, सर्व बाह्य कामें बाजूला ठेवून कांहीं वेळ परमेश्वराचें ध्यान धरावें. आपलें चित्त त्याचेकडे लावावें.

नास्ति चिंतासमो व्याधिः

सध्याच्या कालांत चिंता हा मोठा रोग माणसाच्यामागें लागला आहे. प्रापंचिक अडचणींनें मनुष्य वैतागून गेला आहे. अशा वेळीं त्यानें कांहीं काळ परमेश्वराच्या चिंतनांत घातला तर त्याला निःसंशय फायदा झाल्याखेरीज राहणार नाहीं. बाह्य वृत्ति बंद ठेवून तो अंतर्मुख वृत्ति होऊन परमेश्वराचे ध्यानधारणेंत लीन होईल, तर त्याचें सामर्थ्य आणखी दसपटीनें वाढेल. अनेक बाह्य व्यापार करण्याचे श्रम त्याला कधींच वाटणार नाहींत. असें महान् सामर्थ्य त्यांच्या अंगीं येईल. आपण रोज निद्रा घेतों. निद्रेंतहि आपणांला तेंच लाभतें. झोंप ही ब्राम्ही स्थिति आहे. त्यांतून आपण उठलो म्हणजे पुनश्च ताजेतवाने होतों. निद्रेनें आपणांला शक्ति लाभते. आरोग्य लाभतें. तशीच, आरोग्य आणि उत्साह यांचीं प्राप्ती परमेश्वर व आपण यांच्या तन्मयतेंत लाभेल. हयाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण ओळीनें आठदहा दिवस अभ्यास करा. निश्चितपणें आपणांला एकप्रकारचा दिव्य आनंद लाभेल यांत शंका नाहीं. मानसिक एकाग्रता आणि वैद्यकीय औषधयोजना या दोहोंनीं आपणांला रोग जिंकतां येतो. नवीन नवीन शास्त्रांतील शोध व बोध आपण घेतले पाहिजेत. मागें असून उपयोगी नाहीं. त्याचाहि आपण आपल्या शालांत समावेश केलाच पाहिजे. बाल्हीक, चीन, मेक्झिको या देशांतून औषधी द्रव्यें आणून त्यांचा उपयोग आर्यवैद्यकानें केलाच आहे.

पूर्वीच्या काळचे मी वैद्यवर पाहिले आहेत. एका मिनिटांत अभ्रकभस्म करून देणारे लोक मी स्वतः पाहिलें आहेत. वडाचें दूध व पारद इत्यादिकांच्या संयोगानें केलेलें भस्म मी स्वतः डोळ्यांनीं पाहिलें आहे. काविळ झाली असतां औषधाचा फक्त एकच डोस देऊन पुढें आठदहा दिवस रोग्याला दूधभात खाण्यास देऊन कावीळ विकार बरा झालेला मी पाहिला आहे. नेपाळ, तिबेटपासून खालीं दक्षिणेकडे कन्याकुमारीपर्यंत माझ्या संचारांत मी अनेक लोकांच्या गांठी घेतल्या. त्यांचे अनेक चमत्कार मी पाहिले आहेत. या चमत्कारांचें संशोधन व्हावयास पाहिजे. आयुर्वेदाचें संशोधन जर्मनींत होतें. व ते लोक सांगतात कीं भारतांतील धातूंचीं भस्में, आमच्या येथील आम्ही करतो त्या ऑकसाईड्सपेक्षां शरिरांत सहज शोषिलीं जातात व गुणकारी ठरतात. पण आम्हांस त्याचें कांहींच वाटत नाहीं. यासाठीं आपल्या देशांत अशा चमत्कारांचें संशोधन करण्यासाठीं संशोधनगृह काढलें पाहिजे. पृथ्वीतील सर्व लोकांनीं आपल्या देशांत यावें. विद्या शिकून जावें. अशी पूर्वी आपल्या भरतखंडांत प्राचीन विद्या व शास्त्रें यांची स्थिती होती. ती परत प्राप्त झाली पाहिजे. कोणती ही विद्या शिकण्यास सध्यां परदेशांत जावें लागतें ती स्थिति सुधारून आपल्या देशांत इतर देशांतील लोकांनीं आलें पाहिजे.

———

वसंत मिश्रण
सुवर्णयुक्त टॉनिक
४० गोळ्या किंमत ४ रुपये
पोस्टानें मागवा.

अर्कशाळेचीं
पेटंट व इतर सर्व प्रकारचीं औषधें
पुण्यांत
आतां सुलभतेनें मिळूं लागलीं.
प्रमुख विक्रेते
आदर्श एजन्सी,
३९५।७ सदाशिव पेठ, पुणें २.

नित्योपयोगी अर्कशाला औषधें
एग्युमिक्श्वर
कोणत्याही ज्वरांत सहाय्यक औषध म्हणून, किंवहुना प्रारंभीं एकमेव औषध म्हणून एग्युमिक्श्वरचा उपयोग करणें हितावह आहे. सर्दी, पडशामुळें येणारा ताप, एन्फ्ल्यूएंझा व विषमज्वर यांसाठीं एग्युमिक्श्वर वापरावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातप्रकृतेः लक्षणम्

लेखक : गो. अ. फडके, आयुर्वेदाचार्य

(लेखांक ३ रा)

प्रकृति—

शरिराचें विशिष्ट स्वरूप किंवा स्वभाव याला प्रकृति असें म्हणतात. मनुष्य हा, एक जातीचा प्राणी आहे. पण या जातींतही प्रत्येक व्यक्तीनुसार त्याच्या शरीराचे स्वरूपांत अथवा स्वभावांत फेरबदल असतात. अगदीं एकसारखीं दिसणारीं एकाच वयाचीं, एकाच आईबापाच्या पोटीं एकाच वेळीं जन्माला आलेलीं दोन माणसें घेतलीं तरी त्यांच्या शरीरव्यापारांत थोडाफार फरक आढळतोच. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' ही म्हण यावरूनच पडलेली असावी.शरीर-रचनेंत आणि क्रियेंत थोडाफार अतिसूक्ष्म का होईना फेर-बदल आढळतातच. प्रत्येकाच्या देहांत सप्त धातु असतातच. किंवा प्रत्येकाचें शरीर मस्तिष्क, हृदय, आंत्र, बस्ति इत्यादि अवयवांनीं बनलेलें असतें. विचार, बुद्धीचे व्यापार, रसादि धातूंचे अभिसरण, अन्नपचन, मलविसर्जन, इत्यादि शरीर-व्यापार जवळ जवळ प्रत्येक व्यक्तींत सारखेच चालू असतात असें आपण स्थूलमानानें म्हणतों. पण त्यांत जरा सूक्ष्म दृष्टीनें आपण पाहूं लागलों, म्हणजे आपणांला त्यांतील फरक कळून येतात. प्रत्येक देहांतील धातूंचें प्रमाण व गुण यांत कांहीं तरी विशेष असतात. कांहीं स्थूल तर कांहीं कृश, कांहीं खुजीं तर कांहीं उंच, कांहीं काळीं, तर कांहीं गोरीं, कांहीं निमगोरीं, कांहीं बुद्धीवान तर कांहीं मंद बुद्धीचीं, कांहीं निःस्वार्थी, शूर, पराक्रमी, प्रेमळ तर कित्येक भित्रीं, स्वार्थी, कंजूष, कठोर, चोर अशा असंख्य प्रकारचीं माणसें पहावयास मिळतात.

असे विविध भेद प्रत्येक व्यक्तीव्यक्तींत कां निर्माण झाले याचें उत्तर आयुर्वेदानें "प्रकृति" या एका शब्दानें दिलें आहे. सर्व जगताचें कारण तिलाहि प्रकृति म्हणतात. पण मानवी देह निर्माण होण्यास जें प्रमुख कारण (म्हणजे प्रकृति) यांत फरक्र, सूक्ष्म सूक्ष्म भेद असतात म्हणून निर-निराळ्या प्रकृति बनत असतात.

मानवदेहाचें मुख्य कारण म्हणजे मातापिता. माता-पित्यांचीं सूक्ष्म बीजें. जीं बीजें एकत्र येऊन हा देह बनला तीं. पित्याचे म्हणजे पुरुष रेत त्याला शुक्र म्हणतात, व मातेचे जें स्त्री रज त्याला आर्तव किंवा शोणित असें म्हणतात. शुक्र व शोणित यांचे गर्भाशयांत आत्मा, अष्टप्रकृति, व षोडष विकार यांच्यासह एक काळीं मीलन झालें म्हणजे गर्भधारणा होते. या जीव संक्रमणसमयीं शुक्रशोणितस्थ बीजभूत त्रिधातूंपैकीं किंवा ज्यांचें आधिक्य असेल त्या प्रमाणें त्याचें शरीर बनत असतें व ते बीजभूत त्रिधातू त्या देहाचे कारण बनतात. ती त्याची प्रकृति म्हटली जाते.

शुक्रशोणित संयोगे यो भवेद्दोष उत्कटः।
प्रकृतिर्जायते तेन॥ सु. शा. ४।६३

जन्म प्रारंभांत वात, पित्त, कफ हे त्रिधातु सम व पूर्ण गुणवान असतील तर सर्वांत उत्तम प्रकृतीचा देह जन्माला येतो. पण त्यांत वातपित्तकफांपैकीं कोणी एक किंवा दोन प्राकृत पण अधिक असल्यास ही विकृति असूनहि त्या-पासून देह बनत असल्यानें तिला प्रकृति असेंच म्हटलें जातें.

शुक्रातिवस्थैर्जन्मादौ विषेणेव विषक्रिमेः।
तैश्च तिस्रः प्रकृतयो हीनमध्योत्तमः पृथक्
समधातु समस्तासु श्रेष्ठा निंद्या द्विदोषजाः।
वा. सू. १।१३

येथें अशी शंका येईल कीं आपापल्या पूर्वकर्मानुसार देह बनतो पण देह होण्यास शुद्ध बीजाची आवश्यकता आहे. शुक्र व शोणित हीं शुद्ध पाहिजेत. त्यांत एक किंवा दोन दोन धातूच प्राकृत पण उत्कट असून कसें चालतें? इतर हीन धातूंची वाट काय? एक धातू वा द्विधातू प्राकृत अस-ल्यानें सर्वच बीज निरुपयोगी अथवा दुष्ट होत नाहीं. एकादा त्यांतील अंश अथवा अवयव गुणकर्मांत बदलतो इतकेंच. परंतु गर्भच तयार होत नाहीं असें मात्र होत नाहीं. होऊं शकतो. त्यांतल्या त्यांत जो एक किंवा दोन धातू गुणवान आहेत त्याच्या बलावर गर्भसंभव होऊन शरीर-व्यापार चालूं शकतात व अशीं माणसेंहि दीर्घ आयुष्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढूं शकतात. येथें एक वाग्भटाचार्यांनीं दृष्टांत दिला आहे. विषाच्या कांड्याहि कांहीं दिवसांनीं कीड लागून यांत कृमि निर्माण झालेले दिसतात. त्या विषांत जीवनाला उपयोगी भाग असेल तोच घेऊन त्या कीटकांचीं बीजें विषवल्लीतही वाढूं शकतात. त्याचप्रमाणें बीजांत त्रिधातूंचें कमीअधिकपणानें वैषम्य असलें तरी त्यांतही देहसंभव होऊं शकतो. बीजांतील उत्कट दोष प्राकृत नसतां उलट विकृत असतील तर गर्भधारणा होणार नाहीं. गर्भोत्पादनास शुद्ध बीजांची आवश्यकता असते. यदाकदाचित् झालीच तर सर्व बीज त्या विकृत दोषांनीं व्याप्त नाहीं इतकाच अर्थ त्याचा असतो. मात्र त्या बीजापैकीं थोडाफार भाग अथवा अंश अशा ठिकाणीं दुष्टच आढळतो. म्हणून कित्येक मुलें जन्मतःच आंधळीं, मुकीं, थोटीं, लंगडीं, पांगळीं, अशीं विकृत आकाराचीं आढळतात. दृष्टिउत्पादक बीजभाग वातादि दोषांनीं म्हणजे विकृतोत्पादक कारणांनीं दुष्ट असेल तर जात्यन्ध गर्भ उत्पन्न होऊं शकतो.

गर्भ उत्पन्न काळीं वात पित्त कफापैकीं जें उत्कट पण प्राकृतिक असतील त्यापासून गर्भ निर्माण होईल. ज्या गर्भारंभांत त्रिधातू प्राकृत आणि उत्कट आहेत असा गर्भ सर्वांत उत्तम प्रकृतीचा होईल. ज्यांत एक किंवा दोन धातूच प्राकृत व उत्कट आहेत त्यांत समधातूइतका चांगला गर्भ उत्पन्न होणार नाहीं. समधातूच्या अपेक्षेनें ती विकृतीच म्हटली जाते. ती विकृती पण प्रकृती आहे. अशा प्रकृती पण सात प्रकारच्या मानल्या आहेत (१) वातज, (२) पित्तज, (३) कफज, (४) वातपित्तकफ या समत्रिधातूज, (५) पित्तकफज, (६) वातकफज, व (७) वातपित्तज.

वाताची प्रकृती हीन, पित्ताची मध्यम, कफाची उत्तम, समधातूंची सर्वांत श्रेष्ठ, पूर्ण सत्वगुण प्रधान उत्तमांतील उत्तम अशी म्हटली जाते. द्विदोषज प्रकृती हीन समजल्या जातात. पित्त कफज हीन, वातकफज त्याहून हीन हीनतर व वातपित्तज प्रकृति सर्वांत हीन म्हणजे हीनतमा म्हटली जाते.

वातप्रकृति—

वातप्रकृति ही हीन प्रकृति आहे. शरीर शंभर वर्षे टिकण्यास त्यांत जें सौष्ठव आकृतितः व गुणतः पाहिजे तें यांत नसतें. या प्रकृतींत वायु अधिक बलशाली असल्यामुळें वायूचेंच व्यापार शरीर व्यापाररूपानें दिसून येतात. त्यांत विक्षेपण, अथवा हालचाल अधिक असते. त्यामुळें वातप्रकृतींत संघटना जास्त न दिसतां विघटना अथवा व्ययच जास्त घडून येतो. त्यांच्या शरीररूपी घड्याळाचा आंतील कांटा जलदीकडे (Fast) अधिकच ढकललेला असतो. त्यामुळें वातप्रकृतीच्या माणसांचीं शरीरें व त्यांतील व्यापार जलद चालतात. अशा प्रकृतीच्या शरिरांतील धातूंची प्रवृत्ति विघटनेकडे अथवा नाशाकडेच अधिक असते. कांहीं मोटारगाड्या अशा असतात कीं, त्यांत घेतलेल्या पेट्रोलवर जास्त मैल प्रवास करितात. व याच्याच उलट कांहीं गाड्या अशा असतात, कीं त्यांत तितकेंच पेट्रोल घालून त्यांच्याकडून तितक्या मैलाचा प्रवास होत नाहीं. त्यांना अधिक पेट्रोल लागतें. कारण कांहीं मोटारींचा स्वभावच असा असतो. त्यांत व्यय किंवा नाश अधिक लवकर होतो. कांहीं माणसें अशीं असतात कीं, ती योग्य प्रमाणांत आपला आहार घेऊन तो योग्य काळांत पचन करितात. पण वातप्रकृतीचीं माणसें यांच्या उलट असतात, त्यांना अधिक इंधन घ्यावें लागतें, कारण त्यांच्या शरिरांत व्ययाकडेच प्रवृत्ति अधिक असल्यानें तें शरीररूपी यंत्र चालण्यास त्यांना वारंवार अथवा अधिक आहार घ्यावा लागतो, वाताचें रूक्षादि गुणांचा पगडा या शरिरावर अधिक झालेला असतो, व त्यामुळेंच वायूचींच लक्षणें, वातप्रकृतीच्या शरिरांत, शरीर व्यापारांत, व त्या व्यक्तीचे आचारविचारांत आणि स्वभावांत दिसून येतात.

वातस्तु रूक्षलघु चल बहुशीघ्र शीतपरुष विशदः। तस्य-रौक्ष्याद्वातला रूक्षापचिताल्पशरीराः प्रततरूक्ष क्षामसभिन्न सक्त जर्जरस्वरा जागरूकाश्च भवन्ति। लघुत्वाल्लघुचपल गति चेष्टाहारव्यापाराः, चलत्वादनवस्थितसन्ध्यक्षिभ्रूहन्वोष्ठजिव्हाशिरः स्कंन्धपाणिपादाः,बहुत्वाद्बहुप्रलाप कण्डरासिराप्रतानाः, शीघ्रत्वाच्छीघ्र समारंभक्षोभविकाराः शीघ्रत्रासरागविरागाः श्रुतग्राहिणोऽल्पस्मृतयश्च, शैत्याच्छीतासहिष्णवः प्रततशीतकोद्वेपकस्तम्भाः, पारुष्यात् परुषकेशश्मश्रु रोमनख दशनवदन पाणिपादाः, वैशद्यात् स्फुटितांगावयवाः सतत संधिशब्दगामिनश्च भवंति। त एवं गुण योगाद्वातलाः प्रायेणाल्पबलाश्चाल्पायुषश्चाल्पापत्याश्चाल्पसाधनाश्चाल्पधनाश्च भवन्ति॥ चरकसंहिता वि०८।९८

वातप्रकृतीच्या माणसाची शरीरयष्टी कृश, उंच व रूक्ष असते. डोकें सारखें हालचालींत असतें. डोक्यावरील केश अल्परूक्ष, ताठर, खरखरीत असतात. तो वारंवार भुवया उडवितो. त्याचे नेत्र वाटोळे, रूक्ष, धूसर, काळपट, अरुण रंगाचे असतात. त्याची दृष्टि स्थिर नसते. चंचल असते-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाहुल्या विस्फारित असतात. झोपेंत त्याच्या डोळ्यावरील पापण्या नीट मिटत नाहींत. प्रेताप्रमाणें अर्धवट उघड्या राहतात. चेहरा प्रायः लहान व उभट आणि रूक्ष असतो. गाल फुगीर नसतात. उलट बसलेले अपुष्ट असतात. ओष्ट, जिव्हा, तालु रूक्ष असतात. तोंडांतील जलस्राव कमी असतो. दांत राकट, खर. त्याची मान चिंचोळी, अल्पपुष्ट असते. गळा फुगीर नसतो. त्याचा आवाज रूक्ष, कर्कश, कठोर, बसका, घोगरा, फुटलेला असतो. हनुवटी, खांदे, हात, यांची हालचाल तो फार करतो. उरःस्थान पुष्ट नसते. श्वासोच्छ्वास, व हृदयाची गती वाढलेली असते. पोट फुगीर नसते. उलट खपाटी गेलेलें असतें. त्याची कमर बारीक असते. नितंबभाग पुष्ट व उन्नत नसतात. मांड्या, पिंढऱ्या, लांबट, उंचट पण अपुष्ट असतात. पाय लहानसर असतात, कृश असतात. बाहूप्रकोष्ठ कृशच असतात. उदरावरील, पाठीवरील, शाखावरील त्वचा रूक्ष असते. स्नायू प्रतान वेगळे वेगळे दिसतात. हातावर प्रकोष्ठावर उन्नत शिराशिरांची जाळीं पसरलेलीं, दिसतात. हातांचीं व पायांचीं बोटें लांबट, कृश असतात. पर्वसंधी मोठे झालेले असतात. तळहात तळपाय खरखरीत, फुटलेले, अंगावरील त्वचा फुटलेली तडे गेल्यासारखी धुरकट रंगाची असते. नखें फुटलेलीं, रूक्ष, ओबडधोबड असतात. अंगावरील, रोम, दाढीमिशी, डोक्यावरील केस, रूक्ष, खरखरीत ओबडधोबड, राठ असतात. सांधे मोठेले दिसतात. इतर अंगावयव कृश असल्यामुळे संधी उन्नत दिसतात, हाडांची टोकें उन्नत दिसतात. वातप्रकृतीच्या माणसांनीं हालचाल केली कीं त्यांच्या संधींतून 'चटचट' आवाज निघतात. हीं माणसें, आपल्या शरीरयष्टीच्या मानानें जास्त खातात (बहुभुंजः) किंवा त्यांचें खाणेंपिणें नियमित नसतें. लहर लागली तर कधीं अधिक जेवतात, कधीं कमी जेवतात. त्यांच्या उदरांत पाचक पित्ताचे व्यापार तीव्रतेनें चालत नाहींत. अशा लोकांना शौचासही साफ होत नाहीं. सरगुणी पित्त कमी असतें. प्रतिरोधक वायूच जास्त असतो. त्यामुळें या लोकांची मलविसर्जनाची क्रिया किंवा शक्ति अल्पच असते. पुष्कळ मलविसर्जित केला जात नाहीं. हीं माणसें शौचास साफ झाली नाहीं, अल्प झाली असेंच सांगतील. या लोकांना घामही फारसा येत नाहीं. वातप्रकृतीच्या माणसांचें जननसामर्थ्यही अल्प असतें. त्यामुळें त्यांना अपत्यें पुष्कळ होत नाहींत (न बहुप्रजाः), थोडीं मुलें असतात. स्त्रियांना ते प्रिय नसतात.

अशीं माणसें जलदीनें चालतात. भटकी, फिरणें त्यांना आवडतें. जेवणें, घेणें, देणें, खेळणें इत्यादि शरीरक्रिया ते चपळतेनें करतात. हीं माणसें फार बोलकीं, बडबडी असतात. वात प्रकृतीच्या माणसांना निद्रा अल्प येते. जी थोडी फार लागते ती खंडित असते. त्यांना पर्वताच्या शिखरावर किंवा झाडावर आपण चढलों होतों, विमानांत बसलों होतों, प्रवास करीत होतों अशा स्वरूपाची वारंवार स्वप्नें पडतात. यांची झोंप जागृत असते. खुटकिनी आवाज झाला कीं हीं माणसें पट किनी उठतात.

अशा प्रकृतीच्या माणसांना गाण्याची, वाद्याची, हंसण्याची, मृगयेची, भांडणें काढण्याची, प्रवासाची हौस असते. गोड, आंबट, खारट व उष्ण पदार्थ यांना फार आवडतात. त्यांना थंडी, थंडवारा, पाऊस आवडत नाहींत. शैत्याचा ते द्वेष करितात.

हीं माणसें लवकर रागावतात तशींच लवकर शांत होतात. त्यांच्या अंगांत मत्सर भरलेला असतो. त्यांच्या स्वभावाला निश्चितपणा नसतो. आपलीं मतें व विचार दृढ ठेवित नाहींत वारंवार बदलत असतात. त्यांच्या ताब्यांत त्यांचीं इंद्रियें राहूं शकत नाहींत. जितेंद्रिय नसतात. यांचा स्वभाव चोरटा, आर्यपणाला साजेल असा नसतो. हीं माणसें नास्तिक असतात. कोणताही विषय चटकन् त्यांच्या लक्षांत येतो. ग्रहणशक्ति चांगली असते. पण त्यांची स्मृती अल्प असल्यानें फारसें लक्ष्यांतही राहात नाहीं. हीं माणसें बलशाली नसतात. त्यांचें आयुष्यही फार नसतें. त्यांना जीवितसुखाचीं साधनें अल्प लाभतात. धनसंचय त्यांच्याजवळ फार नसतो. त्यांना स्नेही नसतात.

कुत्रा, उंट, गिधाड, उंदीर, कावळा आणि गाढव यांच्या प्रमाणें स्वरूप चेष्टानुकरण अशा प्रकृतींत आढळतें. रूक्ष, लघु, शीत, खर, चलादि गुण, त्यांच्या देहांत स्वाभाविक क्रियांत, नखशिखान्त ओतप्रोत भरलेले आढळतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

RASA, GUNA, VEERYA, VIPAK, PRABHAVA.

(*Continued from the last issue*)

THE GUNAS.

Although the 'dravya' (substance) is important, Ayurveda could not loose sight of the fact that after all the dravya could only act through its properties, and these latter could easily be classified—pharmacologically—into three important categories. Says Charaka (Soo. 1/67):

" Kinchit Dosha-prashamanam Kinchit Dhatu–pradooshanam Svasthavrittou matam Kinchit trividham dravyamuchyate: "

A free rendering of the above would be: " Some drugs will be found to be curative of the pathological processes in the body; some will be found to upset the normal reactions of the body and the third type of drugs will be found to be useful in maintaining the normal reactions of the body; "

[Students of modern sciences will find nothing exceptionable in this. They are accustomed to fight hyperacidities etc. by 'alkalies', they know of certain substances like the south American arrow poison, curare, which will bring on a condition of tetanic contractions of the skeletal muscles; Everyone is familiar with the action of opium on the respiratory centres, and they also know of the Proteins, Fats and Carbohydrates and the various Vitamines, which are essential to maintain bodily health. But the proteins.. the adequate and essential amino-acids..are not found isolated but are intimately mixed up in the molecules of some food–stuff and it should really be quite obvious to anyone that these food-stuffs could easily be classified according to this 'property' of theirs. To cite a very familiar example, physiologists have always classified the animal-proteins (i. e. milk, eggs, meat etc.) as more 'svasthakar' in comparison with those of 'pulses'. Ayurvedic literature is replete with the classification of the 'Shooka-dhanyas' or the 'Shimbi-dhanyas' (the cereals and pulses), and these classifications were very obviously based on the 'inherent' components of these substances and not on the fact whether the Shashti-shali or the Nishpava were 'hard', or 'soft', or whether the mango-juice and honey or milk were 'solids' or 'liquids'. But the 'Nyaya-Vaisheshika' commentators very unjustifiably used their 'own' jargon to explain the 'gunas' (properties) and somehow the thing 'stuck' to Ayurveda, no one having taken the pains to consider whether it could ever have been the intention of the original authors to say that the 'hardness and dryness' of the cereals (the shashtishli in particular,) could ever be considered to bring on the increase in the 'hardness and dryness' of 'Vata'. This very unfortunate and thoroughly unjustifiable mixing of the 'gunas' of the philosophy with the 'gunas' which were '*operative*' *although not apparent to the 'gross' senses*, resulted in the types of questions as were raised at the time the Sushruta-samhita, as available, was being compiled; (or interpolations were being made in it;) The 'sparshanendriya-gochara' gunas (properties as determined by the sense of touch) referred to above, as described by Charaka have, likewise, nothing to do with the operative gunas of the 'food' and 'oushadhi' dravyas.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

In the resultant confusion of terms such simple fallacies as the 'guru' 'laghu' having entirely different meanings when considered by using either the criterion of 'weight' (sparshanendriya-gochara) and when judged by the criterion of its easy or difficult 'digestibility,' were not taken any note of, and, in fact, *and what I personally have always considered as the most unfortunate thing of all*, even the 'Vata' 'Pitta' and 'Kapha' came to be considered as substances having the *properties*, respectively, of:

Vata : 'Rooksha, Laghu, Sheeta, Khara, Sookshma Chala; meaning dry, light, *cold*, hard, subtle and mobile;

(The 'philosophic' description of Vata is, 'neither hot nor cold'..'anushnasheeta' but this is apparently shelved for the moment; the pity is that while the argument for this shelving is blindly accepted, namely, "because the 'ushna' (hot) treatment is found to allay Vatic diseases, it is described as '*cold*', no attempt is made to apply the same principle to other 'gunas' (properties) of Vata, and the other Doshas.)

Pitta : Sasneha, Teekshna, Ushna, Laghu, Visra and Sara (purgative : ?) Drava; meening that it..the pitta..is slightly lipoid, penetrative, *hot*, light, foul-smelling, and 'fluid', that is n.obile, liquid.

Kapha : Snigdha, Sheeta, Guru, Manda, Shlakshna Mritsna, Sthir; meaning lipoid, cold, heavy, slow, smooth, pliable, yielding and immobile.

No attempt, again, being made to see whether and how far *substances* having such physical..attributes or properties *could* exist.

[Again, making a slight digression, I am inclined to state that this confusion is the result of the absence of 'analytical' thinking. If, as shown above, Vata was to be 'described' as cold, *because it was amenable to a hot treatment*, two things should have been immediately as plain as daylight. That there was every possibility of the other properties also having been determined by the same criterion, and if 'qualities' are to be *assigned* to a 'substance' because it responds in a particular manner to certain KNOWN (treatment) drugs or processes, then it was beyond dispute that these qualities were INFERENTIAL; And, further, when it could be easily proved that,

(a) *substances* having the *qualities* described are not actually procurable, and.

(b) substances which have some of the characters described do not possess the rest of them, (for example, you can have many foul smelling discharges from the body but these will not be 'ushna' in character, and can be '*gross*' *not* '*subtle*'. then it should easily have pointed the way to the recognition of the Vata, Pitta and Kapha as 'processes' in the body *which resulted* in the production in the body of substances having 'gunas' which were classified as above, and given the name as the 'gunas' of the Dosha.]

Indeed one will find in Charaka a definite statement that since the basic principle of Ayurveda is that similars will increase similars and decrease dissimilars, and since the 'rooksha-laghu-sheeta-daruna (i. e. chala) khara, etc. dravyas (i. e. substances) are found to show derangement in the 'normal' Vata (Va-Motion, therefore 'normal' motions and impulses of all kinds) and since the opposites, snigdha etc. showed that 'abnormal' 'motions' were allayed by them, *therefore*, VATA should have had these

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'properties'. (Ch. Sootra 2/7) There is also the very famous statement of Charaka that there are certain individuals who are from 'Conception' possessing of a bias for the *processes*..I say this advisedly...of Vata, Pitta or Kapha; only a few show that all the 'processes' in them are *as they should be*, (SAMA;)

[I emphasize that सम 'Sama' should always have been translated as 'proper' or 'normal' and not in equal proportion or quantity. Innumerable instances can be given to show that the 'quantitative interpretation of SAMA is untenable. What does a SAMA Agni mean for instance? Has Agni too a 'substantiality'? And if it has, will our Ayurvedists be able to *prove* that this substantial AGNI will be either (i) topsy-turvy or impredictable: VISHAMA (immesurable?); (ii) penetrative or having a greater acidity: TEEKSHNA; or (iii) 'Inhibited' and 'slow' MANDA when either the Vata, Pitta or Kapha predominate in the body? The 'Agni' is supposed to determine the nature of the 'Doshas' and it is itself dependent on the character of these which is 'inherited'! The whole thing, as at present understood, is so palpably confusing, that nothing but dogma or/and ignorance could sustain it.) These processes are disturbed in the case of most, the latter being always, 'possessing of disease' (ATURA) in the technical or perfectly physiological sense. This statement is consistent when the interpretation of Vata—Pitta–and Kapha as certain Bio–chemical or Bio–physical processes affected by substances produced in food or through environment, is accepted. But, as I have said above, a lack of analytical thinking has not only resulted in a deplorable mis-understanding but whole teams of research–scholars are supposed to be employed not in finding out whether the statements in Ayurvedic Text–books regarding substances having good or bad actions on these processes are verifiable, but in searching for some 'mysterious infinitesimal (non-existent!) moieties' by "all possible blood-examinations"! No one seems to be concerned with the explicit statements which show that even when 'Doshas', which may be substantial, are produced in the body they remain at the places where they are produced..Amashaya, etc..and can only 'enter' the body by Vyay-ama, (dilatation of or greater absorbability of cells) Ahitachar-sevan (improper 'behaviour') what may be translated as 'exposure') or extremely acute penetrability of the 'Ushma'; These two statements that there are *substances* (?) which are present from birth with a particular 'bias' *and they* are *produced* everyday (of the same bias?) should really have set any discerning student thinking. But accustomed to consider 'Apta–Vakya' as infallible this fallacy was made permanent by explaining it away by saying that "although the Vata–Pitta–Kapha have different *properties* themselves, they do not affect or kill each other by these: *Because* they have an 'immunity from birth', just as the serpent is not 'killed' even by his (own) potent poison"!

"Virudhdhairapi na twete gunairghnanti parasparam Doshaha sahaja–satmyatwat wisham ghoram aheen iwa"

Fortunately for the furture of Ayurveda, this, statement, mostly interpolated, can be proved to be erroneous. Firstly, the whole body of the serpent has no poison stored in

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

it. Nor can it be said that if the poison were injected into the serpent itself it would not kill it. (Modern scientific Medicine has proved that the 'ketone' bodies which are produced by man himself, become abnormal in action because they cannot be further oxidised, and can cause very serious disease). Nor can these Doshas be called "Sahajas" (present from birth), if the above view that they are 'produced' in the body every day is to be accepted. In conclusion, therefore, I would like to state that the "Sahaja-Doshas..actually Tridhatus..are the 'capacities' for the equable conduction of 'processes' of—

(i) storage of energy..endothermic reactions and polymerization..KAPHA, which is therefore described as SHEETA.

(ii) oxidative or hydrolytic processes.. exothermic reactions..PITTA, described as 'Ushna' (tapanat) and,

(iii) the electronic configurations of the arrangement of the different molecules going to form the reactions which when associated with the former type of reaction 'produce' body-proteins or substances, and help KAPHA while when they are associated with the other kind of reactions..as in digestion or katabolism..produce 'heat'; This is a perfectly consistent rendering of the VATA, PITTA and KAPHA and beautifully explains how the VATA is described as "Param yogavahaha" (predominently stimulating the reaction with which it is used) bringing on polymerization as well as hydrolysis.

Again when the reactions are 'Normal' (or equable) the KAPHA, PITTA and VATA are said to be "SAMA," but when these reactions are disturbed, from birth, the individual will be found to be of a 'thinly-built' or 'obese' type or a very irritable or nervous type where the 'impulses' are easily spread into either this or the other channel. This kind of arrangement explains the "DOSHA PRAKRITAYAHA", but when the body 'produces' substances which result in one or the other type of reaction being 'ABNORMAL' (DOSHA) then we get the 'scratching' of Kapha or the 'burning' of Pitta, and the 'pain' of Vata.

I would, therefore like the Charcha-Parishada to consider this proposition in the light of facts mentioned and once for all resolve that the 'gunas' of the 'Dosha's (an absurd combination if put to the test) as described, do not belong to obtainable substances but are 'gunas' apparent in the body-tissues from which to infer what kind of reaction is predominently powerful in a given individual.]

If this view is accepted it will be seen that the 'Gunas' in Ayurveda are those which 'ultimately' are going to be exhibited in the 'body' of the individual. Modern science tells one that the proteins of the rough or smooth hair, the transparent cornea and of the smooth secretion of the mucous glands which keeps a surface, 'lubricated' are all produced from 'amino-acids' taken from food, and that brittle hair or alopecia Xerophthalmia, or dryness of the mucous membrane, are failures of normal processes to produce specific proteins :

Let us therefore, determine that it is not the 'solidity' of the Chocha-Mocha-Kharjura (Cocoa-nut, Plantain and Dates) which increases the 'udakatmakam karyam' (stimulation of reactions of polymerization and storage of energy), but the 'gunas' like 'lipidity' which were converted into the body

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

into 'sheeta' The 'physical' hardness or softness has nothing much to do with the 'ultimate' gunta as exhibited in the body tissues.

I must however also mention that one cannot say that the 'physical properties' need not at all be considered.

Indeed these 'physical properties' of certain 'inert' substances may, if the substances having these properties get entrance into the 'body', (as stated above by the word 'Pravrittihi') produce the greatest disturbance in the 'impulse' processes and subsequently in other grosser processes of the body Dr. Paul Seabra of Rio de Janeiro as quoted by Dr. V V Athalye in his 'Anaphylaxis and Homeopathy' in The Journal of Ayurveda Jan 1950 pp. 9–15 has pointed out the changes of physical and chemical constants of the colloids of the blood–plasma, and the variations in indices of flocculation, changes in the power of swelling, changes in pH values and variations in freezing point the 'Colloido-clastic disturbances' or the complete cardiac, nervous, glandular and thermic anarchy, which can be caused by ultra–microscopic granules or 'granules' of colloids, in a millionth part of a c. c. of blood serum; Particles of INERT substances like Lycopodium, starch or insoluble salts and metals, *when injected intravenously* (pravrittihi) may, according to him, cause a smilar colloido-clastic shock; If the colloids are of a sufficiently small size, they may not have any untoward action, but if they become of a size large enough to cause a 'mechanical irritation' of the sympathetic nerve terminations of the vascular endothelium they can bring on the 'COLLOIDO–CLASTIC SHOCK.'

To my mind these instances are almost a translation of the Ayurvedic doctrines : the 'gunas' are to be construed as the 'ultimate gunas' produced by the substance and exhibited through the body–tissues. If the substances are 'inert' their 'physical properties : gunas' will have no action; *The gunas therefore have an importance only when they are absorbed* through the Maha-srotas, bowel or are otherwise 'introduced' into the body. The guru laghu etc. are to be considered only in this sense.

(*To be Continued*)

जन्म हीच मृत्यूशीं दिलेली यशस्वी झुंज

तुम्ही जन्माला आलांत याचाच अर्थ असा कीं तुम्ही मृत्यूवर मात केली आहे ! कारण प्रतिवर्षी एक लक्ष पन्नास हजार बालकें जन्मतःच मृत्युमुखीं पडतात असें डॉ. जान डब्ल्यू. सिंपल्स आणि लिऑन जेप्पर्ट या होस्टन येथील बेलॉर युनिव्हर्सिटीच्या तज्ज्ञांचें मत आहे. या दीड लक्षांपैकीं एक लक्ष बालकें अकाली जन्मलेली अपुऱ्या दिवसांचीं असतात. गर्भवतींना पूर्ण नऊ महिने होण्यास सहाय्य करणें हा यावर उपाय आहे असें या तज्ज्ञांचें सांगणें आहे. सात महिने जरी पुरे होऊं शकले तरी बालकांच्या जीवनाची पंचवीस ते पन्नास टक्क्यांनीं शक्यता वाढते असें ते म्हणतात. (सायन्स डायजेस्ट : जुलै १९५२.)

—यूटोन हें अर्कशाला औषध गर्भवतीचे पूर्ण नऊ महिने भरण्यास सहाय्य करणारें अप्रतिम औषध आहे. त्यांत उदुंबरफलासारखी गर्भस्थापक औषधें आहेत. गरोदरपणीं यूटोन नियमित घेतलें तर अकालीं प्रसूतीचें भय रहात नाहीं. अश्वगंधा, शतावरी इ. औषधांचा यूटोनमध्यें समावेश असल्यामुळें गर्भाचें उत्तम पोषण होतें. यूटोन हा गर्भस्थापक, गर्भरक्षक व गर्भपोषक असा अनुभवसिद्ध औषधीकल्प आहे.

079433

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

079433

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

R. No B. 5225

अनुभवसिद्ध
अर्कशाला औषधें

युटोन
गर्भरक्षक, गर्भपोषक, शक्तिवर्धक

लोहिन
रक्तवर्धक, पौष्टिक, मेंदूस बलदायक.

वसंत मिश्रण
जीर्णज्वर, रक्तक्षीणता, क्षयांचीं पूर्व व प्रारंभिक लक्षणें याकरितां

शिशुजीवन
बालकांचा दमा, खोकला, अपचन, इ. विकारांवर गुणकारी व शक्तिवर्धक

स्तन्यशोधन
मातेचें दूध निर्दोष करणारा व दुग्धवृध्दिकर औषधीकल्प

आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा

हें मासिक श्री. **विश्वनाथ लक्ष्मण भागाशे**, यांनीं आदर्श मुद्रणालय, ३९५।५ सदाशिव, पुणें येथें छापलें व आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा येथें प्रसिद्ध केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Compiled
1999-2000

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar